# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूर शिक्षण केंद्र

सत्र–१ : पेपर क्रमांक SOE 003

# भारतातील ग्रामीण समाज

**(Rural Society in India)**

सत्र–२ : पेपर क्रमांक SOE 013

# भारतातील नागर समाज

**(Urban Society in India)**

**एम. ए. भाग–१ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१७
**सुधारित तृतीय आवृत्ती :** २०१९
एम. ए. भाग १ (सत्र १ व २) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-582-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ समाजशास्त्र समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  आर्टस्, कॉमर्स कॉलेज, नागठाणे,
  जि. सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**भारतातील ग्रामीण आणि नागर समाज**
**एम. ए. भाग–१ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१ घटक क्रमांक | सत्र–२ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. पी. एस. साळुंखे**<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर | १ | – |
| **डॉ. महादेव सुभेदार शिंदे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ | – |
| **प्रा. अरुण विठ्ठल पौडमल**<br>यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, कोल्हापूर | २ | – |
| **प्रा. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | ३, ४ | १, २, ३, ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे मी हार्दिक स्वागत करतो. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे सत्र पद्धतीनुसार एकूण आठ पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र १ साठी पेपर क्र. SOE 003 भारतातील ग्रामीण समाज व सत्र २ साठी पेपर क्र. SOE 013 भारतातील नागर समाज असा आहे. या पेपरमध्ये सत्र १ साठी चार व सत्र दोन साठी ४ एसे एकूण आठ अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना भारतातील ग्रामीण आणि नागर समाजाचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक श्री. अरुण पौडमल, डॉ. एम. एस. शिंदे, आणि श्री. पी. एस. साळुंखे यांना मनःपूर्वक धन्यवाद. समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, दूर शिक्षण केंद्राचे संचालक आणि केंद्रातील कर्मचारी यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**प्रा. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे**
संपादक
सेवानिवृत्त विभागप्रमुख, समाजशास्त्र (पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय,
सांगली.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

प्रभारी अध्यक्ष **– डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शिवाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र-१ : भारतातील ग्रामीण समाज** | |
| १. | ग्रामीण समाजाच्या अभ्यासाविषयीचे दृष्टिकोन | १ |
| २. | ग्रामीण सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप | २० |
| ३. | कृषक सामाजिक संरचना आणि परिवर्त | ४९ |
| ४. | ग्रामीण समाज आणि नियोजित परिवर्तन | ८९ |
| | **सत्र-२ : भारतातील नागर समाज** | |
| १. | नागर समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १२९ |
| २. | नगराच्या विकासाचे सिद्धांत | १४८ |
| ३. | नगरांचे व शहरांचे वर्गीकरण आणि नागरी प्रक्रिया | १५६ |
| ४. | नागरी समस्या, नगर नियोजन आणि विकास | १८५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१३-१४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**सत्र १ : घटक १**

# ग्रामीण समाजाच्या अभ्यासाविषयाचे दृष्टिकोन
# (Approaches to the study of Rural Society)

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन

१.२.२ आदर्शात्मक निर्देशांक दृष्टिकोन

१.२.३ रोस्टोचा पाच अवस्थांचा दृष्टिकोन

१.२.४ प्रसारणाचा दृष्टिकोन

१.२.५ मार्क्सवादी दृष्टिकोन

१.३ सारांश

१.४ स्मरणार्थ संज्ञा

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला -

- आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन समजावून घेता येईल.
- आदर्शात्मक निर्देशांक दृष्टिकोनाचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- रोस्टो या शास्त्रज्ञांनी मांडलेला पाच अवस्थांचा दृष्टिकोन विशद करता येईल.
- प्रसाराचा दृष्टिकोन सांगता येईल.
- मार्क्सवादी दृष्टिकोनाचे आकलन होईल.

## १.१ प्रस्तावना :

या ग्रंथात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास करणार आहात. ग्रामीण समाजाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करीत असताना सर्वप्रथम या समाजाच्या अभ्यासासाठी विद्वानांनी जे विविध दृष्टिकोन मांडलेले वा स्वीकारलेले आहेत त्यांचा परिचय करून घेणे उचित ठरते. या विविध दृष्टिकोनातून ग्रामीण समाजाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हास ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होईल.

## १.२ विषय विवेचन :

ग्रामण समाजाविषयीचे दृष्टिकोन समजावून घेताना विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे पाच विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन, दुसऱ्या स्वरूपात आदर्शात्मक-निर्देशांकाचा दृष्टीकोन, तिसऱ्या विभागात रोस्टोंचा पाच अवस्थांचा दृष्टिकोन, चौथ्या विभागात प्रसाराचा दृष्टिकोन तर पाचव्या विभागात मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्ट केलेला आहे.

वैज्ञानिक पद्धतीने ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारी ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक विशेष शाखा म्हणून ओळखली जाते. या शाखेचा विकास, मुख्यत: २० व्या शतकामध्ये आणि दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी अमेरिकेमध्ये झाला. १९५० नंतर अशा स्वरूपाचा अभ्यास जगातील इतर राष्ट्रांच्यामध्ये होऊ लागला. ग्रामीण समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करीत असताना, ग्रामीण समाजातील प्रमुख सामाजिक संस्था व संघटना आणि त्यांचा परस्परसंबंध, ग्रामीण समस्या तसेच ग्रामीण सामाजिक संस्थांचा नागरी समाज आणि एकूण समाजव्यवस्थेशी कशा स्वरूपाचा संबंध असतो या विषयीचा अभ्यास करताना परिस्थितीशास्त्रीय (Ecological) सांस्कृतिक (Cultural) आणि वर्तनात्मक (Behevioural) दृष्टिकोनातून ग्रामीण समाजाचे अध्ययन होत असते. लोकसंख्यात्मक विश्लेषणातून ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यासाला विशेष महत्व आहे. कांही ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक इतर सामाजिक शास्त्रांत ग्रामीण समाजाचे अध्ययन करतात. उदा. मानवी भूगोल मध्ये (Human Gerogaphy) ग्रामीण वस्तीस्थानांचा (Settelement Patton) अभ्यास होतो तर अर्थशास्त्रामध्ये, ग्रामीण शेती व्यवसायाचा अभ्यास होतो.

समाजशास्त्रीय अभ्यासात ज्यावेळी ग्रामीण समाजाचा अभ्यास होतो त्या वेळी -

अ) ग्रामीण समाज जीवन हा एक स्वतंत्र अभ्यास घटक म्हणून विचारात घेतला जातो.

ब) ग्रामीण समाजांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो.

क) ग्रामीण समाजातील पर्यावरण, कुटुंब पद्धती, सांस्कृतिक व्यवस्था, ग्रामीण व्यक्तींचे वर्तन आणि इतर सामाजिक घटनांचा अभ्यास होतो.

ड) ग्रामीण सामाजिक परिवर्तनाचाही अभ्यास केला जातो.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये जवळपास ६ लाखपेक्षा जास्त खेड्यांची संख्या आहे. जातीव्यवस्था, ग्रामपंचायत आणि संयुक्त कुटुंबपद्धती या प्रमुख सामाजिक संस्था, परकीय आक्रमणामुळे आणि त्यांच्या समाज अंतर्गत असणाऱ्या अंतर्गत दुही मुळे नष्ट न होता अजूनपर्यंत टिकून आहेत. परंतू काळाच्या ओघात त्यांनी काही नवीन सामाजिक आणि सांस्कृतिक आव्हाने स्वीकारली असल्यामुळे, येणाऱ्या नवीन परस्थितीशी समायोजन करीत त्या वाटचाल करीत आहेत.

या घटकात तुम्ही ग्रामीण समाज, ग्रामीण विकास याबाबतचे विविध दृष्टिकोन समजावून घेणार आहात.

### **१.२.१ आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन** (Modernization Approach)

आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन समजावून घेताना प्रथम आधुनिकीकरणाचा अर्थ समजावून घेऊ. १) आधुनिकीकरण ही एक आर्थिक विकासाप्रमाणे असणारी सामाजिक प्रक्रिया असून, तिच्या काही अटी, नियम आणि परिणाम आहेत. २) आधुनिकीकरण ही एक सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया आहे. अनेक अभ्यासक या संकल्पनेचा अर्थ 'विकास' (Development) या संकल्पनेशी जोडतात. मात्र या दोन्ही संकल्पना भिन्न अर्थाने अभ्यासतात. ३) आधुनिकीकरण ही संकल्पना डॅनियल लर्नर यांनी सर्वप्रथम मांडली असून त्यांच्या मते आधुनिकीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. तर 'विकास' संकल्पनेमध्ये आर्थिक घटकाला विशेष स्थान आहे. ४) काही अभ्यासकाच्या मते, मानवी संस्कृतीमध्ये बदल घडवून आणणारी आधुनिकीकरण ही प्रक्रिया असल्यामुळे, मानवी वर्तन आणि सांस्कृतिक घटकांच्याद्वारे घडून येणाऱ्या परिवर्तनाला आधुनिकीकरणात विशेष महत्व दिले जाते.

ग्रामीण समाज व ग्रामीण विकास याबाबतचा आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन समजावून घेताना भारतासारख्या विकसनशील समाजातील ग्रामीण सामाजिक संस्थावर आधुनिकीकरणाचा जो सकारात्मक व नकारात्मक प्रभाव पडला याचा विचार प्रामुख्याने केला जातो.

- **आधुनिकीकरण आणि ग्रामीण सामाजिक संस्था :**

आधुनिकीकरण या दृष्टिकोनातून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना ग्रामीण समाजातील कृषी व्यवसाय व त्याच्याशी संलग्न असणारे व्यवसाय, तसेच जातीसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, आरोग्यव्यवस्था इत्यादीमुळे घडून आलेले परिणाम अभ्यासले जातात. त्याचबरोबर जमीन सुधारणा कार्यक्रम व हरित क्रांती यांच्यामुळे झालेले परिवर्तनही अभ्यासले जाते. याशिवाय औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि अलिकडेच सुरू झालेल्या जागतिकीकरण व उदारिकरण या प्रक्रियांचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणामही विचारात घेतला जातो.

- **आधुनिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन :**

आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास करण्याची प्रक्रिया मुख्यत: अमेरिकेसारख्या देशात रचनात्मक कार्यात्मक सिद्धांताला एक पर्याय म्हणून ओळखली जात होती. कारण, अमेरिकन समाजशास्त्रामध्ये रचनात्मक-कार्यात्मक सिद्धांताचा प्रभाव असल्याने सामाजिक परिवर्तनाच्या घटकाकडे दुर्लक्ष झाले होते. अशा वेळी वेगवेगळ्या विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण समाजात घडून येणाऱ्या बदलांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन महत्वाचा समजला जातो. भारतामध्ये समुदाय विकास योजना, दारिद्र्य निर्मूलन विषयक योजना, इंदिरा आवास योजना, रोजगार हमी योजना, इत्यादी सारख्या विकास कार्यक्रमातून ग्रामीण समाजात घडून आलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपाच्या परिणामांचा अभ्यास या दृष्टिकोनामध्ये अभ्यासला जातो.

- **आधुनिकीकरण संकल्पनेचा अर्थ आणि ग्रामीण परिवर्तनाचे वास्तव स्वरूप :**

आधुनिकीकरण प्रक्रियेचा अर्थ जाणून घेत असताना, या प्रक्रियेची सुरूवात आणि शेवट कशा स्वरूपाचा आहे हे जाणून घेवून, भारतातील ग्रामीण समाजातील परिवर्तनाची दिशा आणि स्वरूप विचारात घेतली पाहिजे. कारण आधुनिकीकरणात 'बदल' ही प्रक्रिया अंर्तभूत असली तरी, औद्योगिकरणापासून ते आजच्या जागतिकीकरणासारख्या प्रक्रियांचा परिणाम म्हणून, ग्रामीण भागात घडून येणाऱ्या भूत आणि वर्तमान कालीन परिस्थितीमध्ये घडून आलेल्या बदलांचे विश्लेषण महत्वाचे मानले जाते. हरित क्रांती, औद्योगिकरण यासारख्या प्रक्रियांचा परिणाम म्हणून सुरूवातीच्या कालखंडात ग्रामीण समाजात घडून आलेल्या परिवर्तनाचे स्वरूप आणि अगदी अलिकडच्या कालखंडात जागतिकीकरण व खाजगीकरणामुळे, संगणकीकरणामुळे, खेड्यांमध्ये घडून येणाऱ्या बदलांचे स्वरूप पूर्णता भिन्न स्वरूपाचे कसे आहे तसेच ग्रामीण धर्म, शिक्षण, अर्थव्यवस्था, जातीव्यवस्था इ. सारख्या सामाजिक संस्थाच्या मध्ये पाश्चिमात्त्यकरणामुळे घडून आलेल्या बदलांपेक्षा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आधुनिककरणांमुळे घडून आलेले बदल हे कशा वेगळ्या स्वरूपाचे आहेत याचा आढावा घेतला जातो.

- **उत्क्रांती आणि आधुनिकीकरण यांच्यातील साम्य :**

आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना सामाजिक बदलांचे स्वरूप विचारात घेतले जाते. परंतु घडून आलेल्या बदलांचे विश्लेषण कशा स्वरूपाचे आहे हे जाणून घेताना मुख्यतः आधुनिकीकरण म्हणजे पारंपरिकता आणि आधुनिकता या दोन्हींच्या मधील असणारा भेद या संकल्पनेच्या विश्लेषणातून दाखविण्याचा प्रयत्न होत असतो. तसेच सामाजिक बदलांचे स्वरूप म्हणून वेगवेगळ्या अवस्थांच्यामधून समाजाची होत गेलेली प्रगती या अर्थाने ग्रामीण समाज एका विशिष्ट अवस्थांमधून कशा प्रकारे विकसित होत गेला या बद्दलचे विश्लेषण १९ व्या शतकातील सामाजिक विचारवंतानी त्यांना अपेक्षित असणाऱ्या बदलांचे स्वरूप स्पष्ट करताना सामाजिक उत्क्रांतीच्या माध्यमातून वेगवेगळे मानवी समाज ग्रामीण समाज कशा प्रकारे उत्क्रांत होत गेले या संबंधी विश्लेषण केलेले आढळते.

- **पारंपरिकतेकडून आधुनिकीकरणाकडे होणारे ग्रामीण परिवर्तन :**

आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून ग्रामीण परिवर्तनाचे स्वरूप अभ्यासताना पारंपरिक ग्रामीण समाजाची आधुनिकीकरणाकडे बदल होण्याची प्रक्रिया, उत्तर अमेरिका, इंग्लंड, पश्चिम युरोपमध्ये शतकापूर्वी सुरू झाली होती व २० व्या शतकामध्ये या बदल होणाच्या प्रक्रियेला अधिक गती आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले होते. ग्रामीण समाजामध्ये घडून येणाऱ्या परिवर्तनाचे स्वरूप मुख्यत: सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे होते. अशा स्वरूपाच्या परिवर्तनामुळे ग्रामीण समाजरचनेमध्ये बदल घडून येणे, विशेषीकरणामध्ये वाढ होणे आणि सार्वत्रिक स्वरूपाच्या सामाजिक मुल्यांचा प्रभाव ग्रामीण समाज जीवनावर वाढणे इत्यादी बदल झाले. आधुनिकीकरणामुळे वर्तमान ग्रामीण समाजात घडून येणाऱ्या बदलांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**१) विज्ञान व तंत्रज्ञानामुळे झालेले बदल :**

आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव शेतीव्यवसायावर पडला. शेती करण्याच्या पारंपरिक पद्धतीवर परिणाम झाला. शेतीमध्ये आधुनिक यंत्रे व तंत्रे वापरली जाऊ लागली. त्यामुळे अनेक शेतमजूर बेकार झाले. त्यांनी रोजगाराच्या शोधार्थ शहराकडे स्थलांतर सुरू केले. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहरे व खेडी यांच्यातील संपर्क वाढला. त्यांच्यातील अंतर कमी झाले. शहरातील नागरी सुविधा खेड्यांमध्ये उपलब्ध होऊ लागल्या.

**२) नागरीकरणाचा ग्रामीण समुदायावरील परिणाम :**

अलिकडच्या काही दशकामध्ये नागरीकरण प्रक्रियेचा वेग, आधुनिक राष्ट्रांच्यापेक्षा, पारंपरिक राष्ट्रांमध्ये अधिक वाढलेला दिसतो. नागरीकरणाचा एक विपरीत परिणाम म्हणून ग्रामीण भागातील शेत जमिनी सारखी साधनसंपत्ती आणि शेती व्यवसाय यांच्यावर अतिरीक्त दबाव वाढत चालला आहे. शहरातील औद्योगिकरणामुळे शेतीवर काम कारणाऱ्या मजुरांच्या संख्येत घट होऊन शहरामध्ये नोकरी करणाऱ्या मजुरामध्ये वाढ होऊ लागली. ग्रामीण भागातून पूर्वी शहराकडे स्थलांतर करणाऱ्यांमध्ये पुरूषांचे प्रमाण अधिक होते. लिंग समानतेचा परिणाम म्हणून स्थलांतरामध्ये महिलांचे प्रमाणे देखील वाढत आहे.

**३) आर्थिक बाजारपेठा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम :**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असला तरी अलिकडच्या काही दशकामध्ये भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले आहे. शेती उत्पादनामध्ये विशेषीकरण होत गेले. उदा. पश्चिम महाराष्ट्रातील साखर उद्योग आणि अर्थव्यवस्था तर काही भागात कापूस उद्योग आणि अर्थ व्यवस्था, फळबाग आणि अर्थ व्यवस्था अशा विविध क्षेत्रामध्ये शेती व्यवसायाचे स्वरूप बदलत गेले. त्याचप्रमाणे स्थानिक शेती उत्पादनाचा थेट जागतिक बाजारपेठांशी संबंध निर्माण होऊ लागला.

### ४) नियोजनबद्ध स्वरूपातून घडवून आणले जाणारे ग्रामीण सामाजिक परिवर्तन :

जगातील सर्वच राष्ट्रे परस्परांच्या सहकार्याने, ग्रामीण समुदायामध्ये रचनात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी काही नियोजनबद्ध स्वरूपाच्या योजना हाती घेत आहेत. अशा योजनांच्या माध्यमातून रस्ते, वीज, दूरध्वनी सेवा, पाणी इ. सारख्या सुविधा खेड्याच्या पर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर शिक्षण आणि आरोग्यासारख्याक्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी विकसित राष्ट्रे अविकसित राष्ट्रांना मदत देत आहेत. थोडक्यात नियोजनबद्ध विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण समाजामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे.

### ★ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – १

१) ............... यांनी आधुनिकीकरणाची संकल्पना सर्वप्रथम मांडली.

२) ............... देशात रचनात्मक कार्यात्मक सिद्धांताचा प्रभाव आढळतो.

३) इंदिरा आवास योजना ................ विकास कार्यक्रम आहे.

४) आधुनिकीकरणाचे ग्रामीण समाजावरील ............... आणि ............... परिणाम विचारात घेतले जातात.

५) उत्क्रांती संकल्पनेचे .............. शी साम्य दर्शवले आहे.

### १.२.२ आदर्शात्मक निर्देशांकाचा दृष्टिकोन : (Ideal-Typical Approach)

आदर्शात्मक मापदंडाचा दृष्टिकोन म्हणजे अशा स्वरूपाचा विचार आहे की, ज्यामध्ये विकसित आणि अविकसित अवस्थेत असलेल्या समाजाची तुलना करताना, परस्परांचे विकास मापदंड (Index) वापरून त्या ठिकाणचा विकास किंवा परिवर्तन किती प्रमाणात यशस्वी झाले आहे याचा शोध घेतला जातो. या दृष्टिकोनानुसार भारतीय ग्रामीण समाजातील विकास आणि परिवर्तनाचे स्वरूप सर्व ठिकाणी एक सारखे नसून वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशातील ग्रामीण विकास आणि परिवर्तन हे परस्परांपासून कशा अर्थाने वेगळे आणि कमी जास्त प्रमाणात आहे याविषयी विकासाचे मापदंड (Index type) निश्चित केले जातात. ग्रामीण भागातील विकासाचे मापदंड निश्चित करण्याबाबतचे दोन प्रमुख मापदंड पुढील स्वरूपाचे आहेत.

### १) विकसित आणि अविकसित खेड्यांच्या सामाजिक–आर्थिक विकासाची तुलना :

आदर्शात्मक मापदंडाचा दृष्टिकोन अभ्यासताना ग्रामीण भागातील विकसित खेडी आणि अविकसित खेडी यांना अभ्यासाचा घटक समजून विकसित खेडी कशा अर्थाने व कोण–कोणत्या क्षेत्रात विकसित आहेत याचे निर्देशांक (Index) निश्चित केले जातात. उदा. विकसित खेड्यांतील शेती, शेती उत्पादने, शेतीसाठीच्या जलसिंचन याजेना, शेतीवर आधारीत उद्योगांचे प्रमाण, भौगोलिक घटकांच्यामुळे विविध विकास कार्यक्रमांना मिळणारा आधार, त्या ठिकाणच्या लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण, सामाजिक क्षेत्रात

मिळणारी संधी, शैक्षणिक आणि राजकीय विकासामुळे घडून आलेले परिवर्तन अशा विविध निर्देशांकाचा अथवा मापदंडाचा आधार घेवून त्यांची तुलना अविकसित खेड्यांशी केली जाते व त्या आधारावरती अविकसित खेड्यांच्यामध्ये कोण-कोणत्या क्षेत्रात विकास करण्याची आवश्यकता आहे व तो कशा प्रकारे होऊ शकतो याविषयी विकसित खेड्यांच्या मधील विकास निर्देशांक आदर्शम्हणून डोळ्यासमोर ठेवले जातात व अविकसित खेड्यांच्यामध्ये विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. सन २०१४ च्या भारतातील संसदीय निवडणूका दरम्यान, गुजराथ विकास मॉडेलची तुलना ज्या वेळी इतर राज्यांशी करून, गुजराथमधील विकासाचे मापदंड ठरवताना, ग्रामीण रस्ते, पिण्याच्या पाण्याची सुविधा, शेती आणि उद्योगासाठी उपलब्ध असणारी ऊर्जा कशा स्वरूपाची आहे व अशाच स्वरूपाच्या सुविधा भारतातल्या इतर राज्यांमध्ये का मिळू शकत नाहीत या बद्दलचा राजकीय मुद्दा या दृष्टिकोनाच्या आधारे अभ्यासता येतो. किंवा महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा या ठिकाणच्या शेतीच्या मागासलेपणामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण, पश्चिम महाराष्ट्रापेक्षा अधिक का आढळते अशा विविध प्रश्नांची सोडवणूक या अभ्यासाद्वारे करता येते. त्यामुळे भारतातील ग्रामीण विकासामध्ये असणारी असमानता कोणकोणत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय कारणांमुळे निर्माण होतो यासंबंधीचा खुलासा या दृष्टिकोनाच्या आधारे मिळविता येतो.

### २) विकास प्रक्रियेविषयीचा दृष्टिकोन :

विकास प्रक्रियेवर आदर्शात्मक निर्देशांक दृष्टिकोन, विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या मधील सांस्कृतिक भिन्नतेच्या आधारावर देखील स्पष्ट केला जातो. या दृष्टिकोनानुसार, पश्चिमेकडील विकसित राष्ट्रांची संस्कृती पाहिली असता, त्यांच्या जवळ असणाऱ्या ज्ञानाची उपलब्धता, वेगवेगळ्या क्षेत्रातील कौशल्य, त्यांच्या विविध स्वरूपाच्या जागतिक स्तरावर असणाऱ्या आर्थिक संघटना, त्यांच्याकडे असणारे तंत्रज्ञान आणि जगातील गरीब राष्ट्रांना देण्यासाठी उपलब्ध असणारे भांडवल इ. सारख्या घटकांचा विचार करता, विकसनशील राष्ट्रांपेक्षा विकसित राष्ट्रांमधील संस्कृती प्रगत असल्याने पाश्चात्य राष्ट्रांमध्ये आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो व ही विकसित राष्ट्रे जगातील विकसनशील राष्ट्रांच्यामध्ये आपली संस्कृती किंवा तंत्रज्ञान आणि इतर गोष्टी संक्रमित करतात. अशा सांस्कृतिक संक्रमणातून विकसनशील राष्ट्रांमधील विकास घडून येतो. या अर्थाने, भारतातील ग्रामीण विकास मुख्यत: पाश्चात्य संस्कृती द्वारे होत गेलेला आहे. ग्रामीण भारतातील शेती तंत्रज्ञान, शेतीमालाची आयात-निर्यात, अत्याधुनिक सुविधा, नवीन तंत्रज्ञान इ. क्षेत्रातील बदलांना मुख्यत: विकसित राष्ट्रांची संस्कृती कारणीभूत आहे. किंबहूना विकसित राष्ट्रांच्या मधील विकासाच्या कल्पना डोळ्यासमोर ठेवून किंवा त्यांचे विकासाचे निर्देशांक गृहित धरून ग्रामीण भारतातील विकासाचे स्वरूप निश्चित केले जाऊ शकते.

### ३) भविष्यातील विकासाचा अंदाज :

आदर्शात्मक निर्देशांकाच्या दृष्टिकोनानुसार विकसनशील राष्ट्रांमध्ये विविध क्षेत्रात किती विकास झाला यापेक्षा विकसनशील राष्ट्रांतील विकासाचे स्वरूप येत्या काही दशकात कशा स्वरूपाचे राहिल याबद्दलचा अंदाज व्यक्त केला जातो. कारण केवळ मापदंडाच्या आधारे विकासाचे स्वरूप जाणून न घेता, भविष्यात विकासामुळे घडून येणाऱ्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांचा अंदाजसुद्धा अभ्यासणे महत्वाचे ठरते. भारतातील ग्रामीण विकासाबद्दलचा आजपर्यंतचा आढावा घेता, पाश्चात्य विकासामुळे जेवढ्या प्रमाणात ग्रामीण समाज रचना बदलून गेली आहे त्यावरून भविष्यात ग्रामीण समाजरचनेच्या संभाव्य समस्यांची जाणीव अभ्यासकांना होऊ लागली आहे.

अशाप्रकारे आदर्शात्मक निर्देशांकाचा दृष्टिकोन, मुख्यत: विकसित (Developed) आणि (Under developed) विकसनशील राष्ट्रे यांच्यामध्ये असणाऱ्या विकासाचे मापदंड आणि आदर्श यांचे परस्परविरोधी विश्लेषण करून, विकसनशील राष्ट्रांच्या विकासांतर्गत असणाऱ्या त्रुटी, मागासलेपणा आणि स्वरूप, विकसीत राष्ट्रांच्या विकासाच्या मापदंडानुसार दूर करण्याच्या प्रयत्न होतो. या अर्थाने या दृष्टिकोनाचे स्वरूप अभ्यासताना हा दृष्टिकोन मुख्यतः मॅक्स वेबर (जर्मन समाजशास्त्रज्ञ) यांच्या 'आदर्शप्रारूप (Idea tpye)' या संकल्पनेतून विचारात घेतला आहे. समाजशास्त्र कोण-कोणत्या घटकांचा शास्त्रीय अभ्यास करू शकते. यासंबंधीचे विश्लेषण करताना मॅक्स वेबर यांनी 'आदर्श प्ररूप' ही संकल्पना मांडली या अर्थाने विकासाचे स्वरूप जाणून घेताना एक समाज दुसऱ्या समाजाला आदर्श समजून आपल्या विकासाचे स्वरूप आणि दिशा ठरविण्याचा प्रयत्न करतो.

त्याचप्रमाणे अमेरिकन समाजशास्त्रज्ञ टॉलकॉट पार्सन्स यांनी मानवी समाजरचनांचे स्वरूप स्पष्ट करताना दोन मानवी समाजाची तुलना करून समाजरचनांच्यामध्ये असणाऱ्या भिन्न-भिन्न सामाजिक घटकांचा अभ्यास केला आहे. त्याच धर्तीवर विकासाचे स्वरूप जाणून घेत असताना विकसनशिल आणि विकसित समाज यांच्यातील विकासाचे स्वरूप विचारात घेवून दोन्हींची तुलना केली आहे. अशी तुलना करताना या दोन्ही समाजामध्ये असणाऱ्या विकाससंबंधी असणारी समानता आणि विविधता विचारात घेवून विकसित आणि विकसनशील समाजातील विकासाची वैशिष्टे व त्यातील त्रुटी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचप्रमाणे आदर्शात्मक मापदंडाचा दृष्टिकोन आणि त्यांची मांडणी रोस्टोच्या विकास सिद्धांताशी मिळती जुळती आहे रोस्टोच्या सिद्धांतात विकास प्रक्रिया विविध अवस्थेतून जात असताना तिचे स्वरूप कसे बदलत असते याचे विवेचन आहे.

### ★ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न - २

१. ............ दृष्टिकोनामध्ये ग्रामीण समाजातील विकासाच्या मापदंडाचा अभ्यास होतो.

२. ग्रामीण भागातील ............ आणि ............. खेडी यांची तुलना आदर्शात्मक-निर्देशांक दृष्टिकोनात होते.

३. ग्रामीण समाजाचा भविष्यातील विकासाचा अंदाज ............. दृष्टिकोनात घेतला जातो.

४. 'आदर्श प्रारूप' संकल्पना ............ यांनी मांडली.

५. विविध राष्ट्रांच्यामधील विकासातील त्रुटींचा अभ्यास ............. दृष्टीकोनात केला जातो.

### **१.२.३ रोस्टोचा पाच अवस्थांचा दृष्टिकोन** (Rostov's five stages Approach) :

विकास (Development) केवळ एक आर्थिक प्रक्रिया नसून ती आर्थिक घटकांबरोबरच इतर काही 'बिगर-आर्थिक' घटकांच्यामुळे सुद्धा घडून येत असते. डब्लु. डब्लु. रोस्टो या अभ्यासकाने त्यांच्या 'विकास वाढीच्या सिद्धांताचे' विश्लेषण करताना सामाजिक आणि संस्थात्मक पातळीवर असणाऱ्या घटकांचा आधार घेवून विकाससंबंधीचे जे विश्लेषण केले त्याला 'रोस्टाचा पाच अवस्थांचा सिद्धांत' असे म्हणतात.

रोस्टोच्या मते विकास प्रक्रियेचा अर्थ स्पष्ट करताना, 'बिगरआर्थिक' घटकांच्या माध्यमातून (Non-economic factor) विकासाचे सांख्यिकी विश्लेषण देता येत नाही, परंतू अशा 'बिगरआर्थिक' घटकांच्या साहाय्याने विकासाचे होणारे विश्लेषण समाजाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी महत्वाचे असते. विकाससंबंधी विश्लेषण करणारे जेवढे म्हणून सिद्धांत आहेत, त्यामध्ये 'रोस्टो' यांनी सर्व प्रथम 'बिगर आर्थिक' घटकांच्या आधारे विकासाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, आर्थिक विकासाचे विश्लेषण करण्यासाठी, कोणत्याही समाजाची सामाजिक आणि संख्यात्मक रचना अथवा मांडणी कशा स्वरूपाची आहे शिवाय त्या समाजात असणाऱ्या लोकांच्या प्रवृत्ती (Attitude of the people) कशी आहे हे जाणून घेतल्या खेरीज विकासाचे खरे स्वरूप समजून येत नाही.

कार्ल मार्क्स सारख्या अभ्यासकाने आर्थिक विकासाचे विश्लेषण आर्थिक घटकांच्या आधारे करताना, सरंजामशाही, भांडवलशाही आणि समाजवाद या अवस्थांच्या मधून कशाप्रकारे विकास झाला याबद्दल मांडणी केली होती. 'आश्ले' या विचारवंताने उद्योगधंद्याचा विकास स्पष्ट करताना, घरगुती उत्पादन पद्धती, गिल्ड पद्धती आणि कारखाना उत्पादन पद्धत अशा अवस्था मधून विकास झाल्याचे स्पष्ट केले. रोस्टोनेही विकास विविध अवस्थांतून होतो हे स्पष्ट केले आहे.

- **रोस्टोच्या आर्थिक विकासाच्या पाच अवस्था :**

रोस्टोने आर्थिक विकासाच्या पुढील अवस्था सांगितलेल्या आहेत.

१) पारंपरिक समाज

२) समाजातील विकास सुरू करण्यापूर्वीची परिस्थिती

३) विकास प्रक्रियेची सुरूवात

४) परिपक्व विकासाकडे वाटचाल

५) लोकसंख्येतील उपभोक्त्यांचे प्रमाण

रोस्टो यांनी विकास प्रक्रियेचा अर्थ स्पष्ट करताना सामाजिक घटकांचा आधार घेऊन ग्रामीण समाजाचे विश्लेषण केले आहे.

**१) पारंपरिक समाज** (The traditional society) :

रोस्टोच्या मते, ज्यावेळी मानवी समाजातील तंत्रज्ञान मागासलेल्या अवस्थेत होते व विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास कमी होता, वैचारिक मागासलेपण होते त्यावेळी समाजाच्या मर्यादित गरजा साध्या साधनांच्या आधारे पूर्ण केल्या जात होत्या. औद्योगिक क्रांती होण्यापूर्वीच्या समाजांना पारंपरिक समाज म्हणून ओळखले जाते. पारंपरिक समाजात उत्पादनासाठी व्यापक शेतजमीन असुनसुद्धा अप्रगत तंत्रज्ञानामुळे शेती उत्पादनात वाढ होत नव्हती. शिवाय लोकांचा दृष्टिकोन वैज्ञानिक असण्याऐवजी दैववादी स्वरूपाचा होता. शेती हा प्रमुख व्यवसाय समजला जात होता. पारंपरिक समाजरचना श्रेणीरचनेवर आधारीत असल्याने, जमीनदार आणि सावकार या वर्गांचे वर्चस्व होते. या वर्गाकडे राजकीय सत्ता होती. हा वर्ग शेतसारा जमा करून, स्मारके, विवाह, मंदिरे इ. सारख्या अनुत्पादक प्रक्रियांवर खर्च करीत असे. परंतु त्यांच्यादृष्टीने अशा स्वरूपाचा खर्च निरूपयोगी नव्हता. समाजामध्ये आपले स्थान आणि दर्जा टिकून राहण्यासाठी त्यास महत्व दिले जात होते.

रोस्टोच्या मते, कोणत्याही समाजाची विकास प्रक्रिया समजून घेण्यासाठी त्या समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय संरचना अभ्यासणे आवश्यक असते. या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने भारतातील पारंपरीक ग्रामीण समाज रचनेचा अभ्यास केला तर, भारतामध्ये सुद्धा पारंपरिक ग्रामीण समाज, शेती व्यवसायावर अवलंबून होता. त्या ठिकाणी बलुतेदारी, जातीव्यवस्था आणि समाजरचना ही श्रेणीरचनेवर आधारित होती. शेतीवर आधारित जमीनदार, सावकार, बागायतदार असे वर्ग होते. मागासलेले शेती तंत्रज्ञान असल्याने केवळ कुटुंबचरितार्थासाठी उत्पादन घेतले जात होते. थोडक्यात पारंपरिक ग्रामीण समाजरचनेचा प्राथमिक अवस्थेत विकास घडून न येण्यास त्यावेळची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत असलेली.दिसते.

**२) विकास सुरू होण्यापूर्वीची सामाजिक पार्श्वभूमी :**

रोस्टोच्या मते, विकासाची दुसरी अवस्था म्हणजे स्थित्यतरांचा कालखंड समजला जातो. या अवस्थेत पारंपरिक समाजरचनेतील आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरूपाचे परिवर्तन घडून येत असते. या कालखंडात आर्थिक प्रगती, शिक्षण प्रसार, आर्थिक व बौद्धीक विकास घडून येण्यास मदत होत असते. या कालखंडात नवीन उद्योजक नफा मिळवण्याच्या उद्देशाने नवनवीन व्यवसाय सुरू करतात. बँकांच्या भांडवलामध्ये वृद्धी

होते. आयात-निर्यात वाढते गुंतवणूकीला पोषक वातावरण तयार होते की जे पारंपारिक समाजातील आर्थिक-सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी पोषक ठरते. रोस्टोच्या मते या अवस्थेमध्ये विकासाला गती आणण्याच्यादृष्टिने विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये प्रगती, समाजातील व्यक्तींच्या मधील वैज्ञानिक दृष्टिकोन, वाहातूक आणि दळणवळण, शेती उत्पादनामध्ये वाढ, बाजारपेठा आणि व्यापार इत्यादीत वृद्धी होणे आवश्यक असते. भारतातील ग्रामीण समाजाच्या संदर्भात या दृष्टिकोनातून विचार केला तर स्वातंत्र्य प्राप्ती नंतर हरित क्रांती (Green revolution) मुळे विकास प्रक्रियेला वेग मिळाला. परंतु औद्योगिक विकासाला खऱ्या अर्थाने १९९१ च्या जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर चालना मिळाली. शेती व्यवसायाला जागतिक बाजार पेठ मिळाली. आयात-निर्यात वाढली. परंतु आर्थिक प्रगती इतकी प्रगती सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात घडून आलेला दिसत नाही. राजकीय वर्चस्व, जातीयता अजूनही ग्रामीण भागात दिसून येते. त्यामुळे रोस्टोचा सिद्धांत या ठिकाणी काही प्रमाणात खरा ठरतो.

**३) विकास प्रक्रियेची सुरुवात :**

रोस्टोच्या विकास अवस्थांच्यामध्ये पहिली अवस्था ही दुसऱ्या अवस्थेला मार्गदर्शक किंवा चालना देणारी असते. त्यामुळे विकासाची एक अवस्था दुसऱ्या अवस्थेला पूरक ठरते तर दुसरी अवस्था तिसऱ्या अवस्थेला पूरक ठरते आणि शेवटी अर्थव्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या इतर घटकांना देखील चालना मिळत गेल्याने ती अर्थव्यवस्था स्वबळावर विकसित होत असते. रोस्टोच्या मते, अशा स्वबळावर विकसित झालेल्या आर्थिक विकासाची सुरुवातीची अवस्था असे म्हणतात किंवा औद्योगिक क्रांतीचा कालखंड म्हणून सुद्धा ही अवस्था ओळखली जाते. उद्योगधंद्याच्या विस्तारामध्ये वाढ होते. रोजगार संधी वाढतात. शेती उत्पादनाला मागणी वाढते. त्यामुळे ग्रामीण विकास घडून येतो. उत्पादनाच्या नवनवीन क्षेत्रांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर वाढत जातो. शेतीचे व्यापारीकरण होते. सामाजिक-राजकीय व्यवस्थेमध्ये बदल घडून येतो.

उद्योगधंद्याचा विकास आणि त्याचा समाज जीवनावरील परिणाम विचारात घेतल्यास भारतातील ग्रामीण समाजरचनेवर झालेला परिणाम या दृष्टिकोनातून पाहता येतो. सामाजिक जीवनात संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होत गेले. शेतीचे व्यापारीकरण झाले. खेड्यांमध्ये राजकीय वर्चस्व वाढले. खेड्यातील शेतजमीन, पाणी, जंगल आणि इतर स्वरूपाची साधन संपत्ती ही वाहतूक, दळणवळण, उद्योगधंदे यांच्यामुळे धोक्यात आली. शहरातील रोजगार संधी वाढली. अशाप्रकारे भारतामध्ये शहरातील औद्योगिकरणामुळे ग्रामीण विकास झाला असला तरी, ग्रामीण समाजात सामाजिक समस्या आणि विकासाचे विपरीत परिणाम दिसून येवू लागले आहेत.

**४) परिपक्व विकासाकडे वाटचाल :**

रोस्टोच्या मते या अवस्थेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात साधनसंपत्तीचा वापर केला जातो. या अवस्थेमध्ये औद्योगिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून येत असल्याने, जुन्या उद्योगाची

जागा नवीन उद्योग घेतात. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. ग्रामीण भागात शेतीउद्योगावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येमध्ये घट होऊन औद्योगिक क्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण वाढते. पारंपारिक सामाजिक संस्था आणि सामाजिक मूल्यांची जागा, नवीन सामाजिक संस्था व मूल्ये घेतात. अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होते. नागरीकरणाचे प्रमाणे वाढते शहरातील रोजगार आणि मिळणारे वेतन यामुळे ग्रामीण भागातील अकुशल (Unskilled) रोजगाराचे प्रमाण कमी होऊन शहरातील कुशल (skilled) रोजगाराचे प्रमाण वाढते. त्यामुळे रहाणीमान आणि सवयी बदलतात.

या अर्थाने विचार करता सद्यस्थितीला, भारतातील ग्रामीण समाजरचना या अवस्थेत आढळतो. भारतात नागरीकरणाचे प्रमाण वाढल्याने, शेतीमधील रोजगारीचे प्रमाण घटले आहे. पारंपरिक जातीसंस्था, कुटुंब, विवाह, धर्म, यांच्याशीसंबंधीत असलेल्या सामाजिक मूल्यांची जागा नवीन सामाजिक मूल्याने घेतली आहे. त्यामुळे रोस्टोचा सिद्धांत या ठिकाणी ग्रामीण अभ्यासासाठी लागू पडतो.

**५) लोकसंख्येतील उपभोक्त्याचे प्रमाण वाढते :**

रोस्टोच्या मते, ज्यावेळी एखाद्या समाजातील परिपक्व झालेली अर्थव्यवस्था नंतरच्या अशा अवस्थेमध्ये जाते की, ज्यामध्ये त्या समाजातील व्यक्ती औद्योगिकीकरणातून झालेल्या विकासाचे सर्व लाभ मिळवून झाल्यानंतर समाजातील जास्ती-जास्त लोकसंख्येपर्यंत विकासाच्या संधी पोहचवण्याचा प्रयत्न होतो. त्यामधून लोककल्याण आणि सुरक्षितता अधिक विचारात घेतली जाते. काही समाज इतर समाजांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. समाजकल्याणाचा हेतू डोळ्यासमोर ठेवून मुक्त शिक्षण, आरोग्यविषयक सुविधा देण्याचा प्रयत्न करतात. केवळ अन्न, वस्त्र, निवारा या सारख्या मूलभूत गरजांच्या ऐवजी चांगल्या प्रतीची निवासस्थाने, मूलभूत सुविधा, आकर्षक दरात वाहानांची उपलब्धता, चैनीच्या वस्तू इ. देण्याचा प्रयत्न होतो.

या अर्थाने विचार करता, भारतामध्ये आज ग्रामीण भागातील लोकसंख्येसाठी विविध स्वरूपाच्या योजना हाती घेतल्या जात आहेत. शिवाय 'रिलांयन्स फौंडेशन'' यासारख्या योजने अंतर्गत काही खेड्यांच्यामध्ये आरोग्यसुविधा व शिक्षण देण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु भारतातील एकूण ग्रामीण समाजाचा विस्तार आणि आकार विचारात घेता या प्रकारची विकास प्रक्रिया सर्वत्र आढळून येत नाही.

**★ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न - ३**

१. रोस्टोच्या सिद्धांतामध्ये .............. घटकांचा आधार घेवून विकासाचे विश्लेण केले आहे.

२. ............. समाजात लोकांचा दृष्टिकोन दैववादी स्वरूपाचा होता.

३. विकासाच्या .............. अवस्थेत साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर होतो.

४. ............ च्या मते आर्थिक विश्लेषणासाठी, मानवी प्रवृत्तींच्या विश्लेषणाची आवश्यकता असते.

५. ................ समाजाला औद्योगिक क्रांती पूर्वीचे समाज म्हणून ओळखले जाते.

### १.२.४ प्रसाराचा दृष्टिकोन (Diffussion Approach) :

Diffussion या इंग्रजी संज्ञेचा अर्थ 'विस्तार' अथवा 'प्रसार' असा आहे. परंतु एक दृष्टिकोन म्हणून विस्तार ही संज्ञा ज्यावेळी सामाजिक शास्त्रामध्ये अभ्यासली जाते, त्यावेळी एक वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणून 'विस्तारवादी' या संकल्पनेचा अभ्यास अनेक विद्याशाखांच्यामध्ये केला जातो.

समाजशास्त्रामध्ये, सामाजिक स्तरावर घडून येणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिये सारख्या घटनांना उद्देशून विस्तार अथवा परिवर्तन ही संज्ञा वापरली जाते. उदा. जर्मनीतील एक अभ्यासक विचारवंत 'जॉर्ज सिमेल' यांनी 'व्यक्ती' हा अभ्यासाचा केंद्रबिंदू मानून व्यक्तीचे विचार आणि कृती परस्परांना कशाप्रकारे प्रभावीत करतात या विषयी मांडणी केली. समाजातील परिवर्तन अथवा बदलांचा परिणाम होत असताना व्यक्ती कशाप्रकारे नवीन परस्थितीशी समायोजन साधतात आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये व्यक्तीचा सहभाग कशाप्रकारे असतो या संबंधीचा विचार विस्तारवादी दृष्टिकोनात होतो. समाजशास्त्रामध्ये विस्तारवादी दृष्टिकोनांतर्गत ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे होणारे स्थलांतर व शहरांतून खेड्यांच्यामध्ये प्रसारीत होणाऱ्या फॅशन, भाषा आणि उत्पादित वस्तू यांचा खेड्यांतील लोकसंख्येवर होणारा प्रभाव आणि विस्तार यांचा अभ्यास होतो.

अमेरिकेतील अभ्यासक 'ब्रेसी रेयान आणि नेल ग्रॉस' या दोघांनी एका शोधनिबंधामध्ये शेतीवर आधारीत दोन समुदायाचा अभ्यास करताना विस्तारवादी दृष्टिकोनाचा अवलंब करून सामाजिक परिवर्तनाचा 'व्यक्ती' हा कसा केंद्रबिंदू ठरतो हे स्पष्ट केले. त्यानंतर ग्रामीण समाजशास्त्रामध्ये या दृष्टिकोनाला प्रमुख मानून ग्रामीण समाजिक परिवर्तनाच्या अभ्यासाला विशेष महत्व दिले जाऊ लागले.

ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक इरर्व्हट रॉर्जस यांच्यामते, ग्रामीण समुदाय म्हणजे एक प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास असतो. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या कुटुंबामध्ये त्यांचे वडील शेती व्यवसायामध्ये पारंपरिक पद्धतीचा अवलंब करताना नवनवीन शेती तंत्रज्ञानाचा वापर करत नसल्याने कशाप्रकारे दारिद्र्याच्या समस्येला सामोरे जावे लागले आणि शेवटी ही दारिद्र्य अवस्था देखील त्यांना त्या परिस्थितीमधून बाहेर पडण्यास कशी उपयुक्त ठरली हे स्पष्ट केले आहे. ग्रामीण समाजशास्त्र, ग्रामीण समाजांतर्गत असणाऱ्या वेगवेगळ्या समुदायांमधील परस्परसंबंधाचा अभ्यास करते. विस्तारवादी दृष्टिकोनाचा अवलंब करण्याऱ्या अभ्यासकांच्या मते, वेगवेगळ्या समुदायांअंतर्गत असणाऱ्या व्यक्तींच्या मधील परस्परसंबंधाचा परिणाम म्हणून ग्रामीण समाजात स्थिरता, नियंत्रण आणि नवनवीन स्वरूपाच्या विचारप्रणाली निर्माण होत असतात. विस्तारवादी दृष्टिकोनातून अशा प्रकारच्या स्थिर ग्रामीण समुदायामध्ये कशाप्रकारे गतिशीलता निर्माण होत असते म्हणजेच, विस्तारवादी दृष्टिकोनातून ग्रामीण समुदायात घडून येणाऱ्या परिवर्तनाचा अभ्यास केला जातो. अशा स्वरूपाच्या अभ्यासात ग्रामीण समाजातील, वेगवेगळे समुदाय आपल्या स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यासाठी कशाप्रकारे सक्षम असतात तसेच, समाजातील श्रीमंत वर्ग

आपल्या जवळ असणाऱ्या भांडवलच्या आधारे इतर दारिद्र्यरेषेखालील समुदायापेक्षा कशा प्रकारे प्रगती करीत राहातो यांचा अभ्यास या दृष्टिकोनामध्ये होतो.

ग्रामीण समाजाचा विस्तारवादी दृष्टिकोनातून अभ्यास करताना मुख्यतः ग्रामीण समाजात शेती व्यवसायाचा विस्तार कसा होतो, सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षणातील नवनवीन उपक्रम इ. घटकांना प्रमुख समजले जाते. अमेरिकेमध्ये १९५० ते १९७० या कालखंडात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. त्यावेळी, अशास्वरूपाचा बदल घडवून आणण्यामध्ये प्रशासकीय क्षेत्रातील अधिकारी हे सामाजिक कार्यकर्ते, आरोग्य अधिकारी आणि शिक्षक यांच्या माध्यमातून विस्तार घडवून आणण्याचा प्रयत्न करीत होते.

- **प्रसाराच्या दृष्टिकोनाचा आशय :**

साधारणत शेती, आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा विकास, सार्वजनिक आरोग्य, शैक्षणिक समस्या, इ. सारख्या क्षेत्रातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करीत असतानाच अलिकडच्या काळात नव्याने वैज्ञानिक क्षेत्रात जे बदल घडत आहेत त्यांचा ग्रामीण समुदायातील व्यक्तींच्या राहणीमानावर काय प्रभाव पडला व ग्रामीण समाजातील वेगवेगळ्या समुदायातील व्यक्तींचा अशा स्वरूपाच्या बदलांना कशाप्रकारचा प्रतिसाद होता याचा विचार या दृष्टिकोनाअंतर्गत करताना पुढील घटकांना महत्व दिले जाते.

**१) ग्रामीण समुदायाच्या परिवर्तनातील अडथळ्यांचे मूल्यमापन :**

ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास करून ते दूर करण्याचा प्रयत्न या दृष्टिकोनात केला जातो.

**२) प्रभावी योजनांची अंमलबजावणी :**

एका समुदायातील लोकांच्या पसंतीस पडलेल्या विकास योजना दुसऱ्या समुदायात राबविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच जे लाभार्थी आहेत त्यांना त्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रोत्साहीत केले जाते.

**३) विकास योजनांची प्रदर्शनाद्वारे प्रत्यक्ष अनुभूती :**

ग्रामीण भागात ज्या प्रकारच्या विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी होणार असते अशा विकास कार्यक्रमाचे प्रत्यक्ष प्रयोग खेड्यातील लोकांपर्यंत घेवून गेल्यास त्या कार्यक्रमाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होतो.

**४) विकास अधिकारी आणि लाभार्थी यांच्यातील परस्परसंबंध :**

वास्तविक अर्थाने ग्रामीण भागात वेगवेगळ्या विकास योजनांची अंमलबजावणी करणारे प्रशासकीय अधिकारी आणि प्रत्यक्ष योजनांचा लाभ होणारे लाभार्थी हे दोन्ही सामाजिक घटक एकमेकांशी संबंधित असतात. त्यामुळे त्यांच्यामधील सुसंवाद वाढून योजनांचा विस्तार होतो.

**५) विकास योजनांबाबतची निवड आणि वेळ :**

एखाद्या ग्रामीण समुदायासाठी कोणत्या स्वरूपाच्या विकास योजनांची निवड केल्याने त्या समुदायातील व्यक्तींना त्या योजनांचा लाभ मिळणार आहे व कोणत्या विशिष्ट वेळी त्या योजना अंमलात आणल्याने त्या संबंधित लाभार्थींना फायद्याचा ठरणार आहेत याचा विचार केला जातो.

**६) लाभार्थींच्या साहाय्याने योजनांचा विस्तार :**

एखाद्या विकास योजनेच्या यशापयशाचा प्रसार व प्रचार त्या योजनेच्या लाभार्थीमार्फत करणे उपयुक्त ठरते.

**७) लाभार्थींची विश्वसनियता वाढविणाऱ्या योजनांची निर्मिती :**

ग्रामीण भागातील वेगवेगळ्या विकास योजनांचे स्वरूप असे असावे की त्यांच्या अंमलबजावणीतून अनेकांचा त्यावरील विश्वास कमी न होता तो वाढत जावा अशारितीने योजनांचे स्वरूप तयार करण्याचा प्रयत्न विस्तारवादी दृष्टिकोनातून केला जातो.

**★ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – ४**

१. प्रसाराच्या दृष्टिकोनामध्ये .............. घटक केंद्रित समजला आहे.

२. जर्मन अभ्यासक .............. यांनी 'व्यक्ती' हा अभ्यासाचा प्रमुख धारक मानला आहे.

३. सामाजिक बदलांशी होणाऱ्या व्यक्तींच्या समायोजनाचा अभ्यास ............. दृष्टिकोनात होतो.

४. अमेरिकेतील .............. व .............. यांनी शेतीवर आधारीत समुदायांचा अभ्यास केला.

५. ग्रामीण परिवर्तनातील अडथळ्यांचा अभ्यास ............... दृष्टिकोनात होतो.

### १.२.५ मार्क्सवादी दृष्टिकोन (Marxist Approach) :

कोणत्याही मानवी समाजातील सामाजिक घटनांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोनातून घटनांचे स्वरूप अभ्यासले जाते. मानव त्याच्या उपजिवीकेसाठीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी उत्पादन तंत्राचा वापर करू लागला त्यामुळे उत्पादनतंत्र केवळ एक मानवी शोध किंवा कृती नसून, मानवी जीवनाच्या कालखंडातला एक महत्वाचा क्षण होता असे मार्क्स म्हणतो. कारण उत्पादन पद्धतीच्या तंत्रावरूनच मानवाची जीवनशैली विविध कालखंडात बदलत गेली. थोडक्यात मार्क्सवादी दृष्टिकोनातून मानवी समाजाची रचना अभ्यासताना सर्व प्रथम त्या समाजातील भांडवलावर आधारीत संबंधाचे स्वरूप जाणून घेतले पाहिजेत. तसेच प्रत्येक मानवी समाजातील आर्थिक संबंधाचे स्वरूप ऐतिहासिक कालखंडातून कसे बदलत जाते हे समजून घ्यावे लागते.

- **स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ग्रामीण समाजाचे स्वरूप :**

मार्क्सवादी दृष्टिकोनातून ग्रामीण समाजाचे विश्लेषण करताना, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आर्थिक संरचना कशी होती? ग्रामीण समाजातील दारिद्र्य, राहणीमान, श्रीमंत व गरीब वर्गातील तफावत कशी होती? शेतजमीनीवर कोणाची मालकी होती? ही मालकी टिकून राहण्यासाठी ब्रिटिश सरकार कोणत्या वर्गाच्या पाठीमागे होती? इत्यादी प्रश्नांची उत्तरे मार्क्सवादी दृष्टिकोनातून मिळवता येतात.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील जमीनविषयक संबंधाचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात येते की, जमीनदार व सरंजामदार वर्ग शेतकरी व शेतमजुरांचे शोषण करीत होता. त्यामुळे ग्रामीण समाजातील दारिद्र्याचेप्रमाण अधिक होते. त्याचप्रमाणे ब्रिटिश शासनव्यवस्था देखील ग्रामीण समाजातील दरिद्री लोकसंख्येच्या हिताचे निर्णय घेत नसल्यामुळे ग्रामीण भारतामध्ये दारिद्र्याचे प्रमाण अधिक होते.

- **स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण समाजाचे स्वरूप :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय समाजाने मिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग स्वीकारला. ग्रामीण समाजाचा विकास होण्यासाठी जे विकास धोरण स्वीकारले त्याचा, परिणाम म्हणून ग्रामीण समाजातील दारिद्र्याचे प्रमाण, विषमता आणि प्रगती यांचे विश्लेषण मार्क्सवादी दृष्टिकोनातून करताना सद्य स्थितीला असणाऱ्या ग्रामीण समाजातील समस्यांचे कारण शोधता येते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात, भारतीय राज्यघटने नुसार सर्व स्तरातील लोकसंख्येच्या हिताचा विचार करून जमीनविषयक कायद्याद्वारे सर्व स्तरातील लोकसंख्येचे हित साधण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. परंतु वास्तवा मध्ये ग्रामीण समस्यांचे प्रमाण वाढत आहे. आजच्या ग्रामीण समस्यांच्या कारणांचा वेध घेण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोनातून विश्लेषण केल्यास, ग्रामीण समाजाचे वास्तव स्पष्ट होण्यास मदत होईल.

भारतीय समाजामध्ये, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकास योजनांचे अनेक प्रयोग करण्यात येवून सुद्धा आज देखील इतर राष्ट्रांच्या तुलनेत भारतामध्ये दारिद्र्याचे प्रमाण अधिक आढळून येते. नुकत्याच रंगराजन समितीने केलेल्या भारतातील दारिद्र्याच्या पहाणी वरून भारतामध्ये दारिद्र्याचे प्रमाण जवळपास ३०% इतके आहे. थोडक्यात, मार्क्सवादी दृष्टिकोनातून ग्रामीण समाजातील आर्थिक विषमता कोणकोणत्या सामाजिक घटकांच्या मुळे निर्माण होते या संबंधीची माहिती मिळवता येते. त्याचप्रमाणे मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार, ग्रामीण समाजामध्ये शेतजमीनीचे असमान वितरण का आढळते? सीमांत शेतकरी भूमिहिन शेतमजूर यांच्यापेक्षा एका विशिष्ट समुदायांकडे शेतजमिनीच्या मालकीचे प्रमाण अधिक का आढळते? त्याचबरोबर राजकीय सत्ता, आर्थिक उत्पन्न आणि इतर साधनसंपत्तीवर असणाऱ्या मालकीचे प्रमाण विचारात घेता त्यामध्ये समानतेच्या ऐवजी विषमता अधिक प्रमाणात का आढळते? इत्यादी प्रश्नांची उत्तरे मिळविता येतात.

ग्रामीण समाजात कारागीर आणि लघुउद्योगांचा एका बाजूला ऱ्हास होत असताना, शहरांच्यामध्ये मात्र उद्योगधंद्याचे प्रमाण का वाढत आहे? भांडवलशाहीचा परिणाम म्हणून खेड्यातील लघुद्योग कशाप्रकारे नष्ट

होत गेले यासंबंधीचा अभ्यास मार्क्सवादी दृष्टीकोनातून करता येतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण समाजात एका बाजूला बागायतदार आणि जमीनदार यांचा वर्ग आणि दुसऱ्या बाजूला सीमांत किंवा शेतमजूरांचा वर्ग का निर्माण झाला? स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्याकाळात, भांडवलशाहीचा प्रभाव वाढत गेल्याने, उद्योगधंद्याचा विस्तार होऊन सुद्धा बेरोजगारीचे प्रमाण भारतामध्ये का आढळते? त्याचप्रमाणे भारतीय समाजामध्ये वंचित म्हणून समजले जाणारे घटक उदा. महिला, आदिवासी, दलित इत्यादी यांच्या आर्थिक परस्थितीमध्ये सुधारणा का घडून आली नाही? उलट अशा वंचित समुहांच्या शोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे का दिसते? शैक्षणिक संधीचे प्रमाण केवळ समाजातील विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असल्याने शिक्षणाच्या संधीमधील असमानता का दिसून येते? इत्यादी प्रश्नांचा अभ्यास मार्क्सवादी दृष्टिकोनातून करता येतो.

भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक, ए.आर. देसाई यांनी भारतातील खेड्यांची सामाजिक रचना अभ्यासताना मार्क्सवादी दृष्टिकोनातून त्यांनी आपले विचार मांडले. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या कालखंडात भारतीय समाजामध्ये विकास घडवून आणण्यासाठी ज्या प्रकारचा 'विकास मार्ग' अवलंबला गेला तो मुख्यतः 'समाजवादी' स्वरूपाचा नसून भांडवलशाही स्वरूपाचा होता त्यामुळे आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता, ग्रामीण समाजातील शेतजमिनीवरील मालकी हक्कावरून ग्रामीण समाजात जी आर्थिक विषमता आढळते त्या विषमतेचे स्वरूप अभ्यासण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन महत्वाचा समजला जातो.

★ **स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – ५**

१) .............. दृष्टिकोनामध्ये 'उत्पादन तंत्र' शोध नसून तो एक महत्त्वाचा क्षण समजला जातो.

२) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ............... अर्थव्यवस्था ग्रामीण भागात होती.

३) ............. हे शेतकरी व शेतमजूर यांचे शोषण करीत होते.

४) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये ............... अर्थव्यवस्था स्वीकारली.

५) ............. या भारतीय समाजशास्त्रज्ञाने मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अवलंब केला.

## १.३ सारांश :

भारतामध्ये नागरीकरणाची गती वाढत असली तरी आजही भारताची ६५% इतकी लोकसंख्या ही ग्रामीण भागात आढळते. त्यामुळे भारतीय समाजाची खरी ओळख करून घेण्यासाठी ग्रामीण समाजाचा अभ्यास आज ही महत्वपूर्ण समजला जातो. ग्रामीण समाजाचे वैज्ञानिक स्वरूपात अध्ययन होण्यासाठी म्हणून ज्याप्रकारचे दृष्टिकोन विचारात घेतले गेले, त्यामध्ये आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन, आदर्शात्मक मापदंडाचा दृष्टिकोन, रोस्टोचा पाच अवस्थांचा दृष्टिकोन, विस्तारवादी दृष्टिकोन आणि मार्क्सवादी दृष्टिकोन अशा एकूण पाच दृष्टिकोनांच्या माध्यमातून भारतीय ग्रामीण समाजाची ओळख करून घेत असताना पारंपरिक

स्वरूपात असणाऱ्या ग्रामीण समाज रचनेच्या अभ्यासा पासून ते आजच्या आधुनिक कालखंडापर्यंत ग्रामीण समाजामध्ये घडून आलेल्या परिवर्तनाचा अभ्यास तसेच ग्रामीण विकासाची दिशा आणि स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

कोणताही समाज स्थिर नसून तो गतीशील स्वरूपाचा असतो या नियमाने ग्रामीण समाजात जो विकास घडून आला, त्या विकासाचे अध्ययन करण्यासाठी म्हणून वरील दृष्टीकोनांचा अवलंब केला जातो. असे असले तरी, वरील दृष्टिकोनांच्या सहाय्याने भारतीय ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि त्यांची रचना खऱ्या अर्थाने समजून घेता येत नाही. कारण भारतीय खेड्यांची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक रचना एक सारखी नसून ती भिन्न-भिन्न स्वरूपाची असल्याने, अभ्यासा मध्ये एक वाक्यता आढळून येत नाही. तरी सुद्धा वरील दृष्टिकोनांचा ग्रामीण समाजाच्या अभ्यासासाठी उपयोग करून घेणे आवश्यक ठरते.

## १.४ स्मरणार्थ संज्ञा

१) **आधुकिकरण :** तंत्रज्ञानावर आधारित घडून येणारे परिवर्तन.

२) **मार्क्सवादी :** कार्ल मार्क्स या विचारवंताच्या विचारांचा संदर्भ घेऊन केलेले अध्ययन.

३) **आदर्शात्मक निर्देशांक :** विशिष्ट आदर्श स्वरूपाचे मापदंड विचारता घेवून निश्चित केलेला विकास.

४) **प्रसारवाद :** विशिष्ट घटकांमुळे समाजात होणारी प्रसरणाची प्रक्रिया आणि त्यातून होणारे बदल.

५) **भांडवलदार :** संपत्तीचे/भांडवलाचे ज्यांच्या हाती केंद्रीकरण होते ते लोक.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे –

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

१) डॅनियल लर्नर २) अमेरिका ३) ग्रामिण

४) सकारात्मक आणि नकारात्मक ५) आधुनिकीकरण

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१) आदर्शात्मक निर्देशांकाचा २) विकसित आणि अविकसित

३) आदर्शात्मक- निर्देशांकाचा ४) मॅक्स वेबर

५) आदर्शात्मक निर्देशाकांचा

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) बिगरआर्थिक घटक २) पारंपरिक ३) परिपक्व

४) रोस्टो ५) पारंपरिक

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

१) व्यक्ती २) जॉर्ज सिमेल ३) प्रसारणवादी

४) ब्रेसी रेयॉन आणि नेल ग्राथ ५) प्रसारणवादी

★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५

१) मार्क्सवादी २) शेती ३) सरंजामदार

४) संमिश्र ५) ए. आर. देसाई

## १.६ स्वाध्याय

१) ग्रामीण समाजाच्या अभ्यासाचा आधुनिकीकरण दृष्टिकोन स्पष्ट करा.

२) ग्रामीण समाजाच्या अभ्यासाचा आदर्शात्मक निर्देशांकाचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

३) रोस्टोच्या पाच अवस्थांचा ग्रामीण अभ्यासासाठीचा दृष्टिकोन विशद करा.

४) ग्रामीण अभ्यासाचा प्रसारणवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

५) ग्रामीण अभ्यासासाठीचा मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


1. Bernterint Henry, Modernization they\ory and the sociological study of development - Artical Ref. Through internet.
2. Dearing W. James, Applying Diffussion of Innovation theory to intervevtion Development - Aritical Ref. Through Internet.
3. Oommen & Mkherjee, Indian Sociology - Relevance of marxist approach to the study of Indian society : A.R.Desai.
4. Myer R.M.& Taneja M.L. Economics of Development and plainning - Vishal Publication - Jalandhar.


❑❑❑

**सत्र १ : घटक २**

# ग्रामीण सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप
# (Changing Nature of Rural Social Institutions)

**अनुक्रमणिका**


२.१ प्रास्ताविक

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय-विवेचन

२.३.१ कुटुंबसंस्था

२.३.२ जातीसंस्था

२.३.३ धर्मसंस्था

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वाध्याय/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.१ प्रास्ताविक (Introduction)

पहिल्या अध्ययन घटकात आपण ग्रामीण समाज ही संकल्पना समजावून घेतलेली आहे. आता दुसऱ्या घटकात आपण भारतातील ग्रामीण सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप समजावून घेणार आहोत. सामाजिक संस्था ह्या सामाजिक संरचनेतील एक महत्त्वाचा घटक आहेत. म्हणून कोणत्याही समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरूप, रचना कार्य व त्यांच्यातील परिवर्तन इत्यादी गोष्टींचा अभ्यास करावाच लागतो. भारतीय ग्रामीण समाजाच्या अभ्यासासही ही गोष्ट लागू पडते. म्हणून ह्या दुसऱ्या अध्ययन घटकात तुम्ही भारतीय ग्रामीण समाजातील कुटुंबसंस्था, जातीसंस्था व धर्मसंस्था ह्या तीन सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप अभ्यासणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास;

- ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये, कार्ये व त्यामध्ये होत असलेले परिवर्तन समजावून घेता येईल.
- जातीसंस्थेची व्याख्या, वैशिष्ट्ये व तिच्यामध्ये होत असलेले परिवर्तन विशद करता येईल.
- ग्रामीण धर्मसंस्थेचे स्वरूप, कार्ये व तिच्यामध्ये होत असलेले परिवर्तन स्पष्ट करता येईल.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या दुसऱ्या घटकात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजातील कुटुंबसंस्था, जातीसंस्था व धर्मसंस्था ह्या तीन सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप अभ्यासणार आहात. अभ्यास विषयाच्या विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात ग्रामीण कुटुंबसंस्थेचे वैशिष्ट्ये, कार्य व तिच्यात होत असलेले परिवर्तन याची चर्चा केलेली आहे. दुसऱ्या भागात जातीसंस्थेची व्याख्या, वैशिष्ट्ये व तिच्यात होत असलेले परिवर्तन याचे विवेचन केलेले आहे. तर तिसऱ्या भागात धर्मसंस्थेचे स्वरूप, कार्ये व तिच्यात होत असलेले परिवर्तन याचे विवेचन केलेले आहे.

### २.३.१ ग्रामीण कुटुंबसंस्था (Rural Family)

कुटुंब ही सार्वत्रिक अशी मूलभूत सामाजिक संस्था आहे. **मार्शल जोन्स** यांच्या मते ''कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.'' कुटुंबसंस्था ही व्यक्तीच्या दृष्टीने कामतृप्ती, बालसंगोपन, समाजीकरण, मानसिक व सामाजिक संरक्षण देणे इत्यादी आणि समाजाच्यादृष्टीने संस्कृती संक्रमण करणे, समाज सातत्य राखणे अशी महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते. म्हणून सर्वच समाजात कुटुंबसंस्थेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण समाजात तर कुटुंबास इतर कोणत्याही संस्था व संघटनेपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण ग्रामीण सामाजिक जीवनाचा मूलभूत वा आधारभूत घटक कुटुंबच असून कुटुंबाचा ग्रामीण व्यक्ती, इतर सामाजिक संस्था व संपूर्ण समाज ह्यांच्यावर मोठा प्रभाव पडलेला आहे. म्हणून ग्रामीण समाजाच्या अभ्यासात ग्रामीण कुटुंबाच्या अभ्यासास महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. या ठिकाणी आपण भारतातील ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये व कार्ये यांचा ऊहापोह करणार आहोत.

**ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Rural Family)

भारतातील ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१. संयुक्त कुटुंब :** कुटुंबातील सदस्यांच्या संख्येच्या आधारे कुटुंबाचे केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. पती, पत्नी व त्यांची अविवाहीत मुले-मुली एवढेच सदस्य (दोन पिढ्यांचे) एकत्र राहात असलेल्या कुटुंबास केंद्र कुटुंब असे म्हणतात. याउलट ज्या कुटुंबात पती-पत्नी, त्यांची विवाहीत मुले व सुना, अविवाहीत मुली, विवाहीत व अविवाहीत नातवंडे आणि इतर कांही निकटवर्ती आप्त एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटुंब असे म्हणतात. भारतीय ग्रामीण कुटुंब हे मुख्यतः संयुक्त कुटुंब असल्याचे आढळते. त्यामध्ये दोनपेक्षा अधिक पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. त्यांची मालमत्ता, निवासस्थान, भोजनव्यवस्था इत्यादी गोष्टी सामूहिक म्हणजेच एकत्रित स्वरूपाच्या असतात. कुटुंबातील उत्पादन साधने सर्वांच्या मालकीची असतात व त्यांच्या साह्याने केलेल्या उत्पादनाचा सामाईकपणे उपभोग घेतला जातो. सर्व सदस्य मालमत्ता, उत्पन्न, अधिकार व कर्तव्ये इत्यादी गोष्टींनी परस्परांशी घनिष्ठपणे जोडलेले असतात. म्हणूनच संयुक्त कुटुंबाची व्याख्या **डॉ. इरावती कर्वे** पुढीलप्रमाणे करतात ''एकाच निवासस्थानात राहणाऱ्या, एकाच स्वयंपाकगृहातील अन्नसेवन करणाऱ्या, मालमत्तेत समान मालकीहक्क असणाऱ्या, रक्तसंबंधी असणाऱ्या व्यक्तिंचा समूह म्हणजे संयुक्त कुटुंब होय.'' भारतातील पारंपारिक ग्रामीण कुटुंब अशाप्रकारचेच संयुक्त असल्याचे आढळते. आधुनिक काळात मात्र संयुक्त कुटुंबाचे विघटन होत असून त्याजागी केंद्र कुटुंब स्थापण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

**२. पितृसत्ताक कुटुंब :** कुटुंबातील औपचारिक सत्ता पित्याकडे आहे की मातेकडे आहे या आधारे कुटुंबाचे पितृसत्ताक कुटुंब व मातृसत्ताक कुटुंब असे दोन प्रकार पडतात. भारतीय ग्रामीण कुटुंब हे प्रामुख्याने पितृसत्ताक प्रकारचे आहे. कारण कुटुंबातील औपचारिक सत्ता ही पित्याच्या (पुरुषाच्या) हाती असते. कुटुंबाची वंशपरंपरा ही पित्याकडून मोजली जाते. मुले आपल्या नावामागे पित्याचे नाव लावतात. विवाहानंतर मुले पित्याच्याच घरी जमेल तेवढे दिवस राहतात. आणि न जमल्यास वेगळे होऊन केंद्र कुटुंब (विभक्त कुटुंब) स्थापन करतात. मुली मात्र विवाहानंतर पतीगृही राहण्यास जातात. पितृसत्ताक पद्धतीमुळे साहजिकच पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना सर्वच बाबतीत दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे ग्रामीण स्त्रीचा दर्जा अत्यंत निम्न (कनिष्ठ) आहे. नागरी कुटुंब हेही पितृसत्ताक असले तरी तेथे तुलनात्मकदृष्ट्या स्त्रीचा दर्जा थोडासा उन्नत असल्याचे आढळते.

**३. कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही :** ग्रामीण कुटुंब पितृसत्ताक असल्याने कुटुंबप्रमुख हा पुरुष (पिता किंवा जेष्ठ भाऊ) असतो. त्याच्या हाती कुटुंबातील सर्व अधिकार एकवटलेले असतात. कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्याचा पुढाकार असतो. कुटुंबाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन व देखरेख करणे, कुटुंबसदस्यांमध्ये कामाचे वाटत करणे, त्यांच्या विवाहाची, शिक्षणाची, आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे, त्यांच्या समस्या सोडविणे, इत्यादी बाबतचे सर्व अधिकार कुटुंबप्रमुखाकडे असतात व इतर सर्व सदस्य त्याच्या आज्ञेचे पालन करीत असतात. त्यामुळे कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही निर्माण झालेली असते. एकंदरीत कुटुंबप्रमुख हा कुटुंबाचा नेता, सूत्रधार, पालक, मार्गदर्शक व नियंत्रक असतो व त्याच्या तुलनेत इतर सदस्यांचे स्थान दुय्यम असते.

४. **शेतीअधिष्ठीत कुटुंब :** बहुसंख्य ग्रामीण कुटुंबे ही शेती व्यवसायावर आधारलेली आहेत. शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. आणि संयुक्त कुटुंब हे शेती व्यवसायाशी सुसंगत ठरते. कारण शेती व्यवसायाला अधिक मनुष्यबळाची गरज भासते व ही गरज पूर्ण करण्यासाठी सर्व सदस्यांनी एकत्र राहणे गरजेचे ठरते. एकत्र राहिल्याने शेतजमिनीचे विभाजन टळते व तिचे छोटे तुकडे पाडणे टाळता येते. शिवाय उत्पादन साधने सामाईक असल्याने उत्पादन खर्चात बचत होते. परिणामी शेती फायदेशीर ठरते. कुटंबातील सर्व सदस्य आपापल्या क्षमतेप्रमाणे शेतात राबतात व सर्वजण सामाईक उपभोग घेतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही शेती व्यवसायाद्वारेच होते. कुटुंबाच्या सर्व व्यवहाराचा केंद्रबिंदू शेती व्यवसाय असतो.

५. **अवलंबन भावना व शिस्त :** ग्रामीण कुटुंबात अवलंबन भावना व शिस्त मोठ्या प्रमाणावर आढळते. शहरातल्याप्रमाणे खेड्यात गरजापूर्तीची विविध केंद्रे नसतात. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, मनोरंजन, आरोग्य, संरक्षण इत्यादी सर्व गरजांची पूर्तता कुटुंबातच होत असते. त्यामुळे व्यक्ती पूर्णतः कुटुंबावर अवलंबून असते. याचा परिणाम असा होतो की व्यक्ती कुटुंबाची शिस्त निमूटपणे पाळते. कुटुंबप्रमुख व इतर वयस्कर मंडळीचे इतर सदस्यांवर नियंत्रण असते. त्यांच्या आज्ञा सर्वजण पाळतात. कुटुंबाच्या आज्ञा न पाळणाऱ्यास खेड्यात राहणे कठीण जाते.

६. **सामूहिक धार्मिक व सांस्कृतिक जीवन :** ग्रामीण कुटुंबाचे केवळ आर्थिक व सामाजिकच नव्हे तर धार्मिक व सांस्कृतिक जीवन देखील सामूहिक स्वरूपाचे असते. ग्रामीण कुटुंबात देवपूजा, कुलाचार, धार्मिक विधी इ. धार्मिक कृत्ये आणि सण, समारंभ, बारसे, विवाह, श्राद्ध इत्यादी सांस्कृतिक कृत्ये एकत्रितपणे पार पाडली जातात. त्यामध्ये सर्व सदस्य सहभागी होऊन आपापली कर्तव्ये व जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडतात. असे ही सामूहिक जीवन त्यांच्यात भावनिक ऐक्य निर्माण करते.

७. **एकजिनसी स्वरूप :** ग्रामीण कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्परांविषयी प्रेम, आत्मियता, सहकार्याची व कर्तव्याची भावना मोठ्या प्रमाणावर आढळते. निवासस्थान, भोजनव्यवस्था, मालमत्ता, व्यवसाय, धार्मिक व सांस्कृतिक जीवन इत्यादी गोष्टी सामाईक असल्याने सर्व सदस्य एकमेकांच्या घनिष्ठ संपर्कात असतात. त्यामुळे त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा सहकार्य निर्माण होते. प्रत्येकजण स्वहितापेक्षा कुटुंबाच्या हितास अधिक प्राधान्य देतो. कुटुंबाविषयीची आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे बजावतो. प्रत्येकजण कौटुंबिक जीवनाशी पूर्ण एकरूप झालेला असतो. त्यामुळे ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप खूपच एकजिनसी असते.

८. **कुटुंबाचा अभिमान :** ग्रामीण व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी मोठा अभिमान वाटत असतो. कारण तिच्या सर्व गरजांची व आकांक्षांची पूर्तता कुटुंबातच होत असते. शिवाय तिला माया, सहकार्य व संरक्षण कुटुंबातच मिळत असते. समाजात व्यक्तीची ओळख कुटुंबाच्या नावानेच होत असते. व्यक्तीचा सामाजिक दर्जा कुटुंबाच्या दर्जावरूनच ठरत असतो. व्यक्तीच्या चांगल्यावाईट कृत्यासाठी कुटुंबालाच

जबाबदार धरले जाते. थोडक्यात खेड्यात व्यक्ती नव्हे तर कुटुंब हा सामाजिक जीवनाचा घटक असतो. त्यामुळे व्यक्तीला स्वतःच्या कुटुंबाविषयी मोठा अभिमान वाटत असतो.

९. **सापेक्षता :** स्थिर कुटुंब – इतर कुटुंबांच्या तुलनेत (उदा. नागरी कुटुंब व आदिम कुटुंब) ग्रामीण कुटुंब हे अधिक स्थिर असल्याचे आढळते. ग्रामीण कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये परस्परावलंबन, सहकार्य, प्रेम, कर्तव्य भावना इत्यादी गोष्टी मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे कुटुंबाची ध्येये साध्य करण्यासाठी सर्वजण सामूहिकपणे झटत असतात. शिवाय कुटुंबात सदस्यांची संख्या जास्त असल्याने एखाद्या सदस्याच्या मृत्यूने, आजारपणामुळे किंवा म्हातारपणामुळे कुटुंब सहजासहजी मोडकळीस येत नाही. कुटुंबावर आलेल्या आपत्तीचा सर्वजण मिळून सामना करतात. त्यामुळे ग्रामीण कुटुंब कोणताही आघात पचवू शकते. त्यामुळे ते स्थिर राहते. याउलट नागरी कुटुंबातील सदस्यसंख्या कमी असते. तसेच त्यामध्ये व्यक्तीवादाचा प्रभाव असतो. त्यामुळे नागरी कुटुंब हे मोठा आघात पचवू शकत नाही. आदिम कुटुंबात घटस्फोट घेणे सुलभ असल्याने व मुले दत्तक देण्याघेण्याचे प्रमाण जास्त असल्याने आदिम कुटुंबही कांहीसे अस्थिर असते.

**ग्रामीण कुटुंबाची कार्ये** (Functions of Rural Family)

१. **जैविक कार्ये :** कामतृप्ती, प्रजोत्पादन व बालसंगोपन ही जैविक कार्ये ग्रामीण कुटुंब पार पाडते. कामवासनेची तृप्ती ही फक्त विवाहाद्वारे व कुटुंबातच झाली पाहिजे व त्यातून जन्मलेल्या बालकांचे संगोपन हे कुटुंबातच झाले पाहिजे यावर ग्रामीण कुटुंब भर देते.

२. **मानसिक कार्ये :** व्यक्तीला मानसिक सुखशांती व संरक्षण देण्याचे कार्य ग्रामीण कुटुंब प्रभावीपणे पार पाडले. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी गरजांची पूर्तता करून ग्रामीण कुटुंब व्यक्तीला आर्थिक विवंचनेतून मुक्त करते. अपंगत्व, आजारपण, वार्धक्य अशा हतबल अवस्थेत कुटुंब व्यक्तीची प्रेमाने काळजी घेते. संकटकाळात व्यक्तीला धीर देते, तिच्या पाठीशी राहाते, तिचे मनोधैर्य वाढविते. थोडक्यात ग्रामीण कुटुंबात व्यक्तीला प्रेम, माया, सहकार्य, सहानुभूती मोठ्या प्रमाणावर मिळते. त्यामुळे तिला मनःशांती व सुखसमाधान लाभते.

३. **आर्थिक कार्ये :** कुटुंबातील सदस्यांच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी ग्रामीण कुटुंब कांही आर्थिक क्रिया पार पाडते. बहुतेक कुटुंबांचा शेती व्यवसाय असून त्यामध्ये सर्व सदस्य राबतात. कुटुंबाद्वारे सदस्यांत कामाचे वाटप केले जाते. कुटुंबाच्या मालमत्तेचा सर्वांना उपभोग घेता येईल अशी व्यवस्था करते. मालमत्तेचा वारसा ठरविणे, तिचे संरक्षण करणे ही कार्येही ग्रामीण कुटुंब पार पाडते. औद्योगिक क्रांतीपूर्व काळात ग्रामीण कुटुंब आर्थिक क्षेत्रातील एक स्वयंपूर्ण घटक होते. उत्पादन, वितरण, उपभोग या तीनही प्रक्रिया कुटुंबात होत असत. आज कुटुंबाची ही आर्थिक स्वयंपूर्णता संपली असली तरी ग्रामीण कुटंबाचे आर्थिक महत्त्व बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

४. **सामाजिक कार्ये :** व्यक्तीचे सामाजिकरण करणे, तिच्या वर्तनाचे नियंत्रण करणे व तिला सामाजिक संरक्षण मिळवून देणे इत्यादी सामाजिक कार्ये ग्रामीण कुटुंब पार पाडते. ग्रामीण कुटुंबातील वयोवृद्ध व अनुभवी मंडळी मुलांच्या मनावर आदर्श मूल्ये, रीतीरिवाज, आज्ञापालनाची वृत्ती, शिस्त इत्यादींचे सुसंस्कार करतात. त्यामुळे मुलांचे योग्य समाजीकरण होते. तसेच कुटुंब आपल्या सदस्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवते व त्यांच्या हातून सामाजिक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेते आणि उल्लंघन केल्यास व्यक्तीला शिक्षाही करते. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे कार्य पार पाडले जाते. तसेच आपल्या सदस्यांचा कोणी अपमान, बेअब्रू, फसवणूक, बदनामी करू नये याचीही कुटुंब काळजी घेते. सदस्यांना समाजात मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याचाही प्रयत्न करते. त्यामुळे सदस्यांना कुटुंबाद्वारे सामाजिक संरक्षण मिळते.

५. **शैक्षणिक कार्ये :** आपल्या सदस्यांना विविध प्रकारचे शिक्षण देण्याचे कार्यही ग्रामीण कुटुंब करते. कुटुंबाचा जो व्यवसाय असतो त्याचे धडे मुलांना लहानपणापासून कुटुंबातच मिळतात. म्हणजे व्यावसायिक शिक्षण देण्याचे कार्य हे कुटुंब करते. तसेच संस्कृतीच्या विविध अंगाचे ज्ञानही सदस्यांना सर्वप्रथम कुटुंबातच मिळते. समाजात कसे वागावे याचेही प्राथमिक धडे कुटुंबातच मिळतात. थोडक्यात ग्रामीण कुटुंब हे अनौपचारिक शिक्षणाची पाठशाळाच असते.

६. **धार्मिक कार्ये :** ग्रामीण कुटुंब धार्मिक कार्येही मोठी श्रद्धेने पार पाडते. कुटुंबात देवपूजा, होमहवन, प्रार्थना, व्रतवैकल्ये सणसमारंभ इत्यादी धार्मिक विधी मोठ्या उत्साहाने पार पाडले जातात. त्यामध्ये सर्व सदस्य सहभागी होऊन आपली कर्तव्ये चोखपणे बजावतात. कुलाचार, कुलप्रथा, धार्मिक परंपरा व संस्कार (उदा. गर्भाधन, उपनयन, विवाह, अंतेष्टी, श्राद्ध इ.) ग्रामदेवता व निसर्ग-देवतांची पूजा अशी कर्मकांडाची एक मालिकाच ग्रामीण कुटुंबात सतत चालू असते. त्यामुळे सदस्यांना धार्मिक शिक्षण मिळत राहाते.

७. **मनोरंजनात्मक कार्ये :** ग्रामीण संयुक्त कुटुंबात वेगवेगळ्या वयाच्या प्रवृत्तीच्या, अनुभवाच्या व्यक्ती असतात. त्या सर्वांच्या एकत्र येण्याने कुटुंबात मनोरंजनाचे कार्य अत्यंत अनौपचारिकपणे पार पाडले जाते. मुलांचे कोडकौतुक, बाललीला, गप्पागोष्टी, थट्टामस्करी, हास्यविनोद, आजीआजोबांच्या गोष्टी इत्यादीमुळे सदस्यांचे मनोरंजन होते. तसेच कुटुंबात चालणारे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे (उदा. बारसे, विवाह, डोहाळे जेवण, देवदेवतांचे उत्सव, सण समारंभ इ.) देखील निखळ मनोरंजनाचा लाभ होतो. शहरी व्यक्तीला मात्र आज बाजारू व गल्लाभरू मनोरंजन साधनांवर अवलंबून राहावे लागते. त्यातून अनेक विकृती निर्माण होतात. ग्रामीण कुटुंबातील मनोरंजन मात्र तुलनेने स्वस्त व निकोप असते.

**ग्रामीण कुटुंबसंस्थेतील परिवर्तन**

आधुनिक काळात औद्योगिकरण, नागरीकरण, वाहतुकीची प्रगत साधने, शिक्षण प्रसार, सामाजिक कायदे, ग्रामीण विकास, स्त्रीशिक्षण इत्यादीमुळे ग्रामीण कुटुंबसंस्थेत परिवर्तन होत आहे. ह्या परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे–

**अ) कुटुंबाच्या संरचनेतील परिवर्तन**

१) **आकारातील परिवर्तन :** पारंपारिक ग्रामीण कुटुंब संयुक्त प्रकारचे असल्याने त्याचा आकार खूपच मोठा होता. कारण त्यामध्ये तीन-चार पिढ्या एकत्र रहात. आज संयुक्त कुटुंबाचे विघटन झाले असून त्याजागी पतीपत्नी व अविवाहीत मुले असलेले छोट्या आकाराचे विभक्त कुटुंब स्थापन करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे.

२) **कुटुंबकर्त्याच्या सत्तेचा ऱ्हास :** आज ग्रामीण कुटुंबातील कर्त्या पुरुषाच्या सत्तेचा वा अधिकारांचा ऱ्हास होत आहे. कारण कायद्याने कुटुंबातील इतर सदस्यांनाही अनेक अधिकार प्राप्त झालेले आहेत. खेड्यातही शिक्षप्रसार झाल्याने व्यक्तीवाद, व्यक्तीस्वातंत्र्य यांचा प्रभाव वाढत असून कुटुंबकर्त्याची हुकूमशाही नकोशी वाटत आहे. सुशिक्षित व कमावती पत्नी असल्यास पतीला तिच्या सल्ल्यानेच कुटुंबातील निर्णय घेणे भाग पडत आहे. प्रौढ व सुशिक्षित मुले ही वडिलांच्या निर्णयावर आपल्या मताचा प्रभाव टाकू लागली आहेत.

३) **कुटुंबाविषयीच्या दृष्टिकोनात बदल :** पूर्वीचे ग्रामीण कुटुंब समूहवादी होते. व्यक्तीहितापेक्षा कुटुंबाच्या हितास प्राधान्य दिले जाई. आज मात्र व्यक्तीवादाचा प्रभाव वाढत असल्याने कुटुंबाच्या हिताऐवजी व्यक्तीच्या हितास प्राधान्य देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आज व्यक्तीला स्वकर्तृत्वाने सत्ता संपत्ती, मानसन्मान मिळविणे शक्य झाल्याने व्यक्तीस कुटुंबाच्या मदतीशिवाय आपला उत्कर्ष साधणे शक्य होत असल्याने व्यक्ती पूर्वीची कौटुंबिक बंधने व जबाबदाऱ्या टाळू लागली आहे. आपल्या व्यक्तीगत आकांक्षांच्या पूर्तीसाठी कुटुंबाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

४) **नातेसंबंधाचे महत्त्व कमी :** पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात नातेसंबंधास खूपच महत्त्व होते. या कुटुंबात आजीआजोबा, आईवडील, काकाकाकू सख्खी व चुलत भावंडे, पुतण्यापुतणी, नातवंडे तसेच नात्यातील इतरही व्यक्ती असे विविध नातेवाईक असत व व्यक्ती त्या सर्वांना मान देई. त्यांच्याविषयी आपल्या जबाबदाऱ्या प्रेमाने पार पाडी. आज मात्र व्यक्तीवादाच्या प्रभावामुळे नातेसंबंधास महत्त्व देणे कमी होत चालले आहे. एवढेच नव्हे तर स्वतःचे केंद्र कुटुंब स्थापन झाल्यावर आईवडील व सख्खी भावंडे यांच्याकडेही दुर्लक्ष केले जाऊ लागले आहे.

५) **सामूहिक जीवनावर आघात :** पारंपारिक संयुक्त कुटुंबात सर्व सदस्य एकाच घरात रहात, एकाच चुलीवरील अन्न ग्रहण करीत, एकाच व्यवसायात राबत व त्यांची मालमत्ता ही देखील सामाईक असे.

त्यामुळे त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा, सहकार्य, आपलेपणा मोठ्या प्रमाणावर होता. यातून सामूहिक जीवन जगण्याचा आनंद व्यक्तीला मिळत असे. आजमात्र हे सामूहिक जीवन हळूहळू नष्ट होत आहे. कारण वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळे व्यवसाय करू लागल्याने त्यांचे निवास व भोजन व्यवस्था वेगवेगळी होत आहे. त्यामुळे पूर्वीइतके प्रेम, जिव्हाळा, आपलेपणा राहीनासा झाला आहे.

६) **स्त्रियांच्या दर्जात बदल :** पूर्वी कुटुंबात पुरुषाचा दर्जा श्रेष्ठ व स्त्रियांचा कनिष्ठ मानला जाई. 'चूल व मुल' हे स्त्रियांचे कार्यक्षेत्र होते. त्यांना कुटुंबात दुय्यम स्थान होते. आज स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याने ग्रामीण स्त्रियाही नोकरी, धंदा करू लागल्या आहेत. पंचायतराज्यात आरक्षण मिळाल्याने स्त्रियांनाही अधिकारपदे व राजकीय सत्ता मिळत आहे. त्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारत आहे. परिणामी त्यांचा दर्जा हळूहळू उंचावत आहे. सुशिक्षित ग्रामीण स्त्री पूर्वीची जाचक बंधने व रुढीपरंपरा नाकारू लागली आहे.

**ब) कुटुंबाच्या कार्यातील परिवर्तन**

ग्रामीण कुटुंबाच्या रचनेप्रमाणेच त्याच्या कार्यातही हळूहळू परिवर्तन होत आहे. ग्रामीण कुटुंब हे त्याची पूर्वीची अनेक कार्ये आजही पार पाडीत आहे. तथापि, त्याच्या कार्यांच्या तपशिलात पुढीलप्रमाणे बदल घडून येत आहेत.

१) **प्रजोत्पादनातील व बालसंगोपनातील परिवर्तन :** प्रजोत्पादन व बालसंगोपन ही कार्ये ग्रामीण कुटुंब आजही पार पाडते. मात्र यासंदर्भात कांही महत्त्वाचे बदल होत आहेत. पूर्वी गरोदर स्त्रीची काळजी कुटुंबच घेई व तिची प्रसूतीही कुटुंबातच होई. तथापि, आज याकामी आरोग्यकेंद्रे, प्रसूतीगृहे, तज्ज्ञ डॉक्टर्स व नर्सेस यांची मदत घेण्याचे प्रमाण वाढत आहे. बालसंगोपनाचे कार्य कुटुंबच करते. मात्र गरजेनुसार बालवाड्या, अंगणवाड्या, शाळा, दवाखाने यांचे सहाय्य घेतले जात आहे. मुलांना बालवाड्यात, अंगणवाड्यात, शाळेत पाठवून आईवडील आपापल्या उद्योगधंद्यास जातात. मुलांचे निकोप संगोपन व्हावे म्हणून बालसंगोपन केंद्रांचा सल्ला व मार्गदर्शन घेतले जात आहे.

२) **आर्थिक कार्यात परिवर्तन :** पारंपारिक ग्रामीण कुटुंब आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण स्वयंपूर्ण होते. उत्पादन, वितरण व उपभोग ह्या तिन्ही क्रिया पूर्वी कुटुंबातच चालत. आज औद्योगिकीकरणामुळे खेड्यातील घरगुती उत्पादन पद्धती मोडकळीस आली आहे. त्यामुळे कुटुंबातील उत्पादन व वितरणाचे कार्य इतर उद्योगसंस्थांकडे संक्रमित झाले आहे. दळण, कांडण, शिवण, विणकाम इत्यादी कार्ये करण्यासाठी विविध केंद्रे उदयास आली आहेत. त्यामुळे उत्पादन कार्याचे कुटुंबावरील ओझे कमी झाले आहे. ग्रामीण कुटुंब हळूहळू केवळ उपभोगाचा घटक बनत चालले आहे.

३) **शैक्षणिक कार्यातील परिवर्तन :** पूर्वी व्यक्तीला व्यावसायिक, सामाजिक, धार्मिक शिक्षण कुटुंबातच मिळे. आज मात्र व्यावसायिक व इतरही प्रकारचे शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या संस्था खेड्यातही

निघाल्याने कुटुंबाचे शिक्षण देण्याचे केंद्र म्हणून असलेले महत्त्व कमी झाले आहे. आधुनिक शिक्षण देणे ग्रामीण कुटुंबाच्या आवाक्याबाहेरचे आहे. मात्र समाजशिक्षण देण्याचे कार्य ग्रामीण कुटुंब आजही बऱ्याच प्रमाणात पार पाडताना दिसते. मुलांना औपचारिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आजही ग्रामीण कुटुंबासच उचलावी लागत आहे.

४) **सामाजिक नियंत्रणातील परिवर्तन :** पूर्वी ग्रामीण कुटुंब हे सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन होते. ते आपल्या सदस्यांच्या वर्तनाचे प्रभावीपणे नियंत्रण करीत असे. कुटुंबाची शिस्त व आदेश व्यक्ती निमूटपणे पाळीत असे. आज मात्र व्यक्तीवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, भौतिक सुखाची आसक्ती इत्यादींचा प्रभाव पडून कुटुंबाचे सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून असलेले महत्त्व कमी होत आहे. कौटुंबिक कलहाचे प्रमाण वाढत आहे. व्यक्तीव्यक्तीतील संबंध हे करारात्मक बनत चालले आहेत. सामाजिक नियंत्रणासाठी कायदा, पोलीस, न्यायालय यांचा वापर करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

५) **मनोरंजनातील परिवर्तन :** पूर्वी सदस्यांच्या मनोरंजनाचे कार्य ग्रामीण कुटुंब प्रभावीपणे पार पाडीत असे. कुटुंबातील कुलाचार, धार्मिक कर्मकांड, सण-उत्सव इत्यादीमुळे सदस्यांचे निकोप मनोरंजन होई. आज मात्र ग्रामीण भागातही रेडिओ, टी.व्ही., सिनेमा, क्रीडामंडळे, वाचनालये अशी आधुनिक मनोरंजन साधने उपलब्ध झाल्याने कुटुंबातील पारंपारिक मनोरंजन साधनांचे महत्त्व कमी होत आहे.

अशाप्रकारे ग्रामीण कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल होत आहेत. पण ह्या बदलांची गती शहरी कुटुंबाच्या तुलनेत अद्याप खूप मंद आहे.

### २.३.२ ग्रामीण जातीसंस्था

कुटुंब व धर्म या सामाजिक संस्थांप्रमाणेच जातीसंस्था ही भारतीय समाजातील एक महत्त्वाची सामाजिक संस्था असून तिचा भारतीय समाजाच्या विशेषतः ग्रामीण समाजाच्या सर्व अंगावर मोठा प्रभाव आहे. म्हणून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना जातीसंस्थेचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. म्हणून तुम्ही या ठिकाणी जातीसंस्थेचा अर्थ, व्याख्या व तिचा ग्रामीण जीवनाच्या विविध क्षेत्रावरील प्रभाव तसेच जातीसंस्थेतील परिवर्तन या बाबींचा अभ्यास करणार आहात.

**जातीचा अर्थ** (Meaning of Caste)

जात हा शब्द 'जत' या धातूपासून बनला असून त्याचा अर्थ 'जन्म घेणे' असा आहे. यावरून जात हा जन्माच्या आधारे निर्माण होणारा सामाजिक समूह ठरतो. Caste हा इंग्रजी शब्द उरींर या पोर्तुगीज शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'वंशशुद्धता' असा आहे. पोर्तुगीज लोकांनी याच अर्थाने हा शब्द वापरला. या अर्थानुसार जात हा वंशशुद्धतेच्या कल्पनेवर आधारलेला समूह ठरतो. पण जात हा समूह वंशशुद्धतेचा निदर्शक नाही हे अनेक अभ्यासकांनी सिद्ध केलेले आहे. शिवाय जातसंस्था ही अत्यंत गुंतागुंतीची संस्था असून तिला अनेक वैशिष्ट्ये वा पैलू आहेत. त्या सर्वांचे परिपूर्ण आकलन जात किंवा

उरींश या शब्दावरून होऊ शकत नाही. म्हणून जातीचा अर्थ समजण्यासाठी समाजशास्त्रज्ञानी जातीच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे उचित ठरते.

**जातीची व्याख्या** (Definition of Caste)

१. **मजूमदार व मदन** – जात हा एक बंद वर्ग आहे.

२. **चार्लस् कूले** – जेव्हा एखादा वर्ग पूर्णपणे आनुवंशिकतेवर आधारलेला असतो तेव्हा त्यास आपण जात म्हणू शकतो.

३. **डॉ. व्यंकटेश केतकर** यांच्या मते जातीची दोन वैशिष्ट्ये आहेत. अ) विशिष्ट जातीतील सदस्यांच्या पोटी जन्मलेल्या व्यक्तींनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. ब) आपल्या सदस्यांना आपल्या जातीबाहेरील व्यक्तींशी विवाह करण्यास कडक सामाजिक नियमाद्वारे प्रतिबंध केला जातो.

४. **प्रो. मुखर्जी** – जात ही प्रामुख्याने जन्मावर आधारलेली, समाजाचे विविध विभागात विभाजन करणारी गतिशील व्यवस्था असून ती आपल्या सदस्यांवर खाणेपिणे, विवाह, व्यवसाय व सामाजिक व्यवहार याबाबतीत कमीजास्त प्रमाणात निर्बंध घालते.

५. **ई. ए. ब्लंट** – जात हा अंतर्विवाही समूह आहे किंवा अंतर्विवाही समूहाचे संकलन आहे. जिला एक सामान्य नाव असते, जिचे सदस्यत्व आनुवंशिक असते; जी आपल्या सदसयांच्या सामाजिक संपर्कावर कांही निर्बंध घालते. एका सामान्य परंपरागत व्यवसायाचा अवलंब करते आणि समान उत्पत्तीचा दावा करते किंवा साधारणपणे एक सजातीय समुदाय आकारास आणणारी मानली जाते.

६. **ग्रीन** – जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की जिच्यामध्ये तत्त्वतः तरी व्यक्तीस आपला सामाजिक दर्जा बदलणे शक्य नसते. व्यक्तीस जन्माने प्राप्त होणारा दर्जा मरेपर्यंत कायम राहतो. व्यक्तीचा व्यवसाय, निवासस्थान, जीवनपद्धती, व्यक्तिगत संपर्क, विवाहाचा जोडीदार निवडण्याचे क्षेत्र, मित्रपरिवार इत्यादी बाबी जन्माने निश्चित होतात. तसेच उच्च जातीच्या व्यक्तींनी कनिष्ठ जातीतील व्यक्तींशी शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे कमीपणाचे मानले जाते. जातिव्यवस्थेचे कायद्याने संरक्षण केले असून तिला धर्माची संमती आहे.

**जातीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Caste)

वरीलपैकी कोणतीही व्याख्या जातीचे परिपूर्ण स्पष्टीकरण देत नाही. प्रत्येक व्याख्येत कांही उणिवा आहेत. जातीच्या सर्व वैशिष्ट्यांना सामावून घेणारी समाधानकारक व्याख्या करणे कठीण असल्याने डॉ. हटन, एन. के. दत्त आणि डॉ. घुर्ये यांनी जातीची व्याख्या न करता तिची वैशिष्ट्ये स्पष्ट करून तिचे स्वरूप समजावून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून आपणही जातीची कांही वैशिष्ट्ये अभ्यासून तिचे स्वरूप समजावून घेऊ. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

१. **जातीचा आधार जन्म :** व्यक्तिची जात जन्माने ठरते व ती मरेपर्यंत कायम राहते. जातीच्या आधारे व्यक्तीचे सामाजिक स्थान (दर्जा व भूमिका) ठरते व त्यामध्ये बदल करता येत नाही. तसेच जन्मावरून म्हणजेच जातीवरून व्यक्तीचा व्यवसाय, विवाहाचा जोडीदार, जीवनशैली, सामाजिक संपर्काचे क्षेत्र या बाबीही निर्धारित होतात. याबाबतचे जातीचे निश्चित नियम असून त्याचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी पूर्वी प्रत्येक जातीची नियामक मंडळे म्हणजेच जातीपंचायती होत्या. जातीनियमांचे पालन न करणाऱ्यास ह्या पंचायती शासन करीत. साहजिकच व्यक्ती समुदायाच्या नियंत्रणापेक्षा जातीच्या नियंत्रणास अधिक महत्त्व देत. त्यामुळे व्यक्तीच्या मनात समुदायनिष्ठा निर्माण होण्याऐवजी संकुचित जातीनिष्ठा निर्माण झाली. या जातीनिष्ठेमुळेच प्रत्येक जात इतर जातीहून स्वतंत्र व वेगळी ठरली. आणि जातींच्या आधारे भारतीय समाज अनेक खंडात (गटात) विभागला गेला. यालाच डॉ. घुर्ये यांनी समाजाचे खंडात्मक विभाजन असे म्हटले आहे.

२. **अधिक्रमी रचना :** जातिव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असल्याने तिच्यात श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना किंवा सोपानपरंपरा (Hierarchy) निर्माण झालेली आहे. म्हणजेच कांही जातीचा दर्जा श्रेष्ठ, कांहीचा कनिष्ठ तर कांहीचा मध्यम मानला आहे. जातिव्यवस्थेचा मूलाधार असलेल्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ, त्यानंतर क्षत्रियाचा, त्याच्या खालोखाल वैश्याचा तर सर्वात कनिष्ठ दर्जा शूद्र वर्णाचा मानला गेला. जातिव्यवस्थेतही ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ व शूद्राचा सर्वात कनिष्ठच मानला गेला. तथापि इतर जातींच्या दर्जाबाबत मात्र निश्चितता आढळत नाही. यापैकी कांही जाती इतरांपेक्षा आपला दर्जा श्रेष्ठ असल्याचा दावा करतात. उदा. महाराष्ट्रात कुणबी, सोनार, तेली, कोष्टी ह्यासारख्या जातींमध्ये आणि उत्तर भारतातील ठाकूर, यादव, पटेल, राजपूत, जाट इत्यादी जातीमध्ये श्रेष्ठकनिष्ठत्वाबाबत मतभेद आढळतात. दक्षिण भारतात 'कम्मलन' जात आपला दर्जा ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ मानते. जातीप्रमाणेच उपजातीत किंवा पोटजातीतही श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना आढळते. उदा. ब्राह्मण जात सर्वश्रेष्ठ आहे पण तिच्यातही कांही पोटजाती असून 'किरवंत' या पोटजातीस सर्वात कनिष्ठ मानले जाते. सुतार जातीतील 'पांचाळ' ही पोटजात इतर पोटजातीपेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अस्पृश्य जातीतील चांभार जात महारापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते तर महार जात मांगापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अशाप्रकारे प्रत्येक जातीत व पोटजातीत श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना आढळते.

३. **विशेषाधिकार आणि अपात्रता :** जातीच्या रचनेत श्रेष्ठ जातींना विशेषतः ब्राह्मण जातीस अनेक विशेष अधिकार व सवलती बहाल केल्या तर कनिष्ठ जातींवर विशेषतः अस्पृश्य जातींवर अनेक अपात्रता लादल्या आहेत. ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ, वंदनिय व अपिडनिय मानला. ब्राह्मणास 'भूदेव' मानून ब्राह्मण हत्या महापातक ठरविले. इतरांच्या नमस्कारास प्रतिनमस्कार न करता ब्राह्मण केवळ आशिर्वाद देई. अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य, वेदमंत्र इत्यादीबाबतचे अधिकार प्राधान्याने ब्राह्मणास दिले गेले. त्याखालोखाल इतर श्रेष्ठ जातींना कांही खास अधिकार व सवलती दिल्या. याउलट अस्पृश्य जातींना जीवनावश्यक अधिकार नाकारून त्यांच्यावर अनेक अपात्रता लादल्या. उदा. अस्पृश्यांना उच्च जातीच्या वस्तीत घर बांधणे, त्यांच्या

पाणवठ्यावर, मंदिरात, स्मशानभूमीत प्रवेश करणे, वेदमंत्र ऐकणे व उच्चारणे, शिक्षण घेणे, उंची वस्त्रे, पादत्राणे, छत्री, सुवर्णालंकार इत्यादी वापरणे, इत्यादी गोष्टींस मनाई केली. अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ मानला गेला. म्हणूनच पुण्यात पेशवाईच्या काळात अस्पृश्यांना सावली ज्यावेळी लांब पडते त्यावेळी महामार्गावरून फिरण्यास मनाई केली. तसेच त्यांनी रस्त्यावर थुंकू नये म्हणून त्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी मडके बांधण्याची सक्ती केली. गुजरातमध्ये अस्पृश्यांना आपण अस्पृश्य आहोत हे दर्शविण्यासाठी जनावराची शिंगे जवळ बाळगावी लागत. तर पंजाबात भंग्याला आपण येत असल्याची वर्दी ओरडून द्यावी लागे. अशाप्रकारे विशेषाधिकार व अपात्रता यांच्यामुळे भारतीय समाजात प्रचंड सामाजिक विषमता निर्माण झाली.

४. **व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव :** जातिव्यवस्थेत प्रत्येक जातीचा एक परंपरागत व्यवसाय निर्धारित करून व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन घातले. आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याचे किंवा बदलण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. विविध व्यवसायांशी श्रेष्ठकनिष्ठत्वाची व पवित्र-अपवित्रतेची भावना जोडली गेली. श्रेष्ठ जातींचे व्यवसाय उच्च व पवित्र मानले तर कनिष्ठ जातींचे व्यवसाय नीच व अपवित्र मानले. कनिष्ठ जातींना उच्च जातीचे व्यवसाय करण्यास मनाई केली. प्रत्येक जातीचा एक ठराविक व्यवसाय असला तरी एकच व्यवसाय अनेक जाती करताना आढळतात. उदा. शेती, व्यापार, लष्करी सेवा इत्यादी व्यवसाय विविध जाती करताना आढळत.

५. **विवाहावरील निर्बंध :** जात हा अंतर्विवाही समूह आहे. व्यक्तीला आपल्या जातीतूनच विवाहाचा जोडीदार निवडण्याचा कडक निर्बंध घातलेला आढळतो. परजातीतील व्यक्तिशी विवाह करणे निषिद्ध ठरविले. एकाच जातीतील पोटजातीही अंतर्विवाहाचा नियम पाळतात. जातीचे सदस्यत्व जन्माने मिळते या तत्त्वाशी हा नियम सुसंगत ठरतो. वंशशुद्धता टिकविण्याची भावना या नियमामागे असल्याचे दिसते. अर्थात अनुलोम विवाह (उच्च जातीतील पुरुष व कनिष्ठ जातीतील स्त्री यांचा विवाह) आणि प्रतिलोम विवाह (उच्च जातीतील स्त्री व कनिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह) अंतर्विवाहाच्या नियमास अपवाद ठरविले. तथापि अनुलोम विवाह कनिष्ठ दर्जाचा तर प्रतिलोम विवाह निषिद्ध मानला. त्यामुळे अंतर्विवाहाचे पालन जवळपास अनिवार्यच बनले. आज आंतरजातीय विवाह कायदेशीर मानला असला तरी बहुसंख्य लोक स्वजातीतील व्यक्तीशीच विवाह करताना दिसतात.

६. **खाणेपिणे आणि सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध :** व्यक्तीने कोणत्या जातीतील लोकांकडून अन्नपाणी स्वीकारावे, कोणाच्या पंगतीला बसून भोजन घ्यावे याबाबतचेही जातीचे कांही निर्बंध आहेत. साधारणतः उच्च जाती कनिष्ठ जातीच्या हातचे अन्नपाणी स्वीकारणे व त्यांच्या पंगतीला बसून भोजन घेणे निषिद्ध मानतात. यासंदर्भात प्रदेशपरत्वे भिन्नता आढळते. उदा. उत्तर भारतातील कांही उच्च जाती कनिष्ठ जातीकडून पक्के अन्न (दुधातुपातून बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारतात. मात्र कच्चे अन्न (पाण्यात बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारत नाहीत. महाराष्ट्रात उच्च जाती कनिष्ठ जातीनी बनविलेले खाद्यपदार्थ

(भात, भाकरी, पोळी इत्यादी) स्वीकारत नाहीत मात्र तांदुळ, डाळी पीठ स्वीकारतात. यास कोरडा शिधा असे म्हणतात. कनिष्ठ जाती मात्र उच्च जातीकडून कोणत्याही प्रकारचे अन्न आनंदाने स्वीकारतात.

खाण्यापिण्याप्रमाणेच सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध आढळतात. उच्च जाती कनिष्ठ जातीशी घनिष्ठ असा शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे, त्यांच्यात उठबस करणे निषिद्ध व कमीपणाचे मानतात. कनिष्ठ जातीतील व्यक्तीने उच्च जातीतील व्यक्तीशी नेहमी अदबीने वागावे, त्याच्यापासून ठराविक अंतर ठेवून संभाषण करावे असेही नियम आढळतात. उदा. दक्षिण भारतात 'तिया' या अस्पृश्य जातीच्या व्यक्तीने १२ पावले दूर राहून तर 'इलायन वाशानारायण' या जातीने २४ पावले दूर राहून उच्च जातीशी व्यवहार करावा असा नियम होता. यालाच 'आपल्या पायरीने वागणे' असे म्हणतात. जातीजातीतील सामाजिक संपर्काबाबतची ही पायरी म्हणजेच मर्यादा पाळणे व्यक्तीला अनिवार्य असे.

७. **धर्माचा आधार :** जातिव्यवस्थेला हिंदू धर्माचा आधार दिलेला असतो. जातिव्यवस्थेचे वरील सर्व नियम हे धर्माच्या आधारे लोकांच्या मनावर बिंबविण्यात आले. जाती नियमांचे पालन हे धर्मपालन ठरविले. हिंदूधर्मातील कर्म व पुनर्जन्म सिद्धांताचा आधार जातीच्या नियमांना दिला गेला. गतजन्मातील शुभाशुभ कर्मांचा परिणाम (फळ) म्हणून सांप्रत (सध्याच्या) जीवनात अनुक्रमे उच्च व नीच जातीत जन्म मिळतो. सांप्रत जीवनात जी व्यक्ती स्वजातीचे नियम निष्ठेने पाळते तिला पुढील जन्मी उच्च जात प्राप्त होते असे तत्त्वज्ञान समाजात रुजविले. त्यामुळे लोकांच्या मनावर जातिनियमांचा पगडा बसला व ते शतकानुशतके जातीनियम निष्ठेने पाळीत आले.

जातीची वरील वैशिष्ट्ये ही पारंपारिक भारतीय समाजातील आहेत. आधुनिक काळात, पाश्चात्त्य संकृती व शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था, दळणवळणाची प्रगत साधने, सामाजिक सुधारणा चळवळी, लोकशाही मूल्ये, राज्यघटनेतील तरतुदी व पुरोगामी कायदे इ. घटांचा प्रभाव पडून जातीची वरील वैशिष्ट्ये बदलू लागली आहेत. जातीचे कांही नियम नष्ट झाले असून कांही नियम खूपच शिथील झाले आहेत. त्यामुळे जातिव्यवस्थेचा भारतीय समाजावरील विशेषतः औद्योगिक-नागरी समाजावरील प्रभाव खूपच कमी झाला आहे. तथापि ग्रामीण समाजावरील जातीचा प्रभाव अद्यापही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

**जातीसंस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव**

ग्रामीण समाजजीवनाच्या सर्व अंगावर जातीसंस्थेचा प्रचंड प्रभाव पडलेला दिसतो. ग्रामीण व्यक्ती, समूह, संस्था व जीवनपद्धती यांच्या जडणघडणीत जातीसंस्थेने निर्णायक व महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

अ) **आर्थिक जीवनावरील प्रभाव :**

ग्रामीण समाजातील उत्पादन, वितरण, उपभोग इ. आर्थिक प्रक्रियांवर जातीचा प्रभाव पडलेला आढळतो.

१) **उत्पादन पद्धती :** परंपरागत ग्रामीण समाजात जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या उत्पादन कार्याचे वाटप जातीच्या आधारे केले गेले. शेती हा मुख्य व्यवसाय प्रामुख्याने उच्च जातींच्या हाती होता व आजही आहे. तर बिगरशेती व्यवसाय हे कनिष्ठ जाती करीत असत. सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, न्हावी, परीट, कोळी, कुंभार, सोनार, गुरव, चौगुला इ. १२ बलुतेदार आणि साळी, माळी, तेली, तांबाळी, धनगर, सनगर, कोष्टी, कासार, डवरी, डोंबारी, कोल्हाटी इ. १८ अलुतेदार आपापल्या जातीचे व्यवसाय करून शेतकऱ्यांच्या शेतीविषयक व प्रापंचिक गरजांची पूर्तता करीत आणि त्याच्या मोबदल्यात शेतकरी सुगीच्या वेळी त्यांना धान्य देऊन त्यांच्या निर्वाहाची सोय करीत. अशाप्रकारे खेड्यातील सर्व जाती आपापले व्यवसाय करून परस्परांच्या गरजा भागवित. या पद्धतीलाच बलुता-अलुता पद्धती म्हणतात. जातीवर आधारलेल्या या बलुता-अलुता पद्धतीने खेड्यांची कार्यविभाजनाची गरज भागविली व खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता मिळवून दिली. अशाप्रकारे ग्रामीण उत्पादन पद्धती जातीवर आधारलेली होती. आज राज्यघटनेने सर्व जातींना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने जातीचेच व्यवसाय करण्याची सक्ती राहिलेली नाही. तसेच औद्योगिकीकरण, नागरीकरण, शिक्षणप्रसार इ. घटकांच्या प्रभावामुळे बलुतापद्धती कोलमडून पडली आहे. तरीही बहुसंख्य गरीब व अडाणी बलुतेदार-अलुतेदार जाती आपला परंपरागत व्यवसाय करताना दिसतात. जात आणि उत्पादन पद्धती किंवा व्यवसाय यांच्यातील संबंध पूर्णपणे संपलेला नाही.

२) **उपभोगाची पद्धती :** ग्रामीण समाजातील उपभोगाच्या पद्धतीवरही जातीचा प्रभाव पडलेला दिसतो. व्यक्तीने काय खावेप्यावे, कोणाबरोबर खावेप्यावे, कोणाच्या हातचे अन्नपाणी ग्रहण करावे, तिची वेशभूषा, केशभूषा, दागदागिने कसे असावेत, तिने गावात कोठे व कशापद्धतीचे घर बांधावे इ. बाबतचे जातीचे नियम होते. तसेच वेगवेगळ्या जातीसाठी वेगवेगळे पाणवठे होते. उच्च जातींच्या पाणवठ्यावर कनिष्ठ जातींना पाणी भरण्यास मनाई असे. अशाप्रकारे उपभोगासंबंधीचे जातीचे नियम होते व ते व्यक्तीला पाळावेच लागत. आज हे नियम बऱ्याच प्राणात शिथील असले तरी ते पूर्णपणे संपुष्टात आलेले नाहीत. कनिष्ठ जातींच्या हातचे अन्नपाणी घेणे उच्च जातीचे लोक अद्यापही कमीपणाचे मानतात. त्यामुळेच खेड्यात कनिष्ठ जातीच्या व्यक्तीचे हॉटेल आजही दिसत नाही. उच्चशिक्षित व सधन बनलेल्या अस्पृश्य व्यक्तीला खेड्यात उच्च जातीच्या वसाहतीत घर बांधता येत नाही किंवा भाड्याने मिळत नाही.

३) **राहणीमानाचा दर्जा :** खेड्यातील लोकांचे राहणीमान व जात यांच्यामध्येही जवळचा संबंध दिसतो. एकंदरीत ग्रामीण राहणीमान निम्न दर्जाचे असले तरी त्यामध्ये जातीपरत्वे भिन्नता दिसते. खेड्यातील शेती, व्यापार, उद्योग हे उच्च जातीच्या हाती असल्याने त्यांचे राहणीमान वरच्या दर्जाचे आहे. तर कनिष्ठ

जातींना विशेषतः अस्पृश्य जातींना उत्पन्नाचे निश्चित साधन नसल्याने त्यांच्यात प्रचंड दारिद्र्य आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान खूपच निकृष्ट दर्जाचे आहे. बहुसंख्य कनिष्ठ जाती निर्वाहासाठी उच्च जातीवरच अवलंबून आहेत.

४) **कर्जबाजारीपणा :** ग्रामीण समाजात जात व कर्जबाजारीपणा यांचाही घनिष्ट संबंध आहे. कांही उच्च जाती पूर्वापारपणे सावकारीचा धंदा करतात. तर कांही जाती विशेषतः कनिष्ठ जाती पिढ्यानपिढ्या ह्या सावकारांच्या कर्जात बुडालेल्या आहेत. प्रचंड दारिद्र्यामुळे या जातींना गरजापूर्तीसाठी सावकारांकडून प्रचंड व्याजदराने कर्ज घ्यावे लागते आणि हे सावकार कर्जफेडीच्या नावाखाली त्यांना विनामोबदल्यात वा अल्प मोबदल्यात गुलामासारखे राबवून घेतात. डॉ. नेहरुंच्या मते कर्जबाजारीपणा हा कांही जातींचा स्थायीभाव बनलेला आहे.

**ब) सामाजिक जीवनावरील प्रभाव :**

१) **सामाजिक दर्जा :** परंपरागत ग्रामीण समाजात अर्पित दर्जाला महत्त्व होते. जन्मावरून जात व जातीवरून व्यक्तीचा दर्जा ठरत असे आणि त्यामध्ये तिला बदल करता येत नसे. मूर्ख व कर्तृत्वशून्य ब्राह्मणाचा दर्जा उच्च तर विद्वान व कर्तत्ववान शूद्र व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ मानला जाई. आज अर्पित दर्जाऐवजी अर्जित दर्जाला महत्त्व प्राप्त होत आहे. सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण इ. च्या आधारे कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तीला आपला दर्जा उंचावण्याची संधी उपलब्ध होत आहे. तरीही खेड्यात अद्यापही जात व दर्जा यातील संबंध पूर्णपणे संपलेला नाही. उच्च जातीतील साधारण व्यक्तीस जो मानसन्मान व प्रतिष्ठा मिळते ती कनिष्ठ जातीतील असाधारण कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्तीला मिळत नाही. शिक्षण, सत्ता, संपत्ती मिळविली तरीही कनिष्ठ जातीतील व्यक्तीचे कनिष्ठत्व संपत नाही. तिच्या कनिष्ठ जातीचा उल्लेख आवर्जून होतच राहतो.

२) **सामाजिक संपर्काचे क्षेत्र :** ग्रामीण व्यक्तीच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही जातीद्वारेच निर्धारित होते. ग्रामीण व्यक्ती प्रामुख्याने आपल्या जातीतील व्यक्तीशीच घनिष्ठ, घरोब्याचे संबंध प्रस्थापित करताना दिसतात. परजातीतील विशेषतः आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीतील व्यक्तीशी शारीरिक व सामाजिक संपर्क प्रस्थापित करण्यास जातीसंस्थेने मनाई केलेली होती. आज हा निर्बंध शिथील झाला असला तरीही खेड्यातील उच्च जाती कनिष्ठ जातींशी घनिष्ठ सामाजिक संपर्क ठेवणे कमीपणाचे, अप्रतिष्ठेचे मानतात.

३) **सामाजिक नियंत्रण :** ग्रामीण व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण जातीद्वारे प्रभावीपणे होत असे. पूर्वी बहुतेक जातीच्या जातीपंचायती होत्या आणि त्या आपल्या सदस्यांना जाती नियमांचे पालन करावयास लावीत. जातीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास त्या पंचायती शिक्षाही करीत. आज या पंचायती इतिहासजमा झाल्या असल्यातरीही खेड्यात व्यक्तीला 'स्वतःच्या' जातीच्या विरोधात जाऊन वागणे व जगणे कठीण जाते.

४) **विवाहसंबंध :** व्यक्तीच्या विवाहसंबंधावरही जातीचा प्रभाव होता. जात हा अंतर्विवाही समूह असून तो व्यक्तीला जातीबाहेरील व्यक्तीशी विवाहसंबंध जोडण्यास कठोरपणे मनाई करत असे. पोटजातीतही अंतर्विवाहाचा नियम पाळीत. आज आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविला असला तरीही खेड्यात अद्यापही परजातीतील व्यक्तीशी विवाह करणे मानहानीकारक व घराण्याची बेअब्रु करणारे कृत्य मानले जाते. त्यामुळे ग्रामीण लोक जात-अंतर्विवाहाचेच पालन कसोशीने करतात. अंतर्विवाहाच्या नियमांमुळे खेड्यातील जातीजातीतील सामाजिक अंतर वा दुरत्व कायम राहिलेले आहे.

**क) शैक्षणिक जीवनावरील प्रभाव :**

१) **शिक्षणाचा अधिकार :** परंपरागत ग्रामीण समाजात शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चजातीनाच होता. अध्ययन व अध्यापन हे ब्राह्मणांचे कार्य मानल्याने शिक्षण क्षेत्रात त्यांची मक्तेदारी निर्माण झाली होती. स्त्रीशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.

२) **शैक्षणिक मागासलेपण :** आज शिक्षणाचा अधिकार सर्व जातींना मिळाला आहे. ग्रामीण समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. तरीही दारिद्र्य व प्रेरणांचा अभाव यामुळे कनिष्ठ जाती शैक्षणिक योजनांचा पुरेसा फायदा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक मागासलेपण संपलेले नाही.

३) **व्यावसायिक शिक्षण :** परंपरागत समाजात व्यावसायिक शिक्षण व जातींचा प्रत्यक्ष संबंध होता. व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करावा लागे व त्या व्यवसायाचे शिक्षण कुटुंबात वडिलधाऱ्यांच्या हाताखाली मुलांना लहानपणापासूनच दिले जाई. आज ग्रामीण भागातही व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था निघाल्या असल्या तरीही सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परीट इ. जातीची मुले आपल्या व्यवसायाचे शिक्षण कुटुंबातच घेताना दिसतात.

**ड) धार्मिक जीवनावरील प्रभाव :**

१) **जातीधर्म :** जातिव्यवस्थेला हिंदूधर्माचा आधार दिला गेला. जातिव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे. त्यामुळे जातीचे नियम पाळणे हे व्यक्तीचे परमकर्तव्य ठरते असे तत्त्वज्ञान लोकांच्या मनावर बिंबविले. यालाच 'जातीधर्म' म्हटले गेले. 'जातीधर्मपालन' हे धार्मिक जीवनाचे महत्त्वाचे अंग बनले.

२) **धार्मिक कार्यातील सहभाग :** व्यक्तीचा धार्मिक कार्यातील सहभाग हा देखील जातीव्यवस्थेवर आधारलेला होता. खेड्यात वेगवेगळ्या जातीची वेगवेगळी दैवते व देवालये आहेत. उच्च जातीच्या देवालयात कनिष्ठ जातींना प्रवेश दिला जात नाही. तसेच तेथे होणाऱ्या पूजाअर्चा, प्रार्थना, भजन, किर्तन इ. कार्यात कनिष्ठ जातींना सहभागी होता येत नाही. धार्मिक कार्याचे पौरोहित्य हे उच्च जातीकडे विशेषतः ब्राह्मणाकडेच असते.

**३) धार्मिक शिक्षण :** धार्मिक शिक्षण ही जातिव्यवस्थेच्या प्रभावाखाली होते. धार्मिक विधी व कर्मकांडाचे ज्ञान मिळविणे, वेदासारख्या धर्मग्रंथांचे पठण करणे, वेदमंत्र उच्चारणे व ऐकणे इ. बाबतचे अधिकार केवळ ब्राह्मण व क्षत्रिय यांनाच दिले गेले. कनिष्ठ जातीसाठी पुराणोक्त मंत्र वापरले जात.

**ई) राजकीय जीवनावरील प्रभाव :**

प्राचीन काळापासून ग्रामीण राजकीय जीवनावर जातिव्यवस्थेचा प्रभाव असून तो दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

**१) प्रशासन :** प्राचीन व मध्ययुगीन काळात ग्राम प्रशासन (गावकारभार) चालविण्यासाठी ज्या ग्रामपंचायती होत्या त्यांच्यावरही जातिव्यवस्थेचा प्रभाव होता. या पंचायतीचे सदस्य व ग्रामीणी नावाचा ग्रामप्रमुख हे उच्च जातीचेच असत. गाव कारभाराबाबतचे सर्व निर्णय तेच घेत. कनिष्ठ जातींना पंचायतीमध्ये व निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कोणतेही स्थान नव्हते. त्यांना केवळ आज्ञापालनाचे कर्तव्य बजावावे लागे.

**२) न्यायदान :** परंपरागत समाजातील न्यायदान प्रक्रियेवरही जातीचा प्रभाव होता. एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळ्या शिक्षेची तरतूद केलेली होती. उदा. चोरी करणारी व्यक्ती उच्च जातीची असल्यास तिला सौम्य शिक्षा होई, मात्र ती कनिष्ठ जातीची असल्यास तिला गंभीर शिक्षा होई. जातीपंचायतीनाही न्यायदानाचे अधिकार होते. एकाच जातीतील लोकांचे भांडणतंटे हे जातीपंचायतीपुढे मांडले जात. या पंचायती न्यायनिवडा करून गुन्हेगारास शिक्षाही देत असत.

**३) जातीय राजकारण :** स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या लोकशाही राजव्यवस्थेत राजकीय पक्ष, निवडणुकीचा प्रचार, मतदान यांना महत्त्व आले आहे. निवडणुकीच्या राजकारणात उमेदवार ठरविणे, मतदान करणे, मंत्रिमंडळ बनविणे, खातेवाटप करणे इत्यादीवर जातीचा प्रभाव पडलेला आढळतो. स्वजातीच्या अपात्र उमेदवारास लोक मते देतात तर परजातीतील चांगल्या उमेदवारासही नाकारतात. ज्या राज्यात जी जात प्रभावशाली आहे तेथील सत्ता त्या जातीच्या हाती एकवटलेली आढळते. उदा. पंजाबात जाट, महाराष्ट्रात मराठा, आंध्र प्रदेशात रेड्डी इत्यादी. पंचायत राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्था जातीय राजकारणाचे अड्डे बनल्या आहेत. उच्च जातींनी या संस्था काबीज केल्या असून कनिष्ठ जातींना त्या संस्थांत आरक्षण देऊन ही त्यांचा प्रभाव पडत नाही. अशाप्रकारे ग्रामीण राजकारण हे पूर्णतः जातीच्या प्रभावाखाली असल्याचे आढळते.

**४) ग्रामीण नेतृत्व :** पारंपारिक ग्रामीण नेतृत्व हे जातीसंस्थेच्या प्रभावाखाली होते. आजच्या लोकशाही व्यवस्थेतील नेतृत्वही जातीवादावरच पोसले जात आहे. बहुसंख्य ग्रामीण नेते हे आपापल्या गावाचे नव्हे तर जातीचे नेते म्हणूनच ओळखले जातात. त्यामुळे ग्रामीण भागात जातीवाद, जातीय तेढ वाढली असून ग्रामीण सामाजिक-राजकीय जीवनाचे प्रदूषण वाढले आहे.

अशाप्रकारे ग्रामीण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय जीवनावर जातीसंस्थेचा प्रभाव दिसून येतो.

**जातीसंस्थेतील परिवर्तन**

जातीसंस्थेची व्याख्या, वैशिष्ट्ये व तिचा ग्रामीण समाजावरील प्रभाव अभ्यासल्यानंतर आता तुम्ही ग्रामीण समाजातील जातीसंस्थेत कसे परिवर्तन होत आहे हे समजावून घेणार आहात. आधुनिक काळात औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाहतुकीची व संदेशवहनाची प्रगत साधने, सामाजिक कायदे, सामाजिक चळवळी, ग्रामीण विकास कार्यक्रम, पंचायत राज्यव्यवस्था इत्यादींचा प्रभाव पडून ग्रामीण भागातील जातीसंस्थेत हळूहळू परिवर्तन होत आहे. या परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) अर्जित दर्जाला महत्त्व :** जातिव्यवस्थेत व्यक्तीचा दर्जा जन्मावरून म्हणजेच जातीवरून ठरे व त्यामध्ये बदल करता येत नसे. आजही ग्रामीण भागात थोडीफार अशीच परिस्थिती आहे. मात्र त्यामध्ये हळूहळू बदल होत आहे. व्यक्तीच्या कर्तृत्वाच्या आधारे तिचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा निर्धारित होण्यास सुरुवात झाली आहे. कनिष्ठ जातीतील व्यक्तीने स्वकर्तृत्वाने सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण प्राप्त केल्यास तिला मान-सन्मान देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. तसेच केवळ उच्च जातीत जन्मला म्हणून मूर्ख व कर्तृत्वहीन व्यक्तीचे सामाजिक स्थान व दर्जा श्रेष्ठ मानला जाईलच असे नाही.

**२) खाणेपिणे व सामाजिक संपर्काबाबतच्या नियमात शिथिलता :** जातीचे खाण्यापिण्याबाबतचे व सामाजिक संपर्काबाबतचे नियम हळूहळू शिथिल होत आहेत. स्पृश-अस्पृश्य, श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्चनीच, सोवळे ओवळे, शिवाशिव याबाबतच्या जाती नियमांचे पूर्वीइतके स्तोम माजविले जात नाही. सुशिक्षित ग्रामीण पिढी हे नियम पाळीनासी झाली आहे. खेड्यातील हॉटेलमध्ये सर्वजातीच्या लोकांना प्रवेश दिला जातो. नळयोजना आल्याने जातीचे पाणवठे नष्ट झाले आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे लोक गावठाण्याबाहेर घरे बांधताना जातीचा विचार करेनासे झाले आहेत. त्यामुळे खेड्याच्या विस्तारीत भागात वेगवेगळ्या जातीचे लोक एकमेकाशेजारी घरे बांधू लागले आहेत. विविध जातीतील लोकांत सामाजिक संपर्क वाढत चालला आहे. मात्र जातीतच विवाह करण्याचे प्रमाण अद्याप मोठे आहे. आंतरजातीय विवाह आजही खेड्यापाड्यात निषिद्ध मानला जातो.

**३) व्यवसाय स्वातंत्र्य :** पूर्वी प्रत्येक जातीचा विशिष्ट व्यवसाय होता व तोच व्यवसाय व्यक्तीला करण्याचे बंधन होते. आज हे बंधन संपुष्टात आले आहे. लोक आपल्या आवडीचा व्यवसाय निवडू शकतात. शिक्षणामुळे कनिष्ठ जातीत जागृती आल्याने त्या बलुता पद्धतीचा त्याग करू लागल्या आहेत. ज्या बलुतेदार जाती आपला पारंपारिक व्यवसाय करतात त्यादेखील धान्याच्या मोबदल्यात काम करण्याऐवजी रोख मोबदला घेणे पसंत करीत आहेत. पूर्वी कनिष्ठ जातीचे व्यवसाय अपवित्र मानले जात. आजही अपवित्रतेची कल्पना मागे पडू लागली आहे. पैसा देणार कोणताही समाजमान्य व्यवसाय ग्रामीण

लोक जातीपातीचा विचार न करता करू लागले आहेत. उदा. दुधदुभते, पशुपालन, मेंढपालन, कुक्कुटपालन, विणकाम, विटकाम इ.

**४) जातीपंचायती नष्ट :** पूर्वी व्यक्ती जातीचे नियम पाळतात की नाही हे पाहण्यासाठी बहुतेक जातीच्या 'जातपंचायती' होत्या. जातीचे नियम मोडणाऱ्यास ह्या पंचायती शिक्षा करीत. आज ह्या पंचायती नष्ट झाल्या आहेत. त्यांचे अधिकार व कर्तव्ये राज्याकडे हस्तांतरीत झाली आहेत. जातीपंचायतीऐवजी कायदा, पोलीस, न्यायालये इत्यादीद्वारे ग्रामीण लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण होऊ लागले आहे.

**५) जात व धर्म यांची फारकत :** पूर्वी जात ही ईश्वरनिर्मित आहे असे मानले जाई. आज ग्रामीण भागातही शिक्षण प्रसार होऊ लागल्याने जात ईश्वरनिर्मित आहे, गतजन्मातील शुभाशुभ कर्माचे फळ म्हणून उच्च व नीच जातीत जन्म मिळतो ह्या विचारसरणीचा प्रभाव हळूहळू कमी होत आहे. विशेषतः सुशिक्षित ग्रामीण युवावर्ग ही विचारसरणी नाकारू लागला आहे.

**६) जातीयवाद :** पूर्वीचा जातीभेद व अस्पृश्यतापालन कमी होत असले तरी खेड्यात आज जातीयवाद मात्र वाढत आहे. आपल्या जातीचे हित साध्य करण्यासाठी जातीच्या आधारे पुनर्संघटन करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पंचायतराज्यामुळे जातीयवाद व जातीय तेढ वाढण्यास हातभार लावला आहे. पंचायत राज्यातील निवडणुका ह्या जातीच्या आधारे लढविल्या जात आहेत. जात पाहून मत देण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

अशाप्रकारे आज जातीसंस्थेत परिवर्तन होत असल्याचे दिसते. पण ह्या परिवर्तनाची गती मंद आहे. जातीचे जुने नियम नष्ट वा शिथिल झाले असले तरी जातीसंस्था नष्ट झालेली नाही. जात-अंतर्विवाहाचा नियम आजही खेड्यात पाळला जातो. अस्पृश्य जातीतील उच्चशिक्षित सरकारी कर्मचाऱ्यास खेड्यात उच्चजातीत घर भाड्याने मिळत नाही. अस्पृश्यांवरील अन्याय-अत्याचार वाढत आहेत. अनेक खेड्यात अस्पृश्यांना सवर्णांच्या मंदिरात प्रवेश दिला जात नाही. खेड्यातील राजकारण हे अद्याप जातीवरच खेळले जाते. त्यातून जाती-जातीतील संघर्ष वाढत आहे.

### **२.३.३ ग्रामीण धर्मसंस्था** (Rural Religion)

कुटुंबाप्रमाणेच धर्म ही देखील सर्वच समाजात आढळणारी एक मूलभूत अशी सामाजिक संस्था आहे. तथापि सर्व समाजातील धर्माचे स्वरूप सारखे नसल्याने धर्माची सर्वांना मान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. तथापि अनेक विद्वानांनी धर्माची व्याख्या केलेली आहे.

१) **चंद्रकांत खंडागळे :** धर्म ही अलौकिक शक्तीशी संबंधित असलेल्या श्रद्धा व विधी यांची व्यवस्था आहे तसेच मानवी जीवनाशी संबंधित असलेली आचारसंहिता आहे.

२) **एडवर्ड टायलर :** ''दिव्य प्राण्यांवरील श्रद्धा म्हणजे धर्म होय.''

३) **डॉ. होबेल :** ''अलौकिकतेविषयीच्या श्रद्धा, अभिवृत्ती व अशा श्रद्धांशी संबंधित असलेले आचरण यांचा धर्मात समावेश होतो.''

३) **जेम्स फ्रेझर :** ''मानवापेक्षा श्रेष्ठ असलेली शक्ती, जी मानवी जीवन व निसर्गाचे व्यवहार यांचे दिग्दर्शन व नियंत्रण करते अशी श्रद्धा असते, त्या शक्तीची केलेली आराधना म्हणजे धर्म होय.

४) **मॅलिनोस्की :** ''धर्म ही कृती करण्याची पद्धती तसेच श्रद्धेची व्यवस्था आहे आणि समाजशास्त्रीय घटना आहे. तसेच व्यक्तिगत अनुभूतीही आहे.''

वरील व्याख्यांवरून ''धर्म ही मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या अलौकिक किंवा दिव्य शक्तीच्या अस्तित्वावरील श्रद्धा आणि त्या शक्तीची कृपा संपादण्यासाठी करावयाचे विधी यांची व्यवस्था आहे.'' असा अर्थ स्पष्ट होतो. **हिंदुधर्म आणि बौद्धधर्मात** मात्र धर्म ही मानवी वर्तनाची संहिता (Code of Conduct) मानली आहे. धर्माच्या व्याख्येबाबत मतभिन्नता असली तरी एक गोष्ट मात्र खरी, की धर्माचा व्यक्ती, इतर सामाजिक संस्था व संपूर्ण समाज यांच्यावर मोठा प्रभाव आहे. म्हणूनच **किंग्जले डेव्हिस** म्हणतात की, ''धर्म हा मानव समाजात एवढा सार्वत्रिक, शाश्वत व व्यापक आहे की धर्माचे आकलन झाल्याशिवाय समाजाचे आकलन होणार नाही.'' डेव्हिसचे हे मत भारतीय ग्रामीण समाजास तर विशेषत्वाने लागू पडते. कारण नागर समाजापेक्षा ग्रामीण समाजावर धर्माचा पगडा अधिक आहे. ग्रामीण जीवनाची सर्व अंगे ही धर्माने प्रभावित झालेली आहेत. म्हणून ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण धर्माचे स्वरूप व त्याची कार्ये आपण समजावून घेणार आहोत.

**ग्रामीण धर्माचे स्वरूप** (Nature of Rural Religion)

भारतात हिंदू धर्माचे लोक बहुसंख्यांक असून इस्लाम, ख्रिस्ती, जैन, बौद्ध, शीख इत्यादी धर्माचे लोक अल्पसंख्यांक आहेत. ग्रामीण समाजातही अशीच स्थिती आहे. तथापि बहुसंख्यांक असलेल्या हिंदुधर्मातील श्रद्धा व विधी यांचा प्रभाव इतर धर्मातील लोकांवर पडलेला आहे. तसेच इतर धर्मातील श्रद्धा व विधी यांचाही प्रभाव हिंदुवर पडलेला आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील विविध धर्माचे लोक परस्परांच्या धार्मिक सण-उत्सवामध्ये सहभागी होतात. परस्परांच्या देवदेवतांना पूजतात. त्यामुळे ग्रामीण धर्माचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे बनलेले आहे. ग्रामीण धर्माचे स्वरूप समजण्यासाठी १) ग्रामीण धर्मश्रद्धा, २) ग्रामीण धार्मिक आचरण, ३) ग्रामीण धार्मिक संघटन आणि ४) ग्रामीण धार्मिक अधिकारी या चार बाबींचा विचार करावा लागतो.

**अ) ग्रामीण धर्मश्रद्धा** (Rural religious beliefs)

ग्रामीण धर्मश्रद्धांचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे आहे कारण त्यांना अनेक पैलू (अंगे) आहेत. ते पुढीलप्रमाणे -

१. **अलौकिक शक्तीच्या स्वरूपाबाबतची मतभिन्नता :** या विश्वात मानवापेक्षा श्रेष्ठ अशी एक अलौकिक शक्ती असून तिच्या कृपा-अवकृपेवरच मानवाची सुखदुःखे अवलंबून असल्याने तिला नेहमी प्रसन्न ठेवले पाहिजे अशी ग्रामीण लोकांची दृढ श्रद्धा आहे. तथापि या शक्तीच्या स्वरूपाबाबत मात्र त्यांच्यात मतभिन्नता आढळते. कांहींच्या मते ही शक्ती एकच आहे; कांहींच्या मते अनेक आहेत तर काहींच्या मते ही शक्ती एकच आहे पण ती विविध रूपे धारण करते. तसेच काहींच्या मते ही शक्ती सगुण-साकार आहे. कांहींच्या मते ती निर्गुण-निराकार आहे तर काहींच्या मते ती सगुण-साकार तसेच निर्गुण-निराकार अशी उभयविध आहे. साधारणपणे भारतीय ग्रामीण लोकांचा सगुण-साकार रूपावर व अनेकदेवतावादावर अधिक विश्वास असल्याचे आढळते.

२. **निसर्गदेवतांवरील श्रद्धा :** ग्रामीण लोक निसर्गशक्तींना अलौकिक शक्ती मानून म्हणजेच देवतेवता मानून त्यांची पूजाअर्चा करतात. उदा. पर्जन्यदेवता, वायूदेवता, अग्नीदेवता, वनदेवता इत्यादी. त्याचबरोबर निसर्गातील विविध पशुपक्षी, नद्या, पर्वत, वनस्पती इत्यादींच्या ठिकाणीही अलौकिक शक्ती आहे असे मानून त्यांची पूजा करतात. उदा. गाय, बैल, वाघ, साप इ. पशुंची, वड, पिंपळ, बेल इत्यादी वृक्षांची तर गरुडासारख्या पक्ष्याची पूजा करतात. थोडक्यात ग्रामीण धर्मश्रद्धेत निसर्गशक्तीवरील श्रद्धा अंतर्भूत आहे.

३. **आत्म्याच्या अमरत्वावरील श्रद्धा :** ग्रामीण धर्मात आत्म्याच्या अमरत्वावरील श्रद्धाही अंतर्भूत आहे. आत्मा हा देहाहून भिन्न असून मृत्यूनंतरही तो नष्ट न होता या विश्वात दिव्य प्राणी बनून संचार करीत राहतो. आणि मानवी जीवनावर शुभाशुभ असा प्रभाव टाकीत राहतो. अशी श्रद्धा ग्रामीण लोक बाळगतात. कांही आत्मे सज्जन तर कांही दुर्जन प्रवृत्तीचे असतात. सज्जन आत्मे मानवास मदत करतात तर दुर्जन आत्मे मानवास त्रास देतात. असे मानून ग्रामीण लोक सज्जन आत्म्यांना प्रसन्न ठेवण्याची तर दुर्जन आत्म्यांचा त्रास टाळण्यासाठी अनेक विधी करतात. यातूनच भूत-प्रेत पूजा उदयास आलेली आहे.

४. **पारलौकिक जगाच्या अस्तित्वावरील श्रद्धा :** ग्रामीण लोक ऐहिक (लौकिक) जगाहून वेगळे असे एक पारलौकिक जग आहे असे मानतात. या पारलौकिक जगाचे स्वर्गलोक, नरकलोक, प्रेतलोक, पितृलोक असे विभाग मानतात. स्वर्गलोकात देवदेवता राहतात व तेथे सर्व सुखे उपलब्ध असतात तर नरकलोकात दुष्ट आत्म्ये (सैतान) राहतात व तेथे दुःखच दुःख असते. ऐहिक जगात शुभ कर्म करणारी व्यक्ती मृत्यूनंतर स्वर्गात जाऊन सर्व सुखे उपभोगते तर अशुभ कर्म करणारी व्यक्ती नरकात जाते व अनंत दुःख भोगते अशी ग्रामीण लोकांची श्रद्धा आहे. ऐहिक जगात ज्यांच्या इच्छा अतृप्त राहतात त्यांचे आत्मे मृत्यूनंतर अतृप्त अवस्थेत भटकत राहतात असे मानून ग्रामीण लोक त्यांना मुक्ती मिळावी म्हणून श्राद्ध वगैरे विधी करतात. यातूनच ग्रामीण धर्मात पितृपूजा रूढ झाली आहे.

५. **जादुटोण्यावरील श्रद्धा :** ग्रामीण धर्मश्रद्धात जादुटोण्यावरील श्रद्धाही अंतर्भूत झालेली आढळते. ग्रामीण लोक जादुटोणा, मंत्र-तंत्र इत्यादीवर विश्वास ठेवतात. आणि सुख मिळावे व दुःख टळावे म्हणून धार्मिक विधीप्रमाणेच जादूच्या क्रिया करतात. त्यासाठी जादूगार, मांत्रिक, देवर्षी इत्यादींचे सहाय्य घेतात.

त्यातूनच ग्रामीण धर्मात चेटूक, भानामती, अंगारे-धुपारे, मंत्र-तंत्र, मूठ मारणे अशा संकल्पना निर्माण झालेल्या आहेत. अशाप्रकारे ग्रामीण धर्मात धर्मश्रद्धांमध्ये विविध पैलू गुंतलेले आढळतात.

### ब) **ग्रामीण धर्माचरण** (Rural religious practices)

धर्मश्रद्धेप्रमाणेच धर्माचरण हे ग्रामीण धर्माचे एक अंग आहे. अलौकिक शक्तीच्या इच्छेवरच आपली सुखदुःखे अवलंबून आहेत असे मानून ग्रामीण लोक तिला प्रसन्न करून घेण्यासाठी विविध प्रकारचे आचरण (वर्तन) करतात. त्यांनाच धर्माचरण असे म्हणतात. ग्रामीण धर्माचरणाचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे -

**१. प्रार्थना :** अलौकिक शक्तीस संपूर्ण शरण जाऊन तिची मनोभावे आळवणी (मनधरणी) करणे म्हणजे प्रार्थना होय. प्रार्थना ही पद्यमय असली तरी ती गाण्याप्रमाणे मजेत न म्हणता अत्यंत गंभीरपणे व लिनतेने म्हटली जाते. ग्रामीण लोक वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरूपात प्रार्थना करतात. प्रत्येक कुटुंबात कुलदेवतेची प्रार्थना होते तर ग्रामदेवतेची प्रार्थना सर्व गावकरी एकत्र येऊन करतात. प्रार्थना केल्याने देवदेवता प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतात अशी ग्रामीण लोकांची श्रद्धा असते. म्हणून ते धनप्राप्तीसाठी लक्ष्मीदेवतेची, ज्ञान प्राप्तीसाठी सरस्वतीची, पाऊस पडावा म्हणून पर्जन्यदेवतेची, धान्य पिकावे म्हणून भूदेवतेची प्रार्थना करतात.

**२. यज्ञ :** देवदेवतांनी प्रसन्न होऊन आपल्या मनोकामना पूर्ण कराव्यात म्हणून त्यांना कांही वस्तू यथासांगपणे व मनोभावे अर्पण करणे म्हणजे यज्ञ होय. ग्रामीण लोक विविध पद्धतीने यज्ञ करतात. उदा. ओंजळभर पाणी मंत्रोच्चारासह देवतांना अर्पण करणे म्हणजे अर्घ्य देणे, देवापुढे धूप वा अगरबत्ती जाळणे, देवांना हार, पाने, फुले, फळे, नैवद्य इत्यादी अर्पण करणे, त्यांना पशुपक्ष्यांचे बळी देणे इत्यादी कृत्ये यज्ञविधी आहेत. ग्रामीण लोक विविध हेतुंच्या पुर्तीसाठी विविध पद्धतीने यज्ञ करतात. उदा. रोगराई नष्ट व्हावी म्हणून मरिमातेपुढे बकरी-कोंबडी कापतात. नदीचा महापूर उतरावा म्हणून तिची ओटी खणानारळाने भरतात. पाऊस पडावा म्हणून महादेवाच्या मंदिराचा गाभारा पाण्याने भरतात. कांही खेड्यात 'देवकार्य' या नावाने यात्रा, जत्रा, उरूस अशा विशेष प्रसंगी देवतेपुढे पशुबळी देऊन त्याचे मांस प्रसाद म्हणून वाटतात. पूर्वी नरबळी देण्याचीही प्रथा होती. आज ती कायद्याने बंद केली असली तरी अंधश्रद्धेतून नरबळी देण्याच्या घटना अधूनमधून घडल्याचे आढळते. यज्ञ केल्याने देवता प्रसन्न होऊन इच्छित फळ मिळते असे ग्रामीण लोक मानतात.

**३. धार्मिक विधी** (Religious rituals) : ग्रामीण लोक सतत कोणते ना कोणते तरी धार्मिक विधी करीत असतात. कांही प्रमुख धार्मिक विधी पुढीलप्रमाणे -

**अ) मूर्तिपूजा :** ग्रामीण लोक विविध देवदेवतांच्या मूर्तींची पूजा करतात. बहुतेक कुटुंबात देवघर असून त्यामध्ये कुलदेवतेची मूर्ती असते व सकाळी तिची यथासांग पूजा केली जाते. मूर्तिपूजा हा दैनंदिन धर्मविधी मानला जातो.

**ब) उपवास :** विशिष्ट दिवशी विशिष्ट देवतेच्या नावाने उपवास करणे हाही महत्त्वाचा धार्मिक विधी ग्रामीण लोक करतात. उदा. सोमवारी महादेवाच्या नावाने, मंगळवारी अंबाबाईच्या नावाने, गुरुवारी दत्ताच्या तर शनिवारी मारुतीच्या नावाने उपवास करतात. नवरात्रात देवीच्या नावे ९ दिवसाचा उपवास करतात. उपवासाने मनाची व देहाची शुद्धी होते असे मानले जाते.

**क) व्रतवैकल्ये :** ग्रामीण लोक विशिष्ट देवदेवतांच्या नावाने व्रतवैकल्ये ही करतात. उदा. संतोषी मातेचे व्रत, नवरात्रातील दुर्गामातेचे व्रत. व्रतकाळात पोषाख, भोजन, इत्यादीबाबतचे कांही कडक नियम पाळतात. व्रताची सांगता मोठ्या श्रद्धेने केली जाते.

**ड) तीर्थयात्रा :** पवित्र स्थळांना (तीर्थस्थानांना) भेट देणे म्हणजे तीर्थयात्रा होय. ग्रामीण लोक आपल्या परिसरातील तीर्थस्थळाची वर्षातून किमान एकदा तरी यात्रा करतात. उदा. वारकरी पंढरपूरची, देवीचे भक्त तुळजापूरची, गणेशभक्त अष्टविनायकाची तीर्थयात्रा करतात. तसेच आयुष्यात एकदा तरी राष्ट्रीय स्तरावरील तीर्थस्थळांना (उदा. काशी, रामेश्वर, बद्रिनाथ इ.) भेट देण्याचे ध्येय बाळगतात. मुस्लिम हजयात्रेची, बौद्धलोक बुध्दगयेची, जैनलोक सम्मेद शिखरजीची यात्रा करण्याची मनिषा बाळगतात. तीर्थयात्रेबरोबरच पवित्र नदी संगमात स्नान करणे हेही पुण्यकर्म मानले जाते.

**इ) इतर विधी :** ग्रामीण जीवनातील कांही विशेष प्रसंगीही कांही विशेष विधी करतात. उदा. मुलांच्या जन्माच्या पाचव्या दिवशी पाचवीची पूजा करतात. मुलांचे नाव ठेवताना, जावळ काढताना, विवाह करताना तसेच मृत्यूनंतरही वेगवेगळे विधी करतात. नवीन घरात प्रवेश करताना, शेती व्यवसायातील विविध क्रिया (पेरणी, मळणी इ.) करतानाही कांही विधी करतात.

अशाप्रकारे ग्रामीण लोक जन्मापासून मृत्यूपर्यंत व मृत्यूनंतरही विविध धार्मिक विधी सतत करीत असतात. ते केल्याने देवदेवता प्रसन्न होऊन आपल्या मनोकामना पूर्ण करतात अशी त्यांची श्रद्धा असते.

**४. निषेध नियमांचे पालन :** ग्रामीण धर्माचरणात निषेध नियमांच्या पालनास ही खूप महत्त्व आहे. कांही विशिष्ट प्रकारचे वर्तन वर्ज्य करणे म्हणजे निषेध नियमांचे (Taboos) पालन करणे होय. उदा. खेड्यात मृत्यू किंवा प्रसूती यामुळे येणारा 'सुतककाळ' अपवित्र मानून त्या काळात संबंधित व्यक्ती मंदिर प्रवेश करणे निषिद्ध मानतात. मासिक पाळी चालू असलेल्या स्त्रीचा स्पर्श अपवित्र मानून टाळतात. गावात पोथीवाचन (पारायण) चालू असताना लैंगिक संबंध ठेवणे निषिद्ध मानतात. विशिष्ट काळात उदा. श्रावण महिन्यात मांसाहार निषिद्ध मानतात. निषेध नियम न पाळल्यास देवदेवतांचा कोप होऊन कांहीतरी अनिष्ट घडते अशी ग्रामीण लोकांची श्रद्धा असते.

**क) ग्रामीण धार्मिक संघटन** (Rural Religious Organization)

इतर धर्माप्रमाणेच ग्रामीण धर्मातही संघटन आहे. बहुतेक धार्मिक विधी हे इतरांच्या समवेत व संघटितपणे केले जातात. त्यामुळे लोकांना सुखशांती लाभते. त्यांच्यात समूहभावना निर्माण होते. त्यातूनच धार्मिक कार्ये पार पाडण्यासाठी संघटना अस्तित्वात येते. भारतात प्रत्येक धर्माच्या संघटना असून त्या राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर कार्यरत आहेत. ग्रामीण भागात मठ, आश्रम, देवालय इत्यादीच्या रूपात धार्मिक संघटन आढळून येते. प्रत्येक धर्मात अनेक पंथ-उपपंथ, संप्रदाय-उपसंप्रदाय असून त्या प्रत्येकाची खेड्यापाड्यात देवालये, मठ, आश्रम आहेत. त्यांच्यामध्ये गावकरी एकत्र येऊन भजन, किर्तन, पारायण इ. उपक्रम राबवितात व आपापल्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करतात. देवालय, मठ, आश्रम यांना उत्पन्नाचे साधन म्हणून इनाम जमिनी दिल्या आहेत. त्यांचे व्यवस्थापन पाहण्यासाठी खास यंत्रणा उभारलेली असते. त्या यंत्रणेतील कर्मचारी भक्तिभावाने धार्मिक संघटनेची कार्ये पार पाडीत असतात.

**ड) ग्रामीण धार्मिक अधिकारी** (Rural Religious Authorities)

धार्मिक क्षेत्रात विशेषाधिकार असलेल्या व्यक्तींना धार्मिक अधिकारी म्हणतात. देव व मानव यांच्यातील दुवा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. साधारणपणे धर्मसंस्थापक, धर्मसुधारक, प्रेषित, द्रष्टे, साधुसंत, संन्यासी, पुरोहित, ज्योतिषी, जादूगार किंवा मांत्रिक इत्यादींना धार्मिक अधिकारी म्हणता येते. साधू, संत, संन्यासी यांचा धार्मिक व नैतिक अधिकार उच्च दर्जाचा असून तो दयाळू व परोपकारी असतात. गावोगावी फिरून ते लोकांना नैतिक उपदेश करतात. ज्योतिषी हा ईश्वरी इच्छा जाणून घेण्यासाठी काही साधने वापरतो व भविष्यकथन करतो. पुरोहित (पुजारी वा गुरव) हा स्थानिक धार्मिक अधिकारी असून तो मंदिराची व्यवस्था पाहतो. गावकऱ्यांचे धार्मिक विधी करून देतो. गावात भजन-किर्तनाचे आयोजन करतो. जादूगारास वा मांत्रिकास धार्मिक अधिकारी मानण्याबाबत मतभेद होऊ शकतात. तथापि ग्रामीण लोक त्याच्याकडे धार्मिक अधिकारी म्हणून पाहतात. अलौकिक शक्तीशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्याची मदत घेतात. वरील सर्व धार्मिक अधिकाऱ्यांचा ग्रामीण लोकांवर प्रभाव असतो. ते त्यांच्याकडे पूज्यभावनेने पाहतात.

**ग्रामीण धर्माची कार्ये** (Functions of Rural Religion)

साधारणपणे इतर समाजातील धर्माप्रमाणेच ग्रामीण समाजातील धर्माची कार्ये आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१. **सामाजिक ऐक्य निर्मिती :** धर्म ग्रामीण लोकांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करून ते टिकविण्याचे कार्य करतो. वेगवेगळे व्यवसाय, हितसंबंध, आवडीनिवडी, इच्छाआकांक्षा असलेल्या ग्रामीण लोकांना धर्म समान श्रद्धा, विधी, मूल्ये, प्रतिके व दृष्टिकोण पुरवितो व ती त्यांनी आत्मसात करण्याचा उपदेश करतो. परिणामी समान श्रद्धा व मूल्ये बाळगणाऱ्या व समान धार्मिक विधीत सहभागी होणाऱ्या लोकांमध्ये संसक्ती, सहकार्य व आपलेपणा निर्माण होतो. खेड्यातील सर्व लोक ग्रामदेवतेची पूजाअर्चा, यात्रा, उत्सव इत्यादीत

श्रद्धेने व उत्स्फुर्तपणे सहभागी होतात. धार्मिक कार्यातील आपापली कर्तव्ये मोठ्या श्रद्धेने पार पाडतात. त्यामुळे त्यांच्यात मानसिक स्तरावर ऐक्यभाव निर्माण होतो. त्यातूनच गावात सामाजिक ऐक्य व संघटन निर्माण होते. लोकांनी स्वहितापेक्षा गावाच्या हितास प्राधान्य द्यावे अशी शिकवण धर्म देतो व ग्रामीण लोक ही शिकवण आचरणात आणतात. समूहाच्या म्हणजेच गावाच्या हितासाठी सामाजिक ऐक्यभाव टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

२. **सामाजिक नियंत्रण :** ग्रामीण समाजात धर्म सामाजिक नियंत्रणाचे कार्य पार पाडतो. धर्माद्वारे लोकांवर नैतिकतेचे संस्कार केले जातात. त्यांच्या वर्तनास योग्य वळण लावण्याचे कार्य धर्म करतो. समाजमान्य नियमाप्रमाणे लोकांनी वागावे अशीही शिकवण धर्म देतो. कोणते वर्तन योग्य व कोणते अयोग्य हे धर्म ठरवून देतो. साधारणतः धर्मश्रद्धांशी सुसंगत वर्तन हे योग्य व त्यांच्या विरोधी असणारे वर्तन अयोग्य मानले जाते. धर्मश्रद्धांच्या विरोधी वर्तन केल्यास दैवीशक्तीचा कोप होऊन आपणास दुःख भोगावे लागेल अशी भीती ग्रामीण लोकांना वाटत असते. म्हणून ते धर्मानुसार वर्तन करतात. तसेच ग्रामीण भागातील धार्मिक अधिकारी हे लोकांवर सदाचाराचे संस्कार करतात व त्यांना दुराचारापासून दूर राहण्याची शिकवण देतात. अशाप्रकारे धर्म सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून कार्य करतो.

३. **मानसिक सुरक्षा :** ग्रामीण लोकांना मानसिक सुरक्षा म्हणजेच मनःशांती देण्याचे कार्य धर्म करतो. मानवी जीवनातील सुखदुःखे ही दैवी शक्तीच्या कृपा-अवकृपेमुळेच घडतात असे ग्रामीण लोक मानतात. त्यामुळे ते सुख मिळावे व दुःख टळावे म्हणून दैवीशक्तीची पूजाअर्चा करतात. संकटकाळात तिची मदत मागतात. संकटात तिची आपणास हमखास मदत होणार अशी श्रद्धा बाळगतात. त्यामुळे संकटाने ते खचून न जाता त्यास धैर्याने तोंड देतात. दैवीशक्ती सदैव आपल्या पाठिशी आहे. या श्रद्धेतून त्यांना मनःशांती व सुरक्षा लाभते. संकटामुळे येणाऱ्या ताणतणावांचे बऱ्याच प्रमाणात निरसन होते. समजा दैवीशक्तीचा धावा करूनही संकटात तिची मदत झाली नाही, तरीही श्रद्धाळू व्यक्ती निराश न होता ''ठेविले अनंते तैसेचि राहावे'' या उक्तीनुसार आहे त्या स्थितीत समाधान मानते. दैवीशक्तीची इच्छा मानून सुखाप्रमाणेच दुःखाचाही स्वीकार करते. परिणामी तिला मानसिक सुरक्षा मिळते.

४. **समाजकल्याण :** धर्म हा ग्रामीण समाजात सामाजिक कल्याणाच्या कार्यास प्रोत्साहन देण्याचेही कार्य करतो. व्यक्तिने स्वार्थाबरोबरच परमार्थासाठीही झटावे. स्वहिताबरोबरच समाजहितासाठीही झटावे. दिनदुबळ्यांची सेवा करावी अशी शिकवण धर्म देतो. त्यामुळे धर्मश्रद्धाळू व्यक्ती मंदिर, शाळा, दवाखाने, तलाव, विहीर इत्यादींच्या उभारणीसाठी मदत करते. ग्रामीण समाजात देवालये, मठ, आश्रम इत्यादीद्वारे धर्मशाळा उघडणे, अन्नछत्र चालविणे, अनाथांना आश्रय देणे, गरीब रुग्णांसाठी औषधोपचाराची व्यवस्था करणे, शाळा चालविणे इत्यादी कल्याणकारी कार्ये केली जातात.

**ग्रामीण धर्मातील परिवर्तन**

१. **धर्माचा प्रभाव ओसरला :** पूर्वी ग्रामीण समाजावर धर्माचा मोठा प्रभाव होता. आज मात्र आधुनिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर धर्माचे महत्त्व व प्रभाव ओसरत चालला आहे. धर्मश्रद्धा, कर्मकांड, दैवी शक्ती, देवदेवर्षी, मंत्रतंत्र, भूतप्रेत, पापपुण्य, स्वर्गनरक इत्यादी संकल्पनावरील विश्वास डळमळीत होऊ लागला आहे. प्रार्थना, पूजाअर्चा, उपासतापास, व्रतवैकल्ये, नवस, यज्ञ इत्यादीचे पूर्वीइतके अवडंबर माजविले जात नाही. शिकलेली तरूण पिढी या गोष्टी निरर्थक मानून नाकारत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उदारमतवाद, धर्मनिरपेक्षता इत्यादींची ओळख होऊ लागल्याने ईश्वर, कर्म व पूनर्जन्म सिद्धांत, पारलौकिक जगत इत्यादीबाबतचे विचार अशास्त्रीय वाटू लागले आहेत.

२. **सामाजिक नियंत्रणाचे साधन :** म्हणून पूर्वी धर्मास असलेले महत्त्व आज हळूहळू कमी होत चालले आहे. त्याऐवजी ऐच्छिक मंडळे व कायदा यांचे नियंत्रण प्रभावी ठरू लागले आहे. अर्थात धर्माचा प्रभाव ओसरल्याने सामाजिक नियंत्रण व नैतिकतेच्या संदर्भात कांही समस्या उद्‌भवू लागल्या आहेत. पूर्वी धर्माच्या भीतीने सदाचारी व नैतिक वर्तन करणारी ग्रामीण व्यक्ती आज हळूहळू दुराचारी व अनैतिक बनत चालली आहे. लबाडी, फसवणूक, अनैतिक कृत्ये इत्यादीचे प्रमाण खेड्यात वाढत चालले आहे.

३. **मानसिक सुरक्षा देण्यास असमर्थ :** आजच्या बदलत्या आर्थिक-सामाजिक परिस्थितीतून उद्‌भवलेल्या गरिबी, बेरोजगारी, नैराश्य इत्यादी समस्यांची सोडवणूक करून व्यक्तीला मनःशांती वा मानसिक सूरक्षा प्रदान करण्यास धर्म असमर्थ ठरत आहे. भौतिक सुखासाठी धडपडणाऱ्या नव्या पिढीचे समाधान धर्माद्वारे होणे कठीण झाले आहे.

अशाप्रकारे ग्रामीण धार्मिक जीवनात बदल होत असले तरी धर्माचे पूर्ण उच्चाटन झाले असे मात्र नव्हे. नागरीकरणापासून दूर असलेल्या खेड्यात आजही धर्माचे महत्त्व टिकून आहे.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

### अ) बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions)

१. भारतीय ग्रामीण कुटुंब हे मुख्यतः कोणत्या प्रकारचे आहे?

अ) केंद्र कुटुंब ब) विस्तृत कुटुंब क) संयुक्त कुटुंब ड) यापैकी एकही नाही

२. बहुसंख्य ग्रामीण कुटुंबे ही कोणत्या व्यवसायावर आधारलेली आढळतात?

अ) उद्योग ब) पशुपालन क) शेती ड) शासकीय नोकरी

३. जात हा कोणत्या प्रकारचा समूह आहे?

अ) अंतर्विवाही ब) बहिर्विवाही

क) अंतर्विवाही तसेच बहिर्विवाही ड) यापैकी एकही नाही

४. जातीसंस्थेचे नियम कशाच्या आधारे लोकांच्या मनावर बिंबविण्यात आले?

अ) कायदा ब) धर्म क) राज्य ड) यापैकी एकही नाही

५. दिव्य प्राण्यांवरील श्रद्धा म्हणजे धर्म होय. ही व्याख्या कोणी केलेली आहे?

अ) होबेल ब) फ्रेझर क) मॅलिनोस्की ड) टायलर

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. संयुक्त कुटुंब म्हणजे काय?

२. जातीची कोणतीही एक व्याख्या द्या.

३. जातीसंस्थेतील परिवर्तनास जबाबदार असणारे कोणतेही पाच घटक सांगा.

४. धर्म म्हणजे काय?

५. ग्रामीण समाजातील धार्मिक विधी (कर्मकांड) सांगा.

## २.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही भारतीय ग्रामीण समाजातील कुटुंबसंस्था, जातीसंस्था व धर्मसंस्था या तीन सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप अभ्यासलेले आहे. सर्वप्रथम तुम्ही ग्रामीण कुटुंबाची पुढील वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. १) ग्रामीण कुटुंब संयुक्त कुटुंब आहे. २) ते पितृसत्ताक प्रकारचे आहे. ३) त्यामध्ये कुटुंब प्रमुखाची एकाधिकारशाही आढळते. ४) हे कुटुंब शेती व्यवसायावर आधारलेले आहे. ५) ह्या कुटुंबाचे स्वरूप एकजिनसी आहे. ६) ग्रामीण कुटुंबात अवलंबन भावना व शिस्त आढळते. ७) ग्रामीण कुटुंबाचे धार्मिक-सांस्कृतिक जीवन सामूहिक स्वरूपाचे असते. ८) व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी अभिमान वाटतो. ९) ग्रामीण कुटुंब हे सापेक्षतः स्थिर असते. यानंतर तुम्ही ग्रामीण कुटुंबाची जैविक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, मनोरंजनात्मक कार्ये समजावून घेतली आहेत. यानंतर ग्रामीण कुटुंबसंस्थेत होत असलेल्या परिवर्तनाचे स्वरूप अभ्यासलेले आहे. ग्रामीण संयुक्त कुटुंबसंस्थेचे विघटन सुरू झाले असून त्याचे एकजिनसी स्वरूप कमी होत आहे. तसेच त्यामध्ये असलेली अवलंबन भावना, शिस्त व त्याविषयी सदस्यांना वाटणारा अभिमान कमी होत चालला आहे. ग्रामीण कुटुंबाच्या कार्यातही हळूहळू परिवर्तन होण्यास सुरुवात झालेली आहे. यानंतर तुम्ही जातीसंस्थेची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. जातीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी जातीच्या केलेल्या व्याख्या अभ्यासलेल्या आहेत. त्यानंतर जातीची पुढील वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. १) जातीचा आधार जन्म आहे. २) जातीव्यवस्थेत श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना आढळते. ३) जातिव्यवस्थेत उच्च जातींना कांही विशेषाधिकार दिले असून कनिष्ठ जातींवर कांही अपात्रता लादलेल्या आहेत. ४) जातिव्यवस्थेत व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. ५) जात हा अंतर्विवाही समूह आहे. ६)

जातिव्यवस्थेत खोणेपिणे व सामाजिक संपर्कांवर कांही निर्बंध लादलेले आहेत. जातिव्यवस्थेस हिंदू धर्माचा आधार दिलेला आहे. यानंतर ग्रामीण जातीसंस्थेत होत असलेले परिवर्तन आपण समजावून घेतलेले आहे. भारतीय समाजातून जातीसंस्थेचे उच्चाटन पूर्णतः झालेले नाही. तथापि तिचा ग्रामीण समाजावरील प्रभाव हळूहळू कमी होत चालला आहे. जातीचाच व्यवसाय करण्याचे आज कायदेशीर बंधन राहिलेले नाही. आंतरजातीय विवाह हा कायदेशीर ठरविला आहे. त्यामुळे आंतरजातीय विवाहास उच्चशिक्षीत तरूण-तरुणीचे विशेषतः प्रेमविवाह करू इच्छिणाऱ्यांचे मत अनुकूल बनत आहे. तथापि जातीच्या आतच विवाह करण्याचे प्रमाण अद्यापही खूपच मोठे आहे. खाण्यापिण्याचे जातीचे नियम शिथील होत असून अस्पृश्यता पालनाचे प्रमाणही कमी होत आहे. जात ही ईश्वरप्रणित आहे असे उच्चशिक्षीत ग्रामीण तरुण-तरुणी आज मानीत नाहीत. अर्थात नागर समाजातून जातिव्यवस्थेची परंपरागत वैशिष्ट्ये जेवढी परिवर्तित झालेली आहेत तेवढ्या प्रमाणात ग्रामीण समाजातून झालेली नाहीत. शेवटी तुम्ही ग्रामीण धर्माचे स्वरूप, कार्ये व त्यामध्ये होत असलेले परिवर्तन अभ्यासलेले आहे. ग्रामीण धर्मसंस्थेचे स्वरूप समजण्यासाठी आपण १) ग्रामीण धर्मश्रद्धेचे पैलू, २) ग्रामीण धर्माचरणाचे प्रकार, ३) ग्रामीण धार्मिक संघटन, ४) ग्रामीण धार्मिक अधिकारी ह्या चार बाबींचे विवेचन केलेले आहे. त्यानंतर ग्रामीण धर्माची पुढील चार कार्ये अभ्यासलेली आहेत. १) धर्म ग्रामीण लोकांत सामाजिक ऐक्य निर्माण करतो. २) धर्म ग्रामीण लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करतो. ३) धर्म ग्रामीण लोकांना संकटकाळात मानसिक सुरक्षा प्रदान करतो. ४) धर्म समाजकल्याण कार्यास प्रोत्साहन देतो. सर्वात शेवटी तुम्ही ग्रामीण धर्मसंस्थेत होत असलेल्या परिवर्तनाचे स्वरूप समजावून घेतलेले आहे. आज ग्रामीण समाजावर धर्माचा असलेला प्रभाव हळूहळू ओसरत चालला आहे. सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून धर्मास असलेले महत्त्व कमी होत चालले आहे. तसेच बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत धर्म हा ग्रामीण लोकांस मानसिक सुरक्षा देण्यास असमर्थ ठरत चालला आहे.

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) क  २) क  ३) अ  ४) ब  ५) ड

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते ''एकाच निवासस्थानात राहणाऱ्या, एकाच स्वयंपाकगृहातील अन्नसेवन करणाऱ्या, मालमत्तेत समान मालकीहक्क असणाऱ्या, रक्तसंबंधी असणाऱ्या व्यक्तींचा समूह म्हणजे संयुक्त कुटुंब होय.

२. मजुमदार व मदन यांच्या मते जात हा एक बंद वर्ग आहे.

३. जातीसंस्थेतील परिवर्तनास जबाबदार असणारे पाच घटक पुढीलप्रमाणे : अ) औद्योगिकीकरण, ब) नागरीकरण, क) दळणवळणाची प्रगत साधने, ड) सामाजिक कायदे, इ) सामाजिक चळवळी.

४. धर्म ही मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या अलौकिक किंवा दिव्य शक्तीच्या अस्तित्वावरील श्रद्धा व त्या शक्तीची कृपा संपादण्यासाठी करावयाचे विधी यांची व्यवस्था आहे.

५. ग्रामीण समाजातील धार्मिक विधि (कर्मकांड) पुढीलप्रमाणे आहेत - अ) मूर्तिपूजा, ब) उपवास, क) व्रतवैकल्ये, ड) तीर्थयात्रा इत्यादी.

## २.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण कुटुंबाचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.

२. जातिव्यवस्थेच्या पारंपारिक वैशिष्ट्यांमध्ये होत असलेल्या परिवर्तनाची चर्चा करा.

३. ग्रामीण धर्मसंस्थेतील परिवर्तन विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

अ) ग्रामीण कुटुंबाची कार्ये

ब) जातिव्यवस्थेतील अधिक्रमी रचना

क) ग्रामीण धर्मश्रद्धा

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- एखाद्या खेड्यास भेट देऊन तेथील संयुक्त कुटुंबांचे होत असलेले विघटन समजावून घ्या व त्यावर एक टिपण लिहा.
- ग्रामीण समाजावर अद्याप टिकून असलेला जातीसंस्थेचा व धर्मसंस्थेचा प्रभाव समजावून घ्या व त्याआधारे टिपण लिहा.

## २.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ (Suggested Readings)

१. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००५), ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका- सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

२. Dr. A. R. Desaiy, Rural Society in India.

३. A. E. Punit (1978) Social Systems in Rural India, Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi.

❑❑❑

## सत्र १ : घटक ३

# कृषक समाज संरचना आणि परिवर्तन
# (Agrarian Social Structure and Change)

**अनुक्रमणिका**


३.१ प्रास्ताविक

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय-विवेचन

  ३.३.१ कृषक समाज संरचना : जमिनधारणा पद्धतीची उत्क्रांती आणि जमीन सुधारणा

  ३.३.२ कृषिविषयक संकट : जनुकीय सुधारीत बियाणे (G M Seeds) आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या

  ३.३.३ भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळी : चिकित्सक विश्लेषण

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ सारांश

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

३.८ चिंतन आणि कार्य

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.१ प्रास्ताविक

भारतातील ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण समाजातील कृषक समाजसंरचना आणि तिच्यातील परिवर्तनाचा अभ्यास करावा लागतो. तसेच कृषीक्षेत्रातील संकटही समजावून घ्यावे लागते. त्यामुळे आपण या घटकात ग्रामीण कृषक समाज संरचना, जमिनधारणा पद्धती व जमीन सुधारणा यांचा अभ्यास करणार आहोत. कृषिविषयक संकट समजावून घेण्यासाठी जनुकीय सुधारीत बियाणे व शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या दोन प्रश्नांचा अभ्यास करणार आहोत. त्याचबरोबर भारतातील शेतकऱ्यांच्या विविध चळवळींचाही अभ्यास करणार आहोत.

## ३.२ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- ग्रामीण समाजातील कृषक समाज संरचना समजावून घेणे.
- भारतातील जमीन धारणा पद्धतीची उत्क्रांती स्पष्ट करणे.
- जमीन सुधारणा कार्यक्रमाचे स्वरूप विशद करणे.
- जनुकीय सुधारीत बियाणांचा वापर व शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ह्या दोन कृषीविषयक संकटांचे स्वरूप जाणून घेणे.
- भारतातील शेतकरी चळवळींचे आकलन करून घेणे.

## ३.३ विषय विवेचन

या घटकात तुम्ही भारतातील कृषक समाज संरचना व तिच्यातील परिवर्तन यांचा अभ्यास करणार आहात. विवेचनाच्यादृष्टीने ह्या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात कृषक समाजसंरचना समजण्यासाठी जमिनधारणा पद्धतीचे व जमीन सुधारणा कार्यक्रमाचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या विभागात जनुकीय सुधारीत बियाणांचा वापर व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचे विवेचन कृषीक्षेत्रातील संकट म्हणून केलेले आहे. तर तिसऱ्या विभागात भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळींचे विवेचन केलेले आहे.

### ■ कृषक समाज संरचना

### ३.३.१ भारतीय ग्रामीण समाजातील कृषक समाज संरचना

पारंपरिक भारतीय समाजात सामाजिक स्तरीकरण हे जातिव्यवस्थेच्या रूपाने अस्तित्वात होते. आधुनिक भारतीय समाजात मात्र जातिव्यवस्था क्षीण होत चालली असून तिच्या जागी औद्योगिक नागर समाजात वर्गव्यवस्था उदयास आली आहे. या समाजात उद्योजकांचा उच्चवर्ग, पगारदार नोकरांचा मध्यमवर्ग आणि कामगारांचा कनिष्ठ वर्ग असे स्थूलमानाने ३ वर्ग उदयास आले आहेत. थोडक्यात औद्योगिक नागर समाजात जातिव्यवस्थेची जागा वर्गव्यवस्था हळूहळू घेत आहे. असे साधारणपणे म्हणता येईल.

भारतीय ग्रामीण समाजात मात्र जातिव्यवस्था अद्यापही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे. येथे औद्योगिक नागरी समाजातील वरील ३ सामाजिक वर्ग आढळत नाहीत. कारण ग्रामीण समाजात अद्यापही मोठेमोठे उद्योगधंदे फारसे निघालेले नाहीत. तथापि याचा अर्थ असा नव्हे की ग्रामीण समाजात सामाजिक वर्ग नाहीत. ग्रामीण समाजातही फार पूर्वीपासून सामाजिक वर्ग आहेत. फक्त त्यांचे स्वरूप वेगळे आहे. शेती हा ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. शेती व्यवसायात जमिनीवरील मालकी हक्कास खूपच महत्त्व असते. जमिनीवर

व्यक्तीचा किती प्रमाणात मालकी हक्क आहे. या आधारे ग्रामीण समाजात व्यक्तीचे समाजातील स्थान वा दर्जा अवलंबून आहे. जमिनीवरील मालकी हक्कानुसार प्राप्त होणाऱ्या दर्जाच्या आधारे ग्रामीण समाजात वेगवेगळे सामाजिक वर्ग निर्माण झालेले आहेत. साधारणपणे वर्गव्यवस्थेत सामाजिक वर्गांना उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि कनिष्ठ वर्ग अशा ३ वर्गात विभागले जाते. ग्रामीण समाजातील वर्गांनाही अशाचप्रकारे पुढील ३ वर्गात विभागता येईल. १) जमीनदार, बडे बागाईतदार, सावकार व व्यापारी यांचा उच्च वर्ग. २) मध्यम शेतकऱ्यांचा मध्यम वर्ग, ३) सीमांत व लहान शेतकरी, भूमिहीन मजूर व बलुतेदार यांचा कनिष्ठ वर्ग.

**१) जमीनदार, बागाईतदार, व्यापारी व सावकार यांचा वर्ग**

ग्रामीण समाजातील हा श्रीमंत, प्रभावशाली व उच्च सामाजिक स्थान व दर्जा असलेला वर्ग आहे. इतर वर्ग त्यांच्या निर्वाहासाठी मुख्यतः या वर्गावर अवलंबून आहेत. या वर्गात खालील घटकांचा समावेश होतो.

**अ) जमीनदार :**

ब्रिटिश राजवटीपूर्वीपासूनच जीमनदारांचा वर्ग भारतात आढळत असला तरी ब्रिटिश सत्तेच्या उत्तेजनामुळे हा वर्ग अधिक प्रबळ बनला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जमीनदारी पद्धतीचे कायद्याने निर्मूलन केले असले तरीही कायद्यातील त्रुटीमुळे व्यवहारात जीमनदारांचा वर्ग टिकून आहे. सुमारे ५० एकरापेक्षा अधिक जमीन असणाऱ्यास जमीनदार म्हणता येते. जमीनदारी निर्मूलनाचा कायदा करण्यापूर्वी १% लोकसंख्या असलेल्या जमीनदार वर्गाकडे १६% पेक्षा जास्त जमीन होती. आज हे जमीनदार बडे शेतकरी (१० हेक्टरपेक्षा जादा जमीन असणारे) म्हणून ओळखले जातात. हे जमीनदार स्वतः शेती न कसता कुळाकडून किंवा मजुरांकडून शेती कसून घेतात. शेती उत्पन्नातील फार मोठा हिस्सा जमीनदारांना मिळतो. तर कुळे व मजुरांना अल्प मोबदला मिळतो. त्यामुळे कष्ट न करणारे जमीनदार श्रीमंत तर कष्ट करणारी कुळे व मजूर अत्यंत गरीब आहेत. त्यातूनच ग्रामीण समाजात प्रचंड आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. श्रीमंत जमीनदारांचे सर्वच क्षेत्रात वर्चस्व असून कुळांना व मजुरांना त्यांच्या दयेवरच जगावे लागते.

**ब) बागाईतदार :**

बागाईत शेती असणाऱ्या शेतकऱ्यास बागाईतदार म्हणतात. बागाईत शेती भारतात पूर्वीपासूनच असली तरी हरितक्रांतीनंतर बागाईतदारांचा वर्ग अधिक मातब्बर बनला आहे. बागाईतदारांकडे जमिनीचे मोठे क्षेत्र असेलच असे नाही तथापि शेती व्यवसायातील आधुनिक उत्पादन तंत्राचा (रासायनिक खते, संकरीत बियाणे, जंतुनाशके, जलसिंचन सोयी इ.) वापर करून बागाईतदार शेतकरी वर्गातून दोन तीन पिके विशेषतः नगदी पिके (उदा. ऊस, कापूस, फळे, फुले, भाजीपाला इ.) घेतात व अधिक उत्पन्न मिळवतात. त्यामुळे ते सधन बनलेले आहेत. ग्रामीण राजकारणात व समाजकारणात बागाईतदारांचे सध्या प्रवंड वर्चस्व आहे. बहुतेक बागाईतदार पूर्वीचे जमीनदार आहेत. त्यामुळे परंपरेने व उत्तम आर्थिक स्थितीमुळेही बागाईतदारांचे स्थान व दर्जा श्रेष्ठ ठरला आहे.

**क) व्यापारी :**

ग्रामीण समाजात शेतीमालाचा व्यापार करणारे व्यापाली ही उच्च वर्गात मोडतात. हंगामात शेतकऱ्यांचा माल कमी दरात खरेदी करून नंतर तो बाजारात जास्त भावाने विकून हे व्यापारी भरपूर नफा कमावतात. गरीब व गरजू शेतकऱ्यांना अडचणीच्या वेळी आगाऊ पैसे देतात व त्या मोबदल्यात हंगामात त्यांच्याकडून धान्य घेतात. या व्यवहारातही शेतकऱ्यांच्या अडचणींचा गैरफायदा घेऊन व्यापारी स्वस्तात माल मिळवितात व नफा कमावतात त्यामुळे ते सधन बनलेले आहेत.

**ड) सावकार :**

लोकांना व्याजाने पैसे देणाऱ्या व्यक्तींना सावकार म्हणतात. ग्रामीण भागात पूर्वीपारपणे सावकारीचा व्यवसाय करणारी काही कुटुंबे आहेत. बऱ्याच ठिकाणी जमीनदार, बडे शेतकरी, व्यापारी हेच सावकारी करताना आढळतात. गरीब व गरजू शेतकऱ्यांना जमिनीच्या तारणावर भरमसाठ व्याजदराने सावकर कर्ज देतात आणि कर्ज न फिटल्यास त्यांच्या जमिनी हडप करतात. सारकार श्रीमंत असल्याने व लोकांची आर्थिक नड भागवित असल्याने खेड्यात त्यांचा वचक असतो. अलिकडे खेड्यांतही पतपुरवठा करण्यासाठी बँका, पतसंस्था निघाल्या आहेत. पण त्यांची कर्ज देण्याची पद्धती किचकट व दिरंगाईची असल्याने नडलेले शेतकरी सारकाराकडूनच कर्ज घेतात. आज कायद्याने बिगरपरवाना सावकारी करणे गुन्हा आहे. तरीही अशा सावकारांचे अस्तित्व व प्रस्थ टिकून आहे.

अशाप्रकारे ग्रामीण समाजात जमीनदार, बागाईतदार, व्यापारी व सावकार ही मंडळी त्यांच्या उत्तम आर्थिक स्थितीमुळे उच्च वर्गात मोडतात. बऱ्याच खेड्यात कांही व्यक्ती या चारीही भूमिकेत वावरताना दिसतात. खेड्यातील आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकारी इ. संस्था त्यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे समाजात त्यांना मानसन्मान व प्रतिष्ठा आहे. ग्रामीण जीवनावर त्यांचे वर्चस्व आहे.

**२) मध्यम शेतकऱ्यांचा वर्ग**

जमीनदार, बागाईतदार, सावकार इ. च्या खालोखाल सामाजिक स्थान व दर्जा असलेला मध्यम शेतकऱ्यांचा वर्ग सर्वच बाबतीत मध्यमवर्गीय आहे. मध्यम शेतकऱ्यांकडे पुरेशी जमीन (सुमारे २ ते १० हेक्टर) आहे. पण भांडवलाअभावी त्यांची शेती तितकीशी फायदेशीर ठरत नाही. किमान निर्वाह चालण्याइतके उत्पन्न त्यांना मिळते. अनावृष्टी, शेतीमालाच्या किंमतीची अनिश्चितता इ. मुळे त्यांना निश्चित उत्पन्नाची हमी नसते. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. विशेषतः निममध्यम शेतकऱ्यांना (२ ते ४ हेक्टर जमीन असणारे) शेतीच्या व प्रपंचाच्या गरजा भागविण्यासाठी सतत कर्ज काढावे लागते. ग्रामीण समाजात मध्यम शेतकऱ्यांची संख्या सुमारे २१% असून हा वर्ग ग्रामीण रूढी परंपरा, कुलाचार, सणसमारंभ निष्ठेने पाळतो. त्यामुळे ग्रामीण सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचा तो महत्त्वाचे आधार आहे.

३) सीमांत व लहान शेतकरी, भूमिहीन शेतमजूर व बलुतेदार-अलुतेदार यांचा वर्ग -

ग्रामीण समाजातील हा सर्वात कनिष्ठ दर्जा व स्थान असलेला वर्ग आहे.

**अ) सीमांत व लहान शेतकरी**

१ हेक्टरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यास सीमांत शेतकरी किंवा अत्यल्पभूधारक (चरीसळपरश्र ऋीाशी) म्हणतात. तर १ ते २ हेक्टर शेती असणाऱ्यास लहान शेतकरी किंवा अल्पभूधारक (डारश्रश्र षरीाशी) असे म्हणतात. सीमांत व लहान शेतकऱ्यांची संख्या अनुक्रमे ५९.४% व १८.८% इतकी म्हणजे एकत्रित सुमारे ७८% आहे. बहुतेकांची शेती कोरडवाहू (जिरायती) आहे. भांडवलाअभावी त्यांना आधुनिक उत्पादन तंत्र वापरणे शक्य नसल्याने त्यांची शेती किफायतशीर ठरत नाही. जमिनीचे लहान-लहान तुकडे असल्याने त्यांना स्वतःची उत्पादन साधने ठेवणे परवडत नाही. त्यामुळे अनेक जण शेती पडीकच ठेवतात. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे. अनेकजण बड्या शेतकऱ्यांकडे शेतमजूर म्हणून राबतात. गरजापूर्तीसाठी त्यांनाही सतत कर्ज काढावे लागते. शेती विकासाच्या योजनांचा फायदा त्यांनाही सतत कर्ज काढावे लागते. शेती विकासाच्या योजनांचा फायदा त्यांना फारसा मिळत नाही. परिणामी त्यांची शेती व म्हणून आर्थिक स्थिती सुधारत नाही.

**ब) भूमिहीन शेतमजूर :**

ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची जमीन नाही असे लोक इतरांच्या जमिनीवर मजुरी करून निर्वाह चालवितात. त्यांना भूमिहीन मजूर म्हणतात. शारीरिक श्रम हेच त्यांच्या निर्वाहाचे साधन असते. त्यांची आर्थिक स्थिती सर्वात कनिष्ठ आहे. कारण त्यांना शेतीव्यवसायात केवळ ४ ते ६ महिनेच रोजगार मिळतो. इतर वेळी ते बेकार राहतात. तसेच मजुरीचे दर खूपच कमी असून शेतकऱ्यांकडून मजुरी वेळेत मिळत नाही. त्यामुळे दारिद्र्य उपासमार, कुपोषण, अनारोग्य यांनी ते गांजलेले असतात. भूमिहीन मजुरांपैकी काहीजण बड्या शेतकऱ्यांकडे 'सालगडी' म्हणून राहतात. त्यामुळे त्यांना वर्षभर रोजगार मिळत असला तरी त्यांना शेतकऱ्यांच्या शेतात व घरातही एखाद्या गुलामासारखे अहोरात्र राबावे लागते. त्यांचे प्रचंड शोषण होते. औद्योगिक मजुरांप्रमाणे ते संघटित नसल्याने त्यांना कोणतेही फायदे मिळत नाहीत. आज सुमारे २२% भूमिहीन कुटुंबे असून त्यांचे जीवन पूर्णपणे बड्या शेतकऱ्यांच्या दयेवरच अवलंबून आहे.

**क) बलुतेदार-अलुतेदार :**

खेड्यात बिगरशेती व्यवसाय करणे बलुतेदार - अलुतेदार हेही कनिष्ठ वर्गात मोडतात. सुतार, लोहार, चांभार, मांग, महार, कुंभार, सोनार, गुरव, न्हावी, परीट, कोळी इ. १२ बलुतेदार आणि साळी, माळी, तेली, तांबोळी, धनगर, सनगर, कोष्टी, कोल्हाटी, डोंबारी, डवरी इ. १८ अलुतेदार आपापल्या जातीचा व्यवसाय करून शेतकऱ्यांच्या शेतीच्या व प्रपंचाच्या गरजा भागवित व त्या मोबदल्यात शेतकरी त्यांना धान्य देतो. या व्यवस्थेत बलुता-अलुता पद्धती म्हणतात. या पद्धतीत बलुतेदार-अलुतेदार जाती त्यांच्या

निर्वाहासाठी शेतकऱ्यांवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांचे स्थान श्रेष्ठ व त्यांचे कनिष्ठ राहिले. उच्च स्थानी असलेल्या शेतकऱ्यांनी बलुतेदारांचे शोषण केले. परिणामी मानसन्मान राहिला नाही. आज औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांचे व्यवसाय उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे कांहीजण शेतमजुरी करतात. तर कांहींनी शहराकडे स्थलांतर केले आहे.

थोडक्यात, भारतीय समाजात आर्थिक व व्यावसायिक स्थितीच्या आधारे व्यक्तीच्या सामाजिक दर्जात विषमता निर्माण होऊन वरील विविध वर्ग उदयास आले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कायद्याने जमीनदारी पद्धती नष्ट केली असली तरी व्यवहारात मात्र जमीनदारांचा वर्ग टिकून आहे. औद्यागिकीकरणाच्या प्रक्रियेत बलुतेदार-अलुतेदार हा वर्ग हळूहळू लोप पावत चालला आहे. शेतमजुरांची संख्या वाढत आहे.

**भारतातील जमीनधारणा पद्धती** (Land Tenure System)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या जमीन सुधारणा कार्यक्रमाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रथम भारतातील जमीनधारणा पद्धतींचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. कारण शेतीचा विकास व शेतीची उत्पादकता ही जमीनधारणा पद्धतीवर अवलंबून असते.

**जमीनधारणा पद्धतीचा अर्थ :** जमिनीवरील मालकी व तिचा उपभोग घेण्याचा अधिकार निश्चित करणाऱ्या पद्धतीस जमीनधारणा पद्धती असे म्हणतात. जमीनधारणा पद्धती व जमिनीची कूळ-वहिवाट पद्धती (Land tenure system and Land tenancy system) यात फरक आहे. जमीनधारणा पद्धती ही जमिनीवरील मालकीचा व उपभोगाचा अधिकार निश्चित करते. याउलट जमीन कूळ-वहिवाट पद्धती ही जमिनीचा मालक व प्रत्यक्षात जमीन कसणारी व्यक्ती म्हणजेच कूळ यांच्यातील वाटावयाच्या उत्पन्नाचे प्रमाण निश्चित करते.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वी भारतात जमीनधारणेच्या तीन पद्धती रूढ होत्या. (१) जमीनदाधी पद्धती (२) महालवारी पद्धती (३) रयतवारी पद्धती.

**१) जमीनदारी पद्धती :**

जमीनदारी पद्धतीचा अर्थ : ज्या जमीनधारणा पद्धतीत जमीनधारक म्हणजेच जमिनीचा मालक हा स्वतः शेती न कसता इतर व्यक्तींना जमीन कसण्यासाठी देऊन त्याबदल्यात त्यांच्याकडून शेती उत्पन्नातील ठराविक हिस्सा घेत असे, तसेच तो जमीन महसूल किंवा शेतसारा (Land Revenue) गोळा करून सरकारकडे जमा करत असे त्या पद्धतीस जमीनदारी पद्धती असे म्हटले आहे. या पद्धतीत जमीन मालकास 'जमीनदार' (Land Lord), जमीन कसणाऱ्यास 'कूळ' (Tenant) हे नांव मिळाले. जमीनदारास कुळांकडून मिळणाऱ्या शेती उत्पन्नातील हिस्स्यास 'खंड' (Rent) म्हटले गेले.

**जमीनदारी पद्धतीची सुरवात :** भारतात ही पद्धती ब्रिटिश सत्तेच्या प्रोत्साहनामुळे सुरू झाली असली तरी तिचे मूळ मोगल राजवटीच्या अस्ताच्या काळात आढळते. प्राचीन भारतातील खेड्यात ग्रामीणी

(गावप्रमुख) व ग्रामपंचायत गावातील शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करून राजसत्तेकडे जमा करीत. मध्ययुगात भारतात अनेक लहान मोठी राज्ये निर्माण झाली. राज्यविस्तारासाठी होणाऱ्या सततच्या युद्धामुळे राजवटी सतत बदलत असत. शेतकरी जो कोणी राजा असेल त्याला साधारणपणे शेती उत्पन्नाचा १/६ इतका शेतसारा देत. पुढे मोगल सम्राट अकबराचा प्रधान **तोडरमल** याने जमिनीची प्रतवारी ठरवून त्यानुसार शेतसारा ठरवून दिला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शेतसारा वसुलीसाठी लिलाव पद्धती सुरू झाली. जो जास्त रक्कम देऊन लिलाव खरेदी करी त्यास शेतसारा वसुलीचे अधिकार मिळाले. तथापि ईस्ट इंडिया कंपनीकडे सारा वसुल करणारी यंत्रणा नसल्याने **रॉबर्ट क्लाईव्हने** भारतीय अधिकाऱ्यांना (नायब सुभेदार) सारा वसुलीसाठी नेमले. तथापि, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटल्याने पुढे वॉरन हेस्टिंग्जने शेतसारा गोळा करण्यासाठी लिलाव पद्धतीचा अवलंब केला. जास्तीत जास्त शेतसारा गोळा करण्याची हमी देणाऱ्यास लिलाव मिळू लागले. लिलाव मिळवण्याच्या स्पर्धेत शेतकऱ्यांऐवजी कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या विश्वासातील भारतीय कर्मचारी, व्यापारी व सावकार यांना प्राधान्य मिळाले. हे लोक कंपनीचे प्रतिनिधी म्हणून शेतसारा गोळा करू लागले. पुढे लॉर्ड कॉर्नवॉलीसने शेतसारा गोळा करणाऱ्या या प्रतिनिधींना ते ज्या प्रदेशातील शेतसारा गोळा करीत असत त्या प्रदेशातील जमिनीचे मालकी हक्क बहाल केले. अशाप्रकारे जमिनीची मालकी मिळालेल्या व्यक्तींना 'जमीनदार' म्हटले जाऊ लागले. जमीनदारांना शेतसारा वसूलीचे व तो सरकारजमा करण्याचे अधिकार वंशपरंपरेने मिळाले आणि जमीनदारी पद्धती रूढ झाली. शेतसारा गोळा करणारे जमिनीचे मालक बनल्याने मूळच्या जमीन कसणाऱ्यांना कुळांचा दर्जा प्राप्त झाला.

**जमीनदारीचे प्रकार :** जमीनदारी मुख्यतः दोन प्रकारची होती. पहिल्या प्रकारात जमीनदाराने सरकारला द्यावयाची शेतसाऱ्याची रक्कम कायमची निश्चित केली होती. एकदा निश्चित केलेल्या रकमेत सरकारला वाढ करता येत नसे. शेतकऱ्यांकडून गोळा होणाऱ्या शेतसाऱ्यापैकी ८९% भाग सरकारला व ११% भाग जमीनदाराला देण्याचे निश्चित केले. ही पद्धती कॉर्नवॉलिसने २२ मार्च १७९३ पासून बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतात आणि मद्रास (तामिळनाडू) व आसामचा कांही भाग तसेच उत्तर प्रदेशातील बनारस जिल्हा यामध्ये लागू केली. या पद्धतीलाच कायमधारा पद्धती म्हटले गेले. सरकारला दरवर्षी शेतसाऱ्याच्या रूपाने ठराविक उत्पन्न मिळावे व सरकारशी एकनिष्ठ राहील असा जमीनदारांचा वर्ग निर्माण करणे हे उद्देश कायमधारा पद्धतीमागे होते. दुसऱ्या प्रकारात शेतसाऱ्याची रक्कम वेळोवेळी (सुमारे ३० ते ४० वर्षांनी) बदलण्यात येई. हा प्रकार औंध प्रांतात तसेच उत्तर प्रदेश व मध्यप्रदेशात कांही भागात लागू होता.

**मालगुजार पद्धती :** मध्यप्रदेशात मराठेशाहीच्या काळापासून शेतसारा गोळा करणाऱ्या व्यक्तीना आपणच तेथील जमिनीचे मालक आहोत असा दावा केला. ब्रिटिश सत्तेनेही हा दावा मान्य करून त्यांना जमीनदारीचे अधिकार दिले. त्यांनाच 'मालगुजार' हे नांव मिळाले. याच लोकांना गुजराथमध्ये 'तालुकादार' तर महाराष्ट्रातील कोकणात 'खोत' म्हटले जाई. मालगुजार, तालुकादार, खोत हे ही जमीनदाराप्रमाणेच कुळांकडून शेती कसून घेत. तसेच शेतसारा गोळा करून सरकारला देत.

**जमीनदारी पद्धतीची वैशिष्ट्ये :** वरील विवेचनावरून जमीनदारीची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. (१) या पद्धतीत विशिष्ट प्रदेशातील शेकडो एकर जमिनीची मालकी जमीनदारांकडे होती. (२) जमीनदार स्वतः शेती न कसता तिचे लहान लहान तुकडे करून वेगवेगळ्या कुळांना कसण्यासाठी देत व कुळाकडून खंड घेत. (३) कुळांना नेमणे, कुळांना बदलणे, खंडाचे प्रमाण बदलणे, खंडाच्या वसुलीची पद्धत ठरविणे, खंड न देणाऱ्या कुळांना कच्चा कैदेत ठेवणे इ. अधिकार जमीनदारांना होते. (४) शेतसारा गोळा करून तो सरकारजमा करण्याचे काम जमीनदार करीत. (५) ठरलेला शेतसारा ठरलेल्या वेळी सरकार जमा न करणाऱ्या जमीनदाराची जमीनदारी काढून घेण्याचा अधिकार सरकारला होता. (६) शेतसारा व्यवस्थितपणे जमा करणाऱ्या जमीनदारावर सरकारचे इतर कोणतेही नियंत्रण नसल्याने जमीनदारांचे आपल्या प्रदेशात वर्चस्व निर्माण झाले.

**जमीनदारी पद्धतीचे गुण –**

**१) उत्पन्नात वाढ :** जमीनदारी पद्धतीमुळे ब्रिटिश सत्तेच्या महसूल उत्पन्नात वाढ झाली. कायमधारा पद्धतीमुळे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त व कायमस्वरूपी उत्पन्न मिळू लागले.

**२) अडचणीचे निर्मूलन :** ईस्ट इंडिया कंपनी सरकारला भारतातील कृषीव्यवस्थेची माहिती नव्हती. तिच्याकडे जमिनीचे नकाशे नव्हते. शेतसारा वसुलीसाठी पुरेसे कर्मचारी नव्हते. पैशाची चणचण भासत होती. जमीनदारी पद्धतीमुळे या सर्व अडचणींचे बऱ्याच प्रमाणात निर्मूलन होण्यास मदत झाली. कंपनीचे अधिकारी व कर्मचारी सारा वसुलीच्या कामातून मुक्त झाल्याने त्यांचा इतर कामासाठी उपयोग होऊ लागला.

**३) राजकीयदृष्ट्या उपयोग :** ही पद्धत ब्रिटिश सत्तेस राजकीयदृष्ट्याही उपयुक्त ठरली. कारण जमीनदाराच्या रूपाने या सत्तेस प्रत्येक खेड्यात आपला प्रतिनिधी ठेवता आला. जमीनदाराचे हितसंबंध ब्रिटिश सत्तेशी जोडल्याने ही सत्ता टिकली तरच आपली जमीनदारी टिकेल अशी जमीनदारांची भावना झाली. त्यामुळे ते या सत्तेचे निष्ठावंत समर्थक बनले. १८५७ च्या उठावात जमीनदारांनी ब्रिटिश सत्तेस मदत केली. त्यामुळे ब्रिटिश सत्ता बळकट होण्यास मदत झाली.

**४) भीती व गैरव्यवहारास आळा :** ही पद्धती सुरू होण्यापूर्वी सारा वसुलीच्यावेळी शेतकरी वर्गास किती सारा आकारला जाईल याची सतत भीती व चिंता असे. पण निश्चित स्वरूपाचा सारा लागू केल्याने ही भीती संपली. तसेच पूर्वी वाटेल तसा सारा आकारण्यात येत असल्याने उत्पन्न कमी दाखविणे व इतर गैरव्यवहार होत असत. या पद्धतीमुळे या गैरव्यवहारास आळा बसला.

**जमीनदारी पद्धतीचे दोष :**

**१) कुळांचे शोषण :** जमीनदारांनी कंपनी सरकारला विशिष्ट शेतसारा देण्याचे कबूल केल्याने त्यांनी पूर्वीच्या दरापेक्षा अधिक चढ्या दराने व बळजबरीने कुळांकडून खंड वसूल करण्याचे धोरण स्वीकारले. कुळाकडून नजराणे स्वीकारणे, वरचेवर खंड वाढविणे, कुळांना हाकलून लावणे इ. मार्गांनी जमीनदार कुळांचे

शोषण करू लागले. कुळांना वेठीस धरून विनामोबदल्यात राबवू लागले. त्यामुळे अपार कष्ट करून देखील कुळे असाहाय्य व दरिद्री बनली.

२) **हस्तकांचा उदय :** जमीनदारांना विनासायास सत्ता व संपत्ती मिळाल्याने ते आळशी, विलासी, चैनीखोर व ऐतखाऊ बनले. ते खेडी सोडून शहरात राहू लागले. शेतसारा गोळा करण्यासाठी त्यांनी मध्यस्थ किंवा हस्तक नेमले. या मध्यस्थांनीही शेतसारा वसुलीचे अधिकार इतरांना दिले. त्यामुळे मध्यस्थांची एक साखळीच तयार झाली. सायमन कमिशनच्या अहवालात अशा ५० मध्यस्थांची नोंद आढळते. शेतसारा गोळा करणे हे मध्यस्थांच्या उत्पन्नाचे साधन बनल्याने ते कुळांवर जुलूम जबरदस्ती करून अधिकाधिक खंड उकळू लागले. त्यामुळे कुळांवरील बोजा वाढून ते अधिकच अगतिक बनले. कायमधारा पद्धतीमुळे बंगालमध्ये अनुपस्थित जमीनमालकांचा नवीन वर्ग उदयास आला.

३) **सरकारचा तोटा :** जमीनदार प्रचंड प्रमाणावर शेतसारा वसूल करीत असले तरी सरकारच्या तिजोरीत ठराविकच रक्कम भरीत. त्यामुळे सरकारचा तोटा होऊ लागला. कायमधारा पद्धतीत किती सारा गोळा केला याचा हिशेब जमीनदारांना सरकारला द्यावा लागत नसल्याने ते निरंकुश बनले.

४) **व्यापाऱ्यांकडून लूट :** पूर्वी शेतसारा धान्याच्या किंवा पैशाच्या रूपात देण्याची सवलत होती. या पद्धतीत तो पैशाच्या रूपात भरणे आवश्यक केले. त्यामुळे पीक निघताच बाजारात मिळेल त्या किंमतीला धार विकून पैसा उभारणे भाग पडू लागले. याचा फायदा व्यापाऱ्यांनी करून घेतला. ते कमीत कमी किंमतीत धान्य खरेदी करून शेतकऱ्यांना लूटू लागले.

५) **कर्जबाजारीपणा वाढला :** वेळेत सारा न भरल्यास जमीनदार कुळांची जमीन, शेती अवजारे, गुरू ढोरे बळकावू लागले. त्यामुळे सारा भरण्यासाठी कुळे भरमसाठ व्याजाने सावकाराकडून कर्ज घेऊ लागले. कर्जफेडीच्या नावाखाली सावकार त्यांच्या जमिनी बळकावू लागले. परिणामी, अनेक कूळे भूमिहीन शेतमजूर बनली. अनेक कर्जबाजारी कूळे परागंदा होऊ लागली. कांहीजण लुटारू बनले. परिणामी, खेड्यातील सामाजिक ऐक्य धोक्यात आले.

६) **शेती विकासास मारक :** कॉर्नवॉलिसची अशी अपेक्षा होती की, कायमधारा पद्धतीने जमीनदार अधिक नफ्याच्या अपेक्षेने शेती सुधारतील, अधिक जमीन लागवडीखाली आणून अधिक धान्य उत्पादन करतील. परिणामी, सुबत्ता येईल. तथापि, कष्ट न करताही जमीनदाराने खंड रूपाने प्रचंड उत्पन्न मिळत असल्याने त्यांनी शेती सुधारण्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. कुळांनाही मध्येच काढून टाकले जाण्याची भीती असल्याने त्यांनीही शेती सुधारण्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला.

### २) महालवारी पद्धती :

**महालवारी पद्धतीचा अर्थ :** महाल म्हणजे खेडे किंवा जमीनजुमल्याचा (शेतीवाडीचा) प्रदेश होय.'ज्या जमीनधारणापद्धतीत प्रत्येक जमीन मालकावर स्वतंत्रपणे शेतसारा न आकारता संपूर्ण खेड्यावर (महालावर)

सामुदायिक स्वरूपात आकारला जातो आणि तो गोळा करण्याचे व सरकारजमा करण्याची जबाबदारी एखाद्या प्रमुख व्यक्तीवर टाकली जाते त्या पद्धतीला महालवारी पद्धती असे संबोधले गेले.'

**महालवारी पद्धतीची सुरुवात :** उत्तर भारतातील बराच भाग ब्रिटिश सत्तेखाली आल्यानंतर तेथेही बंगाल, बिहार, ओरिसाप्रमाणेच कायमधारा पद्धती लागू करण्याचा प्रयत्न गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जने केला. तथापि ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाने त्याला परवानगी दिली नाही. त्यामुळे कमिशनर्स बोर्डाचा सेक्रेटरी व्होल्ट मॅकेन्झी याच्या सल्ल्यानुसार प्रथम आग्रा, औंध व नंतर पंजाबमध्ये महालवारी पद्धती सुरू करण्यात आली. १८२२ मध्ये त्यासंबंधीचा कायदा करण्यात आला.

**महालवारी पद्धतीची वैशिष्ट्ये :**

१) या पद्धतीत व्यक्तीऐवजी खेडे हा घटक मानून संपूर्ण गावावर सामुदायिक स्वरूपात शेतसारा आकारला जाई. पंजाबमध्ये मात्रा पाच-सहा गावांचा एक गट करून त्या खेड्यातील जमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन शेतसारा गटावर आकारला जाई.

२) शेतसारा गोळा करणारी व सरकारजमा करणारी व्यक्ती ही गावप्रमुख (पंजाबमध्ये गटप्रमुख) असे. तिला वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावानी (उदा. महालदार, नंबरदार, चौधरी, पटेल इ.) ओळखले जाई.

३) शेतसाऱ्याची रक्कम गावप्रमुख किंवा गटप्रमुख आणि ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्याशी चर्चा करून ठरविली जाई. तसेच शेतसारा ठरविताना जमिनीची प्रत, उत्पादन क्षमता, पिकांचा प्रकार, पिकाची किंमत इ. बाबी विचारात घेतल्या जात.

४) गावकऱ्यांशी सामूहिक करार करून शेतसारा कांही वषासाठी (पंजाबात २० तसेच आग्रा प्रांतात ३० वर्षासाठी) निश्चित केला जाई. या करारावर गावाच्या व गटाच्या वतीने अनुक्रमे गावप्रमुख व गटप्रमुख सही करीत.

५) आकारण्यात आलेल्या एकूण शेतसाऱ्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचा वाटा किती हे गावप्रमुख प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न विचारात घेऊन निश्चित करीत असे. पंजाबात हा वाटा खेड्याच्या उत्पन्नानुसार गटप्रमुख ठरवित असे.

६) या पद्धतीत प्रत्येक जमीनधारकास त्याचा जमिनीवरील मालकी हक्क दर्शविणारा दस्तऐवज दिला जाई. व्यक्ती जोपर्यंत व्यवस्थितपणे शेतसारा भरीत असे तोपर्यंत तिची जमिनीवरील मालकी मान्य केली जाई. वेळेवर शेतसारा न भरणाऱ्या जमीन काढून घेण्याचा अधिकार सरकारला होता.

**महालवारी पद्धतीचे गुण :**

१) या पद्धतीत जमीन कसण्याचे काम जमीन मालकच करीत असल्याने मध्यस्थाकडून त्यांचे शोषण होण्याची शक्यता नव्हती.

२) शेती व्यवसायापासून मिळणारे सर्व फायदे जमीन मालकासच मिळत असल्याने शेती व्यवसायात सुधारणा करण्याची प्रेरणा त्यांना मिळू शकते.

३) प्राचीन भारतात थोड्याफार फरकाने ही पद्धती होती. ग्रामीणी व गावप्रमुख शेतसारा गोळा करून मध्यवर्ती सत्तेकडे जमा करीत असे. त्यामुळे लोकांना महालवारी पद्धती आपल्या परंपरेस धरून आहे असे वाटे. त्यामुळे तिच्या विरोधी भावना निर्माण झाली नाही.

४) शेतसाऱ्याची रक्कम ठरविताना गावप्रमुख व ग्रामपंचायतीचे मत विचारात घेतले जाई.

**महालवारी पद्धतीचे दोष :**

१) या पद्धतीत सरकार व जमीन कसणारे लोक यांचा प्रत्यक्ष संबंध येत नव्हता. कारण शेतसारा गोळा करणारा व सरकारजमा करणारा मध्यस्थांचा (गावप्रमुख व गटप्रमुख) वर्ग उदयास आला.

२) ह्या मध्यस्थांना फाजील महत्त्व प्राप्त झाले. ते लोकांकडून जादा शेतसारा गोळा करून त्यातील कांही भाग हडप करू लागले. त्यामुळे ते श्रीमंत बनले व त्यांचा खेड्यात वरचष्मा निर्माण झाला. ते शेतकऱ्यांकडून नजराणे स्वीकारू लागले. त्यांना राबवून घेवू लागले. थोडक्यात, जमीनदारी पद्धतीचे अनेक दोष या पद्धतीत शिरले.

३) या पद्धतीत शेतसाऱ्याचे प्रमाण बरेच मोठे असल्याने शेतकऱ्यांना ही पद्धती फारशी फायदेशीर व प्रेरणादायी ठरली असे म्हणता येत नाही.

कांही काळानंतर महालवारी पद्धतीत सामुदायिक स्वरूपाऐवजी वैयक्तिक स्वरूपात शेतसारा भरण्याची सवलत मिळू लागली. परिणामी, महालवाारीचे रूपांतर रयतवारीत झाले.

**३) रयतवारी पद्धती**

**रयतवारी पद्धतीचा अर्थ :** ज्या जमीनधारणा पद्धतीत जमीन कसणाऱ्या रयतेकडे (प्रजेकडे) जमिनीची मालकी असते व कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थाशिवाय सरकार स्वतःच रयतेकडून शेतसारा गोळा करते त्या पद्धतीस रयतवारी पद्धती म्हटले जाते.

**रयतवारी पद्धतीची सुरुवात :** ही पद्धती ब्रिटिश राजवटीपूर्वीपासूनच अमलात होती. ब्रिटिश सत्तेने फक्त तिला मान्यता दिली. जमीनदारी पद्धतीचे अनेक दुष्परिणाम घडून आले. जमीनदारांचा वर्ग भ्रष्ट, ऐतखाऊ व माजोर बनल्याने सरकारचे ना पुरेसे उत्पन्न वाढले ना शेतीत सुधारणा झाली. हा वर्ग कुळांचे प्रचंड शोषण करू लागल्याने कूळे दरिद्री व असाहाय्य बनली. सरकारविषयी त्यांच्या मनात अप्रिय भावना निर्माण झाली. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या कांही संचालकांना व अधिकाऱ्यांना जमीनदारी पद्धती व कायमधारा पद्धती नकोशी वाटू लागली. मद्रासचा गव्हर्नर सर थॉमस मन्रो व कॅप्टन रीड यांनी जमीनदारी व कायमधारा पद्धती देशाच्या इतर भागात लागू करू नये असे सूचविले. त्याऐवजी शेती कसणाऱ्या रयतेस जमिनीची मालकीदेऊन

सरकारने स्वतःच शेतसारा गोळा करावा तसेच शेतसाऱ्याची रक्कमही कायम स्वरूपात निश्चित न करता विशिष्ट काळापुरतीच निश्चित करावी असे सुचविले. अशी ही रयतवारी पद्धती लागू केल्यास सरकार व रयत यांच्यात प्रत्यक्ष संबंध येतील. मध्यस्थ नसल्याने रयतेचे शोषण होणार नाही व रयत खूष होऊन सरकारची समर्थक बनेल असा आशावादही मन्रो व रीड यांनी व्यक्त केला. एलफिस्टन (मुंबईचे गव्हर्नर) व चॅम्लीन या अधिकाऱ्यांनीही आपल्या अहवालात जवळपास अशाच शिफारसी केल्या.

कंपनीने या शिफारशींना मान्यता दिली व दक्षिण व पश्चिम भागातील प्रदेश कंपनीच्या ताब्यात आल्यानंतर मन्रोच्या सूचनेप्रमाणे जमिनीची मोजणी करून तिच्या सीमा निश्चित केल्या. जमिनीचे नकाशे बनविले. तसेच या प्रदेशातील जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन शेतसारा निश्चित केला आणि १८२० पासून दक्षिण मद्रास, मुंबई, पूर्व पंजाब, आसामचा कांही भाग व कूर्ग (कर्नाटक) या प्रदेशात रयतवारी पद्धती लागू केली.

**रयतवारीची वैशिष्ट्ये :**

१) या पद्धतीत जमीन कसणाऱ्यांनाच जमिनीचे मालकी हक्क वंशपरंपरेने दिले. प्रत्येक गावाचे सर्वेक्षण करून एक रजिस्टर बनविले. त्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याचे नांव व त्याच्या जमिनीची नोंद केली गेली. शेतजमिनीस सर्वे नंबर दिले. शेतकऱ्यांना ओळखपत्रे दिली.

२) रजिस्टरमध्ये नोंद झालेल्या शेतकऱ्यांना आपल्या मालकीची जमीन विकणे, गहाण ठेवणे, भाड्याने देणे, इतरांकडे हस्तांतरित करणे इ. बाबतचे अधिकार दिले. जोपर्यंत शेतकरी सरकारला सारा व्यवस्थित देत असे तोपर्यंत त्याचा जमिनीवर मालकी हक्क असे. शेतसारा वेळेवर न भरल्यास मात्र सरकारला जमीन काढून घेण्याचा अधिकार होता.

३) या पद्धतीने सरकार स्वतःच शेतसारा गोळा करत असल्याने जमीनदार वगैरे सारखा मध्यस्थांचा वर्ग नव्हता.

४) शेतसाऱ्याचे प्रमाण जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन ठरविण्यात येई. साधारणतः शेती उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या निव्वळ उत्पन्नाच्या ५०% इतका शेतसारा ठरविला जाई.

५) शेतसाऱ्याचा कालखंड वेगवेगळ्या भागात वेगवेगळा होता. हा कालखंड २० ते ४० वर्षापर्यंत होता.

**रयतवारी पद्धतीचे गुण :**

**१) शेतीत सुधारणा :** जमिनीची मालकी कसणाऱ्याकडे असल्याने व जमीनदारांसारखे मध्यस्थ नसल्याने शेतीतून होणारा लाभ फक्त त्यांनाच मिळू लागला. परिणामी, शेतीत गुंतवणूक व सुधारणा करण्यास प्रोत्साहन मिळाले.

**२) शेतकऱ्यांना दिलासा :** सरकारच शेतसारा गोळा करीत असल्याने व शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध येऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सरकारला समजू लागल्या. त्यामुळे दुष्काळ व इतर संकटकाळात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

**३) सरकारचा फायदा :** या पद्धतीत सरकार कांही विशिष्ट काळानंतर शेतसाऱ्यात सुधारणा करीत असल्याने सरकारला शेतसाऱ्यात वाढ करून अधिक उत्पन्न मिळवता येऊ लागले. त्यामुळे सरकारचा फायदा होऊ लागला. कायमधारा पद्धतीत हे शक्य नव्हते.

**४) रयतेचा पाठिंबा :** या पद्धतीमुळे मुठभर जमीनदारांऐवजी संपूर्ण रयतेचा पाठिंबा मिळविणे सरकारला शक्य होते. तसेच ही पद्धती कांही भागात पूर्वापारपणे चालत आलेली असल्याने जनतेनेही तिला पाठिंबा दिला. रयतवारी सुरू केल्याने आपल्यावर अन्याय झाला अशी जनतेची भावना नव्हती. उलट रयतेत आत्मविश्वास व स्वावलंबनाची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

**रयतवारी पद्धतीचे दोष :**

**१) डोईजड शेतसारा :** कायमधारा पद्धतीपेक्षा रयतवारीत शेतसाऱ्याचे प्रमाण जास्त होते. विशिष्ट काळानंतर सरकार त्यात वाढ करू शकत होते. त्यामुळे सरकारचा जरी फायदा होत असला तरी शेतकऱ्यांना मात्र शेतसारा डोईजड होऊ लागला. गरीब व लहान शेतकऱ्यांना सारा भरणे अवघड होऊ लागले.

**२) सरकारविरोधी भावना :** शेतसारा वेळेत न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी सरकार जप्त करू लागले. तसेच सरकारी अधिकारी जमीनदारांसारखेच कठोरपणे सारा गोळा करू लागले. सारा न भरणाऱ्यांस उपाशी ठेवणे, निसर्गविधीला न जाऊ देणे, त्यांचे केस प्राण्यांच्या शेपटीला बांधणे, त्यांच्या गळ्यात हाडांची माळ घालणे इ. अमानुष व अपमानास्पद शिक्षा करू लागले. त्यामुळे रयतेत सरकार विरोधी भावना वाढीस लागली.

**३) कर्जबाजारीपणा वाढाला :** शेतसारा न भरल्यास जमिनीवर येणारी जप्ती व होणारी शिक्षा टाळण्यासाठी शेतकरी सावकाराकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घेऊ लागले. कर्ज न फिटल्यास सरकार त्यांच्या जमिनी लुबाडू लागले. परिणामी, अनेक शेतकरी भूमिहीन मजूर बनले. त्यांच्या दुःखात वाढ झाली.

**४) शेती सुधारण्यात अडथळा :** सरकार वेळोवेळी शेतसारा वाढवित असल्याने शेतकऱ्यांकडे शेतीत गुंतवणूक करण्यासाठी पैसा शिल्लक राहणे अवघड झाले. शेतीत सुधारणा करून उत्पन्न वाढविल्यास सरकार शेतसारा वाढविल या भीतीपोटी शेतकऱ्यांनी शेतीत सुधारणा न करण्याचे धोरण स्वीकारले.

**५) कुळांचे शोषण :** या पद्धतीत जमीनमालकच शेती कसत. तथापि, बड्या शेतकऱ्यांनी आपली विस्तृत जमीन कसणे शक्य नसल्याने ते कुळांना जमिनी कसण्यासाठी देऊन त्यांच्याकडून भरमसाठी खंड उकळू लागले. परिणामी, जमीनदारीप्रमाणेच रयतवारीतही कुळपद्धती व कुळांचे शोषण कांही प्रमाणात चालूच राहिले.

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व भारतात वरील तीन जमीनधारणा पद्धती अस्तित्वात होत्या. वेगवेगळ्या भागात या तीनपैकी कोणतीतरी एक पद्धती होती.

**जमीन सुधारणा** (Land Reforms)

दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता, अन्नधान्याची टंचाई इत्यादी समस्यांचे मूळ मागासलेल्या शेतीत आहे हे ओळखून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेती व्यवसायात सुधारणा करण्यास प्राधान्य देण्यात आले. शेती सुधारणा कार्यक्रमाचे १) शेतीत संस्थात्मक सुधारणा करणे २) शेतीत तांत्रिक सुधारणा करणे असे दोन भाग पडतात. शेतीत संस्थात्मक सुधारणा करणे म्हणजे जमिनविषयक संबंधातील विषमता नष्ट करणे होय तर शेतीत तांत्रिक सुधारणा करणे महणजे शेती व्यवसायात आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करून शेती उत्पादनात वाढ करणे होय. या ठिकाणी तुम्ही प्रथम संस्थात्मक व नंतर तांत्रिक सुधारणांचा अभ्यास करणार आहात.

**जमीन सुधारणा कार्यक्रमाचा अर्थ :**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी जमिनीवरील मालकीहक्कामध्ये मोठी विषमता होती. मूठभर जमीनदारांकडे हजारो एकर शेती होती तर बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक होते तर असंख्य लोक किंवा कुटुंबे ही भूमिहीन होती. जमीनदार स्वतः शेती न कसता कुळांकडून खंडाने शेती कसून घेत. शेती उत्पन्नातील मोठा हिस्सा जमीनदारास मिळत असल्याने शेतीत सुधारणा करण्याची आवश्यकता त्यांना वाटत नसे. तसेच ते कुळांना वाटेल तेव्हा काढून टाकीत. त्यामुळे कुळांनाही शेतीत सुधारणा करावी असे वाटत नसे. त्यामुळे शेती व्यवसाय कुंठीत झाला होता. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीत सुधारणा करण्यासाठी प्रथम जमिनीवरील मालकीहक्कात बदल केले पाहिजेत, कुळांना संरक्षण दिले पाहिजे, भूमिहीनांना जमीन मिळवून दिली पाहिजे याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली. यासाठी विविध कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या. या उपाययोजनांनाच स्थूलमानाने जमीन सुधारणा असे म्हणतात. जमीन सुधारणाचा अर्थ समजण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या अभ्यासू.

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे :** लोकांमध्ये जमिनीचे न्याय वाटप करणे, जमीनधारणेचे कमाल क्षेत्र निश्चित करणे, कसेल त्याला जमिनीचे मालकीहक्क मिळवून देणे, शेतीत राबणाऱ्या सर्व घटकांच्या हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करणे आणि सरकार व जमीन कसणारे यांच्यातील मध्यस्थ नष्ट करून त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे या उद्देशाने केलेल्या उपाययोजनांना जमीन सुधारणा असे म्हणतात.

**२) पी. सी. जोशी :** प्रत्यक्ष हस्तक्षेप करून कृषीरचनेत जे बदल घडवून आणले जातात त्यांना जमीन सुधारणा असे म्हणतात.

**जमीन सुधारणेची उद्दिष्टे**

१) शासन व जमीन कसणारे यांचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्यासाठी मध्यस्थांचे (जमीनदार, मालगुजार इ.) उच्चाटन करणे.

२) शेती व्यवसायातील दुर्बल घटकांची (कूळे, भूमिहीन लोक, अल्पभूधारक इ.) स्थिती सुधारणे.

३) जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणे.

४) कुळांना संरक्षण देणे व त्यांनी शेतीमालकास द्यावयाचा खंड निश्चित करणे.

५) शेतीचे छोटे छोटे तुकडे एकत्र जोडणे.

६) सहकारी शेतीसंस्था स्थापन करणे.

७) ग्रामीण लोकांची आर्थिक स्थिती सुधारणे इत्यादी.

**जमीन सुधारणेसाठी केलेल्या उपाययोजना –**

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जमीन सुधारणेअंतर्गत पुढील पाच उपाययोजना केल्या.

१) जमीनदारी पद्धती निर्मूलन कायदे.

२) कुळकायदे

३) कमाल जमीनधारणा कायदा

४) तुकडेबंदी व तुकडेजोड याबाबतचे कायदे

५) सहकारी शेतीसंबंधीचे कायदे.

या पाच उपाययोजनांचे क्रमशः विवेचन करू या.

**१) जमीनदारी पद्धतीचे निर्मूलन :**

ब्रिटिश सत्तेच्या प्रोत्साहनामुळे जमीनदारी पद्धत फोफावली. या पद्धतीचे शेतीवर व समाजजीवनावर गंभीर दुष्परिणाम झाले. जमीनदारी पद्धतीत जमीनदारांना कष्ट न करताच भरपूर उत्पन्न मिळे. त्यामुळे ते शेतीत सुधारणा करीत नव्हते. याउलट अहोरात्र राबवूनदेखील कुळांना अल्प उत्पन्न मिळे. तसेच जमीनदार कुळांना वाटेल तेव्हा काढून टाकीत. त्यामुळे शेती सुधारावी असे कुळांनाही वाटत नसे. यामुळे शेती व्यवसाय डबघाईस आला होता. त्यामुळे जमीनदारी पद्धती नष्ट केल्याशिवाय शेतीत सुधारणा होणार नाही हे ओळखून शासनाने जमीनदारी पद्धती नष्ट करणारे कायदे केले. स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये मद्रास सरकारने सर्वप्रथम व त्यानंतर मुंबई, आसाम, आंध्र प्रदेश, राजस्थान, केरळ, बिहार, पश्चिम बंगाल ह्या राज्यांनी

१९५४-५५ पर्यंत जमीनदारी निर्मूलन कायदे केले. इ.स. १९६२ मध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश ह्या राज्यांनी वतनदारी व इनामदारी रद्द करणारे कायदे केले.

**जमीनदारी निर्मूलन कायद्याची वैशिष्ट्ये :**

१) जमीनदारी निर्मूलन कायद्यांनी जमीनदार, महालदार, वतनदार, इनामदार इत्यादी मध्यस्थांचे उच्चाटन केले.

२) जमीनदारांना स्वतः कसण्यासाठी कांही जमीन ठेऊन त्यांच्याकडील उर्वरीत जमीन सरकारने काढून घेतली व ती कुळांना कायमची मालकीहक्काने कसण्यासाठी दिली.

३) जमीनदारांना त्यांच्या जमिनी काढून घेतल्याबद्दल नुकसान भरपाई रोख रक्कम व कर्जरोख्याच्या रूपात दिली.

**जमीनदारी निर्मूलन कायद्यांचे फायदे :**

१) सरकार व शेतकरी यांचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले.

२) सरकार स्वतः जमीन महसूल गोळा करू लागल्याने सरकारचे उत्पन्न वाढले.

३) अनेक जमीनदारांनी स्वतःकडील शेती सुधारण्यास सुरुवात केली.

४) कुळांना जमिनीची मालकी मिळाल्याने ते शेती विकास करू लागले.

५) ग्रामीण भागातील श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी कमी होण्यास थोडीफार मदत झाली.

**२) कुळकायदे**

कायद्याने जमीनदारी पद्धती नष्ट केली तरी कुळपद्धती मात्र टिकून होती. कुळपद्धतीत जमीनमालक सतत खंडाचे दर वाढवित. कुळांना वाटेल तेव्हा काढून टाकीत. त्यांचे शोषण करीत. स्वतःस शेतीतील मोठे उत्पन्न खंडरूपाने घेत व कुळांना अल्प हिस्सा देत. त्यामुळे कूळे दरिद्री बनली होती. कुळांना जमिनीचे मालकीहक्क नसल्याने ते मन लावून शेती करीत नव्हते. परिणामी, शेती व्यवसाय डबघाईस आला होता. म्हणून कुळांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी व शेती सुधारण्यासाठी कुळकायदे संमत करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेत अ) कुळांनी जमीन मालकास १/६ खंड द्यावा. ब) जमीन मालकास एकदम वा हप्त्याहप्त्याने ठराविक रक्कम देऊन कुळांना जमीन विकत घेण्याचा हक्क मिळावा. अशा शिफारशी केल्या. त्यानुसार घटकराज्यांनी कुळकायदे केले.

**कुळकायद्यांची वैशिष्ट्ये :**

१) कुळकायद्याद्वारे कुळांनी जमीनमालकास द्यावयाचा खंडाचा दर निश्चित केला. उदा. महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान राज्यांनी खंडाची कमाल मर्यादा १/६ इतका केली. तर पश्चिम बंगालमध्ये व आंध्र

प्रदेशात १/२ इतकी, पंजाबात १/३ इतकी, म्हैसूरमध्ये १/४ इतकी, मद्रासमध्ये १/४ ते ४०% इतका खंडाचा दर निश्चित केला.

२) कुळकायद्यांनी कुळांकडे किती काळ जमीन राहील याचीही मुदत निश्चित केली. या मुदतीत कुळांना न काढण्याची तरतूद केली. यामागचा उद्देश असा होता की जमीन दीर्घकाळ कसावयास मिळाल्यास कुळे शेती सुधारण्याकडे लक्ष देतील.

३) कुळांनी शेतात विहीर खुदाई, पाईपलाईन टाकणे, सपाटीकरण इत्यादी सुधारणा केल्यास जमीन मालकांनी त्याला खर्चाची भरपाई द्यावी.

४) १९५७ पासून 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार कुळास सरकारी अधिकारी ठरविल त्या किंमतीस जमीन खरेदी करण्याची व किंमत १२ हप्त्यात मालकास देण्याची संधी दिली.

५) एखाद्या जमीनमालकास स्वतः जमीन कसावयाची असल्यास त्याला विशिष्ट परिस्थितीत ठराविक जमीन कुळाकडून स्वतःकडे घेण्याची तरतूद केली.

**३) जमीनधारणेवरील कमाल मर्यादा :**

जमीन सुधारणेअंतर्गत केलेली तिसरी तरतूद म्हणजे एखाद्या व्यक्तीकडे किंवा कुटुंबाकडे जास्तीत जास्त किती एकर जमीन असावी याची मर्यादा निश्चित केली. या मर्यादेपेक्षा ज्यांच्याकडे अधिक जमीन आहे ती 'अतिरिक्त' ठरवून सरकारने ताब्यात घ्यावी व तिचे वाटप कुळे, लहान शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांना करावी असे ठरविले. जमीनधारणेवर मर्यादा घालणाऱ्या ह्या कायद्यांना कमाल जमीन धारणा कायदा असे म्हणतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५९ मध्ये नागपूर अधिवेशनात काँग्रेस पक्षाने राज्यसरकारांनी जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणारे कायदे करावेत अशी शिफारस केली. त्यानुसार १२ राज्यांनी असे कायदे १९६२ पर्यंत केले. वेगवेगळ्या राज्यांनी कमाल जमीन धारणेची घातलेली मर्यादा वेगवेगळी होती. उदा. आसामात २५ एकर, बिहारात २० ते ६० एकर, महाराष्ट्रात १८ ते १२६ एकर, उत्तर प्रदेशात ४० ते ८० एकर, राजस्थानात २२ ते ३३६ एकर, तामिळनाडूत १२ ते ६० एकर, केरळात १२ ते १५ एकर, म्हैसूरात २७ ते २१६ एकर, पंजाब-हरियानात २७ ते १०० एकर अशी होती. कांही राज्यांनी 'व्यक्ती' हा घटक तर कांही राज्यांनी कुटुंब हा घटक मानून जमीन धारणेची मर्यादा निश्चित केली. कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन काढून घेऊन भूमिहिनांना वाटप सुरू केले. पण त्याविरुद्ध बडे शेतकरी न्यायालयात गेल्याने जमीनीच्या फेरवाटपात अडचणी आल्या.

जुलै १९७२ मध्ये दिल्ली येथे झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेने कमाल जमीन धारणा कायद्याबाबत पुढील शिफारसी केल्या. १) पाच व्यक्तींचे कुटुंब मानून जमीनधारणेची मर्यादा ठरवावी. २) बागाईत व जिराईत जमिनीसाठी वेगवेगळी मर्यादा असावी. ३) धारणक्षेत्रावरील कमाल मर्यादा ५४ एकरापेक्षा जास्त

नसावी. ४) अतिरिक्त जमीन काढून घेताना जमीनमालकास बाजारभावापेक्षा कमी दराने नुकसान भरपाई द्यावी. ५) अतिरिक्त जमीन भूमिहीनांना वाटावी. त्यामध्ये अनुसूचित जातीजमातीतील भूमिहीनांना प्राधान्य द्यावे. ६) मळ्याच्या जमिनी (चहा, कॉफी, रबर, कोको इ.) आणि औद्योगिक व व्यापारी संस्थांनी बिगरशेती उपयोगासाठी ठेवलेल्या जमिनी या कायद्यातून वगळाव्यात. ७) साखर कारखान्यांना आपल्या मालकीची १०० एकर इतकी जमीन ठेवता येईल. या शिफारसीनुसार घटकराज्यांनी कमाल जमीनधारणा कायद्यांत दुरुस्त्या केल्या.

महाराष्ट्र सरकारने २ ऑक्टोबर १९७५ रोजी कमाल जमीन धारणा कायद्यात सुधारणा करून पुढील तरतुदी केल्या.

१) कुटुंब हा घटक मानून धारण क्षेत्रावर मर्यादा घातली.

२) सरकारी जलसिंचन सुविधेद्वारे बारमाही पाणीपुरवठा होणाऱ्या जमिनीची कमाल मर्यादा १८ एकर तर हंगामी पाणीपुरवठा होणाऱ्या जमिनीसाठी २७ एकर केली.

३) खाजगी जलसिंचन सुविधेद्वारे बारमाही पाणीपुरवठा होणाऱ्या जमिनीची कमाल मर्यादा २७ एकर केली.

४) कोरडवाहू व इतर जमिनीसाठी कमाल मर्यादा ५४ एकर केली.

१९७२ च्या सुधारित कायद्यानुसार जानेवारी २००१ अखेरपर्यंत देशात ७३.६७ लाख एकर जमीन अतिरिक्त ठरविली. त्यापैकी ६४.९५ लाख एकर सरकारने ताब्यात घेतली. त्यापैकी ५३.५९ लाख एकर जमीन ५४.८४ लाख लोकांना वाटली.

### ४) तुकडेबंदी आणि तुकडेजोड

जमीन सुधारणेत जमिनीचे लहान लहान तुकडे पाडण्यास बंदी घालण्याचा व अस्तित्वात असलेले तुकडे जोडण्याचा कार्यक्रमही राबविला गेला. वाढत्या लोकसंख्येचा भार शेतीवर पडणे, वडिलोपार्जित जमिनीचे वारसांमध्ये वाटप होणे, संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन तयार होणाऱ्या विभक्त कुटुंबात जमिनीचे वाटप होणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या गहाण जमिनीतील कांही हिस्सा सावकाराने बळकावणे इत्यादी कारणांमुळे जमिनीचे तुकडे पडतात. अशा लहान तुकड्यांवर आधुनिक शेती उत्पादन तंत्र वापरता येत नाही. जमिनीला बांध व कुंपण घालण्यात बरीच जमीन वाया जाते. जमिनीची सीमा व येण्याजाण्याची वाट यावरून भांडणे उद्‌भवतात. लहान तुकड्यावर शेती करण्याची जिद्द रहात नाही. यामुळे शेती व्यवसायावर दुष्परिणाम होऊन व्यक्तीचे, कुटुंबाचे व राष्ट्राचेही उत्पन्न घटते. म्हणून सरकारने तुकडेबंदीचे व तुकडेजोडीचे कायदे केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ ते १९५१ दरम्यान उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब, मुंबई, हैद्राबाद या राज्यांनी, १९५१ नंतर ओरीसा, पश्चिम बंगाल, राजस्थान, हिमाचल प्रदेश ह्या राज्यांनी तर पुढे बिहार (१९५६), कर्नाटक व आसाम (१९६०) व जम्मू-काश्मिर (१९६२) यांनी असे कायदे केले. सुरुवातीस

तुकडेजोड शेतकऱ्यांच्या इच्छेवर अवलंबून ठेवली. पण त्यास शेतकऱ्यांनी पुरेसा प्रतिसाद न दिल्याने पुढे सक्तीने तुकडेजोड करण्याचे ठरविले. अर्थात तुकडेबंदी व तुकडेजोड कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत मंदगतीने झाली. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अहवालानुसार १९९२ अखेरपर्यंत ६ कोटी १२ लाख हेक्टर जमिनीचे तुकडेजोड पूर्ण झाली होती.

**५) सहकारी शेती :**

जमीन सुधारणेत सहकारी शेती संस्था स्थापण्यास उत्तेजन देण्यात आले. शेतीच्या लहान तुकड्यावर केलेली शेती फायदेशीर ठरत नाही. म्हणून शेतजमिनीचा आकार वाढवून त्यावर सुधारित तंत्राने शेती केल्यास ती फायदेशीर ठरेल या उद्देशाने सहकारी शेती संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले. नियोजन मंडळाच्या मते ''सहकारी शेती म्हणजे शेतजमीन एकत्र करणे आणि तिचे संयुक्तपणे व्यवस्थापन करणे होय.'' सहकारी शेतीत अनेक शेतकऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या शेतीचे व शेती अवजारांचे एकत्रीकरण केले जाते व त्या एकत्रीत शेतीवर ते सर्व शेतकरी एकत्रीतपणे शेती करतात व त्यांच्या जमिनीच्या व कामाच्या प्रमाणात उत्पादनातील वाटा प्रत्येकास दिला जातो. सहकारी शेतीचा कारभार सभासद शेतकऱ्यांनी निवडलेल्या संचालक मंडळाद्वारे चालविला जातो.

स्वातंत्र्यपूर्व काळात निवृत्त सैनिकांच्या पुनर्वसनासाठी तसेच देशाच्या फाळणीनंतर निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी शेती सहकारी संस्था स्थापण्यात आल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर १९५९ मध्ये **निजलिंगाप्पा** समितीच्या शिफारशींनुसार प्रत्येक जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर सहकारी शेती संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यासाठी पंचवार्षिक योजनेत तरतुदीही केल्या गेल्या. तथापि, अशा संस्थांची संख्या अल्पच राहिली. भारतासारख्या विशाल देशात १९९१-९२ मध्ये केवळ ४७८३२ इतक्याच सरकारी शेतीसंस्था होत्या आणि त्यांची सभासद संख्या केवळ ५६ लाख इतकीच होती.

अशाप्रकारे, शेती व्यवहारात संस्थात्मक सुधारणा करण्याच्या उद्देशाने जमीन सुधारणा कार्यक्रम राबविले गेले.

**जमीन सुधारणेचे मूल्यमापन**

जमीन सुधारणा कार्यक्रमाचे उद्देश व दिशा योग्यच होती. तथापि, या कार्यक्रमास अपेक्षित यश आले नाही. या अपयशाची कारणे पुढीलप्रमाणे -

**१) उणिवा :** जमीन सुधारणा कायदे करणारे लोकप्रतिनिधी हे बहुसंख्येने बडे जमीनधारक होते. या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे त्यांचेच नुकसान होणार होते. त्यामुळे त्यांनी जमीन सुधारणा कार्यक्रमात मुद्दाम कांही उणिवा व पळवाटा ठेवल्या व त्यांचा फायदा उठवून आपले फारसे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली.

२) **अयोग्य अंमलबजावणी :** जमीन सुधारणा कार्यक्रमाची सरकारी कर्मचारी हे बड्या शेतकऱ्यांचे हितसंबंध जपणाऱ्या राज्यकर्त्यांच्या प्रभावाखाली होते. शिवाय हे कर्मचारी स्वतःच बड्या शेतकरी कुटुंबातील होते. त्यामुळे त्यांनी कूळे, अल्पभूधारक, भूमिहीन मजूर इत्यादींच्या हिताऐवजी बड्या शेतकऱ्यांच्या हितास प्राधान्य दिले व जमीन सुधारणा कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत मंद व अयोग्य पद्धतीने केली.

३) **एकात्मिक अंमलबजावणीचा अभाव :** जमीनदारी निर्मूलन कायदा, कुळकायदे, जमीनधारणा कायदा यांची आखणी व अंमलबजावणी एकात्म पद्धतीने न करता अलगअलगपणे केली. त्यामुळे कायद्यांतून पळवाटा काढण्याची पुरेपूर संधी जमीनधारकांना मिळाली.

४) **असंघटीत दुर्बल घटक :** जमीन सुधारणा कायद्यांचा लाभ ज्या घटकांना होणार होता ते घटक (कूळे, भूमिहीन मजूर इ.) दुर्बल व असंघटीत असल्याने या कायद्यांची योग्यपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून सरकारवर पुरेसा दबाव टाकू शकला नाही. आपल्या हितसंबंधांच्या पूर्तीसाठी बडे जमीनदार, सरकारी कर्मचारी यांच्याशी हा घटक लढा देऊ शकला नाही. तसेच आपल्यावरील अन्यायाविरुद्ध न्यायालयाकडे दाद ही मागू शकला नाही.

५) **जमीनदारांचा वर्ग नष्ट झाला नाही :** कायद्याने जमीनदारी पद्धती नष्ट केली असली तरी उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा इत्यादी राज्यांत जमीनदारांचा वर्ग अद्याप टिकून राहिला असून त्यांच्याकडे आजही पाचशे-हजार एकर शेती आहे. हे जमीनदार आजही कुळांचे व शेतमजुरांचे शोषण करताना आढळतात.

६) **कुळांना पुरेसे संरक्षण मिळाले नाही :** कुळकायद्यांनी कुळांना पुरेसे संरक्षण मिळाले नाही. कुळकायद्यांच्या निर्मितीची चर्चा व प्रक्रिया सुरू होताच अनेक जमीनदारांनी कुळांना हाकलून लावले. या कायद्यांनी ज्या कुळांना जमिनी दिल्या त्या जमिनी नंतर जमीनदारांनी दहशतीच्या मार्गाने परत काढून घेतल्या. कुळकायद्यांनी खंडाचा दर निश्चित केला. तथापि, जमीनदार पूर्वीसारखाच भरमसाठ खंड उकळू लागले. अनेक राज्यांत कुळांच्या हक्कांची कागदोपत्री नोंद नसल्याने कुळांना जमिनी मिळू शकल्या नाहीत.

७) **कमाल जमीनधारणा कायद्यांचे अपयश :** कमाल जमीन धारणा कायद्यांमध्ये अनेक पळवाटा असल्याने ते अपयशी ठरले. अनेक राज्यांनी जमीनधारणेची कमाल मर्यादा वरच्या पातळीवर ठेवल्याने अनेक बडे जमीनधारक ह्या कायद्यांच्या कक्षेत येऊ शकले नाहीत. जे जमीनधारक ह्या कायद्यांच्या कक्षेत येत होते त्यांनी आपल्या जमिनी सज्ञान मुले, पत्नी, अन्य नातलग यांच्या नावावर केल्या. कोरडवाहू जमिनीच्या बाबतची कमाल मर्यादा अधिक असल्याने अनेक जमिनदारांनी आपली जमीन कोरडवाहू असल्याचे दाखविले. त्यासाठी असलेल्या जलसिंचन सुविधा नष्ट केल्या. ज्या जमीनदारांनी आपल्याकडील जमिनी कुळे व भूमिहीनांसाठी दिल्या त्या जमिनी अत्यंत निकृष्ठ दर्जाच्या (माळरानाच्या, खडकाळ, मुरमाड) होत्या. महत्त्वाचे म्हणजे ज्यांना जमिनी मिळाल्या त्या लोकांकडे जमिनी कसण्यासाठी भांडवल व अवजारे नव्हती. परिणामी, जमिनी मिळूनही त्यांना फायदा झाला नाही.

८) **तुकडेजोड व सहकारी शेती संस्थांच्या मार्गातील अडचणी :** भारतीय शेतकऱ्यांनी तुकडेजोडीस फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यांचे आपल्या जमिनीवर प्रेम असल्याने तिचा त्याग करून दुसऱ्याची जमीन स्वीकारण्यास ते तयार झाले नाहीत. तसेच ते अडाणी असल्याने त्यांना सहकाराचे तत्त्वज्ञान व फायदे कळले नाहीत. ते स्वतःच्या शेतीवर जेवढे प्रामाणिकपणे काम करतात तेवढे प्रामाणिकपणे ते सहकारी शेतीवर काम करीत नाहीत. सहकारी शेतीसाठी प्रभावी नेतृत्व व शेतकरी संघटना उदयास आल्या नाहीत. त्यामुळे सहकारी शेतीचा प्रयोग फसला.

### **३.२.२ कृषीविषयक संकट** (Agrarian Crisis)

#### अ) जनुकीय बियाणाचे संकट

कृषी (शेती) हा भारतीय अर्थव्यवस्थेचाच नव्हे तर ग्रामीण समाज जीवनाचाही आधार (कणा) आहे. सुमारे ६०% पेक्षा अधिक भारतीय लोक प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे शेतीवरच निर्वाह चालवितात. देशातील प्रमुख उद्योगधंदे हे शेतीआधारीत आहेत. देशाच्या निर्यातीत कृषी उत्पादनांचा वाटा लक्षणीय आहे. रस्ते व जलमार्ग वाहतूकीत शेतीमालाची वाहतूकही लक्षणीय आहे. रस्ते व जलमार्ग वाहतूकीत शेतीमालाची वाहतूकही लक्षणीय आहे. थोडक्यात कृषी क्षेत्रास देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे.

तथापि, दुर्दैवाने आज कृषी क्षेत्र मोठ्या संकटात सापडलेले आहे. कारण ते विविध समस्यांनी ग्रासलेले आहे. अपुरा पाऊस, जलसिंचनसुविधाची कमतरता, कोरडवाहू क्षेत्राचे मोठे प्रमाण, शेतीमालास वाजवी दर न मिळणे इत्यादीमुळे शेती व्यवसाय किफायतशीर ठरत नाही. परिणामी, वर्षभर अपार कष्ट करूनही शेतकरी दयनियच राहतो. त्यामुळे देशाच्या विविध भागात शेतकरी आत्महत्त्येचे प्रमाण वाढत चालले आहे. अशा अनेक संकटांचा किंवा पेचप्रसंगांचा (Crisis) सामना शेती व शेतकऱ्यांना करावा लागत आहे. अशाच एक नवीन पेचप्रसंग वा संकट शेती क्षेत्रात उद्‌भवलेले आहे व ते म्हणजे **''जनुकिय सुधारीत बियाणे''** (Genetically Modified Seeds) यांचा वापर करणे होय. या नवीन संकटाचे स्वरूप आता आपण समजावून घेणार आहोत. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या समस्येचीही चर्चा करणार आहोत.

**जनुकिय सुधारीत बियाणे म्हणजे काय?** (What is GM Seeds) : ''जनुकिय किंवा आनुवंशिक सुधारीत बियाणे म्हणजे ज्या बियाणाच्या आनुवंशिक पदार्थात (Deoxyribonucleic acid) म्हणजेच DNA मध्ये बदल केलेला असतो.'' हा बदल जेनेटिक इंजिनिअरिंग तंत्राद्वारे केला जातो. अशाप्रकारे बदल केलेले बीयाणे वापरल्यास उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढते. तसेच आवश्यक त्या घटकांचे प्रमाणही वाढते.

अशाप्रकारचे बीयाणे तयार करून त्याचा वापर १९९० मध्ये सुरू झाला. सर्वप्रथम टॉमॅटोचे बीयाणे याप्रकारे सुधारीत करून उत्पादन करण्यात आले. कॅलिफोर्नियातील 'कैलगेने' नावाच्या कंपनीने टोमॅटोच्या गुणसूत्रात बदल करून त्याचे उत्पादन केले. या प्रकारचा प्रयोग पुढे पशुवरही केला गेला. २००६ मध्ये डुकरावर हा प्रयोग केला. उत्तर अमेरिकेत असे बियाणे वापर करून सर्वाधिक पीके घेतली जातात.

**जी. एम. बियाणे वापरण्याचे फायदे :** जनुकीय सुधारीत बियाणे वापरण्याचे अनेक फायदे सांगितले जातात.

१) हे बियाणे वापरून कमी जागेत अधिक उत्पादन घेता येते. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण होऊ शकते.

२) या बियाणात रोगप्रतिकार शक्ती अधिक असते. त्यामुळे ते रोगराई व कीड पडणे अशा आपत्तीतही तग धरून रहाते. वातावरणातील बदलाला पीक बळी पडत नाही.

३) हे बियाणे वापरल्याने कमी मशागत करावी लागते. मातीत ओलावा अधिक काळ टिकून राहतो. त्यामुळे पीकाला जादा पाणी देण्याची गरज नसते.

४) अनेक चाचण्याद्वारे हे सिद्ध झालेले आहे की या बियाणापासून घेतलेले उत्पादन (पीक) हे प्राणी, मनुष्य व पर्यावरण यांच्या दृष्टीने सुरक्षित आहे.

**जी. एम. बीयाणे सुरक्षित आहे काय?** - हे बियाणे सुमारे २०-२५ वर्षापासून वापरात आहे. पण त्याचे मानवी आरोग्यावर उघड दुष्परिणाम झालेले नाहीत असे मत **अमेरिकन मेडिकल असोशियनने** व्यक्त केलेले आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही (WHO) जी. एम. अन्नपदार्थ सुरक्षित असल्याचे म्हटलेले आहे.

**नॅशनल ॲकडमी ऑफ सायन्सने** जी. ए. अन्नाच्या दुष्परिणामाचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे म्हटलेले आहे. एकंदरीत जीएम बियाणाद्वारे उत्पादीत अन्नपदार्थ हे मानवासाठी सुरक्षित आहे असे म्हटले जाते. सुमारे २० वर्षापासून अनेक देशातील लोक जीएम खाद्यपदार्थ खात आहेत पण त्याचा दुष्परिणाम जाणवलेला नाही असे या बियाणांचे पुरस्कर्ते म्हणतात.

तथापि, ही नाण्याची एक बाजू आहे. कांही मंडळी मात्र या बियाणांच्या वापराच्या विरोधात आहेत. त्यांच्या मते जी. एम. बियाणे वापरून घेतलेली पीके ही मानवी आरोग्यासाठी सुरक्षित नाहीत. त्यामुळे त्याच्यावर बंदी घालणेच योग्य ठरते. जनुकीय सुधारित तेलबियांपासून उत्पादीत केलेले खाद्यतेल खाल्ल्याने मानवी रोगप्रतिकार शक्ती कमी होते; पोटाचे विकार वाढतात. यकृतावर दुष्परिणाम होतात. म्हणून या बियाणांवर बंदी घालणे योग्य ठरते.

या बियाणांपासून घेतलेल्या पीकांचे मानव व अन्य प्राण्यांवर झालेले दुष्परिणाम अनेक संशोधकांनी दाखवून दिलेले आहेत. उदा. **जेफ्री एम. स्मिथ** यांनी आपल्या 'जेनेटिक रूलेट' या ग्रंथात याबाबतीतील अनेक संशोधनांचे सार दिलेले आहे. जीएम अन्नाचे पोट व यकृतावर काय दुष्परिणाम होतात हे उंदरावर केलेल्या प्रयोगातून स्पष्ट झाल्याचे पुरावे या ग्रंथात दिलेले आहेत. असे पीक खाणाऱ्या पशुपक्षांचा बळी गेल्याची माहिती त्यात दिलेली आहे. थोडक्यात, जीएम बियाणे सुरक्षित नसल्याचे मत कांही संशोधकांनी मांडलेले आहे.

**भारतातील स्थिती :** जीएम बियाणांच्या वापराबाबत वरीलप्रमाणे परस्परविरोधी मते व्यक्त केली जात असल्याने सामान्य माणूस मात्र संभ्रमात पडलेला आहे. भारतात मात्र अशा बियाणांपासून घेतलेल्या पिकांच्या वापरास बंदी घातलेली आहे. हंगेरी, व्हेनेझुएला यासारख्या देशांनीही बंदी घातलेली आहे. तथापि, भारतात जी. एम. तेलबियापासून बनवलेले खाद्यतेल आयात केले जात असल्याची माहिती पुढे आलेली आहे. भारतात पारंपरिक तेलबियांचे उत्पादन घटत चालले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील जीएम खाद्यतेल, जे स्वस्तही आहे, आयात करून त्याची विक्री होत आहे. त्यामुळे आरोग्यावर घातक परिणाम होत आहेत असे विरोधकांचे म्हणणे आहे. हे मोठे संकट आहे.

जीएम बियाणामुळे भारतातील कृषी क्षेत्रापुढे नवे संकट उद्भवलेले आहे. भारतात सद्या केवळ बीटी कॉटन या जीएम बियाणाच्या वापरास परवानगी दिलेली आहे. तथापि, हे बियाणे वापरून कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची तक्रार केली जात आहे. हे बियाणे अत्यंत महागडे आहे.

तरीही ते शेतकऱ्यांनी अधिक उत्पादनाच्या आशेने वापरले. पण अनेक शेतकऱ्यांनी त्यासाठी कर्जही घेतले. तथापि, अपेक्षित उद्दिष्ट साध्य न झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्याचे सांगितले जाते.

भारताची लोकसंख्या सतत वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी अधिक उत्पादन देणारे जीएम बियाणे वापरावे असे कांही मंडळींचे मत आहे. तथापि, असे बियाणे महागडे असून ते परदेशातून आयात करावे लागते. तसेच या बियाणांपासून पीक घेण्यासाठी विविध खते व किटकनाशके वापरावी लागतात व ती ही आयातच करावी लागतात. त्यासाठी परकीय कंपन्यांवर अवलंबून राहवे लागते. हे भारतातील बहुसंख्य गरीब व अल्पभूधारक शेतकऱ्यांना परवडणारे नाही. महत्त्वाचे म्हणजे या विदेशी बियाणांचा वापर वाढल्यास येथील पारंपरिक बियाणे (देशी वाण) धोक्यात येणार आहे.

आज भारतात अशा बियाणांपासून उत्पादीत केलेल्या डाळी, खाद्यतेल, फळे व भाज्या यांची आयात वाढत चालली आहे. त्यामुळे आरोग्याचा धोकाही वाढत आहे. ही अनारेग्याचीच आयात आहे असे या बियाणांना विरोध करणारे म्हणत आहेत. भारतातील 'दि जेनेटिक इंजिनिअरिंग अप्रोव्हल कमिटी' ही जनुकीय बदल केलेल्या वांग्याच्या बियाणास मान्यता देण्याचा विचार करीत आहे. ही मान्यता मिळाल्यास ते भारतातील पहिले जीएम पीक ठरेल. पण अनेक जणांचा त्याला विरोध आहे. मानवी आरोग्य व पर्यावरणावर विपरित परिणाम होतात असे कारण दिले जात आहे. म्हणून या बियाणांचा वापर होऊ नये असे म्हटले जाते.

**समारोप :** जीएम बियाणांबाबत अशी मतभिन्नता असल्याने भारतीय शेतकरी, जो मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय ज्ञानाबाबत अडाणी आहे, तो संभ्रमात आहे. याबाबत आपणास असे म्हणता येईल की, भारतात विविध प्रकारच्या आरोग्यवर्धक, पौष्टिक सात्त्विक व आरोग्यदायी बीबियाणे उत्पादनासाठी अनुकूल स्थिती आहे. त्याचा वापर करून देशी बीबियाणे उत्पादीत करून त्यांचा वापर वाढविला पाहिजे. त्यासाठी शासन व कृषी तज्ज्ञांनी एक कृती आराखडा करून तो प्रामाणिकपणे अंमलात आणला पाहिजे. म्हणजे बीबियाणांसाठी परकीय देशांवर अवलंबून राहण्याची गरज राहणार नाही.

आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जीएम बीयाणे हे शेतकऱ्यांसाठी केवळ एक पर्याय आहे. त्यांना इतर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ते आपल्या प्रदेशातील हवामान, आपली आर्थिक स्थिती, बाजारपेठेची उपलब्धता, ग्राहकांची आवड (मागणी) इत्यादींच्या आधारे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहेत. कृषी क्षेत्रातील संशोधनावर लक्ष देऊन ते आपल्या फायद्याचा पर्याय निवडू शकतात.

### ब) शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची समस्या

**प्रास्ताविक :** भारतीय समाज विविध सामाजिक समस्यांनी ग्रासलेला आहे. त्यापैकी बहुतेक समस्या ह्या आर्थिक स्वरूपाच्या आहेत. म्हणजेच या समस्या लोकांच्या उत्पन्नाशी निगडीत अशा आहेत. **शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या** ही त्यापैकीच एक अशी समस्या आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही सद्याची अत्यंत ज्वलंत व तीव्र अशी समस्या आहे. अलिकडील काळात भारतीय शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे आणि ही संपूर्ण देशाच्या दृष्टीने चिंताजनक गोष्ट आहे. कारण शेतकरी हा सर्वांचा अन्नदाता/पोशिंदा मानला जातो. तो सर्वांचे-अगदी बऱ्याच प्राण्यांचेही-पोट भरतो. जर तोच आत्महत्त्या करू लागला तर सर्वांचेच भवितव्य धोक्यात येऊ शकते.

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे. देशातील सुमारे ७०% लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेती व्यवसायावर अवलंबून आहे. येथील अनेक उद्योगधंदे हे शेतीवर आधारलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात

शेतीचा वाटा आजही लक्षणीय असा आहे. थोडक्यात, शेती व्यवसाय देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणूनच शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. तथापि, दुर्दैवाने हा कणा आज मोडकळीस आला आहे. कारण शेती करणारा शेतकरी हा दुष्टचक्रात अडकला असून तो आत्महत्त्या करू लागला आहे. त्यामुळे देशापुढील ही एक गंभीर समस्या बनली आहे. म्हणून आपण या समस्येची या ठिकाणी वस्तुनिष्ठपणे चर्चा करणार आहोत. त्यासाठी प्रथम शेतकरी आणि आत्महत्त्या या दोन संज्ञांचा थोडक्यात अर्थ समजावून घेऊ या.

**शेतकरी संज्ञेचा अर्थ :** जो शेती करतो किंवा कसतो तो शेतकरी असा अर्थ होतो. परंतु, शास्त्रीय चर्चेत शेतकरी ही संज्ञा अत्यंत व्यापक अर्थाने वापरली जाते. या संज्ञेत जमीनदार (शेकडो एकर जमिनीचा मालक), अल्पभूधारक (कमी प्रमाणात जमीन असणारा), दुसऱ्याची जमीन खंडाने करणारी व्यक्ती (कूळ), दुसऱ्याच्या शेतात काम करणारी व्यक्ती (शेतमजूर) तसेच शेतीशी संलग्न असणारे व्यवसाय (उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्योत्पादन, कुक्कुटपालन) करणारी व्यक्ती, चहाकॉफीच्या मळ्यातील कामगार इत्यादींचा समावेश केला जातो.

**आत्महत्त्येचा अर्थ व प्रकार :** एखाद्या व्यक्तीने जाणीवपूर्वक स्वतःची हत्या करणे म्हणजे आत्महत्या होय. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल डुर्खीम यांनी आत्महत्त्येचे पुढील तीन प्रकार सांगितलेले आहेत.

**१) अहंवादी आत्महत्त्या :** जेंव्हा व्यक्ती समाजापासून अलग पडते व आपली काळजी घेणारे कोणीही नाही असे समजते. अशावेळी ती समाजाचा विचार न करता फक्त स्वतःचाच विचार करते आणि आत्महत्त्या करते. यास अहंवादी आत्महत्त्या म्हणतात.

**२) प्रमाणकशून्य आत्महत्त्या :** जेंव्हा समाजात सामाजिक प्रमाणके निष्प्रभ होऊन असमतोल निर्माण होतो तेंव्हा व्यक्ती त्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकत नाही व ती आत्महत्त्या करते. यास प्रमाणकशून्य आत्महत्त्या म्हणतात.

**३) परार्थवादी आत्महत्त्या :** जेंव्हा व्यक्ती खूपच समाजनिष्ठ असते व समाजाच्या हितासाठी स्वतःचा जीवही देते तेंव्हा ती परार्थवादी आत्महत्त्या ठरते.

भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ह्या प्रमाणकशून्य आत्महत्त्या या प्रकारात मोडतात. कारण विविध कारणांमुळे जी दयनीय आर्थिक परिस्थिती निर्माण होते तिच्याशी ते जुळवून घेऊ शकत नाहीत व त्यातून ते आत्महत्त्या करतात.

**आत्महत्त्येची आकडेवारी :** साधारणपणे १९९१ नंतर शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करण्याचे प्रमाण हळूहळू वाढत असल्याचे आढळते. यासंदर्भात जी आकडेवारी उपलब्ध होते ती पूर्णतः विश्वसनिय वाटत नाही. कारण सरकार, स्वयंसेवी संस्था, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादीकडून वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी आकडेवारी प्रसिद्ध झालेली दिसते. अलिकडेच केंद्रिय कृषी मंत्रालयाने लोकसभेत जी आकडेवारी दिली ती विचारात घेऊ. संपूर्ण देशात इ.स. २०१३ साली ११७७२ शेतकऱ्यांनी, २०१४ साली १२३६० शेतकऱ्यांनी, २०१५ साली १२६०२ शेतकऱ्यांनी तर २०१६ साली ११३७० शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या होत्या. देशातील सर्वच राज्यांतील शेतकरी कमीजास्त प्रमाणात आत्महत्त्या करतात. तथापि, महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगण, गुजरात या राज्यांत शेतकरी आत्महत्त्येचे प्रमाण जास्त आढळते. इ. स. २०१६ मध्ये महाराष्ट्रात ३६६१, कर्नाटकात २०७९, मध्य प्रदेशात १३२१, आंध्र प्रदेश ८०४, छत्तीसगढमध्ये ६८२, तेलंगणात ६४५ तर गुजरातमध्ये ४०८ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या होत्या.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे**

भारतातील शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करण्याची विविध कारणे सांगता येतात. त्यापैकी कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे:

**१) आर्थिक उदारिकरण :** १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव सरकारने आर्थिक उदारिकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणात आर्थिक विकास वेगाने घडून यावा म्हणून औद्योगिक व सेवा क्षेत्रांच्या विकासावर विशेष भर दिला. मात्र शेती विकासाकडे तुलनेने दुर्लक्ष केले गेले. शेतीक्षेत्रास दिली जाणारी अनुदाने व इतर साहाय्य यांच्यात कपात करण्याचे धोरण राबविले. त्यामुळे शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ झाली. मात्र त्यामानाने शेती उत्पादनांना बाजारभाव मिळेनासा झाला. यातून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ढासळली व ते आत्महत्त्या करू लागले.

**२) कर्जबाजारीपणा :** शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे ही त्यांच्या आत्महत्त्येचे प्रमुख कारण मानले जाते. भारतात ग्रामीण भागात कर्जपुरवठ्याच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे शेतकरी खाजगी सावकारांकडून अवाजवी किंवा चढ्या व्याजदराने कर्ज घेतात. महत्त्वाचे म्हणजे अनेक शेतकरी हे कर्ज शेती विकासाऐवजी घरबांधणी, विवाह, सण-उत्सव साजरे करणे अशा गोष्टींवर खर्च करतात. त्यामुळे त्यांचा विकास होण्याऐवजी त्यांच्या आर्थिक दुरावस्थेत वाढ होते. अनेकांना पहिल्या कर्जाचे व्याज चुकविण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. अशारितीने कर्जाचे ओझे वाढत जाते. कर्ज वसुलीसाठी सावकारांकडून/वित्तसंस्थांकडून दबाव वाढत जातो. अनेकदा घर, शेती, इतर मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेतलेले असते. कर्ज न फिटल्याने या गहाणवट गोष्टींना मुकावे लागते. याचा परिणाम, म्हणून, मानसिक ताणतणाव व नैराश्य वाढते. यातूनच अनेकजण आत्महत्त्येस प्रवृत्त होतात.

**३) शेती उत्पादनास कमी भाव :** औद्योगिक उत्पादनाप्रमाणे शेती उत्पादनांस निश्चित भाव मिळत नाही. शेती हंगाम संपला की, बहुसंख्य शेतकरी आपली उत्पादने एकाच वेळी विक्रीसाठी बाजारात आणतात. त्यामुळे पुरवठा वाढतो. मात्र अशावेळी व्यापारी वर्ग शेती उत्पादनाच्या किंमती मुद्दाम पाडतो. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्यांना व्यापारी ठरविल त्या भावात आपला माल विकावा लागतो. बऱ्याचवेळा उत्पादन खर्च व वाहतूक खर्चही निघत नाही. अशावेळी वर्षभर अफाट कष्ट करून पिकविलेला माल नुकसानीत विकला जातो. बराच शेतीमाल हा नाशवंत असल्याने त्याची दीर्घकाळ साठवणूक करून योग्य किंमत येईल तेंव्हा विकणे अशक्य असते. परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. याचा ताण येऊन अनेक शेतकरी आत्महत्त्या करतात.

**४) उत्पादन खर्चात वाढ :** आज महागाई सतत वाढत चालली आहे. बी-बियाणे, खते, जंतुनाशके, वीज, वाहतूक, मजूरी इत्यादीचे भाव वाढत आहेत. त्यामुळे शेती उत्पादनाचा खर्चही वाढत आहे. किमान हमी भाव हा अनेकदा खर्चाच्या मानाने कमी असतो व तो ही अनेक शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे शेती व्यवसाय हा किफायतशीर राहिलेला नाही. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती ही नेहमीच तोट्यात असते. सततच्या तोट्यांमुळे त्रस्त होऊन अनेक शेतकरी हे आत्महत्त्येचा मार्ग स्वीकारतात.

**५) अपुऱ्या जलसिंचन सुविधा :** भारतात जलसिंचनाच्या सुविधा खूपच अपुऱ्या आहेत. बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती ही लहरी मोसमी पावसावर अवलंबून आहे. हा पाऊस कधी अपुरा पडतो तर कधी गरजेपेक्षा जास्त पडतो. त्यामुळे कधी अनावृष्टीस तर कधी अतिवृष्टीस तोंड द्यावे लागते. म्हणजेच शेतकऱ्यांना सतत कोरड्या वा ओल्या दुष्काळास तोंड द्यावे लागते. अनेकदा मोसमी पाऊस हा अवेळी

पडतो व हातातोंडाशी आलेले पीक बुडते व शेतकऱ्याचे नुकसान होते. या नुकसानीस कंटाळून बरेच शेतकरी आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होतात.

**६) परकीय मालाचे आक्रमण :** उदारीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय बाजारात परकीय शेती माल मोठ्या प्रमाणावर येत आहे. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना आपल्या मालाच्या किंमती कमी करणे भाग पडत आहे. परकीय शेतमालाशी स्पर्धा करताना भारतीय शेतकऱ्यांना सतत नुकसान सोसावे लागत आहे. अशा स्थितीत शेतीमालास संरक्षित बाजारपेठ मिळत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना फायदा मिळणे तर दूरच, निर्वाह चालविणेही कठीण होत आहे. अशा या समस्येतून मुक्त होण्यासाठी बरेच शेतकरी आत्महत्त्या करणे पसंत करतात.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबविण्यासाठी करावयाची उपाययोजना**

शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही अत्यंत गंभीर व चिंताजनक अशी समस्या असून तिचे वेळीच निराकरण होणे गरजेचे आहे. जर शेतकरी आत्महत्त्यांचे सत्र थांबले नाही तर शेती व्यवसायाचे अस्तित्व धोक्यात येऊन भारतीय अर्थव्यवस्था कुंठित होऊ शकते. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील उपाययोजना सुचविता येतील.

**१) कर्ज पुरवठ्याच्या सुविधा वाढविणे :** कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे एक प्रमुख कारण आहे. अधिकृत वित्तसंस्थांमार्फत (बँका, पतसंस्था इ.) वाजवी दराने शेतकऱ्यांना जर पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा झाला तर ते खाजगी सावकारांच्या कचाट्यातून सुटतील. म्हणून ग्रामीण भागात कर्जपुरवठ्याच्या सुविधा वाढविल्या पाहिजेत. म्हणजेच शासनाने खाजगी सावकारांना योग्य तो पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे. शिवाय खाजगी सावकारीस आळाही घातला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक खेड्यात बँक शाखा सुरू केली पाहिजे. तसेच कर्ज देण्याची पद्धतीही सुलभ केली पाहिजे. अनावश्यक कागदी घोडे न नाचवता शेतकऱ्यांना गरजेनुसार त्वरीत कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. म्हणजे ते सावकाराकडे कर्ज मागण्यासाठी जाणार नाहीत.

**२) जलसिंचन सुविधा वाढविणे :** शेतकऱ्यांचे मोसमी पावसावरील अवलंबन कमी करण्यासाठी जलसिंचन सुविधा वाढविणे आवश्यक आहे. शेतीला गरजेनुसार पर्याप्त पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या धरणांबरोबरच लघुपाटबंधारे, कालवे, तलाव विहीरी, अशा सुविधा वाढविल्या पाहिजेत. पावसाचे पाणी अडवून भूगर्भातील तसेच भूपृष्ठावरील जलसाठा वाढविला पाहिजे. या कार्यात शासकीय संस्थाबरोबरच स्वयंसेवी व्यक्ती व संस्थांनीही योगदान दिले पाहिजे. शेतकऱ्यांनीही आपल्या ग्रामस्थांच्या मदतीने आपले शिवार वर्षभर हिरवेगार राहिल यासाठी स्थानिक जलस्त्रोतांचा विकास घडवून आणला पाहिजे. थोडक्यात, जलसिंचन सुविधा वाढविल्याने शेतीला हमखास पाणीपुरवठा होऊन पीक उत्पादन वाढेल व शेतकऱ्यांचेही उत्पन्नही वाढेल. परिणामी, ते आत्महत्त्येपासून परावृत्त होतील.

**३) सुधारीत शेतीचा अवलंब :** बहुसंख्य भारतीय शेतकरी हे शेतीत सुधारीत तंत्र वापरीत नसल्याने त्यांची शेती किफायतशीर ठरत नाही. ती किफायतशीर ठरण्यासाठी त्यांनी सुधारीत शेती तंत्र वापरले पाहजे. सुधारीत खते, बीबियाणे, जंतुनाशके, दुबार-तिबार पीक पद्धती, इत्यादीचा अवलंब केला पाहिजे. यासाठी शासनाने शेतकऱ्यांना विशेषतः अल्पभूधारक गरीब शेतकऱ्यांना शेतीचे सुधारित तंत्र उपलब्ध करून दिले पाहिजे. त्यामुळे शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल व ते आत्महत्त्या करणार नाहीत.

**४) शेती उत्पादनास वाजवी भाव :** शेती मालास वाजवी भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते व ते आत्महत्त्येस प्रवृत्त होतात. म्हणून शेतीमालास उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळेल असे धोरण शासनाने राबविले पाहिजे. केंद्र शासन कृषी मालास किमान आधार किंमत जाहीर करीत असले तरी ही किंमत पर्याप्त ठरत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होत नाही. म्हणून शेती उत्पादनास योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.

**५) मध्यस्थांचे उच्चाटण :** सद्याच्या कृषीमाल बाजारपेठेत शेतकऱ्यांचे अडते, दलाल, व्यापारी इत्यादी मध्यस्थांकडून मोठे शोषण होते. हे मध्यस्थ विविध क्लृपत्या वापरून शेतकऱ्यांना फसवतात. अल्प किंमतीत शेतकऱ्यांकडून माल खरेदी करून नंतर चढ्या भावाने बाजारात विकून मोठा नफा कमावतात व गबर होतात. शेतकरी मात्र गरीबच राहतो. म्हणून या मध्यस्थांचे उच्चाटन करून शेतकऱ्याने आपला माल थेट बाजारपेठेतच विकावा अशी व्यवस्था केली पाहिजे. त्यामुळे त्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळेल. परिणामी, त्यांच्यावर आत्महत्त्येची वेळ येणार नाही.

**६) शेतीपूरक व्यवसायाचा स्वीकार :** शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच शेतीपूरक असे विविध व्यवसाय (उदा. पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्योत्पादन, मधुमक्षिका पालन, विणकाम इ.) करून आपले उत्पन्न वाढविले पाहिजे. म्हणजेच जोडधंदे केले पाहिजेत. कारण दुर्दैवाने एखादे वर्षी शेती हंगाम बुडाला तरी त्यांना जोडधंद्यामुळे आपला निर्वाह चालविणे शक्य होईल. परिणामी, आत्महत्त्येचा विचारही त्यांच्या मनात येणार नाही. याकामी शासनाने गरजू शेतकऱ्यांना जोडधंद्यासाठी कर्जपुरवठा, शिक्षण-प्रशिक्षण, बाजारपेठा अशा सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**७) उत्तम बीबियाणे, खते, जंतुनाशके इत्यादींचा पुरवठा :** शेती उत्पादन वाढण्यासाठी शेतकऱ्यांनी उत्तम दर्जाची बीबियाणे, खते, जंतुनाशके वापरली पाहिजेत. शासनाने त्यांना या गोष्टी सवलतीच्या/वाजवी दराने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. कारण अनेक खाजगी कंपन्या बनावट बीबियाणे, खते, जंतुनाशके चढ्या भावाने शेतकऱ्यांना विकून त्यांची फसवणूक करतात. अशा कंपन्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई शासनेने केली पाहिजे.

**८) जीवन विमा व पीक विमा :** शासनाने गरीब व गरजू शेतकऱ्यांसाठी शंभर टक्के लाभ देणारी विमा योजना, बँका व जीवन विमा कंपन्या यांच्या मदतीने राबविली पाहिजे. त्यामुळे आपत्तीच्या काळातही शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आपला निर्वाह चालविणे शक्य होईल. निर्वाहाची चिंता मिटल्याने शेतकरी आत्महत्त्येस प्रवृत्त होणार नाहीत.

**९) अन्नधान्य पुरवठा :** ज्यांनी आत्महत्त्या केल्या ते बहुसंख्य शेतकरी हे आपल्या कुटुंबास एकवेळचे भोजनसुद्धा पुरवू शकत नव्हते. म्हणून ते स्वतःस दोषी मानून आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त झाल्याचे दिसून आले आहे. म्हणून शासनाने आपत्तीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबासाठी दरमहा ठराविक अन्नधान्य स्वस्त भावाने उपलब्ध करून दिले पाहिजे. तसेच टंचाईच्या काळात शेतकऱ्यांच्या गुराढोरांस मोफत चाराही उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यामुळे शेतकरी कुटुंब व त्यांचे पशुधन यांची उपासमारीपासून मुक्तता होईल. परिणामी, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या टळतील.

**१०) जाणीव जागृती :** शेतकऱ्यांना आत्महत्त्येपासून रोखण्यासाठी शेतकरी वर्गाचे योग्य ते प्रबोधन करून त्यांच्यात जाणीवजागृती निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांच्या ठिकाणी जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. येणाऱ्या संकटांचा धैर्याने मुकाबला करण्याची मनोवृत्ती

त्यांच्या ठिकाणी निर्माण केली पाहिजे. त्यासाठी प्रबोधनाचे विविध उपक्रम राबविले पाहिजेत. तसेच शेती विकास, वित्त पुरवठा, विमा योजना, बाजारपेठा, जोडधंदे इत्यादी विषयांची वस्तुनिष्ठ माहितीही शेतकऱ्यांना करून दिली पाहिजे. अशा माहितीमुळे शेतकरी जागृत होईल व कोणत्याही संकटाशी सामना करण्याचे धैर्य त्यांच्या अंगी येईल व ते आत्महत्त्येसारखा पलायनवादी मार्ग स्वीकारणार नाहीत.

वरील सर्व उपाययोजना प्रामाणिकपणे व काटेकोरपणे अंमलात आणल्या तर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबतील. किमान त्यांचे प्रमाण कमी होईल अशी आशा आहे.

### ३.३.३ भारतातील कृषक असंतोषाची कारणे आणि कृषक चळवळी

(Causes of Agrarian Unrest and Peasant Movements)

भारत हा प्राचीन काळापासून कृषीप्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्यांक ग्रामीण लोक कृषी व्यवसायावरच आपला निर्वाह चालवितात. ग्रामीण वर्गसंरचना ही कृषी व्यवसायावरच आधारलेली आहे. जमीनदार, शेतकरी, कुळे, शेतमजूर इत्यादी वर्ग कृषी क्षेत्रात आढळतात. प्राचीन काळापासून ब्रिटिश राजवट स्थिर होईतोपर्यंत भारतीय खेडी ही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व राजकीयदृष्ट्या स्वायत्त होती. खेड्यातील शेतकरी व बिगरशेती व्यवसाय करणारे कारागीर (बलुतेदार) हे परस्पर सहकार्याने आपल्या गरजा गावातल्या गावातच भागवित. त्यासाठी त्यांना बाह्य जगावर फारसे अवलंबून रहावे लागत नसे. तसेच खेड्यातील पंचायती ह्या गावचा कारभार समर्थपणे चालवित. शेतसारा गोळा करणे, न्यायदान, ग्रामसंरक्षण, लोककल्याण इ. कामे पंचायती पद्धतशीरपणे पार पाडीत. पंचायतीच्या कार्यात मध्यवर्ती राजकीय सत्ता म्हणजेच राजा सहसा हस्तक्षेप करीत नसे. त्यामुळे खेड्यांना राजकीय स्वायत्तता लाभली होती. अशा ह्या आर्थिक स्वयंपूर्णतेमुळे व राजकीय स्वायत्ततेमुळे ग्रामीण जीवन म्हणजेच कृषी क्षेत्र हे सुखी-समाधानी व संतोषप्रद होते.

भारतात ब्रिटिश राजवट स्थिरावल्यानंतर मात्र खेड्यातील आर्थिक स्वयंपूर्णता व राजकीय स्वायत्तता संपुष्टात आली. परिणामी ग्रामीण किंवा कृषक समाजातील सुखी समाधानी जीवन संपुष्टात आले. ब्रिटिश सत्तेने भारतीयांवर अन्याय अत्याचार सुरू केले. कृषी क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. शेतकरी, कुळे, शेतमजूर यांचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेस या सत्तेने प्रोत्साहन दिले. परिणामी कृषीक्षेत्रात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच भारतात शेतकरी चळवळी उदयास आल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देखील हा असंतोष व चळवळी टिकून आहेत. या ठिकाणी तुम्ही भारतातील कृषी क्षेत्रातील असंतोषाची कारणे व त्या असंतोषातून उद्‌भवलेल्या कांही प्रमुख शेतकऱ्यांच्या चळवळी अभ्यासणार आहात.

#### शेतकऱ्यांच्या असंतोषाची कारणे

**१) जमीनदारी पद्धती :** भारतात आपली राजकीय सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर भारतातून जास्तीत जास्त जमीन महसूल (शेतसारा) गोळा करणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट होते. कारण भारत हा कृषीप्रधान देश असल्याने जमीन महसूल हाच सरकारच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत होता. जमीन महसूल गोळा

करण्यासाठी ब्रिटिश सत्तेने जमीनदारी पद्धतीस जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले. जमीनदार, जहागिरदार, इनामदार या मंडळींना शेतसारा गोळा करण्याचे अधिकार दिले. ही मंडळी चढ्या दराने व सक्तीने शेतसारा वसूल करू लागली. वरचेवर साऱ्याची रक्कम वाढविणे, कुळ असलेल्या शेतकऱ्यांना हाकलून देणे, कुळांकडून भेटी स्वीकारणे इत्यादी मार्गांनी ही मंडळी शेतकऱ्यांचे/कुळांचे शोषण करू लागली. परिणामी जमीनदार, जहागिरदार, इनामदार ही मंडळी कष्ट न करता ऐषोआरामात राहू लागली तर अहोरात्र कष्ट करणारे शेतकरी व कुळे यांची स्थिती अत्यंत दयनिय बनली. त्यामुळे कृषक क्षेत्रात असंतोष निर्माण झाला.

२) **व्यापाऱ्याकडून शोषण :** ब्रिटिश राजवटीपूर्वी शेतसारा हा धान्याच्या किंवा पैशाच्या रूपात देण्याची सोय होती. ब्रिटिशांनी मात्र पैशाच्या रूपात शेतसारा भरणे अनिवार्य केले. त्यामुळे पीक निघताच बाजारात मिळेल त्या किंमतीला धान्य विकून पैसा उभारणे शेतकऱ्यांना भाग पडू लागले. याचा गैरफायदा व्यापारी वर्गाने घेतला. ते कमीत कमी किंमतीत धान्य खरेदी करून शेतकऱ्यांचे शोषण करू लागले.

३) **कर्जबाजारीपणा :** वेळेत शेतसारा न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी, घरेदारे, गुरेढोरे, जमीनदार बळकावू लागले. त्यामुळे शेतसारा भरण्यासाठी शेतकरी खाजगी सावकारांकडून चढ्या व्याजाने कर्ज घेऊ लागले. कर्ज देताना हे सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण म्हणून घेऊ लागले व कर्जफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी आपल्या नावावर करू लागले. त्यामुळे अनेक शेतकरी भूमिहीन बनले. कांही कर्जबाजारी शेतकरी परागंदा होऊ लागले. कांही शेतकरी चोर-दरोडेखोर बनले. ही स्थिती कृषक असंतोषास कारणीभूत ठरली.

४) **ग्रामोद्योगाचा ऱ्हास :** ब्रिटिशांनी भारतात मोठमोठे उद्योगधंदे सुरू केले. या उद्योगांशी स्पर्धा करणे ग्रामीण भागातील घरगुती उद्योगांना अशक्य झाले. त्यामुळे ग्रामीण उद्योग बंद पडले व त्यातील कारागीर बेकार झाले. हे बेकार कामगार शेतीक्षेत्रात रोजगार शोधू लागले त्यामुळे शेतीवर अतिरिक्त भार पडला. शेती व्यवसायात बेकारी वाढली. परिणामी बेकारांमध्ये असंतोष निर्माण झाला.

५) **शेती व्यवसायातील कुंठितावस्था :** ब्रिटिश सत्तेने भारतीय शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या सुविधा निर्माण केल्या नाहीत. ब्रिटिशकाळात देशात वारंवार दुष्काळ पडू लागले. पण दुष्काळाविरुद्ध उपाययोजना केली नाही. याउलट दुष्काळातही शेतसारा सक्तीने वसूल करण्याचे धोरण ठेवले. परिणामी शेतसारा भरण्यासाठी शेतकरी कर्ज काढू लागले. कर्जबाजारी शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा करणे अशक्य झाले. त्यामुळे शेती व्यवसायात कुंठितावस्था निर्माण होऊन शेतकरी-कुळे-शेतमजूर हा वर्ग दारिद्र्याने गांजला.

६) **शेतीचे व्यापारीकरण :** ब्रिटिश सत्तेने भारतीय शेतकऱ्यांना कापूस, ताग, नीळ, चहा, कॉफी, रबर अशी व्यापारी पीके घेण्याची सक्ती केली. इंग्लंडमधील उद्योगधंद्यास कच्चा माल मिळावा हा त्यामागे उद्देश होता. ब्रिटिशांच्या या धोरणामुळे भारतीय शेतकऱ्यांना आपल्या आवडीची व गरजेची पीके घेणे अशक्य झाले. परिणामी त्यांच्यात प्रचंड असंतोष निर्माण झाला.

**७) आदिवासींचे शोषण :** ब्रिटिश राजवटीपूर्वीच्या भारतात आदिवासी लोक हे प्रगत समाजापासून दूर व अलिप्त असे जीवन जगत होते. आदिवासी हे जंगलचे राजे होते. ते जंगलावर आपला निर्वाह चालवित. जंगलतोड करून तेथे शेती करीत. जंगलातून मध, डिंक, लाख, फळे, कंदमुळे, लाकूडफाटा, गवत गोळा करीत. जंगलातील प्राण्यांची शिकार करीत, जंगलात गुरे चारत. ब्रिटिशांनी मात्र जंगलविषयक कायदे करून जंगलाचा उपयोग करण्यास आदिवासींना बंदी घातली. ब्रिटिशांनी नेमलेले जंगल कर्मचारी आदिवासींचे शोषण करू लागले. आदिवासी स्त्रियांवर अन्याय अत्याचार करू लागले. त्यामुळे भारतातील आदिवासीमध्ये असंतोष निर्माण झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देखील आदिवासींचे शोषण थांबले नाही. प्रगत लोकांनी आदिवासी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या जमिनी बळकावल्या. त्यामुळे त्यांच्यातील असंतोषास आणखीन खतपाणी मिळाले.

**८) वंचिततेची भावना :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने शेती विकासाच्या अनेक योजना व कार्यक्रम सुरू केले. परंतु त्यांचा फायदा बड्या बागाईतदार शेतकऱ्यांना व जमीनदारांनाच झाला आहे. छोटे शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर हे सरकारी विकास योजनांच्या लाभापासून वंचीत राहिलेले आहेत. ही वंचिततेची भावना त्यांच्यात असंतोष निर्माण करण्यास कारणीभूत ठरली आहे.

**९) तोट्याची शेती :** स्वातंत्र्यानंतर महागाई उत्तरोत्तर वाढत चालली आहे. त्यानुसार सरकारनेही वेळोवेळी, वीजदर, पाणीपट्टी, खतांच्या किंमती शेतीकर्जावरील व्याजदर इत्यादीमध्ये वाढ केली आहे. परिणामी शेती व्यवसाय किफायतशीर ठरेनासा झाला आहे. एखाद्या वर्षी शेतीचा चांगला हंगाम झाला व उत्तम पीक आले तर बाजारात शेतीमालाच्या किंमती ढासळतात. त्यामुळे शेती पिकूनदेखील शेतकऱ्यांचा फायदा होत नाही. शेतीमालाच्या किंमती स्थिर ठेवण्यात किंवा शेतीमालास हमी भाव देण्यास सरकारला म्हणावे तसे यश आलेले नाही. त्यामुळे भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती ही तोट्यात आहे.

**१०) जागृती :** ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध भारतीयांनी स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा सुरू केला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यातील अनेक नेत्यांनी शेतकरी वर्गाला त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची जाणीव करून दिली. त्यामुळे शेतकरी वर्गात जागृती निर्माण झाली. परिणामी शेतकरी वर्ग स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही व्यवस्था आली. या व्यवस्थेत लोकांचा राजकीय सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. विविध राजकीय पक्षांनी व नेत्यांनी शेतकरी वर्गास त्याच्या हक्कांची व अधिकारांची जाणीव करून दिली. परिणामी शेतकरी वर्गात राजकीय व सामाजिक जागृती निर्माण झाली. आपल्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शेतकरीवर्ग संघटीत होऊ लागला. यातूनच शेतकऱ्यांच्या विविध संघटना उदयास आल्या. ह्या संघटनांनी शेतकऱ्यांना आपल्या हक्कांसाठी चळवळी/आंदोलने करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे ही त्यांच्यात असंतोष उद्भवला.

**भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळी किंवा आंदोलने**

वरील विविध कारणांमुळे भारतीय शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. आणि या असंतोषातून शेतकरीवर्गाने वेळोवेळी अनेक चळवळी, आंदोलने किंवा उठाव केले. शेतकऱ्यांच्या ह्या चळवळीचे स्थुलमानाने अ) ब्रिटिश राजवटीतील कृषक चळवळी आणि ब) स्वातंत्र्योत्तर काळातील कृषक चळवळी असे दोन भाग पाडता येतील.

**अ) ब्रिटिश राजवटीतील कृषक चळवळी**

ब्रिटिश राजवटीत भारतीय शेतकऱ्यांनी जे उठाव किंवा चळवळी केल्या त्यांच्यामागे १) परकीय ब्रिटिश राजवट उलथून टाकून तिच्या जागी स्वकीय राजवट आणणे. २) ब्रिटिशांनी शेतसारा देऊ न शकलेल्या ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या होत्या. त्यांना जमिनीचे मालकीहक्क परत मिळवून देणे. ३) जमीनदार, व्यापारी, सावकार, सरकारी कर्मचारी इत्यादींच्या अन्याय-अत्याचारास विरोध करणे. ४) धार्मिक व सामाजिक जीवनात ब्रिटिशांचा होणारा हस्तक्षेप थांबविणे इत्यादी उद्देश होते. ब्रिटिश राजवटीत अनेक शेतकरी चळवळी उद्‌भवल्या होत्या. त्यापैकी कांही प्रमुख चळवळी पुढीलप्रमाणे -

**१) संथाळांची चळवळ :** बंगालमधील राजमहाल टेकड्यांच्या प्रदेशात राहणारे संथाळ नावाच्या आदिवासी जमातीचे लोक शेती करीत असत. कॉर्नवॉलीसच्या कायमधारा पद्धतीनुसार संथाळाच्या जमिनी जमीनदारांच्या नियंत्रणाखाली गेल्या. ह्या जमीनदारांनी मोठ्या प्रमाणावर शेतसारा बसविल्याने संथाळ शेतकरी जंगलमय प्रदेशात येऊन तेथे शेती करू लागले. पण जमीनदार तेथेही येऊन संथाळांना त्रास देऊ लागले. शेतसारा देऊ न शकलेल्या संथाळाच्या जमिनी जमिनदार जप्त करू लागले. खोट्या कागदपत्रांच्या सहाय्याने सावकार संथाळांचे शोषण करू लागले. या अन्याय अत्याचाराच्या विरोधात कान्हू व सिधू या दोन बंधुनी १८५३ मध्ये सुमारे ६० हजार संथाळांना एकत्र करून सशस्त्र संघर्ष सुरू केला. जमीनदार, सावकार, इंग्रज अधिकारी, पोस्ट, पोलीस ठाणे, शासकीय कार्यालये इत्यादीवर हल्ले सुरू केले. ब्रिटिश सत्तेने हा उठाव अत्यंत क्रूरपणे दडपला त्यामध्ये सुमारे १५ हजार संथाळ मारले गेले. संथाळांच्या उठावाने इंग्रजाविरुद्ध लढण्याची प्रेरणा भारतीयांना मिळाली.

**२) नीळ उत्पादक शेतकऱ्यांची चळवळ :** बंगालमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांनी १८५९-६० मध्ये ही चळवळ केली. बंगालमधील बहुतेक निळीचे मळे हे युरोपियन जमीनदारांच्या मालकीचे होते. ह्या जमीनदारांनी बंगालमधील शेतकऱ्यांना आपल्या शेतात निळीचेच उत्पादन करण्याची सक्ती केली. त्यासाठी हे जमीनदार शेतकऱ्यांवर अन्याय-अत्याचार करू लागले. अनेक शेतकऱ्यांना त्यांनी तुरुंगात डांबले. त्यावेळी न्यायाधीश हे युरोपियनच असल्याने ते जमीनदाराच्या बाजूनेच निर्णय देत. या अन्यायाच्या विरोध १८५९ मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले व नीळ उत्पादनास विरोध केला. पोलिसांच्या मदतीने जमीनदारांनी हे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. पण सुशिक्षित बुद्धिजीव वर्गाने शेतकऱ्यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला. सभासंमेलने वृत्तपत्रे यामधून शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. परिणामी

शेतकऱ्यांच्या समस्यांची चौकशी करण्यासाठी इंग्रज सरकारला आयोग नेमणे भाग पडले. या आयोगाने शेतकऱ्यांची बाजू योग्य असल्याचा निर्णय देऊन सरकारला शेतकऱ्यांच्या हितासाठी कांही उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. परिणामी शेतकऱ्यांना कांही प्रमाणात दिलासा मिळाला.

**३) बंगालमधील जमीनदाराविरुद्धची चळवळ :** ब्रिटिश सत्तेचा पाया बंगालमध्ये घातला गेला. बंगालमधील जमीनदार मनमानेल त्याप्रमाणे कुळांकडून खंड सक्तीने वसूल करीत. तसेच खंडात केंव्हाही वाढ करीत. वाढीव खंड न देणाऱ्या कुळांच्या जमिनी जप्त करीत; त्यांना मारहाण करीत, तुरुंगात डांबत, सक्तीने राबवून घेत. या अन्यायाविरुद्ध तेथील शेतकऱ्यांनी १८७२ ते १८७६ या काळात आंदोलन सुरू केले. जमीनदारांना खंड देण्याचे नाकारले. जमीनदारांवर सशस्त्र हल्ले सुरू केले. त्यामुळे ब्रिटिश सत्तेने लष्कराच्या मदतीने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्ये फारसे यश आले नाही. शेतकऱ्यांचे आंदोलन चालूच राहिले. शेवटी सरकारने शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी कायदा करण्याचा आश्वासन दिले. मग हे आंदोलन थांबले.

**४) महाराष्ट्रातील रामोश्यांची चळवळ :** १८१८ मध्ये महाराष्ट्रात मराठी सत्तेचा अंत झाल्यानंतर ब्रिटिश सत्ता आली. या सत्तेने इतर शेतकऱ्यांप्रमाणेच रामोशी, भिल्ल, कोळी ह्या जमातींकडूनही सक्तीने भरमसाठ शेतसारा वसुली सुरू केली. त्यामुळे ह्या जमातींची आर्थिक स्थिती खालावली. उमाजी नाईक या क्रांतिकारकाने रामोशी जमातीस संघटीत करून इंग्रजी सत्ता व जमीनदार वर्गाविरुद्ध आंदोलन सुरू केले. त्यांने महसूल वसुलीस प्रतिकार केला. इंग्रज अधिकारी, जमीनदार, सावकार, ह्यांच्यावर सशस्त्र हल्ले सुरू केले. सर्वत्र लुटालूट सुरू केली. रामोश्यांचा हा तीव्र उठाव पाहून इंग्रज सरकारने तडजोडीचे धोरण स्वीकारले. काही रामोश्यांना जमिनी तर काहींना नोकऱ्या दिल्या. तथापि उमाजी नाईक पकडल्यानंतर हे आंदोलन शमले.

**५) पुणे–अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची चळवळ :** महाराष्ट्रात ब्रिटिशांनी शेतसारा वसुलीसाठी रयतवारी पद्धती स्वीकारली. त्यानुसार शेतसाऱ्याची रक्कम ठरविण्याचे काम व ती वसूल करण्याचेही काम शासकीय यंत्रणाच करू लागली. मात्र शासकीय अधिकारी शेतसारा अत्यंत जुलमीपद्धतीने वसूल करू लागले. दुष्काळ वा इतर आपत्तीतही सक्तीने शेतसारा वसूल करू लागले. शेतसारा भरण्यासाठी खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊ लागले. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार त्यांच्या जमिनी हडप करू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांत असंतोष माजला. यातूनच त्यांनी सावकाराविरुद्ध उठाव करून त्याची घरे जाळणे व लुटणे, कर्जाच्या कागदपत्रांची होळी करणे, त्यांना मारहाण करणे, अशी हिंसक कृत्ये सुरू केली. हा उठाव शमविण्यासाठी सरकारने प्रारंभी सैन्याची मदत घेतली. त्यानंतर मग शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी शासनाने कायदा संमत केला.

**६) चंपारण्य चळवळ :** बंगालप्रमाणेच बिहारमधील दरभंगा व चंपारण्य ह्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नीळ उत्पादनास नकार देऊन युरोपिन मळेवाल्यांच्या विरोधात १८६६ पासूनच आंदोलने सुरू केली होती. या

आंदोलनास तीव्र स्वरूप १९१७ मध्ये प्राप्त झाले. चंपारण्यात युरोपियन मळेवाल्यांनी शेतकऱ्यांना निळ उत्पादनाची सक्ती केली. निळीच्या मळ्यात भारतीय लोकांना मजूर म्हणून राबवून घेत. युरोपियन मळेवाल्यांच्या ह्या अन्यायाची बातमी महात्मा गांधींच्या कानावर गेल्यावर ते तेथील शेतकऱ्यांच्या व मजूरांच्या मदतीस निघाले. मात्र इंग्रज सरकारने त्यांना चंपारण्यात प्रवेश करण्यास मनाई केली. ही मनाई मोडल्याबद्दल सरकारने गांधीजींवर खटला भरला. गांधींनी अन्यायी कायदा मोडल्याबद्दल शिक्षा भोगण्याची तयारी दर्शविली. ह्या खटल्याची चर्चा देशभर सुरू झाली. लोकमत म. गांधी व निळ उत्पादक शेतकऱ्यांच्या बाजूला असल्याने सरकारने हा खटला काढून घेतला व चंपारण्यातील अन्याय दूर करण्यासाठी कायदा केला.

७) **खेडा सत्याग्रह :** गुजरातमधील खेडा जिल्ह्यात १९१८ मध्ये मोठा दुष्काळ पडला. शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय बनली. अशावेळी मुंबई इलाख्यातील इंग्रज सरकारने शेतसारा वसुलीचे धोरण तर ठेवलेच शिवाय शेतसाऱ्यात २३% वाढ केली. ही वाढ व शेतसारा वसुली थांबविण्याची विनंती खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सरकारला केली. पण सरकारने ती धुडकावून लावली. आणि शेतसारा न दिल्यास शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करण्याची व त्यांना अटक करण्याची धमकी दिली. तथापि गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली व वल्लभभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी सरकारच्या या धोरणाविरुद्ध शांततेने अहिंसकपणे चळवळ सुरू केली. ही चळवळ लष्करी बळावर दडपण्याचा प्रयत्न सरकारने केला. पण शेतकऱ्यांनी चळवळ चालूच ठेवली. गुजरातमधल इतर जिल्ह्यातील लोकांनीही खेडातील शेतकऱ्यांना पाठिंबा दिला. शेवटी सरकारला शेतसारा माफ करणे भाग पडले.

८) **बार्डोलीचा सत्याग्रह :** ब्रिटिश राजवटीत मुंबई प्रांतात दर ३० वर्षांनी शेतमहसूलाची फेरआखणी केली जाई. बार्डोली तालुक्यात (सद्याच्या गुजरातमध्ये) १९२६ मध्ये इंग्रज सरकारने २५% शेतसारा वाढविला. शिवाय या तालुक्यात नवीन २३ गावे समाविष्ट केली. त्यामुळे एकूण शेतसारा वाढ ३०% झाली. शेतसारावाढीची सरकारने ९ कारणे सांगितली. काँग्रेसने यासंदर्भात एक समिती नेमली. या समितीने माहिती गोळा करून शेतसारा वाढ अन्यायकारक ठरविली. त्यामुळे शेतकऱ्यांनी वल्लभभाई पटेलांशी चर्चा केली. त्यांनी शेतसारा न देण्याचे आवाहन केले. तसेच बार्डोलीत परिषद आयोजित केली. तिला ८० खेड्यांतील शेतकरी हजर राहिले. परिषदेत शेतसारा वाढीविरोधी आंदोलन करण्याचा ठराव संमत झाला. सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करण्याची धमकी दिली. पण आंदोलन चालूच राहिले. पाटील-तलाठी यांनी राजीनामे दिले. या आंदोलनाचे पडसाद ब्रिटिश संसदेत उमटले. शेवटी सरकारने एक चौकशी समिती नेमली. या समितीने शेतसारा वाढ कमी करण्याची शिफारस केली. शेवटी सरकारने शिफारस मान्य केली. शेतकऱ्यांचा विजय झाला. ऑक्टोबर १९२८ मध्ये हे आंदोलन समाप्त झाले. या आंदोलनाचे नेतृत्व खंबीरपणे केल्याने वल्लभभाई पटेलांना सरदार म्हटले जाऊ लागले.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळी (१९४६-५१)**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने शेतीविकासावर भर दिला. तथापि बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांपुढे अनेक समस्या भ्या ठाकल्या. जमिनीवरील मालकीहक्क, कुळांचे प्रश्न, शेतीमालाची किंमत, शेती उत्पादनाचा वाढता खर्च, शेतमजूरांच्या अडचणी, इत्यादी समस्यांनी शेतीक्षेत्र अशांत बनले. परिणामी शेतकऱ्यांनी आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटीतपणे अनेक चळवळी केल्या. त्यापैकी कांही प्रमुख चळवळी पुढीलप्रमाणे :-

१) **तेलंगणातील चळवळ :** पूर्वीच्या निजामाच्या हैद्राबाद संस्थानांत असलेल्या सरंजामशाही व्यवस्थेमुळे तेलंगण भागात अनेक समस्या उद्‌भवल्या. देशमुख, जहागिरदारही मंडळी कुळांचे शोषण करीत. त्यांना मध्येच काढून टाकीत. वरचेवर खंडाची रक्कम वाढवित. सावकारमंडळी गरीब शेतकऱ्यांना भरमसाठ व्याजाने कर्ज देत. कर्फजेडीच्या नावाखाली त्यांच्या जमिनी बळकावत. त्यामुळे शेतकरी, कुळे, शेतमजूर या वर्गात असंतोष उद्‌भवला. भारतीय साम्यवादी पक्षाने या वर्गास संघटीत करून वेठबिगार प्रथा नष्ट करणे, जमिनीदारी पद्धती नष्ट करणे, शेतीकर्ज माफ करणे, शेतमजुरीचे दर वाढविणे इत्यादी मागण्यांसाठी चळवळ सुरू केली. जमिनदारांनी चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निजामाने भारतीय संघराज्यात सामील होण्याचे नाकारले. मुस्लिम रझाकार संघटनेने अन्यायअत्याचार सुरू केले. साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांची दले स्थापन झाली. या दलांनी रझाकाराच्या संघटनेस जोरदारपणे प्रतिकार केला. या दलांनी तेलंगणातील कांही भूप्रदेशावर आपला अंमल प्रस्थापित केला. पुढे १९४८ मध्ये भारत सरकारने शेतकरी दलांचा उठाव मोडून काढला. पुढे शेतकरी दलातून बडे शेतकरी बाहेर पडले. गरीब शेतकऱ्यांनी ही चळवळ १९५१ पर्यंत चालू ठेवली व त्यानंतर ती संपुष्टात आली.

२) **नक्षलवादी चळवळ :** स्वातंत्र्योत्तर भारतातील एक प्रमुख कृषक चळवळ म्हणजे नक्षलवादी चळवळ होय. पश्चिम बंगाल राज्यातील दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी या ठिकाणच्या आदिवासी शेतकरी व शेतमजूर यांनी जमिनदार वर्गाच्या विरोधात मे १९६७ मध्ये उठाव केला. जमीनदार, सावकार यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न या उठावातील लोकांनी केला. पोलिसांनी हा उठाव दडपण्याचा प्रयत्न केल्यावर ह्या उठावास हिंसक वळण लागले. या उठावातील लोकांनी शस्त्र हाती घेतले. पुढे ह्या उठावास साम्यवादी कार्यकर्ते चारू मजूमदार, कनू सन्याल, पंजाबराव, जंगल संथाल, जेलसिंग, विनोद मित्र इत्यादींचे नेतृत्व लाभले. या नेत्यांवर मार्क्स, लेनिन, माओ या साम्यवादी विचारवंतांचा पगडा होता. त्यामुळे ही चळवळ राजकीय हितसंबंधाची चळवळ बनली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे हे या चळवळीचे उद्दिष्ट न रहाता क्रांतीकारक मार्गाने समग्र समाजव्यवस्था बदलणे हे या चळवळीचे उद्दिष्ट बनले. पुढे ही चळवळ पश्चिम बंगालबाहेर बिहार, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यांतही पसरली. जमीनदार, सावकार, जंगल अधिकारी, पोलीस यंत्रणा इत्यादींद्वारे होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात ही चळवळ आहे असे मानले जाते. साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव असणाऱ्या नेत्यांच्या मते मात्र ही चळवळ म्हणजे

वर्गसंघर्षच आहे. आजही ही चळवळ चालू असून ती शेतकऱ्यांची चळवळ न रहाता, अतिरेक्यांची वा दहशतवाद्यांची चळवळ बनली आहे. पश्चिम बंगाल, बिहार, आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडू, महाराष्ट्र या राज्यांच्या या ना त्या भागात अधुनमधून या चळवळीतील कार्यकर्ते हे हिंसक कारवाया घडवून आणताना दिसतात.

**३) शेतकरी संघटनांनी केलेल्या चळवळी किंवा आंदोलने :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या विविध भागात शेतकऱ्यांनी वेळोवेळी अनेक आंदोने केलेली आहेत. या आंदोलनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही आंदोलने शेतकऱ्यांच्या संघटनांनी केलेली आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रमुख शेतकरी संघटना पुढीलप्रमाणे आहेत.

१) महेंद्रसिंग टिकेत यांच्या नेतृत्वाखालील ''भारतीय किसान युनियन'' (उत्तर प्रदेश)

२) प्रा. एम. डी. नंजुंदा स्वामी यांच्या नेतृत्वाखालील ''कर्नाटक राज्य रयत संघ'' (कर्नाटक)

३) अजमीरसिंग लकनलाल, बाबीरसिंग राजपाल व भूपिंदरसिंग मान यांच्या नेतृत्वाखालील ''भारतीय किसान युनियन'' (गुजरात)

४) नारायणस्वामी नायडू यांच्या नेतृत्वाखालील ''तामिळनाडू शेतकरी संघ''.

५) शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील ''शेतकरी संघटना'' (महाराष्ट्र)

वरील शेतकरी संघटनांना शेतीमालास योग्य भाव मिळावा, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा व्हावा, कर्जमाफी मिळावी, दुष्काळ व महापुरासारख्या आपत्तीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, पाणीपट्टी, वीजदर इत्यादीत सूट मिळावी. शेतमजुरांना पुरेसे वेतन मिळावे, बिगरशेती हंगामात रोजगार हमीची कामे सुरू करावीत इत्यादी मागण्यासाठी देशाच्या विविध भागात चळवळी केलेल्या आहेत.

उदा. १९७० मध्ये किसान युनियन आणि शेतमजूर संघ यांनी अखिल भारतीय स्तरावर 'जमीन बळकाव' नावाचे आंदोलन केले. जंगलातील जमिनी, सरकारी मालकीच्या जमिनी तसेच अतिरिक्त जमिनी आंदोलकांनी ताब्यात घेऊन त्यांचे भूमिहीनांना वाटप करणे हा या चळवळीचा उद्देश होता. महाराष्ट्रातील सुमारे ५० हजार शेतकरी व शेतमजूर या आंदोलनात सहभागी झाले होते. १९७२ मध्ये किसान युनियनने जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे व अतिरिक्त जमिनीचे भूमिहीनांमध्ये वाटप करणे, दुष्काळ निवारण्यासाठी रोजगाराची कामे सुरू करणे यासाठी आंदोलन केले. नारायणस्वामी नायडू यांच्या नेतृत्वाखाली तामिळनाडू शेतकरी संघाने वीजेचे वाढविलेले दर देण्यास नकार दिला व आपला निषेध तीव्र करण्यासाठी करबंदीचे आंदोलन केले.

**४) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी :** स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात वेळोवेळी अनेक शेतकरी चळवळी झालेल्या आहेत. त्यापैकी कांही प्रमुख चळचळी पुढीलप्रमाणे–

**अ) शेतकरी कामगार पक्षाने केलेली आंदोलने :** पूर्वी काँग्रेसमध्ये असलेल्या केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांनी १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) स्थापन करून शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतसारा कमी करणे, यासाठी प्रयत्न सुरू केले. १९५० मध्ये दाभाडी येथे भरलेल्या पक्षाच्या अधिवेशनात एक जाहीरनामा संमत करून (याला दाभाडी प्रबंध म्हणतात.) त्यामध्ये १७ कलमी कार्यक्रम सूचविला. जमीनसुधारणा कार्यक्रम राबविणे, शेतमजूरांना पुरेसे वेतन देणे, सावकारी नष्ट करणे, उत्पादन खर्च व नफा विचारात घेऊन शेतीमालाच्या किंमती ठरविणे, शेतकऱ्यांना वाजवी दराने कर्जपुरवठा करणे इत्यादी मागण्यासाठी या पक्षाने चळवळी केल्या.

**ब) लाल निशान (बावटा) पक्षाने केलेल्या चळवळी :** १९४२ मध्ये साम्यवादी पक्षातून बाहेर पडून एस. के. लिमये यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने नवजीवन संघटना स्थापन केली होती. पुढे तिचे शेकापमध्ये विलीनीकरण केले. पुढे मतभेद झाल्याने १९५१ मध्ये दत्ता देशमुख व त्यांच्या सहकार्यांनी किसान पक्ष स्थापन केला. १९६५ मध्ये या पक्षास लालबावटा पक्ष हे नाव दिले गेले. या पक्षाने कोतवालांची तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची संघटना उभारली. पुढे १९७० मध्ये या पक्षाने शेतकऱ्यांची संघटना बांधण्यासाठी श्रीरामपूर (जिल्हा अहमदनगर) येथे भूमिहीन शेतमजूरांची परिषद घेतली. या परिषदेत दुष्काळ निवारण प्रश्नांवर चर्चा केली. तसेच ऊसतोडी कामगारांची संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. शेतमजूरांच्या कामाचे तास, सुट्ट्या, किमान वेतन यासारख्या प्रश्नांवर चळवळी केल्या.

**क) श्रमीक संघटनेची चळवळ :** ब्रिटिश राजवटीत धुळे जिल्ह्यातील गुजर व लेवा पाटील या जातींच्या लोकांनी शेतसारा वसुलेचे अधिकार मिळविले. यातून त्यांनी सत्ता व संपत्ती मिळविली. गरीब आदिवासींना व शेतमजूरांना भरमसाठ व्याजदराने कर्ज देऊन त्याच्या फेडीच्या नावाखाली त्यांच्या जमिनी हडप केल्या होत्या. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी अमरसिंग या नेत्याने जानेवारी १९७२ मध्ये 'भूमुक्ती' परिषद बोलावली. या परिषदेत भिल्ल आदिवासी सेवामंडळ, भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी सहभागी झाले. या आघाडीने अमरसिंगाच्या नेतृत्वाखाली 'श्रमीक संघटना' स्थापन केली. या संघटनेने सनदशीरपणे आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळवून देणे, रोजगार हमीची कामे सुरू करण्यासाठी शासनावर दबाव टाकणे, आदिवासी सहकारी संस्थांची कर्जे माफ करणे, १९४७ नंतर झालेली आदिवासींच्या जमिनीची हस्तांतरे रद्द करणे, शेतमजूरांचे वेतन निश्चित करणे इत्यादी मागण्यासाठी चळवळ केली.

**ड) भूमिसेना आंदोलन :** ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील सावकारांनी अनेक आदिवासींच्या जमिनी कर्जफेडीच्या नावाखाली हडप केल्या होत्या. या जमिनी परत मिळविण्यासाठी आदिल नावाच्या नेत्याच्या नेतृत्वाखाली 'भूमिसेना' नावाची संघटना स्थापन केली गेली. या संघटनेने जमिनीच्या हस्तांतराबाबतच्या तक्रारी शासकीय कार्यालयाकडे नोंदविल्या. मात्र त्याची दखल घेतली नाही. म्हणून या संघटनेने सावकाराच्या शेतातील उभी पीके कापण्याची मोहिम सुरू केली. त्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांनी

भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना अटक करणे सुरू केले. तरीही पीक कापणी मोहिम चालूच राहिली. शेवटी शासकीय अधिकाऱ्यांना या प्रकरणात लक्ष घालणे भाग पडले व त्यांनी ८०० प्रकरणे सोडवून आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळवून दिल्या.

**ई) शेतकरी संघटनेची आंदोलने :** महाराष्ट्रात १९७८ मध्ये शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन करून तिच्या माध्यमातून शेतीमालास योग्य भाव मिळावा, उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव सरकारने द्यावा यासाठी वेळोवेळी आंदोलने केली आहेत.

१) फेब्रुवारी १९८० मध्ये या संघटनेने कांद्यास योग्य भाव मिळावा म्हणून आंदोलन केले. १ मार्च १९८० रोजी चाकण येथे पुणे-नाशिक महामार्ग अडवून धरला. परिणामी १५ मार्च १९८० रोजी सरकारने नाफेड या सहकारी खरेदी-विक्री संस्थेमार्फत कांदा खरेदी योजना सुरू केली.

२) शेतकरी संघटनेने ऊसाला प्रतिटन रु. ३००/- इतका भाव मिळावा म्हणून आंदोलन सुरू केले. साखर कारखान्यांना ऊस न घालण्याचा ठराव केला. सरकारने ऊसास पाणी व वीज न पुरविण्याचा मार्ग अवलंबिला. त्या विरोधात शेतकरी संघटनेने १० नोव्हेंबर १९८० रोजी नाशिक, धुळे, अहमदनगर या जिल्ह्यात ''रस्ता रोको'' आंदोलन केले. तसेच खेरवाडी येथे ''रेल्वे रोको'' आंदोलन केले. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार-गोळीबार केला. शरद जोशींसह अनेकांना अटक झाली. जोशींनी तुरुंगात उपोषण सुरू केले. २० नोव्हेंबरला विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी 'चक्का जाम' नावाचे आंदोलन करून ऊस आंदोलकांना पाठिंबा दिला. शेवटी २७ नोव्हेंबर १९८० ला शासनाने रु. ३००/- भाव देण्याचे मान्य केले.

३) निपाणी (कर्नाटक) परिसरातील तंबाखूचे व्यापारी तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे शोषण करीत. म्हणून शेतकरी संघटनेने तंबाखूस योग्य भाव मिळावा म्हणून सरकारला निवेदन दिले. पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याने १४ मार्च १९८१ रोजी शरद जोशींच्या नेतृत्वाखाली ५० हजार शेतकऱ्यांनी पुणे-बंगळूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. ते २३ दिवस चालले. सरकारने अनेक आंदोलकांना अटक केली. त्यांच्यावर लाठीमार-अश्रूधूर-गोळीबार यांचा प्रयोग केला. त्यात १२ शेतकरी मेले. त्यानंतर कर्नाटक सरकारने तंबाखू खरेदी-विक्रीसाठी एक सहकारी संस्था स्थापन केली. त्यामुळे हे आंदोलन थांबले.

४) १९८२ मध्ये शेतकरी संघटनेने दुधास दर वाढवून मिळावा म्हणून आंदोलन सुरू केले. पुणे, सातारा, सांगली, धुळे ह्या जिल्ह्यात आंदोलनास उत्तम प्रतिसाद मिळाला पण राज्यात इतरत्र प्रतिसाद मिळाला नाही. शासनानेही दुधास वाढीव भाव देण्याचे नाकारले. परिणामी हे आंदोलन फसले.

५) १९८६ मध्ये शेतकरी संघटनेने कृत्रिम धाग्याच्या विरोधात विदर्भामध्ये रास्ता रोको आंदोलन सुरू केले. कृत्रिम धाग्याची वस्त्रे घालणाऱ्या प्रवाशांना अडवून त्यांच्या कपड्यावर संघटनेचा शिक्का मारण्याचा उपक्रम सुरू केला. कृत्रिम धाग्याच्या वस्त्रांची होळीही केली. संघटनेने रेल्वेरोकोचा निर्णय घेतला. पण सरकारने ८-१० हजार आंदोलकांना अटक करून आंदोलन मोडून काढले.

६) १९८८-८९ मध्ये शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांचे कर्ज माफ व्हावे म्हणून आंदोलन केले. शेतकऱ्यांकडून कर्जमाफीचे अर्ज भरून घेऊन ते अर्ज न्यायालयात सादर करण्यात आले. कर्जवसुलीवर स्थगिती मिळविली. ही न्यायालयीन लढाई दीर्घकाळ चालली. पुढे सरकारने कर्जमाफीची योजना सुरू केल्याने हे आंदोलन स्थगित झाले. अशाप्रकारे शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेने विविध आंदोलने करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले.

**फ) स्वाभिमानी शेतकरी संघटनेची चळवळ :** श्री. राजू शेट्टी यांनी ही संघटना स्थापन केली असून कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर ह्या जिल्ह्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसास योग्य दर मिळावा म्हणून आंदोलन केले. साखर कारखानदार ऊसास कमी भाव देऊन शेतकऱ्यांची कशी पिळवणूक करतात हे त्यांनी सभा, संमेलने अयोजित करून शेतकऱ्यांना पटवून दिले. तसेच शासकीय कार्यालयावर मोर्चे काढले. रास्तारोको आदोलने केली. परिणामी ऊसास दर वाढवून देणे कारखानदारांना भाग पडले. या संघटनेने दूध दरवाढीसाठी ही आंदोलने केली. दूध संघातील पदाधिकारी दुध उत्पादक शेतकऱ्यांना कसे फसवितात हे त्यांनी पटवून दिले. दुधाचे टेंपो अडविणे, दुधडेअरींना दूध न घाटणे, रस्त्यावर दूध ओतून देणे इत्यादी मार्गांनी या संघटनेने आंदोलने केली. परिणामी दुधाचे दर वाढण्यास मदत झाली. ऊस उत्पादक व दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये ही संघटना लोकप्रिय झाली असून राजू शेट्टी लोकसभेवर २००९ व २०१४ मध्ये निवडून आले होते. मात्र २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र ते पराभूत झालेले आहेत.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) बहुपर्यायी प्रश्न.**

१. एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यास काय म्हणतात?

अ) सीमांत शेतकरी ब) लहान शेतकरी क) मध्यम शेतकरी ड) जमीनदार

२. महाराष्ट्रात प्रामुख्याने कोणती जमिनधारणा पद्धती होती?

अ) जमीनदारी ब) महालवारी क) रयतवारी ड) वरील सर्व

३. कोणत्या क्रांतीकारकाने रामोशी जमातीस संघटीत करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध आंदोलन केले?

अ) वासुदेव फडके ब) उमाजी नाईक क) कान्हू व सिधू ड) यापैकी एकही नाही

४. बार्डोली आंदोलनाचे नेतृत्व कोणी केले?

अ) मोरारजी देसाई ब) विठ्ठलभाई पटेल क) वल्लभभाई पटेल ड) वरील सर्व

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शेतमजूर कोणास मानले जाते?

२. चंपारण्य चळवळीचे नेतृत्व कोणी केले?

३. नक्षलवादी चळवळीतील प्रमुख नेत्यांची नावे सांगा.

## ३.५ सारांश

या तिसऱ्या अध्ययन घटकात तुम्ही प्रथम ग्रामीण भागातील कृषक वर्गसंरचना समजावून घेतली आहे. ग्रामीण भागात १) जमीनदार, बागाईतदार, व्यापारी व सावकार यांचा उच्च वर्ग २) मध्यम शेतकऱ्यांचा मध्यम वर्ग तर ३) सीमांत व लहान शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, बलुतेदार-अलुतेदार यांचा कनिष्ठ वर्ग असे तीन वर्ग आढळतात. त्यानंतर तुम्ही ग्रामीण समाजातील कृषिविषयक संकट समजावून घेतले आहे. शेवटी तुम्ही भारतीय कृषक क्षेत्रातील असंतोषाची कारणे व त्या असंतोषातून उदयास आलेल्या विविध शेतकरी चळवळींचा आढावा घेतलेला आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील कांही प्रमुख शेतकरी चळवळीचे स्वरूप तुम्ही समजावून घेतलेले आहे.

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) अ  २) क  ३) ब  ४) क

### ब) एका वाक्यात उत्तरे

१) जी व्यक्ती आपला निर्वाह चालविण्यासाठी दसऱ्याच्या मालकीच्या शेतात कायम किंवा तात्पुरत्या काळासाठी मजूर म्हणून काम करते तिला शेतमजूर असे म्हणतात.

२) महात्मा गांधीनी चंपारण्य चळवळीचे नेतृत्व केले.

३) चारू मजुमदार, कनू संन्याल, पंजाबराव, जंगल संघालं, कुमार किशन जेलसिंग, विनोद मित्र इ. नक्षलवादी चळवळीचे नेते आहे.

## ३.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

### अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. जमीन धारणा पद्धतींचे विवेचन करा.

२. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या समस्येचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भारतातील विविध शेतकरी चळवळींचा थोडक्यात आढावा घ्या.

**ब) टीपा लिहा.**

१. भूमिहीन शेतकरी

२. जनुकीय बियाणे

३. जमीन सुधारणा

४. स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळी

## ३.८ चिंतन आणि कार्य

- आत्महत्त्या केलेल्या एखाद्या शेतकऱ्याच्या कुटुंबास भेट देऊन त्याच्या समस्या समजून घ्या.
- एखाद्या शेतकरी चळवळीच्या नेत्याची वा कार्यकर्त्याची मुलाखत घ्या. आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सूचविलेल्या उपाययोजना लिहून काढा.

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००५), ग्रामीण समाजशास्त्र प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

२) C. N. Shankar Rao (2009), Sociology of Indian Society, S. Chanda, New Delhi.

३) प्रा. चंद्रकांत खंडागळे (२०१९), भारतातील सामाजिक चळवळी, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

❑❑❑

सत्र १ : घटक ४

# ग्रामीण समाज आणि नियोजित परिवर्तन
# (Rural Society and Planned Change)

**अनुक्रमणिका**


४.१ प्रास्ताविक

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय-विवेचन

    ४.३.१ नियोजित ग्रामीण विकास : दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम : रूपरेषा

    ४.३.२ हरित क्रांतीचा प्रभाव

    ४.३.३ पंचायत राज्य

    ४.३.४ जागतिकीकरणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील प्रभाव

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.१ प्रास्ताविक (Introduction)

कोणत्याही समाजाचे स्वरूप समजावून घेताना त्याची संरचना तसेच त्यामध्ये होणारे परिवर्तन यांचा अभ्यास करावा लागतो. निसर्गाप्रमाणेच मानव समाजही परिवर्तनशील आहे. आपणास स्थिरता व नित्यता लाभावी अशी प्रत्येक समाजाची अपेक्षा असते. तथापि कोणताही समाज स्थिर नसतो. त्यामध्ये सतत परिवर्तन होत असते. ग्रामीण समाजही याला अपवाद नाही. भारतीय ग्रामीण समाजातही सतत परिवर्तन होत आलेले आहे. तथापि, ब्रिटिश राजवटीपूर्वीच्या भारतीय ग्रामीण समाजात परिवर्तनाची गती अत्यंत मंद होती. ब्रिटिश राजवटीत परिवर्तनाची गती वाढली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर ग्रामीण समाजातील परिवर्तनास मोठी

चालना मिळाली. कारण ग्रामीण समाजात अत्यंत नियोजितपणे परिवर्तन घडवून आणण्यास चालना दिली. ग्रामीण समाजातील दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, अज्ञान, अनारोग्य, अस्वच्छता, दैववादीवृत्ती, रूढीप्रियता जातीवाद, अस्पृश्यतापालन, स्त्रीपुरूष भेद इत्यादी समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी अनेक योजना, प्रकल्प व कार्यक्रम सुरू करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण समाजात संरचनात्मक परिवर्तन घडून येण्यास चालना मिळाली. म्हणून या ठिकाणी तुम्ही ग्रामीण समाजात नियोजनबद्धपणे परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेल्या उपक्रमांचा अभ्यास करणार आहात.

## ४.२ **उद्दिष्टे** (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास;

- दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- हरित क्रांतीचा अर्थ, स्वरूप व प्रभाव सांगता येतील.
- पंचायत राज्याचे स्वरूप विशद करता येईल.
- जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव स्पष्ट करता येईल.

## ४.३ **विषय विवेचन** (Presentation of Subject Matter)

या अध्ययन घटकात तुम्ही ग्रामीण समाजातील नियोजित परिवर्तनाचे स्वरूप समजावून घेणार आहात. विवेचनाच्या सोयीसाठी या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमांचे स्वरूप स्पष्ट केले जाईल. दुसऱ्या विभागात हरितक्रांतीचे विवेचन केले जाईल. तिसऱ्या विभागात पंचायत राज्याचे स्वरूप विशद केले जाईल. तर चौथ्या विभागात जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव स्पष्ट केला जाईल.

### ४.३.१ नियोजित ग्रामीण विकास : दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम : रूपरेषा

**ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनासाठी केलेली उपाययोजना**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने ग्रामीण भागातील दारिद्र्याच्या निर्मूलनासाठी विविध कार्यक्रम राबविले आहेत. त्या कार्यक्रमांचे पुढील तीन गटात विभाजन करता येईल.

**अ) रोजगार निर्मितीसाठीचे कार्यक्रम**

बेकारी हे ग्रामीण दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनासाठी ग्रामीण लोकांना रोजगार पुरविण्यासाठी विविध योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

१. **सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास अभिकरण** (Marginal Farmers and Agricultural Labourers Development Agency - MFAL)

सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास अभिकरण (Marginal Farmers and Agricultural Labourers Development Agency - MFAL)

सीमांत शेतकरी व शेतमजूर हे ग्रामीण भागातील सर्वात दरिद्री घटक असल्याने त्यांच्या दारिद्र्य निर्मूलनासाठी १९७०-७१ मध्ये ही योजना राबविली. या योजनेअंतर्गत या घटकांना शेतीशिवाय अन्य रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कुक्कुटपालन, पशपालन, दुग्धव्यवसाय, वराहपालन, मधुमक्षिका पालन, इत्यादी जोडधंदे सुरू करण्यासाठी अनुदानासह कर्जपुरवठा करण्यात आला. त्यासाठी सहकारी संस्थाद्वारे अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात आला. १९८० पर्यंत या योजनेद्वारे १ कोटी ६९ लाख सीमांत शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला. पुढे ही योजना खठउझ या योजनेत समाविष्ट केली गेली.

२. **लहान शेतकरी विकास अभिकरण** (Small Farmers Development Agency - SFDA)

लहान शेतकऱ्यांची शेती किफायतशीर होण्यासाठी त्यांना शेतीतील आधुनिक उत्पादन तंत्र पुरविण्यासाठी ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत अल्प व्याजदराने व अनुदानासह कर्जपुरवठा कऱ्यात आला. शेतकऱ्यांना शेतीत बारमाही रोजगार उपलब्ध व्हावा हा उद्देश यामागे होता. १९८० पर्यंत १८१८ खेड्यांत ही योजना राबविली. पुढे १९८० मध्ये ही योजनाही खठउझ योजनेत समाविष्ट केली.

३. **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम** (National Rural Employment Programme - NREP)

दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण लोकांना कामाचा मोबदला धान्य रूपाने देयाचा कार्यक्रम १९७७ मध्ये राबविला. पण त्यास अपेक्षित यश आले नाही. म्हणून १९८० मध्ये सरकारने NREP ह्या नव्या नावाने कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण बेकारांना रोजगार मिळवून देणे व त्याचबरोबर विहिरी, तळी, लघुजलसिंचन योजना बालवाड्या, शाळा, पंचायतगृहे इ. स्वरूपाची सामुदायिक मालमत्ता निर्माण करण्यावर भर दिला गेला.

४. **ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम** (Rural Landless Employment Guarantee Programme - RLEGP)

महाराष्ट्र सरकारने १९७२-७३ पासून 'रोजगार हमी योजना' ही दारिद्र्य निर्मूलनासाठी रोजगार पुरविणारी योजना यशस्वीपणे राबविली. त्याच धर्तीवर केंद्र सरकारने १९८३ पासून ग्रामीण भूमिहीन लोकांना

रोजगाराची हमी देणारा RLEGP हा कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमांतर्गत कायम स्वरूपाचा रोजगार निर्माण करण्याबरोबरच भूमिहीन लोक, महिला, अनुसूचित जाती-जमाती यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यावर भर दिला.

५. **ग्रामीण तरुणांसाठी स्वयंरोजार प्रशिक्षणाची योजना** (Scheme of Training, Rural Youth for Self-Employment- TRYSEM)

ग्रामीण तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता किंवा रोजगारासाठी शहराकडे धाव न घेता ग्रामीण भागात राहूनच स्वयंरोजगार करावा या उद्देशाने १५ ऑगस्ट १९७९ पासून ट्रायसेम (TRYSEM) ही योजना सुरू केली. अल्प उत्पन्न गटातील १८ ते ३५ वयोगटातील ग्रामीण तरूण बेकारांना या योजनेअंतर्गत विविध व्यवसायांचे (उदा. कुक्कुटपालन, मत्स्यपालन, काडीपेटी, फटाके, अगरबत्ती, साबण, खडू इत्यादिचे उत्पादन, सुतारकाम, लोहारकाम, चर्मकाम, ड्रायव्हिंग, वाहनदुरुस्ती इत्यादी) प्रशिक्षण देण्यात आले. १९९४-९५ पर्यंत सुमारे साडेतीन लाख ग्रामीण तरुणांनी या योजनेचा लाभ घेऊन स्वयंरोजगार सुरू केला होता.

६. **एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम** (Integrated Rural Development programme - IRDP)

ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी राबविलेल्या विविध योजनांचे एकत्रीकरण करून केंद्र सरकारने २ ऑक्टोबर १९८० रोजी IRDP ही एकच ग्रामीण रोजगार निर्मितीसाठीची योजना सुर केली. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबास स्वतःचा व्यवसाय किंवा उद्योग सुरू करण्यासाठी बँकांमार्फत अनुदानासह कर्जपुरवठा करून त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे व त्या कुटुंबांना दारिद्र्यरेषेच्यावर आणणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यरेषेखालील (वार्षिक उत्पन्न रु. ३५०० पर्यंत असणाऱ्या) कुटुंबांना शेतीविकास, पशुसंवर्धन, छोटे उद्योग वा व्यवसाय सुरू करणे यासाठी कर्जपुरवठा केला जाई. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी देशातील सर्व जिल्ह्यात ''जिल्हा ग्रामीण विकास मंडळे'' स्थापण्यात आली. सहाव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमावर ४७.६२ कोटी रुपये खर्च केले गेले. त्याचा लाभ १ कोटी ६५ लाख ६० हजार कुटुंबांना झाला. त्यापैकी ६४ लाख कुटुंबे ही अनुसूचित जाती-जमातीची होती. दारिद्र्य निर्मूलनाची ही एक सर्वंकष योजना होती. तथापि तिच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. तिचा लाभ गरजूंना कमी व सधन लोकांनाच अधिक झाला अशी टिका करण्यात आली.

७. **जवाहर रोजगार योजना :**

ग्रामीण बेकारी व दारिद्र्य निर्मूलनासाठी केंद्र सरकारने १९८९ मध्ये ही योजना सुरू केली. पूर्वीच्या NREP आणि RLEGP या दोन योजनांचा जवाहर रोजगार योजनेत समावेश करण्यात आला. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील किमान एका व्यक्तीस वर्षातील किमान १०० दिवस रोजगार

मिळवून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. ग्रामीण मजुरांना त्यांच्या घराजवळच रोजगार उपलब्ध करून देणे, महिला व अनुसूचित जाती-जमातींना या योजनेत राखीव जागा देणे, या योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायतीने करणे व तिच्यावर ग्रामसभेने नियंत्रण ठेवणे इत्यादी या योजनेची कांही वैशिष्ट्ये होती. या योजनेअंतर्गत सामाजिक वनीकरण, मृद्संधारण, जलसंधारण, लघुपाटबंधारे योजना, ग्रामीण पाणीपुरवठा, रस्तेबांधणी, जमीन सुधारणा, गटार दुरुस्ती इत्यादी कामे हाती घेण्यात आली. १९८९-९० ते १९९१-९२ या काळात या रोजनेवर ७६९७ कोटी रु. खर्च करण्यात आले. तर १९४७ लाख मनुष्य दिवस रोजगाराची निर्मिती करण्यात आली.

**८. पंतप्रधान रोजगार योजना** (Prime Miister's Rozgar Yojana - PMRY)

२ ऑक्टोबर १९९३ रोजी पंतप्रधान नरसिंहराव यांनी ग्रामीण बेकारांसाठी खात्रीशीर रोजगार निर्माण करणारी ही योजना सुरू केली. ही योजना वाळवंटी प्रदेश, डोंगराळ भाग, अवर्षणग्रस्त प्रदेशासाठी होती. शेती हंगामाव्यतिरिक्त काळात ग्रामीण अर्धबेकारांना रोजगार पुरवून त्यांचे जीवनमान उंचावणे हा या योजनांचा उद्देश होता.

**९. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** (SGSY)

पुर्वीच्या IRDP आणि TRYSEM इत्यादी योजना बंद करून त्याजागी ही योजना १ एप्रिल, १९९९ पासून सुरू केली. ग्रामीण लोकांसाठी स्वयंरोजगार निर्माण करून त्यांचे दारिद्र्य दूर करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेवर केंद्र सरकार ७५% तर राज्य सरकार २५% रक्कम खर्च करते. १९९९ ते २००४ पर्यंत या योजनेवर केंद्र व राज्य सरकारांनी ६७३४ कोटी रुपये उपलब्ध करून दिले होते.

**१०. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना** (SGRY)

ही योजना २४ सप्टेंबर २००१ पासून केंद्र सरकारने सुरू केली. पूर्वीच्या जवाहर ग्राम समृद्धी योजना व रोजगार अश्वासित योजना ह्यांचे विलिनीकरण या नव्या योजनेत केले. ग्रामीण भागात वेतन रोजगार निर्माण करणे व लोकांना अन्न सुरक्षितता देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे वेतनाचा कांही भाग धान्य रूपाने व कांही भाग रोख रकमेच्या रूपात दिला जातो.

**११. कामासाठी अन्न हा राष्ट्रीय कार्यक्रम** (National Food for Work Programe)

१४ नोव्हेंबर २००४ पासून हा कार्यक्रम केंद्र सरकारने देशातील सर्वाधिक मागासलेल्या १५० जिल्ह्यात रोजगाराच्या संधी पुरविण्यासाठी सुरू केला. ग्रामीण भागातील मजुरीवर काम करणाऱ्या सर्व अकुशल श्रमीकांना या योजनेचा लाभ होतो. या योजनेचा सर्व खर्च केंद्र सरकार करते. राज्यांना केंद्राकडून मोफत अन्नधान्य या योजनेसाठी पुरविले जाते.

## १२. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा–२००५

हा कायदा २ फेब्रुवारी २००६ पासून अंमलात आला आहे. ग्रामीण भागातील बेकारांना वर्षातून १०० दिवस काम मिळणे हा त्यांचा या कायद्याने कायदेशीर हक्क ठरविला आहे. पूर्वीच्या SGRY आणि NEWP या दोन्ही योजना या कायद्यात विलीन केल्या आहेत. या कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीला वर्षभर १०० दिवस हक्काने रोजगार देणे.

२. अशा व्यक्तीने ठराविक नमुन्यात रोजगार मागणीचा लेखी अर्ज ग्रामपंचायतीने केलेल्या दिवसापासून १५ दिवसाच्या आत त्याला रोजगार पुरविणे.

३. जर मुदतीत रोजगार न पुरविल्यास त्यास बेकार भत्ता देणे.

४. सध्या कायद्याने राज्यातील शेतमजूरांना जेवढी मजुरी मिळते तेवढी मजुरी काम मागणाऱ्यास देणे.

५. काम मागणाऱ्यास शक्यतो त्याच्या घरापासून पाच कि.मी.च्या आत काम पुरविणे. त्यापेक्षा जास्त अंतरावर काम पुरविल्यास १०% जादा मजुरी देणे.

६. ग्रामीण भागात दीर्घकाळ टिकणाऱ्या मालमत्तेची निर्मिती होईल. (उदा. जलसंधारण, वनीकरण, वृक्षारोपण, पाटबंधारे, जलाशयातील गाळ काढणे, भूसंधारण, पूर नियंत्रण इ.) अशी कामे हाती घेणे.

७. कामाची आखणी अंमलबजावणी व देखरेख याची प्रमुख जबाबदारी ग्रामपंचायतीची राहिल.

## ब) विशिष्ट घटकांच्या दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती, महिला व बालक, अपंग व निराधार यासारख्या विशिष्ट घटकांचे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठीही कांही योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यापैकी कांही प्रमुख योजना पुढीलप्रमाणे–

**१. संजय गांधी निराधार योजना :** निराधार असलेल्या वृद्ध, अपंग, अंध, मनोदुर्बल अशा लोकांना दरमहा कांही रोख रक्कम अनुदान म्हणून दिली जाणारी ही योजना आहे.

**२. इंदिरा आवास योजना :** अनुसूचित जाती व जमाती, वेठबिगारीतून मुक्त केलेले शेतमजूर तसेच इतरही व्यक्ती ज्या दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यांना मोफत घरे बांधून देण्याची ही योजना १८८५–८६ मध्ये सुरू केली. या योजनेचा ७५% खर्च केंद्र तर २५% खर्च राज्य सरकार उचलते. या योजनेतील ६०% घरे ही अनुसूचित जाती–जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी असतात. १९८५–८६ ते २००३–०४ या

कालावधीत या योजनेअंतर्गत १० कोटी १३ लाख घरे बांधण्यात आली व त्यासाठी १७४२५ कोटी रु. खर्च केले गेले.

**३. दशलक्ष विहिरी योजना** (Million Wells Scheme) : अनुसूचित जाती, जमाती, मुक्त झालेले वेठबिगार, दारिद्र्यरेषेखालील सीमांत व लहान शेतकरी यांच्या शेतीला पाणी पुरविण्याच्या उद्देशाने भारतभर १० लाख विहीरी खोदण्याची ही योजना राबविण्यात आली. १९८९ ते ९९ या काळात १२ लाख ८० हजार विहीरी खोदण्यात आल्या व त्यासाठी ४७६९ कोटी रुपये खर्च झाले. १९९९ पासून ही योजना सुवर्णजयंती ग्रामीण स्वरोजगार योजनेत विलीन केली आहे.

**४. ग्रामीण भागातील महिला व बालकांचा विकास कार्यक्रम** (Development of Women and Children in Rural Areas - DWCRA) ग्रामीण महिलांसाठी अर्थाजनाचे उपक्रम सुरू करून त्यांची उन्नती साधण्याच्या उद्देशाने ही योजना १९८२ मध्ये सुरू केली. साक्षरतेचे कमी प्रमाण व बालमृत्यूचे अधिक प्रमाण असलेल्या जिल्ह्यांची निवड करून त्यातील खेड्यातील महिलांच्या गटास (५ ते १० महिलांचा एक गट) रु. २५००० मात्र अर्थाजनाचे उपक्रम सुरू करण्यासाठी दिले जातात. या योजनेस युनिसेफचे सहाय्य मिळते.

**क) दारिद्र्यनिर्मूलनाचे इतर कार्यक्रम**

संपूर्ण देशातील दारिद्र्य नष्ट करण्यासाठी काही योजना व कार्यक्रम राबविले गेले. त्याचा फायदा ग्रामीण समाजालाही झाला. असे कांही प्रमुख कार्यक्रम पुढीलप्रमाणे –

**१. वीस कलमी कार्यक्रम :** दारिद्र्य व आर्थिक शोषण नष्ट करणे व दुर्बल घटकांचा उद्धार करणे ह्या प्रमुख उद्देशाने पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वीस कलमी कार्यक्रम (गरीबी हटाव) १९७५–७८ या कालावधीसाठी राबविला. या कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास वर्गांचा विकास करणे, अतिरिक्त जमिनीचे दुर्बल घटकांमध्ये वाटप करणे, भूमिहीन मजूरांना किमान मजुरी मिळवून देणे, ग्रामीण जनतेस, जलसिंचन सुविधा पुरविणे, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढविणे, कुटुंब नियोजनाचा प्रसार करणे, प्राथमिक आरोग्य सेवांचा विस्तार करणे, महिला, मुले, कामगार यांचे कल्याण करणे, प्राथमिक शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार करणे, औद्योगिक धोरण सुलभ करणे, सर्व खेड्यांना पिण्याचे पाणी पुरविणे इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाचा खूप गाजावाजा झाला. तथापि, शासकीय कर्मचाऱ्यांची उदासिनता, अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार इत्यादीमुळे या कार्यक्रमास अपेक्षित यश आले नाही. मात्र दारिद्र्य निर्मूलनाविषयी जनतेत मोठ्या प्रमाणावर जागृती घडून आली.

**२. किमान गरजा कार्यक्रम** (Minimum Needs Programme) : पाचव्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम १९७४–७५ मध्ये सुरू केला. लोकांच्या किमान गरजांची पूर्तता करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात पाणीपुरवठा करणे, ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा

विस्तार करणे, ग्रामीण भूमिहीन मजुरांना घरे पुरविणे, ग्रामीण भागाचे विद्युतीकरण करणे, ग्रामीण लोकांना सकस आहार पुरविणे इत्यादी उपक्रम राबविले. त्यासाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेत १५१८ कोटी रुपयांची तर सहाव्या पंचवार्षिक योजनेत (१९८०-८५) ५८०७ कोटी रुपयांची तरतूद केली होती.

**३. पंतप्रधानांची ग्रामोदय योजना** (PMGY) : ही योजना २०००-२००१ मध्ये सुरू केली. या योजनेअंतर्गत घटकराज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य व शैक्षणिक सेवा सुविधा पुरविणे, ग्रामीण लोकांना निवारा, पिण्याचे पाणी, आणि सकस आहार पुरविणे, ग्रामीण भागाचे विद्युतीकरण करणे इत्यादीसाठी केंद्रसरकारकडून अर्थसहाय्य पुरविले जाते. या योजनेअंतर्गत २००३-०४ आणि २००४-०५ साठी रुपये २८०० कोटीची तरतूद केली होती.

**४. अंत्योदय अन्न योजना :** डिसेंबर २००० मध्येच ही योजना सुरू केली. गरीबांना अत्यंत स्वस्त दराने (तांदुळ रुपये ३ प्रति कि.ग्रॅ. तर गहू रुपये २ प्रति कि.ग्रॅ. दराने) अन्नधान्य रेशन दुकानातून पुरविणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत एका कुटुंबास दरमहा कमाल ३५ कि.ग्रॅ. धान्य मिळू शकते. प्रारंभी दारिद्र्यरेषेखालील १ कोटी कुटुंबांना, नंतर २००३ मध्ये दीड कोटी कुटुंबांना, नंतर २००४-०५ मध्ये २ कोटी कुटुंबांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात आला. २००३-०४ मध्ये या योजनेसाठी ४५.५६ लाख टन अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले.

### ४.३.२ हरित क्रांतीचा प्रभाव

**हरित क्रांतीचा अर्थ :**

शेती क्षेत्रात नियोजनबद्ध परिवर्तन घडवून आणण्याचा हरित क्रांती हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. क्रांती हा शब्द आकस्मिक किंवा झटपटपणे आमूलाग्र किंवा मूलभूत बदल घडवून आणणे या अर्थाने वापरला जातो. ''**क्रांती म्हणजे समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात किंवा व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येणे म्हणजेच प्रस्थापित व्यवस्था नष्ट होऊन तिच्या जागी नवीन व्यवस्था येणे होय.**'' या अर्थानुसार ''**हरित क्रांती म्हणजे कृषी क्षेत्रात किंवा कृषी उत्पादन व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येणे होय.**'' अशी आपणास व्याख्या करता येईल. शेतजमिनीचे आकारमान न वाढविता, आहे त्या शेतजमिनीत आधुनिक किंवा प्रगत उत्पादन तंत्र वापरून शेती उत्पादनात मोठी वाढ करणे यालाच उद्देशून हरित क्रांती ही संज्ञा वापरली जाते. सुधारित शेती अवजारे, संकरित बीबियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सुविधा इत्यादींचा वापर करून वर्षातून दोन-तीन पीके घेणे, वर्षभर शेती हिरवीगार ठेवणे म्हणजे हरित क्रांती होय. हरित क्रांतीद्वारे भारतीय ग्रामीण समाजात मोठे परिवर्तन घडन आले आहे.

**भारतात हरित क्रांतीचा प्रारंभ**

हरित क्रांती जगात सर्वप्रथम उत्तर अमेरिकेतील मेक्सिको देशात सन १९४०-४१ मध्ये घडून आली. त्यानंतर ही क्रांती जगातील इतर अनेक देशांत घडून आली. भारतात सन १९६७-६८ मध्ये पहिली हरित क्रांती घडून आली तर सन १९८३-८४ मध्ये दुसरी हरितक्रांती घडून आली असे मानले जाते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला दारिद्र्य, बेकारी, अन्नधान्य टंचाई, उपासमार अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. या समस्यांचे निर्मूलन करून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थाचा कणा असल्याने शेतीचा विकास केल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होणार नाही याची नियोजनकर्त्यांना जाणिव झाली. देशातील वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी तसेच कापड, साखर, ताग, तेल गिरण्या इत्यादी उद्योगधंद्यांची कच्च्या मालाची गरज भागविण्यासाठी शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आवश्यक होते. तथापि, भारतीय शेतकरी अप्रगत अशा पारंपारिक उत्पादन तंत्राने शेती करीत असल्याने शेतीचे उत्पादन व उत्पादकता खूपच कमी होती. म्हणून शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी काय करावयास हवे याबाबतचा सल्ला फोर्ड फाऊंडेशनच्या तज्ज्ञ समितीकडून घेण्याचे सरकारने ठरविले. या समितीने एप्रिल १९५९ मध्ये आपला अहवाल सादर केला. या अहवालात समितीने प्रकर्षित प्रदेश विकास कार्यक्रम (Intensive Area Development Programme) सुरू करण्याची शिफारस केली. त्यानुसार १९६० मध्ये हा कार्यक्रम देशातील केवळ ७ जिल्ह्यात प्रथम सुरू केला. आणि पुढे १९६५ मध्ये देशांतील ११४ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम सुरू केला. त्यामुळे १९६७-६८ पासून भारतातील अन्नधान्याचे विशेषतः तांदुळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढून हरित क्रांती घडून आली. त्यानंतर पुढे ऊस, कापूस, ताग ह्या नगदी पीकांचेही उत्पादन बऱ्यापैकी वाढले.

**हरित क्रांतीची कारणे**

भारतात हरित क्रांती घडून येण्यास पुढील कारणे जबाबदार ठरली.

१) **कृषी संशोधन :** स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकारने भारतीय कृषी संशोधन मंडळ स्थापन केले. शिवाय घटक राज्यातही अशी मंडळे स्थापन झाली. तसेच देशात सर्वत्र कृषी विद्यापीठे व महाविद्यालये सुरू झाली. या सर्व मंडळांनी व विद्यापीठांनी पीक लागवड, मशागत, बीबियाणे, खते व जंतुनाशके, जलसिंचन सुविधा इत्यादी संदर्भात मौलिक संशोधन केले व ते शेतकऱ्यापर्यंत पोहचविले. या संशोधनामुळे शेतकऱ्यांना शास्त्रीयदृष्ट्या शेती कशी करावी याचे ज्ञान झाले. परिणामी हरितक्रांती घडून येण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली.

२) **जलसिंचन सुविधा :** भारतीय शेती लहरी अशा मान्सूनवर अवलंबून असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे. म्हणून स्वातंत्र्यानंतर शेतीला बारमाही पाणीपुरवठा व्हावा म्हणून सरकारने मोठ्या,

मध्यम व लघु पाटबंधारे योजना राबविल्या. तसेच विहीर, कुपनलिका, पाझर तलाव यांची खुदाई करून जलसिंचन सुविधा वाढविल्या. तसेच उपसा जलसिंचनाच्या (Lift Irrigation) सोयीही निर्माण केल्या. त्यामुळे शेतीला हमखास पाणी मिळू लागले. त्यामुळे वर्षातून दोन वा तीन पीके घेणे शक्य झाले. परिणामी शेतीचे उत्पादन वाढले व हरित क्रांती घडून आली.

३) **संकरित बी–बियाणे :** कृषी शास्त्रज्ञांनी बी–बियाणांच्या संदर्भात संशोधन करून अधिक उत्पादन देणाऱ्या बी–बियाणांच्या जाती शोधून काढल्या. ही सुधारित बी–बियाणे शेतकऱ्यांना पुरविण्यासाठी सरकारने राज्य शेती महामंडळे स्थापन केली. याशिवाय अनेक खाजगी शेती संस्थांनीही दर्जेदार संकरित बी–बियाणांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका या धान्यांची संकरित बी–बियाणे शेतकरी वापरू लागले. त्यामुळे भरघोस पीके येऊन अन्नधान्याचे उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढले व हरित क्रांती घडून आली.

४) **खतांचा वापर :** कृषी संशोधनातून नवनवीन रासायनिक खते तयार होऊ लागली. सरकारने सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत ही खते शेतकऱ्यांपर्यंत पोहचविली. शिवाय शेतकऱ्यांना ही खते खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून सरकारने सबसिडीही दिली. त्यामुळे शेतात अल्पावधीत खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. सन १९६०–६१ ते १९६५–६६ या कालावधीत खतांचा वापर प्रतीवर्षी सुमारे ९० हजार टनांनी वाढला. खते वापरल्यामुळे पीकांची भरघोस वाढ होऊन अन्नधान्याचे उत्पादन वाढले. परिणामी हरितक्रांती शक्य झाली.

५) **प्रगत शेतीअवजारे :** स्वातंत्र्यानंतर आधुनिक वा प्रगत अशी शेती अवजारे निर्माण करण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणावर निघाले. त्यामुळे नांगरणीसाठी ट्रॅक्टर, पीक कापणीची यंत्रे, मळणीची यंत्रे, पाणीपुरवठ्यासाठी डिझेल इंजिन व वीजेचे पंप, पाईप लाईन्स अशी शेती अवजारे शेतामध्ये वापरली जाऊ लागली. परिणामी शेतीची कमी वेळेत उत्तम मशागत होऊ लागली. प्रगत शेती अवजारामुळे उत्पादन खर्चातही बचत होऊ लागली. परिणामी हरितक्रांती होण्यास चालना मिळाली.

६) **वित्तपुरवठा :** शेती व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते. नवीन शेती अवजारे, खते, बीयाणे खरेदी करणे, शेतात जलसिंचन सुविधा निर्माण करणे, भूसुधारणा करणे इत्यादीसाठी शेतकऱ्यांना पैसा लागतो. शेतकऱ्यांची पैशाची गरज भागविण्यासाठी सरकारने व्यापारी बँका, सहकारी बँका, भूविकास बँका, सहकारी पतसंस्था इत्यादीच्याद्वारे अल्प व्याजदराने त्यांना कर्ज पुरविणे सुरू केले. परिणामी शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा करणे शक्य होऊ लागले. त्यामुळेच हरितक्रांती होणे शक्य झाले.

७) **शेती मालास हमी :** शेतीमध्ये आधुनिक उत्पादन तंत्र वापरून भरपूर अन्नधान्य उत्पादन होऊ लागले. परिणामी शेतीमाल बाजारात मोठ्या प्रमाणावर येऊ लागल्या. अशा स्थितीत शेतीमालाच्या किंमती ढासळू नयेत व शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सरकारने शेतीमालाच्या हमी किंमती निश्चित केल्या. शेतीमालाच्या किंमती घसरू लागल्यास सरकारने हमी दिलेल्या किंमतीत धान्य खरेदी करण्याची शाश्वती

शेतकऱ्यांना दिली. सरकारच्या ह्या प्रोत्साहनात्मक धोरणामुळे शेतकऱ्यांना अधिक धान्य पिकविण्याची प्रेरणा मिळू लागली व हरितक्रांती घडून आली.

८) **अन्य कांही कारणे :** वरील प्रमुख कारणांशिवाय इतरही अन्य कांही कारणे हरितक्रांती होण्यास कारणीभूत ठरली. त्यामध्ये जंतुनाशकांचा वापर करणे, शेतीमालावर प्रक्रिया करणे, शेतीमाल बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी वाहतूक सुविधांत वाढ करणे, धान्य साठवणुकीसाठी गोदामे बांधणे, जमिनीची धूप होऊ नये म्हणून बांदबंदिस्ती करणे इत्यादींचा समावेश होतो. या छोट्यामोठ्या कारणांमुळेही अन्नधान्याचे उत्पादन वाढून हरित क्रांती होण्यास मदत झाली.

**हरित क्रांतीचे परिणाम**

हरित क्रांतीचे अनुकूल तसेच प्रतिकूल परिणाम घडून आले आहेत.

**अनुकूल परिणाम :**

१) **शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल :** हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडून आला. भारतीय शेतकरी फार पूर्वीपासून शेतीकडे केवळ निर्वाहाचे (पोट भरण्याचे) साधन म्हणून पाहात आलेला आहे. कसे तरी करून आपले व आपल्या कुटुंबाचे पोट भरणे एवढ्या संकुचित दृष्टिकोनातून शेतकरी शेती करीत असे. हरित क्रांतीमुळे शेतीचे उत्पादन वाढले. परिणामी शेतकऱ्यांना नफा होऊ लागला. त्याच्या हाती पैसा येऊ लागला. परिणामी शेतकरी केवळ पोटासाठी शेती न करता नफा मिळविण्यासाठी, पैसा कमावण्यासाठी शेती करू लागला. म्हणजेच शेतीकडे तो व्यापारी दृष्टिकोनातून बघू लागला. थोडक्यात हरित क्रांतीमुळे उत्पादनाचा हेतूच बदलला. हा बदल नक्कीच स्वागतार्ह ठरला.

२) **शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढली :** हरित क्रांतीमुळे शेतीचे उत्पादन व उत्पादकता मोठ्या प्रमाणावर वाढली. सुधारित शेती अवजारे, रासायनिक खते, जंतुनाशके, जलसिंचन सुविधा इत्यादींचा वापर करून वर्षातून दोन-तीन पीके घेतली जाऊ लागली. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. उदा. १९६०-६१ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ८२ दशलक्ष टन एवढे होते. ते वाढून इ.स. १९८४-८५ मध्ये १४६ दशलक्ष टनावर पोहचले. परिणामी देशातील अन्नधान्याच्या टंचाईची समस्या संपुष्टात आली. आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. हरितक्रांतीच्या पूर्वी देशाला अन्नधान्य आयात करावे लागे. अन्नधान्य मिळविण्यासाठी कांही वेळा परकीय देशांनी घातलेल्या अपमानास्पद अटी स्वीकाराव्या लागत. हरित क्रांतीमुळे हा प्रकार बंद झाला. त्यामुळे देशाची पत व प्रतिष्ठा वाढली.

३) **शेतीतील गुंतवणूक वाढली :** हरित क्रांतीच्या पूर्वी शेतीत अप्रगत उत्पादन तंत्र वापरले जाई. परिणामी शेतीचे उत्पादन व उत्पादकता खूपच कमी असे. त्यामुळे शेती व्यवसाय तोट्यात असे. म्हणून शेतकरी शेती व्यवसायात गुंतवणूक करण्यास धजावत नसत. हरित क्रांतीमुळे शेतीचे उत्पादन व उत्पादकता

वाढून शेती व्यवसाय फायदेशीर ठरू लागला. त्यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला. ते शेतीत सुधारणा करण्यासाठी (उदा. विहीर खोदणे, पाईप लाईन टाकणे, विजेचा पंप बसविणे, टॅक्टर घेणे, बांधबंदिस्ती करणे इ.) गुंतवणूक करू लागले. त्यामुळे शेती व्यवसाय किफायतशीर ठरू लागला.

**४) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली :** हरित क्रांतीमुळे शेतीचे उत्पादन वाढले. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. त्यांच्या हाती पैसा खेळू लागला. परिणामी त्यांची आर्थिक स्थिती सुधारली. शेतकरी मोठमोठी घरे बांधू लागले. घरात भांडीकुंडी व फर्निचर घेऊ लागले. दुचाकी-चारचाकी वाहने बाळगू लागले. मुलांच्या शिक्षणावर - आरोग्यावर पैसा खर्च करू लागले. एकंदरीत हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांचे विशेषतः बड्या बागाईतदार शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावले.

**५) रोजगारात वाढ :** हरित क्रांतीमुळे ग्रामीण भागात रोजगार वाढला. कारण हरित क्रांतीमुळे शेतात वर्षातून दोन-तीन पीके घेणे शक्य होऊ लागले. परिणामी शेतात पेरणी, खुरपणी, काढणी, मळणी, मशागत, पिकांना पाणी देणे इत्यादी क्रिया-प्रक्रियांमध्ये वाढ होऊन ग्रामीण लोकांना शेतात वर्षभर रोजगार मिळू लागला. ज्या भागात हरित क्रांती यशस्वी झाली तेथील शेतीचे हंगामी स्वरूप कमी झाले. त्यामुळे हंगामी बेकारी कमी झाली. तसेच हरित क्रांतीमुळे श्रीमंत झालेल्या शेतकऱ्यांनी पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन असे जोडधंदे सुरू केले. त्यामुळेही रोजगार वाढण्यास मदत झाली.

**६) औद्योगिक विकासास चालना :** हरित क्रांतीमुळे औद्योगिक विकासास चालना मिळाली. हरित क्रांतीमुळे ऊस, कापूस, ताग, इत्यादींचेही उत्पादन वाढले. त्यामुळे साखर कारखाने, सुत गिरण्या, ताग गिरण्या इत्यादी उद्योगांची कच्च्या मालाची गरज पूर्ण होऊन त्यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच हरित क्रांतीमुळे अनेक नवे उद्योग सुरू झाले. रासायनिक खते व जंतूनाशके, विजेचे पंप व पाईप लाईनचे साहित्य, शेती अवजारे यांच्या उत्पादनाचे कारखाने निघाले. परिणामी औद्योगिक विकास होण्यास मदत झाली.

**प्रतिकूल परिणाम**

हरित क्रांतीचे कांही प्रतिकूल परिणाम म्हणजेच दुष्परिणामही घडून आले आहेत. या दुष्परिणामांना हरित क्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्या असेही म्हणतात. हे प्रतिकूल परिणाम पुढीलप्रमाणे -

**१) केवळ बड्या शेतकऱ्यांचा फायदा :** हरित क्रांतीचा फायदा केवळ बड्या शेतकऱ्यांनाच झाला. कारण आधुनिक शेती अवजारे, रासायनिक खते व जंतुनाशके, संकरित बी-बियाणे, जलसिंचन सुविधा इत्यादींचा वापर करण्यासाठी लागणारा पैसा ह्या बड्या शेतकऱ्यांकडेच होता. छोट्या शेतकऱ्यांकडे पैसा नसल्याने हे नवीन उत्पादन तंत्र त्यांना वापरणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांची शेती अप्रगतच राहिली. अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी बड्या शेतकऱ्यांना विकून टाकल्या. त्यामुळे ते भूमिहीन बनले. तर बडे शेतकऱ्यांच्या शेतीक्षेत्रात वाढ झाली.

**२) आर्थिक विषमता वाढली :** हरित क्रांतीचा लाभ केवळ बड्या शेतकऱ्यांनाच झाला. त्यामुळे ते अधिक श्रीमंत बनले. तर छोटे शेतकरी वा अल्पभूधारक शेतकरी हे हरित क्रांतीचया लाभापासून वंचित राहिल्याने ते अधिकच गरीब बनले. परिणामी ग्रामीण भागात आर्थिक विषमता वाढली.

**३) प्रादेशिक विषमता वाढली :** हरित क्रांतीमुळे भारतात प्रादेशिक विषमताही वाढली. कारण हरित क्रांती ही देशाच्या कांही मोजक्या राज्यांमध्येच (उदा. पंजाब, हरियाणा, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, केरळ इत्यादी) घडून आली. त्यामुळे या राज्यांतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. इतर राज्यांत मात्र हरित क्रांतीचा प्रयोग फारस यशस्वी झाला नाही. त्यामुळे ही राज्ये मागास राहिली. परिणामी विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण झाला.

**४) पीकांच्या उत्पादनातील असमतोल :** हरित क्रांतीमुळे पीकांच्या उत्पादनात असमतोल निर्माण झाला. कारण हरित क्रांतीमुळे प्रामुख्याने गहू व तांदूळ यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. त्याखालोखाल ज्वारी, बाजरी, मका, ऊस यांचे उत्पादन वाढले. मात्र तेलबिया, कडधान्ये, मसाल्याचे पदार्थ, फळे यांच्या उत्पादनात फारशी वाढ झाली नाही.

**५) बेकारी वाढली :** हरित क्रांतीमुळे बेकारी वाढली. कारण हरित क्रांतीमुळे शेतीत यंत्रे वापरली जाऊ लागली. त्यामुळे शेतमजूरांवर बेकारीची पाळी आली. ते शेती क्षेत्राबाहेर फेकले गेले. अनेकांना स्थलांतरीत व्हावे लागले. हरित क्रांतीमुळे अल्पभूधारक व कुळे देखील बेकार झाली. कारण बड्या शेतकऱ्यांप्रमाणे अल्पभूधारकांना आधुनिक उत्पादन तंत्र वापरणे शक्य होईनासे झाले. त्यामुळे अनेकांनी आपल्या जमिनी बड्या शेतकऱ्यांना विकल्या. तसेच अनेक बड्या शेतकऱ्यांनी कुळांनाही हाकलून लावले. व ते स्वतःच यंत्रांच्या मदतीने आधुनिक शेती करू लागले. अशाप्रकारे हरित क्रांतीमुळे शेतमजूर, अल्पभूधारक, कुळे इत्यादी बेकार झाले.

**६) इतर समस्या :** हरित क्रांतीमुळे संकरित बीयाणांचा वापर वाढला. त्यामुळे अन्नधान्यांचे उत्पादन वाढले. पण त्यांची गुणवत्ता कमी झाली. हे धान्य निकृष्ट असल्याने लोकांचे आरोग्य खालावले. हरित क्रांतीमुळे रासायनिक खते, जंतूनाशके, कीटकनाशके, पाणी यांचा बेसुमार वापर वाढला. त्यामुळे अनेक ठिकाणी जमिनी क्षारपड बनल्या. तसेच खतांचे व जंतूनाशकांचे अंश अन्नधान्यात उतरले. असे धान्य खाणाऱ्यांचे आरोग्य बिघडले. हे अंश पाण्यात व मातीत मिसळल्याने जलप्रदूषणात व मृदेच्या प्रदूषणात वाढ झाली. महत्त्वाचे म्हणजे अधिक धान्य पिकविले खरे पण ते साठवून ठेवण्याची पुरेसी व्यवस्था न केल्याने दरवर्षी हजारो टन धान्य सडू लागले.

अशाप्रकारे हरित क्रांतीचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडून आले आहेत.

### ४.३.३ पंचायत राज्य व्यवस्था (Panchayat Raj System)

भारतीय ग्रामीण समाजात नियोजनबद्ध सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक साधन म्हणून पंचायत राज्यव्यवस्थेचा अभ्यास आता तुम्ही या घटकात करणार आहात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय ग्रामीण समाजातील स्थानिक कारभार पाहण्यासाठी व ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, गट स्तरावर पंचायत समिती व ग्राम स्तरावर ग्रामपंचायत या तीन प्रातिनिधिक संस्था स्थापन केल्या. या त्रिस्तरीय रचनेस **पंडित नेहरूंनी** 'पंचायत राज्य' हे नाव दिले. पुढे १९९३ मध्ये भारतीय राज्यघटनेत ७३ वी दुरूस्ती करून पंचायत राज्यातील या तीन संस्थांना राज्यघटनेत स्थान दिले. पंचायत राज्याचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात लक्षणीय परिवर्तन घडून येण्यास चालना मिळाली. या ठिकाणी तुम्ही पंचायत राज्याचे स्वरूप व त्यामुळे घडून आलेले परिवर्तन याचा अभ्यास पुढील मुद्यांच्या आधारे करणार आहात.

१) पंचायत राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२) मेहता समिती

३) महाराष्ट्रातील नाईक समिती

४) ७३ वी राज्यघटना दुरुस्ती

५) महाराष्ट्रातील पंचायत राज्यातील संस्था

६) पंचायत राज्यामुळे घडून आलेले परिवर्तन

वरील सहा मुद्यांचे विवेचन क्रमशः पुढीलप्रमाणे :

**१) पंचायत राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

भारतात पंचायत राज्याची कल्पना नवीन नाही. प्राचीन भारतात खेड्याचा कारभार पाहण्यासाठी 'ग्रामीणी' नावाचा ग्रामप्रमुख व कांही अनुभवी व वयोवृद्ध लोकांचे एक मंडळ म्हणजेच पंचायत होती. ही पंचायत महसूल गोळा करून केंद्रीय सत्तेकडे पाठविणे, न्यायदान करणे, ग्रामसंरक्षण करणे, गावाच्या कल्याणाच्या योजना राबविणे इ. कार्ये समर्थपणे पार पाडीत. पंचायतीच्या कार्यात राजा म्हणजेच केंद्रीय सत्ता सहसा हस्तक्षेप करीत नसल्याने पंचायती राजकीयदृष्ट्या स्वायत्त होत्या. ही स्वायत्तता ब्रिटिश राजवट सुरू होईतोपर्यंत टिकून होती. ब्रिटिश सत्तेने मात्र पंचायतीचे वरील अधिकार (कार्ये) काढून घेतले व त्याऐवजी स्वतंत्र अधिकारी (कलेक्टर, मामलेदार, पोलीस, न्यायाधीश इ.) नेमले. त्यामुळे पंचायती निष्प्रभ झाल्या. मात्र पुढे भारतासारख्या खंडप्राय देशाचा कारभार पाहण्यासाठी ब्रिटिश सत्तेने शहरात स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका, महानगरपालिका) स्थापन केल्या. **लॉर्ड रिपन** यांनी १८८२ मध्ये ग्रामीण भागातही स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. पण तो नाकारला गेला. पुढे १९०७ च्या **रॉयल कमिशननेही** ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था स्थापण्याची शिफारस केली पण या शिफारसीची अंमलबजावणी झाली नाही. पुढे १९३५ च्या कायद्यानुसार १९३७ मध्ये प्रांतिक मंत्रिमंडळे सत्तेवर आली व त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी लोकांनी निवडावेत असे सुचविले. मात्र १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्था स्थापण्याकडे दुर्लक्ष झाले.

## २) मेहता समिती :

ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र शासनाने २ ऑक्टोबर १९५२ रोजी सुरू केलेल्या 'समुदाय विकास कार्यक्रमास' अपेक्षित यश आले नाही. म्हणून या अपयशाची कारणे शोधून त्यावर उपाय सुचविण्यासाठी केंद्र शासनाने **बलवंतराय मेहता** यांच्या अध्यक्षतेखाली (इतर सदस्य : ठाकूर फुलसिंग, डी. पी. सिंग, बी. जी. राव) एक समिती नेमली. या समितीने देशातील कांही निवडक गट, तेथील लोक व पदाधिकारी, शासकीय कर्मचारी, तज्ज्ञ इत्यादींशी चर्चा करून एक अहवाल तयार केला व तो १९५७ मध्ये केंद्राकडे पाठविला. या अहवालात समितीने लोकशाही विकेंद्रीकरणावर आधारलेली त्रिस्तरीय योजना सूचविली. या योजनेनुसार जिल्हा स्तरावर, जिल्हा परिषद, गट स्तरावर पंचायत समिती व ग्राम स्तरावर ग्रामपंचायत या तीन प्रातिनिधीक संस्था स्थापन करून त्यांना उत्पन्नाची साधने व अधिकार देऊन त्यांच्यामार्फत ग्रामीण विकास घडवून आणावा अशी शिफारस केली. केंद्र शासनाने ही शिफारस स्वीकारून राज्य सरकारांना या संस्था स्थापन करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार सर्वप्रथम राज्यस्थानमध्ये २ ऑक्टोबर १९५९ रोजी पंचायत राज्य स्थापन करण्यात आले.

## ३) महाराष्ट्रातील नाईक समिती :

मेहता समितीच्या अहवालाचा अभ्यास करून महाराष्ट्रात पंचायत राज्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन महसूल मंत्री **वसंतराव नाईक** यांच्या अध्यक्षतेखाली जून १९६० मध्ये एक समिती नेमली. या समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनाने स्विकारला व ''महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१'' हा कायदा संमत केला व १ मे १९६२ रोजी त्याची अंमलबजावणी सुरू केली. त्यानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद व गट (तालुका) स्तरावर पंचायत समिती या दोन संस्था स्थापन केल्या. ''मुंबई राज्य ग्रामपंचायती अधिनियम १९५८'' नुसार गाव स्तरावर स्थापन केलेल्या ग्रामपंचायतींना पंचायत राज्यव्यवस्थेत समाविष्ट केले. पंचायत राज्य स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील **नववे** राज्य ठरले.

मेहता समितीने घटकराज्यांना स्थानिक परिस्थितीनुसार कांही बदल करण्याची मुभा दिली होती. त्यानुसार मेहता समितीने महाराष्ट्रात कांही बदल केले. त्यामुळे इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रातील पंचायत राज्याचे स्वरूप कांहीसे वेगळे बनले. हे वेगळेपण पुढीलप्रमाणे होते.

१) इतर अनेक राज्यात पंचायत समितीला जादा व महत्त्वाचे अधिकार देऊन प्रबळ बनविले होते. महाराष्ट्रात मात्र पंचायत समितीऐवजी जिल्हा परिषदेला जादा व महत्त्वाचे अधिकार देऊन प्रबळ बनविण्यात आले.

२) इतर राज्यांत फक्त ग्रामपंचायतीची निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीने घेण्याची व जि. प. आणि पं. स. ची निवडणूक अप्रत्यक्ष पद्धतीने घेण्याची तरतूद केली. महाराष्ट्रात मात्र तीनही संस्थांची निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीने घेण्याचे ठरले.

३) इतर राज्यांत जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदार यांना जिल्हा परिषदेवर पदसिद्ध सदस्यत्व दिले होते. महाराष्ट्रात मात्र त्यांना असे सदस्यत्व दिले नाही.

४) इतर राज्यांत जिल्हाधिकाऱ्यास पंचायत राज्याच्या संदर्भात काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या गेल्या. महाराष्ट्रात मात्र त्याला विशेष स्थान न देता त्याच्याच दर्जाचा (I.A.S.) एक अधिकारी जि. प. चा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमण्यात येऊ लागला.

**४) ७३ वी घटनादुरुस्ती :**

पंचायत राज्य पद्धतीचा प्रयोग अनेक राज्यांत सुरू झाला. पण त्यामध्ये सुसुत्रता नव्हती. त्यातील प्रातिनिधिक संस्थांची रचना वेगवेगळी होती. या संस्थांच्या निवडणुका वेळेत होत नव्हत्या. महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, गुजरात इ. थोड्या राज्यांचा अपवाद वगळता अनेक राज्यांत पंचायत राज्यांची वाटचाल अत्यंत निराशाजनक होती. म्हणून १९८७-८८ मध्ये पंतप्रधान राजीव गांधींनी पंचायत राज्यपद्धतीस घटनात्मक दर्जा देण्यासाठी व त्यामध्ये स्त्रियांना ३० टक्के राखीव जागा देण्यासाठी एक घटना दुरुस्ती विधेयक तयार केले. पण ते मंजूर होऊ शकले नाही. पुढे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह रावांच्या कारकिर्दीत हे विधेयक सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत मांडले. त्यावर संसदेच्या संयुक्त समितीने विचार केला. या समितीच्या अहवालाच्या आधारे लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ रोजी तर राज्यसभेने २३ डिसेंबर १९९२ रोजी संमत केले. निम्म्याहून अधिक घटकराज्यांनी त्यास मान्यता दिल्यानंतर राष्ट्रपतीने २० एप्रिल १९९३ रोजी त्यास संमती दिली आणि २४ एप्रिल १९९३ पासून त्याचा अंमल सुरू झाला. हीच ७३ वी घटनादुरुस्ती होय. या घटनादुरुस्तीनुसार घटनेत नववा भाग समाविष्ट केला असून 'कलम २४३-ओ' या कलमांत पंचायत राज्यांविषयीच्या तरतूदी दिल्या आहेत. त्यांच्या अधिन राहून राज्यांनी कायदे करावयाचे असतात.

**७३ व्या घटनादुरुस्तीनुसार केलेल्या प्रमुख तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत**

● **रचना :**

१) ग्रामीण भागात ग्रामस्तर, मध्यस्तर व जिल्हा स्तर या तीन स्तरांवर पंचायती संस्था असतील पण २० लाखांहून कमी लोकसंख्या असलेल्या राज्यांत मध्यस्तरावरील संस्था नसेल.

२) कोणत्याही स्तरावरील पंचायत संस्थेत भरावयाच्या जागांची संख्या लोकसंख्येनुसार ठरविली जाते. लोकसंख्या व भरावयाच्या जागांचे गुणोत्तर राज्यभर सारखेच असावे लागते.

३) तिन्ही स्तरावरील संस्थांच्या जागा प्रत्यक्ष निवडणुकीने भरावयाच्या असतात. ग्रामपंचायतीचे अध्यक्ष मध्य स्तरावरील पंचायतीचे सदस्य बनतात व मध्य स्तरावरील पंचायतीचे अध्यक्ष जिल्हा स्तरावरील पंचायतीचे सदस्य बनतात. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषदेचे सदस्य हे मध्य वा जिल्हा स्तरावरील संस्थेचे सदस्य बनतात. ग्राम स्तरावरील पंचायतीचा सभापती निवडण्याची पद्धत राज्याचे कायदेमंडळ कायद्याने निश्चित करते. तर मध्य व जिल्हा स्तरावरील पंचायतीचा सभापती (अध्यक्ष) तिच्या सदस्यांमधून व त्यांच्याकडून निवडला जातो.

● **राखीव जागा :**

१) प्रत्येक स्तरावरील पंचायत संस्थेच्या सदस्यांमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा असतात. या राखीव जागांपैकी त्या त्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी १/३ जागा राखीव असतात.

२) प्रत्येक स्तरावरील पंचायत संस्थेत निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांपैकी किमान १/३ जागा स्त्रियांसाठी राखीव असतात. अशा स्त्रियांत अनुसूचित जाती-जमातीतील स्त्रियांच्या राखीव जागांचा समावेश आहे.

३) सर्व स्तरावरील पंचायत संस्थांच्या अध्यक्षांच्या एकूण जागांपैकी किमान १/३ जागा स्त्रियांसाठी राखीव असतात. तसेच ही अध्यक्षांची पदे अनुसूचित जाती व जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखून ठेवली जातात. राज्यसरकारला कायद्यान्वये मागासवर्गीय नागरिकांसाठी ही पंचायत संस्थांच्या सदस्यत्वाच्या तसेच अध्यक्षांच्याही जागा राखीव ठेवता येतात. महाराष्ट्रात पंचायत राज्यात महिलांना ५० टक्के राखीव जागा ठेवल्या असून त्यानुसार फेब्रुवारी २०१२ मध्ये निवडणूका घेण्यात आल्या आहेत.

● **पंचायत संस्थांचा कालावधी :**

प्रत्येक कालावधी तिच्या पहिल्या बैठकीपासून पाच वर्षे पूर्ण होईपर्यंत असतो. हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी निवडणूका घ्याव्या लागतात. कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच पंचायत संस्थेचे विसर्जन झाले तर विसर्जन झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत निवडणूका घ्याव्या लागतात आणि विसर्जित पंचायत संस्थेच्या जागी आलेली नवीन पंचायत संस्था विसर्जित पंचायत संस्थेच्या उरलेल्या कालावधीपुरतीच अस्तित्वात राहते. हा उरलेला कालावधी जर सहा महिन्यांपेक्षा कमी असेल तर मात्र निवडणूका घ्यावयाची गरज नसते.

● **पंचायत संस्थांच्या सदस्याची पात्रता**

१) भारताचा नागरिक असणे.

२) वयाची २१ वर्षे पूर्ण असणे.

३) राज्याच्या कायदेमंडळाने निवडणुकीच्या संदर्भातील कायद्याने निर्धारित केलेली पात्रता.

● **पंचायत संस्थांच्या शक्ती, अधिकार व जबाबदाऱ्या :**

राज्याच्या कायदेमंडळास पंचायत संस्थांच्या शक्ती, अधिकार व जबाबदाऱ्या कायद्यान्वये निश्चित करता येतात. पंचायती संस्थांवर पुढील कामे सोपविता येतात.

१) आर्थिक विकासाच्या व सामाजिक न्यायाच्या योजना तयार करणे.

२) त्यांच्यावर सोपविल्या गेलेल्या अशा योजनांची ज्यामध्ये ११ व्या अनुसूचीतील बाबी संबंधीच्या योजनांचाही समावेश आहे. या अनुसूचीत भूसुधारणा, लघुसिंचन प्रकल्प, पशुसंगोपन, शिक्षण, कृषी, पिण्याचे पाणी, ग्रामीण गृहनिर्माण, मत्स्यपालन, आरोग्य, मलमूत्र निस्सारण, महिला व बाल कल्याण, लघुउद्योग, कुटुंबकल्याण, दारिद्र्य निर्मूलन इ. २९ विषय आहेत.

● **पंचायतीच्या उत्पन्नाची साधने :**

राज्यसरकार कायद्यान्वये पंचायत संस्थांना कर, शुल्क, पथकर, फीज लावण्याचा व वसूल करण्याचा अधिकार देऊ शकते. तसेच वसुलीची पद्धती व किमान मर्यादाही घालून देऊ शकते. राज्य सरकारने गोळा केलेल्या करांच्या उत्पन्नातील कांही भाग तसेच राज्याच्या संचित निधीतून अर्थसहाय्य राज्य सरकार पंचायतींना देऊ शकते.

- **वित्त आयोग :**

या घटनादुरुस्तीनुसार २५ एप्रिल १९९३ पासून वर्षभराच्या आत आणि त्यानंतर दर पाच वर्षांनी राज्यसरकार राज्य वित्त आयोगाची नेमणूक करते. पंचायतीच्या आर्थिक स्थितीची तपासणी करून हा आयोग पुढील बाबींसंबंधी शिफारशी करू शकतो.

१) राज्य सरकारकडून वसूल होणाऱ्या कर, शुल्क, पथकर, फीज इ. च्या उत्पन्नाचे राज्यसरकार व पंचायती यांच्यात होणारे वाटप व पंचायतीच्या विविध स्तरांना त्यातून द्यावयाचा वाटा.

२) पंचायतीकडे सुपूर्द करावयाचे कर, शुल्क व पथकर.

३) पंचायतींना करावयाचे अर्थसहाय्य. आयोगाचा अहवाल व त्यातील शिफारशीवर केलेली कारवाई बाबतचे निवेदन राज्यपालास राज्य कायदेमंडळासमोर ठेवावे लागते.

- **निवडणूक आयोग :**

पंचायत संस्थांच्या निवडणुकांवर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण ठेवण्यासाठी व मतदार याद्या तयार करण्यासाठी राज्यात राज्य निवडणूक आयोग स्थापून त्याच्या प्रमुखाची म्हणजे आयुक्ताची नियुक्ती राज्यपाल करतात. आयुक्ताच्या सेवाशर्ती व कालावधी राज्यपालच ठरवितात. आयुक्ताला पदच्यूत करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास पदच्यूत करण्याची जी पद्धती आहे तीच पद्धती आहे. पंचायतीच्या निवडणुकीसंदर्भातील सर्व बाबींवर तरतूदी करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

- **अपवाद :** पंचायत राज्याबाबतच्या वरील तरतूदी :

१) आसाम, मेघालय व त्रिपुरा या राज्यांतील अनुसूचित क्षेत्रांना व जनजाती क्षेत्रांना लागू नाहीत.

२) नागालँड, मेघालय, मिझोराम या राज्यांना आणि कोणत्याही कायद्याने जेथे जिल्हा परिषदा अस्तित्वात आहेत अशा मणिपूरच्या पहाडी क्षेत्रास लागू नाहीत.

३) तसेच जिल्हा स्तरावरील पंचायत संस्थेसंबंधीची कोणतीही बाब पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्याच्या पहाडी क्षेत्रांना-जेथे दार्जिलिंग गुरखा पहाडी परिषद अस्तित्वात आहे-लागू नाहीत. मात्र आसाम, मेघालय व त्रिपुरा या राज्यांच्या विधानसभांनी २/३ बहुमताने ठराव संमत केल्यास या तरतूदी त्यांना लागू होऊ शकतात. संसदही कायद्याने अशी तरतूद करू शकते.

- **निवडणुकीसंबंधी न्यायालयीन हस्तक्षेपास मनाई :**

कलम २४३ मधील मतदारसंघाची रचना, मतदारसंघामध्ये जागांची वाटणी याबाबतच्या कायद्याची विधीग्राह्यता कोणत्याही न्यायालयात प्रश्नांकित करत येत नाही.

**महाराष्ट्रातील पंचायत राज्यांतर्गत संस्था :**

ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पंचायत राज्य म्हणतात. महाराष्ट्रात पंचायत राज्यपद्धतीत अ) जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, ब) तालुका किंवा विकास गट स्तरावर पंचायत समिती व क) गाव स्तरावर ग्रामपंचायत या तीन संस्था आहेत.

### अ) जिल्हा परिषद

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी मुंबई नगर व मुंबई उपनगरे हे दोन नागरी (शहरी) लोकवस्तीचे जिल्हे वगळता उरलेल्या ३४ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक अशा ३४ जि.प. आहेत.

**रचना :**

१) जिल्हा परिषदेत जिल्ह्यातील लोकसंख्येनुसार प्रौढ मतदारांनी प्रत्यक्ष पद्धतीने निवडून दिलेले किमान ५० व कमाल ७५ सभासद असतात. साधारणतः ३५००० ते ४०००० लोकसंख्येसाठी एक सभासद असतो. अनुसूचित जाती व जमाती आणि नागरिकांचा मागास वर्ग यांच्यासाठी कांही जागा लोकसंख्येच्या प्रमाणात राखून ठेवतात. एकूण निर्वाचित जागांपैकी १/३ जागा स्त्रियांसाठी राखीव असतात. २) जिल्ह्यातील पंचायत समित्यांचे सभापती हे जि.प. चे पदसिद्ध सभासद असतात.

**कार्यकाल :**

जिल्हा परिषदेचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो. तथापि, विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार राज्य सरकार तत्पूर्वीही जिल्हा परिषद बरखास्त करू शकते.

**जिल्हा परिषदेची कार्ये :**

अ) सामान्य कार्ये व ब) विकासाची कार्ये असे दोन भाग पाडता येतात.

**अ) सामान्य कार्ये :**

१) पंचायत समितीचे अर्थसंकल्प निश्चित करणे.

२) राज्य शासनाच्या अनुदानाचे पंचायत समित्यांमध्ये वाटप करणे.

३) पंचायत समित्यांच्या विकास कार्यात समन्वय साधणे, त्यांना मार्गदर्शन करणे.

४) पंचवार्षिक योजनेअंतर्गत कार्यक्रमांची आखणी करणे इ.

**ब) विकासाची कार्ये :**

**कृषी विकास :** जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी आधुनिक उत्पादन तंत्रे, शेती अवजारे, संकरित बी-बियाणे, रासायनिक खते व जंतुनाशके इ. शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे, पीक स्पर्धा घेणे, पिकांचे संरक्षण करणे, पीक प्रात्यक्षिके आयोजित करणे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे.

**पशुसंवर्धन :** जिल्ह्यातील पशुंचे संवर्धन करण्यासाठी, गुरांचे दवाखाने चालविणे, गुरांची प्रदर्शने भरविणे, कुक्कुटपालन, पशुपालन दुग्धव्यवसाय इ. ना प्रोत्साहन देणे. गुरांच्या आरोग्याबाबतची शास्त्रीय माहिती लोकांना पुरविणे.

**वनीकरण :** पडीक जमिनीवर वृक्षारोपण करणे, चराऊ कुरणे तयार करणे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व लोकांना पटवून देणे.

**समाजकल्याण :** ग्रामीण जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात कल्याणकारी योजना राबविणे. अनुसूचित जाती-जमाती, वृद्ध, अपंग, महिला अशा दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी

योजना राबविणे, वसतिगृहे उभारणे, अस्पृश्यता व जातिभेद निर्मूलन करणे, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणे इ.

**शिक्षण प्रसार :** जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करणे. त्यासाठी शाळा बांधणे. त्यांना अनुदान देणे, शिक्षक नेमणे, शैक्षणिक सामग्री पुरविणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, बालवाड्या, अंगणवाड्या, प्रौढ शिक्षण केंद्रे, आश्रमशाळा सुरू करणे.

**वैद्यकीय :** तालुका व गाव स्तरावर दवाखाने, वैद्यकीय उपचार केंद्रे, प्रसुतिगृहे बांधून त्यांना अर्थसहाय्य देणे, वैद्यकीय कर्मचारी नेमणे.

**आरोग्य सुविधा** : लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी त्यांना स्वच्छतेच्या व आरोग्याच्या सवयी लावणे, फिरते दवाखाने, लसीकरण केंद्रे, पिण्याचे स्वच्छ पाणी, पोषक आहार इ. सुविधा पुरविणे त्याबाबत मार्गदर्शन करणे.

**बांधकाम व दळणवळण :** जिल्ह्यात रस्ते, पूल व शासकीय इमारती बांधणे, लघुपाटबंधारे योजना राबविणे.

**सहकार :** जिल्ह्यात सहकारी संस्था स्थापण्यास उत्तेजन देणे, सहकारी पतसंस्था, बँका, खरेदी-विक्री संघ इ. ना राज्यसरकारच्या योजना समजावून सांगणे. सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे.

**समाजशिक्षण :** ग्रामीण भागात लोकजागृती करण्यासाठी नवीन ज्ञान, विचार व माहिती यांचा समाजात प्रसार करणे. त्यासाठी चित्रपट, भित्तीपत्रके, घोषवाक्ये, मेळावे, प्रदर्शन, वाचनालय, इ. चा वापर करणे. क्रीडा, कला, मनोरंजन इ. च्या सुविधा पुरविणे.

**गृहनिर्माण :** जिल्ह्यात गृहनिर्माण योजना राबविणे. शिवाय, बाजार, धर्मशाळा, चावड्या, समाजमंदिर, ग्रामपंचायतीची कार्यालये इ. बांधणे. राज्यशासनाने सोपविलेल्या विकास योजना व कार्यक्रमही जिल्हा परिषदेला राबवावे लागतात.

### जिल्हा परिषदेचे पदाधिकारी

**अध्यक्ष व उपाध्यक्ष :** जि. प. चे निर्वाचित सदस्य आपल्यामधून एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. अनुसूचित जाती, जमाती व नागरिकांचा मागास वर्ग यांतील सदस्य तसेच स्त्री सदस्य यांच्यातील, नेमून दिलेल्या पद्धतीने अध्यक्षपद क्रमशः राखून ठेवले जाते. अध्यक्ष व उपाध्यक्षाची मुदत अडीच वर्षे (पूर्वी पाच वर्षे होती) आहे. या दोन्ही पदावर एका व्यक्तीला सलग दोन मुदतींपेक्षा अधिक कार्यकालासाठी राहता येत नाही. अध्यक्षास राज्यमंत्र्याचा दर्जा आहे. या दोघांनाही मानधन तसेच निवासस्थानाची सोय मिळते. जि.प. चे सदस्य आपल्या १/५ बहुमताने अविश्वासाचा ठराव मंजूर करून अध्यक्षास पदच्यूत करू शकतात. अध्यक्ष विभागीय आयुक्ताकडे तर उपाध्यक्ष अध्यक्षाकडे राजीनामा देऊ शकतो. जिल्हा परिषदेचे सदस्यही अध्यक्षाकडेच राजीनामा देऊ शकतात.

### अध्यक्षाची कार्ये :

१) जिल्हा परिषदेची बैठक बोलाविणे, बैठकीचे अध्यक्षपद भूषविणे, बैठकीचे कामकाज चालविणे व त्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

२) जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामाची कागदपत्रे पाहणे.

३) जिल्हा परिषदेच्या प प्रशासकीय व आर्थिक प्रशासनावर देखरेख ठेवणे.

४) जिल्हा परिषदेचे निर्णय व ठराव यांची अंमलबजावणी करून घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय देखरेख व नियंत्रण ठेवणे.

५) जिल्ह्यात एखादी अनपेक्षित गंभीर समस्या वा संकट उद्‌भवल्यास एखादे कार्य करून घेणे किंवा स्थगित करणे याबाबत आदेश देणे.

६) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना गोपनीय अहवाल लिहीणे.

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष जिल्हा परिषदेच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारतो. तसेच तो अध्यक्षाचे अधिकार वापरतो व त्याची कर्तव्ये बजावतो.

**जिल्हा परिषदेच्या समित्या :**

जिल्हा परिषदेचे कामकाज विविध समित्यांमार्फत चालते. एक स्थायी समिती व नऊ विषय समित्या अशा दहा समित्या असतात.

**स्थायी समिती**

**रचना :**

१) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध सभापती असतो.

२) विषय समित्यांचे सभापती हे या समितीचे पदसिद्ध सदस्य असतात.

३) जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी आपल्यातून निवडलेले आठ सदस्य या समित्यांचे सदस्य असतात.

४) स्थायी समितीच्या कार्याबाबत विशेष ज्ञान वा अनुभव असलेले दोन सहयोगी सदस्य असतात.

५) उपयुक्त कार्यकारी अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो.

कार्ये :

१) जिल्हा परिषदेच्या सर्व कार्याबाबतच्या प्रगतीचा सतत आढावा घेणे.

२) जिल्हा परिषदेच्या संस्थावर देखरेख ठेवणे.

३) जिल्हा परिषदेच्या विकासाची कामे व योजना यांवर लक्ष देणे.

४) जिल्हा परिषदेचे कर व आर्थिक बाबी या संबंधीचे धोरण ठरविणे इ. कार्ये करते. त्यामुळे या समितीस खूपच महत्त्व आहे.

**विषय समित्या पुढीलप्रमाणे आहेत :**

**कृषी व सहकार समिती :** एक सभापती, जिल्हा परिषदेच्या सदस्यांमधून निवडून दिलेले नऊ सदस्य, पाच सहयोगी सदस्य आणि शेती व सहकार क्षेत्रातील दोन तज्ज्ञ व्यक्ती असे १७ सदस्य या समितीत असतात. जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा व सहकारी संस्थांचा विकास करण्याचे काम करते.

**सार्वजनिक बांधकाम समिती :** एक सभापती, जिल्हा परिषदेच्या सदस्यांमधून निवडून दिलेले सात सदस्य, तीन सहयोगी सदस्य असे ११ सदस्य या समितीत असतात. जिल्ह्यातील ग्रामीण भागात शासकीय इमारती, रस्ते, पूल, पाण्याचे बंधारे, तळी बांधते.

**समाज कल्याण समिती :** एक सभापती, जिल्हा परिषदेच्या सदस्यांमधून निवडलेले पाच अनुसूचित जाती-जमातीचे सदस्य, तीन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे सदस्य आणि दोन स्त्री सदस्य असे ११ सदस्य या समितीत असतात. हिचा सभापती हा अनुसूचित जाती जमातीचाच असावा लागतो. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, जमाती, अपंग, निराधार व इतर मागास वर्ग इ. दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या योजना राबविते.

**शिक्षण समिती :** एक सभापती, जिल्हा परिषदेच्या सदस्यांमधून निवडून आलेले सात सदस्य, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या दोन व्यक्ती सहयोगी सदस्य असे १० सदस्य या समितीत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शिक्षण प्रसार करणे, शिक्षक व शैक्षणिक सामग्री पुरविण्याचे काम करते.

**आरोग्य समिती :** एक सभापती, जिल्हा परिषद सदस्यांतून निवडून दिलेले सात सदस्य, इतर चार स्वीकृत सदस्य असे १२ सदस्य असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वैद्यकीय व आरोग्य सुविधा पोहचवण्याचे काम करते.

**महिला व बाल कल्याण समिती :** या समितीत ७०% स्त्री सभासद असतात आणि सभापतीही स्त्री सदस्य असते. स्त्रिया व बालकांच्या कल्याणाचे कार्यक्रम राबविते.

**पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती :** हिच्यातही एक सभापती व अन्य काही सदस्य असतात. जिल्ह्यातील पशुधनाचे संवर्धन करणे व दुग्ध व्यवसायाच्या विकासाचे काम करते.

**जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समिती :** जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा या समितीचा पदसिद्ध सभापती असतो. इतर कांही सदस्य असतात. जिल्ह्यात जलसंधारणाची कामे करणे व ग्रामीण लोकांना पिण्याचे पाणी पुरविणे याबाबतची कामे करते.

**वित्त समिती :** या समितीत एक सभापती व इतर १२ सदस्य असतात. त्या बारामध्ये कांही आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञ सहयोगी सदस्य म्हणून असतात. जिल्हा परिषदेच्या आर्थिक नियोजनाची जबाबदारी हिच्यावर असते. जिल्हा परिषदेच्या विकास योजनांना आर्थिक मंजुरी देणे तसेच पंचायत समित्यांच्या विकास कामांना मंजुरी देऊन आर्थिकदृष्ट्या त्यांना सल्ला व मार्गदर्शन करण्याचे काम करते.

९ विषय समित्यांमध्ये ५ सभापती असतात. त्यामुळे दोन समित्यांचे सभापतीपद एका व्यक्तीकडे येऊ शकते. जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष हा एक समितीचा सभापती असतो. जिल्हा परिषदेचा प्रत्येक सदस्य हा कोणत्या ना कोणत्या तरी समितीचा सदस्य असतो. समित्यांमुळे जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांना तिच्या कामकाजात प्रत्यक्ष सहभागी होता येते. समितीचे सभापती हे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाकडे सभापतीचा राजीनामा देऊ शकतात. एखाद्या समिती सदस्य आपल्या समिती सदस्यत्वाचा राजीनामा संबंधित समितीच्या सभापतीकडे देऊ शकतो.

**जिल्हा परिषदेचे अधिकारी :**

**मुख्य कार्यकारी अधिकारी :** हा जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असून सामान्यतः भारतीय प्रशासकीय सेवा मधून त्याची नियुक्ती राज्य सरकार करते. जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास राज्य सरकार त्याला परत बोलावू शकते. याची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत–

१) जिल्हा परिषदेच्या बैठकांना उपस्थित रहाणे.

२) जिल्हा परिषदेबाबतचा योग्य तो अहवाल राज्य सरकारकडे पाठविणे.

३) जिल्हा परिषदेत अर्थसंकल्प मांडणे व कर वसुलीची व्यवस्था करणे.

४) संपूर्ण जिल्हा परिषदेवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

५) जिल्हा परिषदेच्या तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची निवड मंडळाच्या मदतीने भरती करणे.

६) अध्यक्षांच्या संमतीने गरज भासल्यास जिल्हा परिषदेची बैठक बोलवण्याचा अधिकार याला आहे.

७) जिल्हा परिषदेच्या सदस्यांना व पदाधिकाऱ्यांना कायदेशीर तरतूदी समजावून देणे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी :** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मदतीसाठी दोन किंवा अधिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात. सामान्यतः महाराष्ट्र राज्य सेवांमधून म्हणजेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेद्वारे निवड झालेल्या व्यक्तीची राज्य सरकार या पदावर नियुक्ती करते. कांही जागा पदोन्नतीने भरतात.

**कार्ये :** जिल्हा परिषदेत दोन उपमुख्य अधिकारी असतात त्यापैकी एक जण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या सल्ल्याने प्रशासकीय आणि आस्थापनाविषयक कामकाज पाहतो. त्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवतो. स्थायी समितीचा पदसिद्ध सचिव म्हणून काम पहातो तर दुसरा हा जिल्ह्यातील विकास योजनांच्या अंमलबजावणीचे काम पाहतो. विकास योजना यशस्वी होण्यासाठी जनसंपर्क साधतो. जनतेला विकास योजना समजावून देतो. महिला व बालकल्याण समितीसाठीही एक उपमुख्य कार्यकारी अधिकारी नेमला जातो.

**जिल्हा परिषदेचे उत्पन्न :**

१) जिल्ह्यातून गोळा झालेल्या जमीन महसुलापैकी ७०% भाग आणि जंगलातून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ५% भाग जिल्हा परिषदेला मिळतो.

२) जिल्ह्यातील विकास योजना राबविण्यासाठी येणारा खर्च राज्यसरकार 'सहेतुक अनुदान' म्हणून देते.

३) सरकारच्या तिसऱ्या व चौथ्या श्रेणीतील जो सेवक वर्ग जिल्हा परिषदेकडे असतो त्यांचे वेतन व भत्ते यांचा खर्च राज्यसरकार 'सेवकवर्ग अनुदान' म्हणून देते.

४) जमीन महसूलावर जेवढा जास्तीत जास्त स्थानिक उपकर बसवून जिल्हा परिषद जेवढे जादा उत्पन्न मिळविल ते जि.प.ला मिळते.

५) जि. प. नी केलेल्या विकास कामाची प्रगती पाहून त्यांना अधिक काम करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून राज्यसरकार 'प्रेरक अनुदान' देते.

६) राज्य सरकारने जिल्हा परिषदेवर सोपविलेल्या विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी येणारा खर्च राज्यसरकार जिल्हा परिषदांना देते.

७) शेतसाऱ्याच्या प्रत्येक रुपयावरील २० पैसे इतका उपकर तसेच पाणीपट्टीच्या प्रत्येक रुपयावरील २० पैसे इतका उपकर बसवून त्याचे उत्पन्न राज्य सरकार जिल्हा परिषदांना देते.

८) व्यापार, व्यवसाय, नोकरी, सार्वजनिक पाण्याचे नळ, मनोरंजन इ. वरील कर आणि दलाल, अडत्ये यांच्यावरील परवाना फी तसेच बाजारात होणारी गुरांची खरेदी-विक्रीवरील फी जिल्हा परिषदांना मिळते.

**ब) पंचायत समिती**

पंचायत राज्यातील मध्य स्तरावरील (तालुका किंवा विकास गट स्तरावरील) प्रातिनिधीक संस्थेस पंचायत समिती म्हणतात. प्रत्येक जिल्ह्याची विभागणी काही विकास गटात करून प्रत्येक गटासाठी एक पंचायत समिती स्थापन केली जाते. महाराष्ट्रात साधारणपणे तालुका हा विकास गट मानला आहे. ठाणे, पुणे, उल्हासनगर व नागपूर हे नागरी लोकवस्तीचे तालुके सोडून बाकी सर्व तालुक्यास पंचायत समिती आहे.

**रचना :** पंचायत समितीची सदस्य संख्या निश्चित नाही. साधारणपणे किमान १५ व कमाल २१ सदस्य असल्याचे आढळते. हे सदस्य विविध प्रकारचे असतात.

१) तालुक्यातील १५ ते २० हजार मतदारामागे एक याप्रमाणात कांही सदस्य निवडून आलेले असतात. तसेच नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठीही विशिष्ट प्रमाणात जागा राखून ठेवलेल्या असतात.

२) तालुक्यातून जिल्हा परिषदेवर निवडून गेलेले सदस्य हे पंचायत समितीचे सदस्य असतात.

३) शेतीशी संबंधित सहकारी संस्थेचा अध्यक्ष सहयोगी सदस्य म्हणून घेतला जातो.

४) पंचायत समितीच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेचे जेवढे मतदारसंघ असतात त्यातील प्रत्येक मतदारसंघातील सर्व ग्रामपंचायतीचे सदस्य आपल्यातून दोन सभासद पंचायत समितीवर निवडून देतात

**कालावधी :** पाच वर्षे असतो. पण त्यापूर्वीही राज्यसरकार गैरकारभार आढळल्यास पंचायत समिती बरखास्त करू शकते.

**सभापती व उपसभापती :** पंचायत समितीचे निवडून आलेले सदस्य अपल्याकडून एकाची सभापती (अध्यक्ष) व एकाची उपसभापती (उपाध्यक्ष) म्हणून निवड अडीच (२.५) वर्षासाठी करतात. (पूर्वी ५ वर्षे). अनुसूचित जाती व जमाती, मागासवर्गीय नागरिक यांतील सदस्य व स्त्री सदस्य यांसाठी नेमणून दिलेल्या पद्धतीने क्रमशः पंचायत समितीचे सभापतीपद राखून ठेवले जाते. ज्या विकासगटातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या अनुसूचित जमातीची असेल तर तेथे सभापती व उपसभापती दोघेही अनुसूचित जमातीचाच असावे लागतात. आदिवासी विकास गटातील पंचायत समितीचा उपसभापती हा अनुसूचित जमातीचाच असावा लागतो. सभापती व उपसभापतींना मानधन व निवासस्थानाची सोय असते. पंचायत समितीचे सदस्य बहुमताने ठराव संमत करून त्यांना पदावरून दूर करू शकतात. उपसभापती सभापतीकडे तर सभापती जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाकडे राजीनामा देऊ शकतो.

**सभापतीची कामे :**

१) पंचायत समितीच्या बैठका बोलावून त्यांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व बैठकीचे (सभेचे) कामकाज चालविणे, मार्गदर्शन करणे.

२) राज्य शासन व जिल्हा परिषदेने सोपविलेल्या विकास योजनांची पंचायत समितीच्या क्षेत्रात गट विकास अधिकाऱ्यामार्फत अंमलबजावणी करणे.

३) पंचायत समितीच्या विकास कार्याचा अहवाल जिल्हा परिषदेस देणे.

४) पंचायत समितीच्या आर्थिक व प्रशासकीय व्यवहारावर देखरेख ठेवणे. इ. सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती काम पाहतो.

**सरपंच समिती :**

पंचायत समितीच्या क्षेत्रातील कमाल १५ सरपंचांची दरवर्षी क्रमशः निवड करून उपसभापतीच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन केली जाते. दरमहा या समितीची किमान एक बैठक होते. ही समिती तालुक्याच्या विकास योजनांचा आराखडा तयार करते. पंचायत समिती व गाव यांच्यातील ही समिती दुवा आहे. विस्तार अधिकारी हा या समितीचा सचिव असतो.

**पंचायत समितीची कामे :** पुष्कळशी जिल्हा परिषदेसारखीच असतात.

१) विकासाच्या व इतरही योजनांची आखणी करणे व जिल्हा परिषदेच्या अनुमतीने त्यांची अंमलबजावणी करणे.

२) जिल्हा परिषदेने सोपविलेली कामे पार पाडणे.

३) ग्रामपंचायतीच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवून त्यांना विकास कामाबाबत मार्गदर्शन करणे.

४) अंदाजपत्रक तयार करणे व मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविणे.

५) करवाढीच्या सूचना जिल्हा परिषदेस देणे.

६) कृषी विकास, पशुसंवर्धन, वनीकरण, समाजकल्याण, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, बांधकाम व दळणवळण, कुटिरोद्योग, गृहनिर्माण इ. बाबतचे विकास कार्यक्रम राबविणे.

७) स्थानिक साधनसंपत्तीचा विकास कार्यासाठी वापर करून घेणे.

**गटविकास अधिकारी** (Block Development Officer)

हा पंचायत समितीचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी व सचिव असतो. साधारणपणे महाराष्ट्रात राज्यसेवा मधून म्हणजेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेद्वारे निवड झालेल्या व्यक्तीची या पदावर राज्यसरकार नेमणूक करते. काही जागा पदोन्नतीनेही भरल्या जातात.

**कार्ये :**

१) प्रशासकीय प्रमुख म्हणून पंचायत समितीच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर व कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

२) पंचायत समितीचा सचिव म्हणून तिच्या बैठकांना उपस्थित रहाणे आणि सदस्यांना कायदेशीर तरतुदींची माहिती देणे.

३) पंचायत समितीने आखलेल्या विकास योजनांची तिच्या क्षेत्रात अंमलबजावणी करणे.

४) शासकीय अधिकारी म्हणून पंचायत समितीच्या कामाचा अहवाल शासनाकडे पाठविणे.

५) पंचायत समितीच्या अंदाजपत्रकास जि.प. ची मंजूरी मिळवून त्याची अंमलबजावणी करणे.

६) ग्रामपंचायतीच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

वरील कामे पार पाडण्यासाठी त्याला शेती, आरोग्य, शिक्षण, पशुसंवर्धन, सहकार, उद्योग या क्षेत्रातील विस्तार अधिकारी मदत करीत असतात.

**क) ग्रामपंचायत**

पंचायत राज्यपद्धतीतील गाव स्तरावरील प्रातिनिधीक संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. दहा हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांत ग्रामपंचायत असते. डोंगराळ भागात किमान ३०० व डोंगराळ भाग सोडून किमान ५०० लोकसंख्या असलेल्या गावात ग्रामपंचायत स्थापन करता येते. यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या दोन किंवा अधिक गावात मिळून एकच ग्रामपंचायत स्थापन करता येते. तिला गट-ग्रामपंचायत म्हणतात.

**रचना :** ग्रामपंचायतीची सदस्यसंख्या किमान ७ आणि कमाल १७ इतकी असते गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ग्रामपंचायतीची सदस्यसंख्या निश्चित केली जाते. १५०० किंवा त्यापेक्षा कमी संख्येला ७ सदस्य, १५०१ ते ३००० पर्यंतच्या लोकसंख्येला ९ सदस्य, ३००१ ते ४५०० पर्यंत ११ सदस्य, ४५०१ ते ६००० पर्यंत १३ सदस्य, ६००१ ते ७५०० पर्यंत १५ सदस्य आणि ७५०१ च्या पुढे १७ सदस्य असतात.

**निवड :** ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड गावातील प्रौढ व्यक्तीकडून गुप्त मतदान पद्धतीने होते. लोकसंख्येच्या आधारे गावाचे कांही वॉर्ड (प्रभाग वा मतदारसंघ) पाडून प्रत्येक वॉर्डातून दोन वा तीन सदस्य (पंच) निवडले जातात. राज्य सरकारने ठरवून दिल्याप्रमाणे अनुसूचित जाती वा जमाती, तसेच नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी विशिष्ट प्रमाणात जागा राखीव असतात. तर स्त्रियांसाठी १/३ जागा राखीव असतात. गावातील सेवा सहकारी सोसायटीचा अध्यक्ष हा ग्रामपंचायतीचा पदसिद्ध सदस्य असतो.

**कार्यकाल :** ग्रामपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. ग्रामपंचायतीत गैरकारभार आढळतो असा जिल्हाधिकाऱ्याने अहवाल दिल्यास ग्रामपंचायत बरखास्त केली जाऊ शकते.

**सरपंच व उपसरपंच :** पूर्वी ग्रामपंचायतीचे निर्वाचित सदस्य आपल्यातून एकाची सरपंच म्हणून व एकाची उपसरपंच म्हणून पाच वर्षांसाठी निवड करीत. महाराष्ट्रात आता २०१७ पासून सरपंचाची निवड थेट जनतेतूनच प्रौढ मताधिकार पद्धतीने केली जाते. त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव बहुमताने ग्रामपंचायत सदस्यांनी मंजूर केल्यास त्यांना पदत्याग करावा लागतो. उपसरपंच सरपंचाकडे तर सरपंच पंचायत समितीच्या सभापतीकडे राजीनामा देऊ शकतो.

**सरपंचाची कामे :**

१) ग्रामपंचायतीची प्रत्येक महिन्यास किमान एक सभा बोलावणे सरपंचावर बंधनकारक आहे.

२) मासिक सभेशिवाय सरपंच आवश्यकतेनुसार तसेच जिल्हा परिषदेची स्थायी समिती किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा पंचायत समिती यापैकी कोणीही मागणी केल्यास ग्रामपंचायतीची खास सभा बोलावतो.

३) सभेस गणपूर्ती आहे की नाही हे पाहतो. सभेचे कामकाज सुरू करण्यासाठी निम्म्यापेक्षा जास्त सदस्य हजर असावे लागतात.

४) ग्रामपंचायतीच्या सभेचे अध्यक्षस्थान भूषवितो.

५) ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावांची व घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करतो.

६) ग्रामपंचायतीची मालमत्ता, करवसुली, कर्मचारी वर्ग आणि आर्थिक व्यवहार यावर लक्ष ठेवतो.

७) सरकारी योजनांची गावाच्या क्षेत्रात अंमलबजावणी करतो.

सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच हा सरपंचाची कामे पाहतो.

**ग्रामसेवक :** हा ग्रामपंचायतीकडील सरकारी सेवक असून तो ग्रामीण विकास मंत्रालयाकडील कर्मचारी असतो. शासकीय नियमांच्या अधिनतेत जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामसेवकाची नियुक्ती करतो. साधारणपणे तीन हजार वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावासाठी एक ग्रामसेवक असतो. मात्र त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या दोन वा अधिक गावासाठी एकच ग्रामसेवक असू शकतो.

**ग्रामसेवकाची कामे :**

१) ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे.

२) ग्रामपंचायतीच्या सभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

३) ग्रामपंचायतीच्या सदस्यांना कायदेशीर तरतुदींची माहिती देणे.

४) शासकीय योजनांची गावाच्या क्षेत्रात अंमलबजावणी करणे.

५) ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर वसुली करणे.

६) ग्रामपंचायतीचे प्रशासकीय दप्तर (कागदपत्रे) सांभाळणे. ग्रामपंचायतीचा अहवाल शासनाकडे पाठविणे.

७) शासन व गावातील जनता यातील दूत (मध्यस्त) म्हणून काम करणे.

८) गामपंचायतीच्या इतर सेवकांवर (शिपायावर) प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

**ग्रामपंचायतीचे अधिकार व कार्ये :**

ग्रामपंचायतीच्या कार्याचे अ) आवश्यक कार्ये व ब) ऐच्छिक कार्ये असे दोन भाग पाडता येतात.

**अ) आवश्यक कार्ये :**

१) जिल्हा परिषदेने आखलेल्या विकास योजना पंचायत समितीच्या मार्गदर्शनानुसार गावाच्या हद्दीत राबविणे.

२) गावातील विकास कार्याचा आढावा घेणे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करून पंचायत समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे.

३) गावातील रस्ते बांधणे व ते स्वच्छ ठेवणे, सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे, रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे.

### ६) पंचायत राज्यामुळे घडून आलेले सामाजिक परिवर्तन

पंचायत राज्य हे ग्रामीण समाजात नियोजनबद्ध परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. पंचायत राज्याच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजात जे सकारात्मक तसेच नकारात्मक परिवर्तन घडून आले आहे, त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

**१) राजकीय सहभाग वाढला :** पूर्वी राजकारणापासून अलिप्त असलेले ग्रामीण लोक पंचायत राज्यामुळे राजकारणात भाग घेऊ लागले. निवडणूका, मतदान, प्रचार, इत्यादी प्रक्रिया ग्रामीण भागातील तळागाळापर्यंत पोहचल्या. लोक या प्रक्रियांमध्ये हिरीरीने भाग घेऊ लागले. ७३ व्या राज्यघटनादुरुस्तीनंतर अनुसूचित जाती व जमाती, इतरमागास वर्ग, महिला यांनाही पंचायत राज्यांतर्गत सत्ता स्थाने मिळू लागली. एकंदरीत पंचायत राज्यामुळे ग्रामीण जनतेचा राजकीय सहभाग वाढला हा एक मोठा सकारात्मक बदल आहे.

**२) ग्रामीण विकासास चालना :** पंचायत राज्याचा प्रभाव पडून ग्रामीण विकास घडून येण्यास मोठी चालना मिळाली आहे. ग्रामीण जीवनाच्या विविध क्षेत्रात अपेक्षित असे परिवर्तन घडून आले आहे. उदा. ग्रामीण भागातील शेतीक्षेत्रास जलसिंचन सुविधा पुरविल्याने शेती उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. लघुद्योग-कुटिरोद्योगांना प्रोत्साहन दिल्याने स्वयंरोजगाराच्या संधीत वाढ होऊन ग्रामीण कारागिरांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. खेड्यापाड्यात रस्ते, वीज, पाणी, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, फोन, शाळा, दवाखाने, आरोग्य केंद्रे अशा सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यास मदत झालेली आहे.

**३) लोकशाही पद्धतीचे शिक्षण :** पंचायत राज्य हे लोकशाही विकेंद्रीकरणावर आधारलेले आहे. त्यामुळे लोकांना लोकशाही राज्यपद्धतीचे शिक्षण मिळू लागले आहे. शिवाय स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मुल्यांची ओळख ग्रामीण जनतेस होऊ लागली आहे. त्यामुळे लोकशाहीकरणाची प्रक्रिया खेड्यापाड्यापर्यंत पोहचली आहे. परिणामी, राज्य व केंद्र स्तरांवरील लोकशाही व्यवस्था बळकट होण्यास हातभार लागला आहे.

**४) समाजकल्याणास प्रोत्साहन :** पंचायत राज्यामुळे समाज कल्याण कार्यासही मोठे प्रोत्साहन मिळाले आहे. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती, इतर मागासवर्ग, भूमिहीन मजूर, अल्पभूधारक, निराधार व दिव्यांग लोक इत्यादी वंचित व दुर्बल घटकांच्या कल्याणाचा विविध योजना पंचायत राज्याद्वारे राबविल्या जात आहेत. परिणामी, त्याचे कल्याण वा विकास होण्यास मोठे प्रोत्साहन मिळत आहे. यातूनच समाजात समता व न्याय प्रस्थापित होण्यास हातभार लागला आहे.

**५) नवीन नेतृत्त्वाचा उदय :** स्थानिक ग्रामीण नेतृत्त्वास वाव देणे हे एक पंचायत राज्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार स्थानिक लोक पंचायत राज्यात सक्रिय सहभाग घेऊ लागले आहेत. यातूनच पारंपरिक ग्रामीण नेतृत्त्व म्हणजेच पूर्वीचे जहागिरदार-इनामदार, देशमुख-देशपांडे, पाटील-कुलकर्णी इत्यादींचे नेतृत्व मागे पडून त्याजागी सुशिक्षित, लोकशाही व पुरोगामी नेतृत्त्व उदयास आले आहे. हे नवीन नेतृत्त्व आपणास पाठिंबा मिळावा म्हणून सर्व जातीच्या, धर्माच्या व वर्गाच्या लोकांना आपल्याबरोबर घेऊन जाऊ इच्छित आहे. हे एक अपेक्षित असे चांगले परिवर्तन आहे.

६) **मनोवृत्तीत परिवर्तन :** पंचायत राज्यामुळे ग्रामीण जनतेला नवीन ज्ञान, कल्पना, मूल्ये इत्यादींची ओळख होऊ लागली आहे. त्यामुळे त्यांची जुनाट/मागासलेली मनोवृत्ती बदलण्यास चालना मिळाली आहे. पंचायत राज्यामुळे प्राप्त झालेल्या अधिकार व साधनांद्वारे आपण आपल्या गावाचा/भागाचा विकास करू शकतो याची जाणीव त्यांना झाली आहे. यातूनच त्यांची मनोवृत्ती विकासाभिमूख व परिवर्तनशिल अशी बनण्यास मदत झाली आहे.

७) **गटातटाचे राजकारण :** पंचायत राज्यामुळे ग्रामीण लोकांचा राजकीय सहभाग वाढला हे खरे. तथापि, त्यामुळे गटातटाचे राजकारण निर्माण झालेले आहे. पंचायत राज्यातील संस्थावर ताबा मिळविण्यासाठी ग्रामीण भागात अनेक गटतट उदयास आले असून त्यांच्यात सत्ताप्राप्तीसाठी जीवघेणा संघर्ष होऊ लागला आहे. विकास कामांकडे दुर्लक्ष करून हे गट आपसात संघर्ष करीत असल्याने ग्रामीण भागातील शांतता व ऐक्य धोक्यात आले आहे.

८) **स्वार्थी नेतृत्त्व :** पंचायत राज्यामुळे ग्रामीण भागात नवे नेतृत्त्व उदयास आले हे खरे. पण हे नवे नेतृत्त्व अपेक्षेप्रमाणे फारसे विधायक नसल्याचे आढळते. हे नेतृत्त्व सत्ताप्राप्तीसाठी दहशत, हिंसा, पैसा, जातीधर्म इत्यादींचा वापर करताना दिसत आहे. केवळ आपले व आपल्या आप्तमित्रांचे हितसंबंध साधण्यासाठी सत्तेचा वापर करीत आहे. यातून अनेक ठिकाणी घराणेशाही उदयास आली आहे. पंचायत राज्याची सत्ता कांही ठराविक घराण्याच्या हातात पिढ्यानपिढ्या अडकून पडलेली आहे. अनेक नेते हे गुंड, गुन्हेगार, मवाली इत्यादींच्या मदतीने पंचायत राज्यातील संस्थांवर कब्जा करून बसलेले आहेत. तर कांही नेते हे आमदारकी, खासदारकी मिळविण्याचे साधन म्हणून पंचायत राज्याकडे पाहताना दिसतात. ग्रामीण विकास घडवून आणणे हे त्यांच्या ध्यानीमनीही नाही.

९) **उच्च वर्गांचे वर्चस्व :** पंचायत राज्याच्या माध्यमातून सामान्य ग्रामीण जनतेला सत्ता व अधिकार प्राप्त होतील अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र ही अपेक्षा धुळीस मिळाली आहे. कारण पंचायत राज्यांवर केवळ उच्चवर्गांचे/उच्चजातींचे वर्चस्व निर्माण झालेले आहे. सर्वसामान्य जनता विशेषतः ग्रामीण दुर्बल घटक हे पंचायत राज्याच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीने अनुसूचित जाती व जमाती, इतर मागासवर्ग, महिला यांना पंचायत राज्यात राखीव जागा मिळाल्या असल्याने त्यांनाही सत्ता प्राप्त होत आहे हे खरे. परंतु, प्रत्यक्षात मात्र उच्च जातीचे लोकच पंचायत राज्याचा कारभार चालविताना दिसतात. त्यामुळे दुर्बल घटकांना राखीव जागांमुळे मिळणारी सत्ता ही वास्तवीक नसून भ्रामक आहे असेच म्हणावे लागते.

१०) **राजकीय पक्षांचा प्रभाव :** पंचायत राज्याचा कारभार हा पक्षीय राजकारणापासून अलिप्त असावा अशी अपेक्षा होती. पण, ही अपेक्षादेखील प्रत्यक्षात साकार झालेली नाही. वेगवेगळे राजकीय पक्ष पंचायत राज्यांतर्गत होणाऱ्या निवडणूकात सहभागी होत असून ते स्थानिक लोकांवर नियंत्रण ठेवीत आहेत. निवडणुकीत आपल्या पक्षातर्फे उमेदवार उभा करून निवडून आलेल्या उमेदवारांना पक्षाच्या आदेशानुसार काम करण्याचा दबाव टाकीत आहेत. त्यामुळे ग्रामीण स्थानिक लोकांना आपल्या आशाआकांक्षानुसार कारभार करण्याची संधी मिळेनासी झाली आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते हे पंचायत राज्यातील नेत्यांवर नियंत्रण ठेवून त्यांना पक्षीय ध्येयधोरणानुसार वागण्यास भाग पाडीत आहेत. त्यामुळे सत्तेचे खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण झाले असे म्हणता येत नाही.

### ४.३.४ जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव

जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण ह्या सामाजिक परिवर्तनाच्या सर्वव्यापी व सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या प्रक्रिया आहेत. १९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात आर्थिक पुनर्रचनेचे (सुधारणेचे) जे कार्यक्रम सुरू झाले त्यातूनच ह्या तीन प्रक्रियांची सुरुवात झाली. या ठिकाणी तुम्ही जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा अर्थ, वैशिष्ट्ये व तिचा भारतीय ग्रामीण समाजावरील प्रभाव समजावून घेणार आहात.

**जागतिकीकरणाचा अर्थ आणि व्याख्या :**

जागतिकीकरण ही ''संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ'' बनविण्याची म्हणजे ''जागतिक अथव्यवस्था'' (Global Economy) निर्माण करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे ही प्रक्रिया मूलतः आर्थिक प्रक्रिया ठरते. तथापि या प्रक्रियेस सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणात्मक असे विविध पैलू आहेत. जागतिकीकरणाचा अर्थ समजण्यासाठी त्याच्या विविध दृष्टिकोनातून केलेल्या व्याख्या तसेच वैशिष्ट्ये समजावून घेऊ.

१) **दिपक अय्यर** – एखाद्या देशाचे आर्थिक व्यवहार त्या देशाच्या भौगोलिक व सामाजिक सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

२) **श्रवणकुमार सिंग** – आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामग्रीचे व भांडवलाचे सुलभ अभिसरण निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

३) **ॲन्थनी गिडेन्स** – जगातील विभिन्न लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता आणि परस्पर निर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय. ही पारस्पारिकता आर्थिक व सामाजिक संबंधातील तसेच स्थळकाळातील अंतर मिटवून टाकते.

४) **डेव्हिड हेल्ड आणि ॲन्थनी मॅकग्रा** : सामाजिक संबंध व व्यवहार यात आमूलाग्र बदल घडवून आणणारी व त्यायोगे विविध कार्याचे, परस्परसंबंधाचे व सत्तेचे आंतरखंडीय व आंतरक्षेत्रीय जाळे निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

५) **गीलपीन** – प्रभुत्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.

६) **प्रा. चंद्रकांत खंडागळे** : जगातील विविध लोक, राष्ट्रे किंवा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करून त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

उपरोक्त व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाचा अर्थ आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) विविध राष्ट्रांना जागतिक स्तरावर मुक्तपणे आर्थिक व्यवहार करण्यास वाव देऊन त्याद्वारे संपूर्ण जगाची एकच अर्थव्यवस्था बाजारपेठ निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

२) जगातील विविध समाजामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमा पार करून त्यांच्यात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय संबंध प्रस्थापित करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय. म्हणजे संपूर्ण जगास एक खेडे (Global Village) बनविणे होय.

३) आर्थिक, औद्योगिक व राजकीय दृष्ट्या शक्तीशाली असलेल्या राष्ट्रांनी आपली आर्थिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये इतर राष्ट्रांना स्वीकारण्यास भाग पाडणे म्हणजे जागतिकीकरण होय.

**जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये :** (Characteristics of Globalization)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे अर्थ आणि स्वरूप अधिक सुस्पष्टपणे समजण्यासाठी तिची वैशिष्ट्ये अभ्यासणे उपयुक्त ठरेल. उपरोक्त व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील.

**१) जागतिक अर्थव्यवस्था :** जागतिकीकरण ही जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून विविध राष्ट्रांतील भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठा व श्रम (कामगार) या घटकांचे एकीकरण करून विशाल आकार असलेल्या जगाचे प्रत्यक्ष व्यवहार करण्यासाठी एक लहान खेड्यात रूपांतर होणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणात देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्याने कोणत्याही देशातील उत्पादीत वस्तू जगात कोठेही विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. त्यामुळे संपूर्ण जगासाठी एकच बाजारपेठ तयार होऊन जग हे जणू एक 'बाजारसमूह' (Shopping Complex) बनला आहे.

**२) सामाजिक प्रक्रिया :** साधारणत: जागतिकीकरण ही आर्थिक प्रक्रिया वाटते. तथापि जार्ज मॉडेलस्की म्हणतात त्याप्रमाणे ''जागतिकीकरण ही जगातील विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणारी सामाजिक प्रक्रिया आहे.'' मुक्त जागतिक व्यापार जलदगतीने वाहतूक यंत्रणा, उपग्रहीय संदेशवहन, माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे इत्यादी घटकांमुळे विविध समाजात पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक पटीने परस्परसंबंध व परस्परावलंबन वाढले आहे.एका समाजात घडलेल्या घटनेचे संपूर्ण जगावर होत आहेत. एका समाजात उद्‍भवलेली समस्या सर्व जगाची समस्या वाटू लागली आहे. व्यापार, उद्योग, नोकरी, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने लोकांना जगात कोठेही स्थलांतर करणे सुलभ व शक्य झाले आहे. स्थळकाळाचे अंतर कमी होऊन 'विश्वची माझे घर' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात साकारत आहे. मालकोम वाटर्स म्हणतात त्याप्रमाणे जागतिकीकरणात विविध सामाजिक -सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौगोलिक प्रभाव दूर होऊन भौगोलिक सीमा अनावश्यक वाटू लागल्या आहेत.

**३) उदारीकरण व जागतिकीकरण :** या दोन जागतिकीकरणाशी सलंग्न असलेल्या प्रक्रिया आहेत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्रांना उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडत आहे. किंबहुना त्यांच्याशिवाय जागतिकीकरणाची प्रक्रिया शक्य होणार नाही. उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील विविध प्रक्रियांवर (उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग, गुंतवणूक, श्रमपुरवठा इ.) असणारे अनावश्यक सरकारी निर्बंध, नियंत्रणे व नियमने काढून टाकणे किंवा शिथील करणे होय. खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक (सरकारी) उद्योगांची मालकी खाजगी क्षेत्राकडे किंवा त्याच क्षेत्रातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाडेपट्टीने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय. श्री. डी. आर. पेंडसे म्हणतात त्याप्रमाणे देशाच्या आर्थिक व्यवहारातील सरकारचा किंवा सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय. आज अनेक देशांनी उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्याने जागतिक अर्थव्यवस्था किंवा बाजारपेठ निर्माण होणे( म्हणजेच जागतिकीकरण) सुलभ झाले आहे.

**४) जागतिकीकरणाची माध्यमे :** जागतिकीकरणास चालना देणारे अनेक घटक आहेत. त्यांना जागतिकीकरणाची माध्यमे किंवा साधने (agencies) असे म्हणतात १) आंतरराष्ट्रीय संघटना (उदा. संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) जागतिक बँक (WB), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आंतरराष्ट्रीय वित्त निगम - (WTO) इत्यादी) २) क्षेत्रीय संघटना (उदा. अमेरिकन राष्ट्रसंघ, युरोपियन मुक्त व्यापार संघ, फ्रेंच कम्युनिटी अरब लीग, सार्क, ओपेक इत्यादी) ३) बहुराष्ट्रीय कंपन्या (उदा. कॅडबरी, लिव्हर, कोलगेट, पाँडस, पेप्सी, कोकाकोला, मॅक्डॉल, लिप्टन इत्यादी) आणि ४) बिगर शासकीय संघटना - (NGOs) (उदा. रेडक्रॉस मानवी हक्क आयोग, अम्नेस्टी इंटर्नॅशनल, आंतरराष्ट्रीय ऑलंपिक समिती, विश्व प्रकृती निधी इत्यादी आणि ५) माहिती तंत्रज्ञानाचे जाळे ही जागतिकीकरणाची प्रमुख माध्यमे आहेत. त्यांच्यामुळे विविध राष्ट्रांत आर्थिक-सामाजिक सांस्कृतिक संबंध मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

या संदर्भात आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (WTO) World Trade Organization ही संघटना विशेष महत्त्वाची ठरली आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात विस्कळीत झालेला जागतिक व्यापार सुरळीत करण्यासाठी १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी जकात व व्यापार संबंधीचा साधारण करार - GATT ( General Agreements on Terrifs and Trade) केला प्रारंभी त्यास इतर राष्ट्रांनी विरोध केला. पण पुढे त्यांची उपयुक्तता पटल्याने अनेक राष्ट्रे त्या करारात सहभागी झाली. या करारातील अडथळे दूर करण्यासाठी गॅटचे महासंचालक आर्थर डंकेल यांनी तयार केलाला प्रस्ताव गॅटच्या सदस्यांनी उरूग्वे परिषदेत स्वीकारला. आणि त्यास गॅट ऐवजी World Trade Organization- WTO म्हणजेच जागतिक व्यापार संघटना असे नाव १ जानेवारी १९९५ रोजी दिले. जकात दर वाढविणे, अनुदाने कमी करणे, सदस्य राष्ट्रांचे उत्पादन वाढविणे, रोजगारवृध्दी, जीवनमान उंचावणे, पर्यावरण संरक्षण इत्यादी या संघटनेची उद्दिष्टे आहेत. सद्या या संघटनेचे

१४२ देश सदस्य असून ९५% जागतिक व्यापार तिच्यामार्फत होतो. या संघटनेमुळे जागतिकीकरणास जोरदार चालना मिळाली आहे.

५) **राजकीय सत्तेवर मर्यादा :** जागतिकीकरणात राष्ट्रांच्या राजकीय सत्तेवर अनेक मर्यादा आल्या आहेत. जगात उदयास आलेल्या विविध आंतरराष्ट्रीय संघटना व करारात सहभागी होणे व त्यांचे पालन करणे प्रत्येक राष्ट्रास भाग पडत आहे. आपली आर्थिक व राजकीय धोरणे ठरवितांना त्या संघटनांचा, करारांचा व इतर राष्ट्रांचा विचार प्रत्येक राष्ट्रास करावा लागत आहे. आपल्या गंभीर समस्या एकट्याने सोडविणे आज कोणत्याही राष्ट्रास शक्य नाही. त्यांना इतरांची मदत घ्यावीच लागत आहे. त्यामुळे तत्त्वतः प्रत्येक राष्ट्र सार्वभौम असले तरी व्यवहारात त्यांची सत्ता मर्यादित होत चालली आहे. म्हणूनच डॅनियल बेल म्हणतात की जागतिकीकरणात राष्ट्र-राज्याची संकल्पना मोडीत निघाली आहे.

६) **विकसित राष्ट्रांचे प्रभूत्त्व :** जागतिकीकरणात सर्व जगाची एकच किंवा सामाईक अशी आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होत आहे. तथापि, या व्यवस्थेत सर्व राष्ट्रांचा समान सहभाग आढळत नाही. विकसित राष्ट्रांचे (उदा. अमेरिका, युरोपियन राष्ट्रे इ.) प्रभुत्त्व निर्माण झालेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघ- (UNO) आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना इत्यादी या राष्ट्रांच्या प्रभावाखाली आहेत. त्यामुळे ही राष्ट्रे आपली अर्थव्यवस्था, धोरणे व संस्कृती इतर राष्ट्रांवर लादत आहेत. यालाच काही अभ्यासक 'नवीन वसाहतवाद' असे म्हणतात.

७) **गतिशीलतेत वाढ :** जागतिकीकरणात व्यक्तीची व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलता प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. शिक्षण नोकर, व्यापार, पर्यटन इत्यादींच्या निमित्ताने व्यक्ती जगात कोठेही स्थलांतरीत होऊ लागली आहे. राज्य देखील व्यक्तीला त्यासाठी प्रोत्साहन व मदत देत आहे. तसेच उच्च गुणवत्तेच्या परकीय व्यक्तींना आपल्या समाजात आमंत्रित करीत आहे. काही राज्यांनी तर दुहेरी नागरिकत्त्व देणे सुरू केले आहे. याचाच अर्थ असा की, पूर्वी व्यक्तीचा विचार एखाद्या राज्याचा नागरीक म्हणून होई. आज मात्र संपूर्ण मानवजात यासंदर्भात व्यक्तीचा विचार होऊ लागला आहे. त्यामुळे व्यक्ती अधिक गतिशील (Mobile) व जागतिक (Global) झाली आहे. याचाच परिणाम म्हणून कुटुंब, समुदाय. प्रांत, राष्ट्र इत्यादीबाबतचे प्रेम, निष्ठा व बांधिलकीची भावना शिथील होत चालली आहे.

८) **सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया :** जागतिकीकरण ही अखिल मानव समाजात (जगात) आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे या प्रक्रियेत उद्योग, व्यापार, कृषी, वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, दळणवळण, स्थलांतर, राहणीमान, शासनव्यवस्था, समाज व्यवस्था, संस्कृती, पर्यावरण अशा सर्वच क्षेत्रात रूपांतरण वा परिवर्तन घडून येऊ लागले आहे. त्यामुळे जगाचा चेहराच बदलत चालला आहे.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव**

जागतिकीकरणाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता आपण जागतिकीकरणामुळे भारतीय समाजात होत असलेल्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समजावून घेणार आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्था व नियोजन यांचा स्वीकार करून आर्थिक विकास साधण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात मोठमोठे उद्योगधंदे उभारले. तसेच आर्थिक व्यवहारावर सरकारचे कडक नियंत्रण ठेवले. परंतु १९५०-१९९० या काळात आर्थिक नियोजन व सरकारी नियंत्रणे यांचा फायदा होण्याऐवजी तोटाच झाला. दारिद्र्य, बेकारी महागाई वाढतच गेली. निर्यात दर अल्पच राहिला. सार्वजनिक उद्योग तोट्यात गेले. १९८०-१९९० या दशकात मोठी चलनवाढ झाली. परकीय चलनसाठा घटत गेला. अनिवासी भारतीयांच्या बँकेतील ठेवी कमी झाल्या. शिवाय राजकीय अस्थिरताही निर्माण झाली. परिणामी भारताची जगातील पत घसरून विदेशी कर्ज मिळणे अवघड झाले. म्हणून १९९१ मध्ये भारतात 'आर्थिक संकट' उद्भवले. त्यातून बाहेर पडण्यासाठी भारताने जागतिक बँक व आंतर राष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या संस्थांनी विदेशी व्यापार मुक्त करणे, रुपयाचे अवमूल्यन करणे, परकीय भांडवलास भारतात मुक्त प्रवेश देणे, अनुदानात कपात करणे, आयात-निर्यात कर कमी करणे इत्यादी अटी भारतावर घातल्या. या अटींनुसार नरसिंहराव सरकारने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर करून त्यामध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या प्रक्रियांचा स्वीकार केला. त्यानुसार अनेक उद्योग परवानामुक्त केले. भारतीय उद्योगात परकीय गुंतवणुकीस परवानगी दिली. जकात दर कमी केले. निर्यातीवरील निर्बंध उठवून आयात मुक्त केली. रूपया टप्याटप्याने परिवर्तनीय केला. सार्वजनिक उद्योगांचे व बँकांचे खाजगीकरण केले. त्यांच्यावरील निर्बंध उठविले. विदेशी बँकाना भारतात प्रवेश दिला. भांडवल व नाणेबाजारत पारदर्शकता आणली. भारतीय कंपन्यांना परदेशात गुंतवणुकीस परवानगी दिली. या सर्व तरतुदींमुळे म्हणजेच उदारीकरण व खाजगीकरण यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. परिणामी भारतात जागतिकीकरणाचे जोरदार वारे वाहू लागले. आणि जागतिकीकरणाचा प्रभाव पडून भारतीय समाजात सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मोठी चालना मिळाली. जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील इष्ट तसेच अनिष्ट प्रभाव पडला आहे.

**इष्ट प्रभाव**

**१) कृषी उद्योगास चालना :** जागतिकीकरण, उदारिकरण व खाजगीकरण या प्रक्रियांमुळे भारतात ६ उद्योग सोडून बाकीचे सर्व उद्योग सुरू करण्यास खाजगी उद्योजकांना व परकीय कंपन्यांना परवानगी मिळाली. त्यामुळे अनेक उद्योजकांनी व परकीय कंपन्यांनी (पेप्सी, कोकाकोला, पिझ्झा, हच इ.) भारतात शेतीमालावर प्रक्रिया करून चिप्स, कुरकुरे, सॉस, शीतपेये, ज्यूस, आईस्क्रिम इत्यादींच्या उत्पादनाचे उद्योग काढले. त्यामुळे या खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग करणे, त्यांची विक्री करणे असे स्वयंरोजगार निर्माण झाले. त्यामुळे रोजगार वृद्धी तर झालीच शिवाय बटाटा, टोमॅटो, विविध फळे यासारख्या शेतीमालांचे उत्पादन वाढले.

२) **शेतीमालाच्या निर्यातीत वृद्धी :** जागतिकीकरणात निर्यातीवरील निर्बंध काढून टाकल्याने व निर्यात कराचे दरही कमी झाल्याने भारतातून कापूस, तांदूळ, गहू, चहा, कॉफी, ताग, फळे, फुले भाजीपाला, प्रक्रियायुक्त डबाबंद खाद्यपदार्थ यांची निर्यात वाढली. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा फायदा होऊ लागला.

३) **कृषी उद्योगास नवजीवन :** भारतात शेतीमालावर आधारलेले सूत,ताग, तेल, साखर, खाद्यपदार्थ इत्यादी उद्योग सहकारी क्षेत्रात आहेत. पण त्यापैकी अनेक उद्योग आज एकतर आजारी किंवा बंद पडले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले त्यामुळे आजारी किंवा बंद पडलेले हे सहकारी उद्योग खाजगी उद्योजकांनी चालविण्यास घेतले. त्यामुळे ग्रामीण भागातील सहकारी क्षेत्रातील अनेक उद्योगांना नवजीवन मिळाले.

४) **बँकिंग सुविधात वाढ :** जागतिकीकरणात परकीय बँकांना भारतात शाखा उघडण्यास परवानगी मिळाली. त्यांनी भारतातील मोठ्या शहरांत आपल्या शाखा सुरू केल्या. परिणामी देशी बँकांना स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे देशी बँकांनी आपल्या शाखा ग्रामीण भागात उघडणे सुरू केले. परिणामी ग्रामीण भागात बँकींग सुविधा वाढू लागल्या आहेत.

५) **दळणवळण सुविधांत वाढ :** जागतिकीकरणामुळे भारतात दळणवळण क्षेत्रात क्रांती घडून आली. टपाल, दूरध्वनी, मोटार, विमान या सेवांचे अत्याधुनिकीकरण व विस्तारीकरण झाले. टेलिफोन, आयएसडी, एसटीडी, मोबाईल इत्यादींचे देशभर झाळे विणले गेले. ग्रामीण भागातही ह्या सुविधा उपलब्ध झाल्या. त्यामुळे ग्रामीण लोकांना देशाविदेशातील लोकांशी संपर्क साधता येऊ लागला. मोबाईल कंपन्यातील स्पर्धेमुळे मोबाईल सेवा स्वस्त होऊन तिचा लाभ ग्रामीण भागातील सामान्य व्यक्तीसही होऊ लागला. थोडक्यात दळणवळण सुविधा वाढल्यामुळे भारतीय खेड्यांचे संपर्कक्षेत्र मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे.

**जागतिकीकरणाचा अनिष्ट प्रभाव :**

१) ***लहान शेतकऱ्यांचा तोटा :*** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्पादन वाढवून व त्याची निर्यात करून नफा कमाविणे केवळ मूठभर बड्या शेतकऱ्यांनाच शक्य आहे. बहुसंख्य भारतीय शेतकरी हे अल्पभूधारक, अडाणी, गरीब व परंपरागत तंत्राने शेती करणारे असल्याने त्यांची शेती तोट्यात आहे. बी-बियाणांचे पेटंट, खते व जंतुनाशके यांच्या अनुदानातील कपात व मजूरीचे वाढते दर इत्यादीमुळे शेती उत्पादन खर्च वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे. त्यामुळे त्यांना जागतिकीकरणाचा फायदा उठविणे शक्य होत नाही. उलट जागतिकीकरणामुळे त्यांची शेती तोट्यात गेली आहे म्हणून ते आत्महत्या करू लागले आहेत असे जागतिकीकरणाचे विरोधक म्हणतात.

२) ***निर्यातीत अडथळे :*** जागतिकीकरणामुळे शेतीमालाची निर्यात वाढून शेतकऱ्यांचा व पर्यायाने ग्रामीण समाजाचा फायदा होऊ शकतो हे खरे. परंतु शेतीमालाच्या निर्यानीत कांही राष्ट्रांकडून अडथळे

आणले जात आहेत. उदा. अधिक प्रमाणात जंतुनाशके फवारली जातात म्हणून मध्यपूर्वेतील राष्ट्रांनी आंबे, संत्री, द्राक्षे इत्यादी फळांची आयात रोखून धरली. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. भारतीय शेतीमालाची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय मानकांच्या कसोटीस उतरत नाही. शिवाय भारतात विशेषतः ग्रामीण भागात वाहतूक, सुसज्ज बंदरे, साठवणूक, पॅकेजिंग इत्यादी सुविधांची कमतरता आहे. त्यामुळे निर्यात वाढीस मर्यादा पडतात. त्यामुळे उत्पादन वाढविले तरी शेतकऱ्यांचा फायदा होईलच असे नाही.

३) **अन्नधान्यांच्या किंमतीत वाढ :** जागतिकीकरणात फळे, फुले, भाजीपाला, तांदूळ, गहू अशा कांही मोजक्याच पिकांची निर्यात करून नफा कमावणे शक्य झाले आहे. त्यामुळे बागाईतदार शेतकरी व शेती करणाऱ्या कंपन्या ह्या केवळ अशीच पिके घेण्यावर भर देऊ लागल्या आहेत. त्यामुळे तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया इत्यादींचे उत्पादन कमी होऊन त्यांच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यामुळे गोरगरिबांना जगणे मुश्किल झाले आहे. शिवाय पिकांच्या बाबतीतील जैविक विविधता कमी होत आहे.

४) **पर्यावरणाची समस्या :** जागतिकीकरणामुळे उद्योजक व बहुराष्ट्रीय कंपन्या जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविवेकी व अतिरेकी वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन न करता बेसुमार जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे हवा, पाणी, जमीन यांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

५) **आर्थिक विषमता :** जागतिकीकरणामुळे उद्योग, व्यापार, रोजगार यांच्या संधी वाढल्या आहेत. पण ह्या संधींचा लाभ केवळ शहरातील उच्चशिक्षित वर्गाला होऊन त्यांच्या हाती भरपूर पैसा येऊ लागला आहे. याउलट ग्रामीण भागातील अशिक्षित व गरिब लोक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. दारिद्र्य, बेकारी, कुपोषण ह्या समस्यांनी ते हैराण झाले आहेत. म्हणजेच जागतिकीकरण हे आर्थिक विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे.

६) **ग्रामीण बेकारीत वाढ :** जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांची उत्तम दर्जाची उत्पादने भारतीय बाजारपेठेत मुबलक प्रमाणात आली आहेत. परकीय कंपन्यांनी जाहीरातीच्या जोरावर भारतीय बाजारपेठ काबीज केली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लघुउद्योग व कुटिरोद्योगांना परकीय कंपन्यांशी स्पर्धा करणे अशक्य होऊन त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. परिणामी या उद्योगातील ग्रामीण कारागीरांवर बेकारीची पाळी आली आहे.

७) **मूल्ये व सवयीत बदल :** जागतिकीरणामुळे ग्रामीण लोकांची मूल्ये, सवयी, दृष्टिकोन इत्यादीत बदल होत आहे. पाश्चात्त्य संस्कृतीतील चंगळवाद, भोगवाद, व्यक्तीवाद, इत्यादींचा प्रभाव ग्रामीण लोकांवरही हळूहळू पडू लागला आहे. तसेच ग्रामीण भागातील तरूण वर्ग खाणेपिणे, वेशभूषा, केशभूषा इत्यादी बाबतच्या आरोग्यास घातक असणाऱ्या सवयींच्या आहारी चालला आहे. उदा. कोल्ड्रिंक्स, फास्टफूड, मद्यपान, धुम्रपान, भारतीय हवामानाशी विसंगत पोषाख करणे, कर्ज काढून चैन करणे इत्यादी.

अशाप्रकारे जागतिकीकरणाचा इष्ट–अनिष्ट प्रभाव भारतीय ग्रामीण समाजावर पडत आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

### अ) बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions)

१. कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार पंचायत राज्यपद्धती स्थापन करण्यात आली आहे?

अ) मेहता समिती ब) कृष्णमाचारी समिती

क) राधाकृष्णन समिती ड) यापैकी एकही नाही.

२. पंचायत समितीचा सचिव कोण असतो?

अ) मुख्य कार्यकारी अधिकारी ब) गट विकास अधिकारी

क) उपमुख्य कार्यकारी अधिकारी ड) तहसिलदार

३. भारतातील हरितक्रांतीचा जनक कोण आहे?

अ) पंडीत नेहरू ब) डॉ. स्वामीनाथन क) विनोबा भावे ड) गुन्नर आणि मिर्डाल

४. जागतिकीकरणात राज्याचे कोणत्या धोरणाकडे दुर्लक्ष होत चालले आहे.

अ) लोकशाही ब) खाजगीकरण क) कल्याणकारी ड) यापैकी एकही नाही.

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. (Answer in one sentence)

१. पंचायत राज्यपद्धतीमध्ये कोणत्या तीन प्रातिनिधीक संस्था स्थापन केलेल्या आहेत?

२. जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख कोण असतो?

३. हरितक्रांती सर्वप्रथम कोणत्या राज्यात घडून आली?

४. जागतिकीकरणाची कोणतीही एक व्याख्या द्या.

## ४.५ सारांश (Let us Sum up)

ह्या चौथ्या अध्ययन घटकांत तुम्ही भारतीय ग्रामीण समाजात नियोजनबद्धपणे परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेल्या उपाययोजना अभ्यासलेल्या आहेत. सर्वप्रथम तुम्ही जमीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत केलेले विविध कायदे उदा. जमीनदारी निर्मूलन कायदे, कुळकायदे, कमाल जमीन धारणा कायदे, तुकडेबंदी व तुकडेजोड कायदे आणि सहकारी शेतीसंस्थासंबंधीचे कायदे समजावून घेतलेले आहेत. त्यानंतर हरितक्रांतीची कारणे व परिणाम अभ्यासलेले आहेत. तसेच हरितक्रांतीमुळे ग्रामीण समाजात निर्माण झालेल्या समस्याही समजावून घेतलेल्या आहेत. त्यानंतर तुम्ही ग्रामीण कारभार पाहणाऱ्या पंचायत राज्यव्यवस्थेतील

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तीन प्रातिनिधीक संस्थांची रचना व कार्ये समजावून घेतलेली आहेत. तसेच पंचायत राज्यामुळे ग्रामीण समाजात घडून आलेल्या परिवर्तनाचेही स्वरूप अभ्यासलेले आहे. सर्वात शेवटी जागतिकीकरणाची व्याख्या, वैशिष्ट्ये व त्याचा ग्रामीण समाजावरील इष्ट तसेच अनिष्ट प्रभाव समजावून घेतलेला आहे.

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check our progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) अ  २) ब  ३) ब  ४) क

**ब) एका वाक्यात उत्तरे**

१. हरितक्रांती सर्वप्रथम पंजाब राज्यात घडून आली.

२. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत ह्या तीन प्रातिनिधीक संस्था पंचायत राज्यपद्धतीत स्थापन केल्या आहेत.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असतो.

४. दिपक नय्यर यांच्या मते एखाद्या देशाचे आर्थिक व्यवहार त्या देशाच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

## ४.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. हरितक्रांतीची कारणे व परिणाम विशद करा.

२. जिल्हा परिषदेची रचना व कार्ये स्पष्ट करा.

३. ग्रामपंचायतीची रचना व कार्ये स्पष्ट करा.

४. जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावरील प्रभाव विशद करा.

५. दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमांचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

२. पंचायत राज्याचे मूल्यमापन

३. पंचायत समिती

४. जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये

## ४.८ चिंतन आणि कार्ये (Reflection and Action)

- तुमच्या जवळपासच्या एखाद्या खेड्यास भेट द्या. आणि तेथे होत असलेल्या नियोजनबद्ध परिवर्तनाचे स्वरूप समजावून घ्या व त्याआधारे एक टिपण तयार करा.
- तुमच्या जवळपासच्या एखाद्या खेड्यात पाश्चात्य संस्कृतीतील कोणकोणत्या गोष्टींचा शिरकाव झाला आहे हे जाणून घ्या व त्या गोष्टींची एक यादी तयार करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००५) ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

२. नलिनी पंडीत (२००१) जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

३. Kiely Ray and Phil Marfket (1998) Globalization and the Third World, McMillan, London Routledge.

४. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२०१९), जागतिकीकरण आणि समाज, अक्षर दालन, कोल्हापूर


❑❑❑

सत्र २ : घटक १

# नागर समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना
# (Basic Concepts in Urban Sociology)

**अनुक्रमणिका**


१.१ प्रास्ताविक

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय-विवेचन

    १.३.१ परिस्थितीशास्त्र आणि समुदाय

    १.३.२ नागर समाजाची वैशिष्ट्ये

    १.३.३ पूर्व-औद्योगिक नगर आणि औद्योगिक नगर

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## **१.१ प्रास्ताविक** (Introduction)

या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात तुम्ही भारतातील नागर समाजाचा अभ्यास करणार आहात. त्यासाठी सर्वप्रथम तुम्ही नागर समाजशास्त्रातील कांही महत्त्वाच्या संकल्पना समजावून घेणार आहात. नागर समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी या संकल्पनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास;

- परिस्थितीशास्त्र व समुदाय या संकल्पना स्पष्ट करता येतील.
- नागर समाजाची वैशिष्ट्ये सांगता येतील.
- पूर्व-औद्योगिक नगर व औद्योगिक नगर ह्या संकल्पना समजावून घेता येतील.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

नागर समाजाच्या अभ्यासातील चार संकल्पना समजावून घेण्यासाठी या घटकाचे चार भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात परिस्थितीशास्त्र व समुदाय या संकल्पना स्पष्ट केल्या जातील. दुसऱ्या भागात नागर समाजाची वैशिष्ट्ये यांची चर्चा केली जाईल. तर तिसऱ्या भागात पूर्व-औद्योगिक नगर व औद्योगिक नगर या संकल्पनांचे स्पष्टीकरण केले जाईल.

### १.३.१ परिस्थितीशास्त्र व समुदाय

Ecology ही मूळची जीवशास्त्रातील संकल्पना आहे Ecology या इंग्रजी शब्दासाठी मराठीत परिस्थितीशास्त्र, परिस्थिती विज्ञान, परिसर विज्ञान इत्यादी शब्द रूढ आहेत. आपण Ecology साठी परिस्थितीशास्त्र ही संज्ञा वापरणार आहोत. परिस्थितीशास्त्र ही जीवशास्त्राची एक शाखा मानली जाते. तथापि, आज हा एक आतंरविद्याशाखीय विषय (Interdisciplinary subject) बनला आहे. कारण हा विषय जीवशास्त्राबराबेरच भूगोल, मानवशास्त्र, समाजशास्त्र, पर्यावरणशास्त्र इत्यादीशी संबंधीत आहे. याठिकाणी आपण परिस्थितीशास्त्र म्हणजेच ecology या संकल्पनेचा अर्थ समजावून घेणार आहोत.

- **परिस्थितीशास्त्राचा अर्थ :**

Ecology ही संज्ञा जर्मन जीवशास्त्रज्ञ अर्नेस्ट हॅकेल याने (Hackel) पर्यावरणाचा प्राण्यांवर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास या अर्थाने सर्वप्रथम वापरली. Ecology ही संज्ञा दोन शब्दापासून बनलेली आहे. जळ्ङ्गी म्हणजे घर (house) किंवा निवासस्थान (dwelling place) आणि Logos म्हणजे पद्धतशीर अभ्यास (systematic study) किंवा शास्त्र वा विज्ञान (Science) होय. यावरून व्युत्पत्तीशास्त्रीयदृष्ट्या परिस्थितीशास्त्र म्हणजे सजीवांच्या निवासाच्या स्थानाचा म्हणजेच त्यांच्या सभोवतालच्या परिसराचा किंवा परिस्थितीचा अभ्यास होय. अर्थात ecology ही संज्ञा कांही अभ्यासकांनी वेगळ्या अर्थाने वापरलेली दिसते. उदा. अर्थ कर्ट लेविन यांनी मानवाच्या जीवनकक्षेवर परिणाम करणाऱ्या मानसिक घटकांचा अभ्यास या अर्थाने ecology ही संज्ञा वापरली. कांही अभ्यासक ecology साठी Bionomics हा प्रतिशब्द

वापरतात. अलिकडे ecology साठी Environmental Science (पर्यावरणशास्त्र) हा प्रतिशब्द वापरला जाऊ लागला आहे.

● **परिस्थितीशास्त्राची व्याख्या :**

परिस्थितीशास्त्राचा अर्थ समजण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊ या.

**१) चंद्रकांत खंडागळे :** सावयवांमधील तसेच सावयवी व त्यांचे भौतिक पर्यावरण यांच्यातील आंतरक्रिया व आंतरसंबध यांचा वैज्ञानिक अभ्यास म्हणजे परिस्थितीशास्त्र होय. (Ecology is the scientific study of the interactions and interrelations among organisms and between the organisms and their physical environment)

**२) विल्यम स्कॉट :** विशिष्ट पर्यावरणात राहणाऱ्या सावयवांमधील आंतरसंबध तसेच सावयवांची परस्परांशी व त्यांच्या पर्यावरणाशी असणारी तडजोड यांचा अभ्यास म्हणजे परिस्थितीशास्त्र होय. (Ecology is the study of the interelationships among organisms living in a particular environemnt, their adjustment to each other and to their environment.)

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, परिस्थितीशास्त्र म्हणजे सावयवी (अवयवयुक्त असे परिपूर्ण जीव) व त्यांचे भौतिक पर्यावरण यांच्यातील आंतरक्रिया व आंतरसंबंध यांचा वैज्ञानिक अभ्यास होय. एखाद्या विशिष्ट भौतिक वा भौगोलिक पर्यावरणात राहणारे सजीव (म्हणजेच वनस्पती व प्राणी) हे परस्परांशी तसेच आपल्या पर्यावरणाशी कसे अनुकूलन, समायोजन किंवा तडजोड साधतात याचा अभ्यास परिस्थितीशास्त्रामध्ये होतो.

● **परिस्थितीशास्त्राच्या शाखा** (Branches of Ecology) :

वनस्पती व प्राणी यांचा सावयवांमध्ये म्हणजे सजीवांमध्ये (living beings) समावेश होतो. त्यामुळे परिस्थितीशास्त्राचे २) वनस्पतीचे परिस्थितीशास्त्र (Plant ecology) आणि २) प्राण्यांचे परिस्थितीशास्त्र (Animal ecology) असे मुख्य दोन विभाग किंवा शाखा पडतात. पहिल्या शाखेत वनस्पती व त्यांचे पर्यावरण यांच्यातील तर दुसऱ्या शाखेत प्राणी व त्यांचे पर्यावरण यांच्याती आंतरक्रिया व आंतरसंबंध अभ्यासले जातात. मानव हा देखील एक प्राणीच आहे. त्यामुळे मानवाचे परिस्थितीशास्त्र (Human Ecology) अशी एक उपशाखा प्राण्यांच्या परिस्थितीशास्त्राची मानता येते.

अमेरिकन समाजशास्त्र **रॉबर्ट पार्क** यांनी सर्वप्रथम मानव परिस्थितीशास्त्र ही संज्ञा वापरली. **पार्क व बर्जेस** यांनी आणि पुढे **मॅकंझी** या तीन समाजशास्त्रज्ञांनी मानव परिस्थितीशास्त्राचा विकास घडवून आणला. मानवाच्या सर्व प्रकारच्या विकासात (शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक) त्याच्या भौतिक पर्यावरणाचे योगदान वा भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे मानवाच्या विकासाचे अध्ययन करताना मानवाच्या जीवनावर त्याच्या पर्यावरणाचा पडणारा प्रभाव अभ्यासणे आवश्यक ठरते. यातूनच मानव व त्याचे पर्यावरण

यातील आंतरक्रिया व आंतरसंबंध यांच्या अभ्यासास उद्देशून '**मानव परिस्थितीशास्त्र**' ही संज्ञा वापरली जाते. लोकसंख्या, वसाहत, तंत्रविद्या, सामाजिक संघटन, पर्यावरण हे पाच मानव परिस्थितीशास्त्राचे प्रमुख पैलू आहेत.

कांही समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिस्थितीशास्त्र (Social ecology) ही समाजशास्त्राची एक शाखा मानली आहे. मानव समाज व त्याच्या सभोवतालचे पर्यावरण यांच्यातील आंतरक्रिया व आंतरसंबंध यांचा अभ्यास म्हणजे सामाजिक परिस्थितीशास्त्र होय. मानव समाज व त्याचे पर्यावरण यांचा एकमेकांवर मोठा प्रभाव पडत असतो. या परस्पर प्रभावाचा अभ्यास सामाजिक परिस्थितीशास्त्रात होतो. मानव समाजाचे आदिम समाज, ग्रामीण समाज व नागर समाज असे एक वर्गीकरण केले जाते. त्यामुळे सामाजिक परिस्थितीशास्त्राचे आदिम परिस्थितीशास्त्र (Tribal Ecology) ग्रामीण परिस्थितीशास्त्र (Rural Ecology) व नागर परिस्थितीशास्त्र (Urban Ecology) असे तीन विभाग वा शाखा पाडता येतात. समाज, मग तो आदिम, ग्रामीण वा नागर असो, त्याचे स्वरूप निर्धारीत करणारे जे विविध पर्यावरणीय घटक आहेत त्यांचा अभ्यास सामाजिक परिस्थितीशास्त्रात होतो. कोणत्याही समाजाच्या पर्यावरणातील हवामान, जलसंपत्ती, खनीजसंपत्ती, जमीन, वनस्पती, प्राणी इत्यादी घटक हे या समाजातील सदस्यांचे व्यवहार, आहार, निवासस्थान, वेशभूषा, वर्तनप्रकार, क्रीडाप्रकार, मनोरंजन साधने इत्यादीवर प्रभाव टाकीत असतात. तसेच हे सदस्य त्यांच्या सभोवतालच्या पर्यावरणावरही प्रभाव टाकीत असतात. समाज व त्याचे पर्यावरण यांचा परस्परावर जो प्रभाव पडतो, त्यांच्यात ज्या आंतरक्रिया घडतात, त्या प्रभावाचा व आंतरक्रियांचा अभ्यास सामाजिक परिस्थितीशास्त्रात होतो. मानवाने आपले जीवन सुखी करण्यासाठी वाहतूक, संप्रेषण, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी संदर्भातील सोयीसुविधा निर्माण केलेल्या आहेत. या सोयीसुविधांचाही मानवाच्या समाजजीवनावर मोठा प्रभाव पडत असतो. सामाजिक परिस्थितीशास्त्रात या प्रभावाचाही अभ्यास होतो. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे बहुतेक समाजशास्त्रज्ञ हे सामाजिक परिस्थितीशास्त्राऐवजी मानव परिस्थितीशास्त्र ही संज्ञा वापरताना दिसतात.

- **समुदाय** (Community) :

सामाजिक परिस्थितीशास्त्रज्ञ (Social ecologists) हे मानव किंवा मानव समाज आणि त्याचे पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास करताना समुदायाच्या अभ्यासावर विशेष लक्ष केंद्रीत करतात. कारण जेव्हा समुदाय हा अभ्यासाच विषय असतो तेव्हा परीस्थितीशास्त्रीय घटकांचा अधिक सहजपणे व कार्यक्षमतेने वापर करता येतो. म्हणून याठिकाणी आपण समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये थोडक्यात समजून घेणार आहोत.

- **समुदायाचा अर्थ :**

समूदाय हा शब्द community या इंग्रजी शब्दाचे मराठी रूप आहे. Community हा इंग्रजी शब्द लॅटीन भाषेतील com म्हणजे एकत्र (together) आणि munis म्हणजे सेवा (service) या दोन

शब्दापासून बनला आहे. त्यामुळे व्युत्पत्तीशास्त्रीयदृष्ट्या community म्हणजे एकत्रीतपणे परस्परांची सेवा करणेसाठी (to serve together) निर्माण झालेला मानवी समूह असा अर्थ होतो. व्यवहारात समुदाय ही संज्ञा बऱ्याचवेळा धर्म, जात, व्यवसाय इत्यादीच्या आधारे निर्माण झालेल्या समूहासाठी वापरली जाते. उदा. जैन समुदाय, मराठा समुदाय, शिक्षक समुदाय इत्यादी. अशा समुदायाच्या सदस्यांचे परस्परसंबंध हे केवळ एखाद्याच हितसंबधापुरते मर्यादित असतात. समाजशास्त्रात समुदायाचा हा व्यावहारिक अर्थ मान्य केला जात नाही. समाजशास्त्रीयदृष्ट्या एखाद्या समुदायाच्या सदस्यांचे परस्परसंबध हे सर्व प्रकारच्या हितसंबंधाशी निगडीत असतात. जर्मन समाजशास्त्रम **फर्डिनंड टोनीज** यांनी समाजाचे प्रकार स्पष्ट करताना ''घनिष्ठ अशा प्राथमिक संबंधाचे प्रभुत्व असलेल्या समाजासाठी'' Gemeinschaft (म्हणजे Community) ही जर्मन संज्ञा प्रथम वापरली. समुदायाचा समाजशास्त्रीय अर्थ समजण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊ या.

**१) चंद्रकांत खंडागळे** – समुदाय हा आम्हीपणाची भावना असलेला आणि निश्चित अशा भौगोलिक प्रदेशात राहणारा मानवाचा समूह असून त्यामध्ये त्यांच्या किमान गरजांची व हितसंबंधांची पूर्तता होत असते. (A commnity is a group of human beings having the we-feeling and living in a certain geographical area within which minimum of their needs and interests are fulfilled)

**२) किंग्जले डेव्हिस :** समुदाय हा सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांना सामावून घेऊ शकणारा लहानात लहान असा प्रादेशिक समूह आहे. (A community is the smallest territorial group that can embrace all aspects of social life).

**३) ऑग्बर्न व निमकॉफ :** एका मर्यादित भूप्रदेशातील सामाजिक जीवनाचे संपूर्ण संघटन म्हणजे समुदाय होय. (A community may be thought of as the total organization of social life within a limited area)

समाजशास्त्रीयदृष्ट्या जमात (Tribe), खेडे (Village), शहर (City), राष्ट्र-राज्य (Nation-state), इत्यादी समुदाय ठरतात. काहीजण तर संपूर्ण जग हा देखील एक समुदाय मानतात.

- **समुदायाची वैशिष्ट्ये** :

समुदाय ही संकल्पना अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी समुदायाची वैशिष्ट्ये समजावून घेऊ या.

**१) निश्चित भौगोलिक क्षेत्र :**

प्रत्येक समुदायास निश्चित असे भौगोलिक क्षेत्र असते. या क्षेत्रामुळे एक समुदाय दुसऱ्या समुदायापासून वेगळा असल्याचे लक्षात येते. या भौगोलिक क्षेत्रातील हवा, पाणी, मृदा, खनीजसंपत्ती, पशुपक्षी, वनस्पती इत्यादींचा समुदायातील लोकांच्या जीवनावर प्रभाव पडत असतो. समुदायाप्रमाणेच समाजासही निश्चित

भौगोलिक क्षेत्र असते. तथापि, समुदायाच्या क्षेत्रापेक्षा समाजाचे क्षेत्र अधिक विशाल असते. एखाद्या समाजात अनेक समुदाय समाविष्ट असतात. शिवाय समाज हा अमूर्त असतो तर समुदाय हा मूर्त असतो.

**२) समुदाय भावना :**

कोणत्याही समुदायातील सदस्यात एकतेची भावना असते. समान भौगोलिक क्षेत्रात राहात असल्याने त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा, सहकार्य निर्माण होते व त्यातूनच आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण होते. या भावनेसच समुदाय भावना असे म्हणतात. समुदाय भावनेमध्ये पुढील तीन तऱ्हेच्या भावना मिसळलेल्या आढळतात. १) आम्हीपणाची भावना (We-feeling), २) कार्यभावना (Role feeling) व ३) अवलंब भावना (Dependency feeling). आम्हीपणाची भावना म्हणजे आपण सर्व एक आहोत ही भावना होय. कार्यभावना म्हणजे आपले कार्य हे समुदायाच्या कार्याचाच एक भाग आहे असे मानण्याची भावना होय. तर अवलंबन भावना म्हणजे आपण गरजापूर्तीसाठी समुदायावर अवलंबून आहोत ही भावना होय.

**३) अनिश्चित आकार :**

किंग्जले डेव्हिसने समुदायास सर्वात लहान समूह मानले आहे. तथापि, समुदायाचा आकार निश्चित नसतो. कांही समुदाय (उदा. जमात किंवा खेडेगांव) लहान तर कांही (उदा. नगर वा महानगर) मोठ्या आकाराचे असतात. एखाद्या मोठ्या समुदायात अनेक लहान समुदाय सामावलेले असू शकतात. उदा. एखादे राष्ट्र हा मोठा समुदाय असून त्यामध्ये अनेक प्रांत अंतर्भूत असतात. एखाद्या प्रांतात अनेक शहरे अंतर्भूत असतात.

**४) सर्वसमावेशक स्वरूप :**

समुदायाचे स्वरूप सर्वसमावेशक असे असते. त्यामध्ये सामाजिक जीवनाची सर्व अंगे समाविष्ट असतात. त्यामुळे सदस्यांच्या किमान गरजांची व हितसंबंधांची पूर्तता समुदायात होत असते. म्हणून व्यक्ती आपले संपूर्ण जीवन समुदायात व्यतीत करू शकतात.

**५) स्वयंपूर्णता आवश्यक नाही :**

समुदाय सर्वसमावेशक असतो. पण याचा अर्थ असा नव्हे की, तो स्वयंपूर्ण असतो. समुदाय स्वयंपूर्ण असणे गरजेचे नाही. पारंपारिक भारतीय खेडी ही अलगतेमुळे बरीचशी स्वयंपूर्ण होती. आजच्या काळात मात्र कोणताच समुदाय हा स्वयंपूर्ण राहिलेला नाही. आज प्रत्येक समुदाय इतर समुदायांवर अवलंबून आहे.

**६) नैसर्गिक निर्मिती :**

एखाद्या मंडळाप्रमाणे समुदाय हा मानवनिर्मित नसतो. तर विशिष्ट भूक्षेत्रात राहणाऱ्या लोकांच्या परस्परसंबंधातून समुदायाची नैसर्गिकपणे निर्मिती किंवा उदय होत असतो.

**७) संघटन :**

समुदायामध्ये संघटन (organization) असते. संघटनामुळेच समुदाय दीर्घकाळ टिकून राहतो. समुदायातील सदस्यांच्या वर्तनाचे कांही नियम केले जातात व सदस्य ते नियम पाळतात की नाही हे पाहणारी एक यंत्रणाही असते. त्यामुळेच समुदायाचे अस्तित्व व सातत्य टिकून राहाते.

**८) स्थायी समूह :**

समुदाय हा स्थायी समूह आहे. निश्चित भूप्रदेश, आम्हीपणाची भावना व संघटन या तीन गोष्टीमुळे समुदायास स्थायी स्वरूप प्राप्त होते.

**९) मूर्त स्वरूप :**

समुदाय मूर्त स्वरूपाचा समूह आहे. निश्चित भूक्षेत्रामुळे एखादा समुदाय कोठे सुरू होतो व कोठे संपतो हे लक्षात येते. म्हणून तो मूर्त ठरतो.

**१०) विशिष्ट नाव :**

प्रत्येक समुदायास विशिष्ट नाव असते. त्या नावामुळे त्यास इतराहून वेगळी ओळख प्राप्त होते. लुमले यांच्यामते समुदायास स्वत:चे असे खास व्यक्तीमत्त्वही असते व त्या व्यक्तिमत्त्वात समुदायाच्या रूढी परंपरांचा समावेश होतो.

**परिस्थितीशास्त्र व समुदाय** (Ecology and Communicy) :

सामाजिक परिस्थितीशास्त्रज्ञ हे जेव्हा परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोनातून समुदायाचा अभ्यास करतात तेव्हा ते समुदायास कायदेशीर किंवा प्रशासकीय घटक वा एकक (unit) न मानता समाजशास्त्रीय एकक मानतात. कोणत्याही सामाजिक घटनेचे क्षेत्रीय विभाजन कसे आहे हे अभ्यासण्यात परिस्थितीशास्त्रज्ञांना विशेष रस (interest) असतो. उदा. समुदायाच्या कोणत्या भागात चोरी, मारामारी, बलात्कार असे गुन्हे घडतात, कोणत्या भागात उच्च व निम्न वर्गाचे लोक राहतात, समुदायाच्या कोणत्या भागात अल्पसंख्यांक समूह वास्तव्य करतात यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यात परिस्थितीशास्त्रज्ञ विशेष रूची दाखवितात. परिस्थितीशास्त्रज्ञ हे क्षेत्रीय संबधास सामाजिक संबंधाचे निर्देशांक (index) मानतात. यंग आणि मॅक यांच्या मते, परिस्थितीशास्त्रज्ञ समाजरचना समजावून घेतात, मानवी कृतींच्या क्षेत्रीय संरचनेवर अधिक लक्ष केंद्रीत करतात. परिस्थितीशास्त्रीयदृष्ट्या समुदायात केंद्रीय क्षेत्र (focal area) व सभोवतालच्या प्रदेश यांचा समावेश होतो. समुदायाचा आकार हा त्याच्या आर्थिक व सामाजिक प्रभावामुळे निश्चित होत असतो. परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोन हा समाजशास्त्रज्ञाबरोबरच अर्थशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक लोक, सामाजिक नियोजन संस्था इत्यादी देखील पसंत करताना दिसतात.

परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोनातून समुदायाचा अभ्यास करण्याची रीत अमेरिकन समाजशास्त्रज्ञांनी लोकप्रिय केली. **विसकॉनसिन** (wisconsin) नावाच्या कृषक खेड्याचा अभ्यास करताना **सी. जे. गालपिन** यांनी सर्वप्रथम परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. आधुनिक नागरी समाजाच्या अभ्यासासाठी हा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे. परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोनातून केले जाणारे समुदायाचे अभ्यास हे नागरी पर्यावरणातील संधी व मर्यादा, उद्योगातील पर्यावरण, उद्योगाचे स्थान, उद्योगामुळे कौटुंबिक व स्थानिक संबंधांवर येणाऱ्या मर्यादा इत्यादीच्या संदर्भात लोकांच्या परस्परसंबंधांशी निगडीत आहेत. अमेरिकेतील शिकागो संप्रदायातील पार्क व बर्जेस या समाजशास्त्रज्ञांनी परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोनाच्या संदर्भात संस्थापक स्वरूपाचे कार्य केलेले आहे. त्यानंतर **मॅकंझी** यांनी सामाजिक परिस्थितीशास्त्राची मूलतत्त्वे सांगून परिस्थितीशास्त्रास समाजशास्त्राची एक महत्त्वपूर्ण शाखा बनविले. आज परिस्थितीशास्त्रीय दृष्टिकोन हा शिकागो संप्रदायाबाहेरही लोकप्रिय झालेला आहे.

## १.३.२ नागर समाजाची वैशिष्ट्ये

**अर्थ व व्याख्या :**

नागर समुदाय हा मानवी समाजाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा आहे. आधुनिक काळात नागर समाजास अनेक दृष्टीने खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि प्राचीन काळापासून मानव समाजात नगरे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. नगर हा शब्द city (सिटी) या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. city हा शब्द लॅटीन भाषेतील civitous (सिविटॉस) या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'नागरीकता' असा आहे. तथापि यावरून नगर म्हणजे काय याचा स्पष्ट बोध होत नाही. नगर म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर मोठा आकार, दाट लोकवस्ती, पक्की व उंच घरे, माणसांची गर्दी, वाहतूक साधनांनी गजबजलेले रस्ते, विविध उद्योगधंदे, बाजारपेठा, व्यवसाय, शिक्षण प्रशिक्षण संस्था, धर्मस्थळे, करमणुकीची साधने यासारख्या असंख्य गोष्टी उभारतात. तरी परंतु नगराची सर्वसामान्य अशी समाजशास्त्रीय व्याख्या करणे कठीण आहे. वेगवेगळे निकष वापरून व्याख्या करण्याचे प्रयत्न केले जातात. ते निकष पुढीलप्रमाणे :

**१) लोकसंख्या :** जास्त लोकसंख्येच्या वस्तीस नगर असे म्हणतात. पण ही व्याख्या समाधानकारक नाही. कारण वेगवेगळ्या देशात याबाबत वेगवेगळी स्थिती आढळते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेत २५००, भारतात ५००० तर नेदरलँडमध्ये २००००, तर डेन्मार्कमध्ये केवळ २५० लोकसंख्येच्या वस्तीला नगर मानले जाते. लोकसंख्येची घनता विचारात घेऊन बऱ्याचवेळा लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या वस्तीला नगर म्हटले जाते. परंतु नेमक्या किती लोकसंख्येच्या घनतेच्या आधारावर खेडे व शहर यामध्ये भेद करावा हे ठरविण्यात अडचण येते. कारण ऑस्ट्रेलिया न्यूझिलंड यासारख्या देशातील कांही नगरामध्ये लोकसंख्येची घनता केवळ १० आहे तर कांही नगरात ती ३५० इतकी आहे. भारतात कमीत कमी ४०० इतकी लोकसंख्येची घनता नागर समुदायासाठी आवश्यक मानली आहे.

२) **व्यवसाय :** व्यवसाय हा निकष लावून बिगरशेती व्यवसाय असणाऱ्या वस्तीस नगर म्हटले जाते. यासंदर्भात डब्ल्यू. एफ. विलफॉक्स म्हणतात, 'जेथे निर्वाहाचा प्रमुख आधार शेती असतो ते खेडे व जेथे शेती व्यवसाय अजिबात नसतो ते शहर होय' पण ही व्याख्या ही निर्दोष नाही. कारण कांही देशातील अनेक लहान लहान खेड्यात बिगरशेती व्यवसाय चालतो. मग त्यांना नगर म्हणावयाचे काय?

३) **पर्यावरण व जीवनपद्धती :** या निकषांच्या आधारे खेडे व नगर यामध्ये भेद केला जातो. खेड्यातील पर्यावरण नैसर्गिक असते तर शहरात मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव असतो असे म्हटले जाते. तसेच खेड्यापेक्षा शहरातील जीवनपद्धती अधिक पुढारलेली किंवा सुधारलेली (उर्ळींळश्रळूशव) असते असाही फरक सांगितला जातो. तथापि अशी तुलना योग्य ठरत नाही. मॅकायव्हर म्हणतात त्याप्रमाणे ग्रामीण समुदाय कोठे संपतो व नागर समुदाय कोठे सुरू होतो यांमध्ये निश्चित सीमारेषा आखणे अवघड आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत शहरालगतच्या खेड्यांमध्ये नागरी जीवनपद्धतीचा शिरकाव झाला असून तेथेही मानवनिर्मिती वा कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव वाढत आहे. याउलट मोठमोठ्या शहरातील झोपडपट्ट्या व गरिबांच्या वस्त्यांमध्ये ग्रामीण जीवन पद्धतीची लक्षणे आढळतात. सारांश शुद्ध ग्रामीण व शुद्ध नागरी असे समुदाय आज दिसून येत नाहीत.

थोडक्यात नागर समुदायाची व्याख्या करणे अवघड आहे. तथापि कांही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** साधारणपणे मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातिय स्वरूपाची लोकसंख्या, बिगरशेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व करमणूक सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा अधिक प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नगर किंवा नागर समुदाय असे म्हणतात.

२) **लेवीस ममफोर्ड :** इतिहासावरून हे स्पष्ट होते की नगर असे केंद्र आहे की जेथे समुदायातील अधिकतम शक्ती व संस्कृतीचे केंद्रीकरण झालेले असते. शहर हे सामाजिक संबंधाच्या समग्रतेचे प्रतिक व स्वरूप असते. ते धर्म, व्यवसाय, न्याय व ज्ञान यांचे महत्त्वपूर्ण केंद्र असते.

३) **थियोडार्सन आणि थियोडार्सन :** नगर म्हणजे असा समुदाय की ज्यामध्ये लोकसंख्येची घनता अधिक असते, बिगरशेती व्यवसायांना प्राधान्य असते, संकीर्ण श्रमविभाजनातून उदयास आलेले उच्च दर्जाचे विशेषीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची औपचारीक व्यवस्था आढळते. या व्याख्येत शहराची प्रमुख वैशिष्ठ्ये स्पष्ट झाली आहेत.

४) **भारताच्या १९९१ च्या जनगणना अहवालानुसार** 'जेथे नगरपालिका, महानगरपालिका, कँटोनमेंट बोर्ड आहे, किमान लोकसंख्या ५००० व काम करणाऱ्या पुरुषांपैकी शे. ७५ पुरुष बिगरशेती व्यवसायात असून लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. ला किमान ४०० आहे असे क्षेत्र नागरी समुदाय ठरते.'

याशिवाय नव्याने विकसित झालेले क्षेत्र, विकास प्रकल्पाच्या निमित्ताने स्थापन झालेल्या वसाहती, रेल्वे वसाहती, महत्त्वाची पर्यटन केंद्रे यांचाही नागर विभागात समावेश केला जातो.

**नागर समाजाची वैशिष्ट्ये** (Characterstics of Urban Society) :

१) **मानवनिर्मित पर्यावरण :** नागर समाजावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. हा समुदाय निसर्गापासून कांहीसा दूर असल्याने त्याच्यावर नैसर्गिक घडामोडींचा प्रत्यक्ष प्रभाव फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान तंत्रज्ञानावर आधारलेल्या मानवनिर्मित कृत्रिम उपकरणांचा वापर करण्यावर विशेष भर देतात. ग्रामीण लोक पाण्याची गरज नदी, ओढा, तलाव याद्वारे भागवितात. याउलट शहरी लोक कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय करून ही गरज भागवितात. शहरात उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी पंखा-कूलर, एअरकंडिशन अशी कृत्रिम साधने वापरतात.

या मानवनिर्मित पर्यावरणाचा शहरी समाजावर परिणाम झालेला दिसतो. शहरी लोक अधिक जिज्ञासू व चिकित्सक बनलेले असतात. निसर्गात व समाजजीवनात घडणाऱ्या घटनांकडे ते वैज्ञानिक दृष्टीने पाहतात. घटना घटनांमधील कार्यकारण संबंध शोधण्याचा खटाटोप करतात. वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय व आतार्किक विचार व दैववादीवृत्ती इत्यादीपासून बऱ्याच प्रमाणात दूर असतात. विज्ञानवाद, बुद्धिवाद, प्रयत्नवाद इत्यादीच्या आधारे कृत्रिम पर्यावरण तयार करून आपले जीवन अधिक सुसह्य व समृद्ध बनविण्याचा प्रयत्न शहरी लोक करतात.

२) **बिगरशेती व्यवसाय :** नागर समाजातील लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. शहरात विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असतात. उद्योगधंदे, कारखाने, व्यापारपेठा, शिक्षणसंस्था, करमणूक केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था आणि शासकीय-निमशासकीय कार्यालये इत्यादींची शहरात रेलचेल असते. आणि या सर्वांमध्ये काम करून शहरी लोक आपला निर्वाह चालवित असतात. हे सर्व व्यवसाय बिगरशेती व्यवसाय म्हणून ओळखले जातात. शहरात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. अवजारे, खते, जंतुनाशके, कीटकनाशके इ. चे. उत्पादन करणारे व शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगही असतात. अशा उद्योगातही काही शहरी लोक गुंतलेले असतात. असे उद्योग ही बिगरशेती व्यवसायच ठरतात.

३) **मोठा आकार :** नागर समाज आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या तुलनेत जास्तच असते. शिवाय शहरात लोकसंख्येची घनता देखील जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो व कांही शहरात तर करोडो लोक दाटीवाटीने रहात असतात. शहरी समुदाय उद्योगधंद्याचे, व्यापाराचे, रोजगाराचे, शिक्षणाचे केंद्र असल्याने सभोवतालच्या भागातून लोक शहरात सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच कांहींना महानगराचे स्वरूप येते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहराचे आकारमान वाढण्यास मदत होते.

४) **सामाजिक विजातीयता :** नागर समाजात विजातीयता मोठ्या प्रमाणावर असते. विविध व्यवसायांची उपलब्धता व दळणवळणाची प्रगत साधने यामुळे देशाच्या विविध भागांतून भिन्न वंशाचे, भिन्न धर्मांचे, भिन्न जातींचे, भिन्न भाषेंचे व भिन्न संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची सामाजिक-सांस्कृतिक तसेच आर्थिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. अशा लोकांचे लहान लहान समूह शहरात अस्तित्वात येतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आचारविचार, श्रद्धामूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन व जीवनपद्धती इत्यादीबाबतीत विविधता निर्माण होते. लोकसंख्येतील या विविधतेलाच सामाजिक विजातीयता म्हणतात.

५) **सामाजिक सहिष्णुता :** नागर समाज सामाजिकदृष्ट्या विजातीय असला तरी देखील त्यामध्ये सामाजिक सहिष्णुता मोठ्या प्रमाणावर असते. मोठी लोकसंख्या व लोकसंख्येतील विविधता यामुळे शहरात व्यक्तीचा विभिन्न वंशाच्या, जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, वर्गाच्या लोकांशी संबंध अपरिहार्यपणे येत असतो. या सर्वांच्या आशाआकांक्षा आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती, मतेमूल्ये व आचारविचार भिन्न भिन्न असतात. तथापि आपले हितसंबंध साध्य करताना शहरी व्यक्तीला इतरांच्या मताबद्दल, चालिरीतीबद्दल, धर्मश्रद्धा व धर्माचरणाबद्दल सहिष्णुता दाखविणे भाग पडते. त्यांच्या कांही गोष्टी आपणाला पटत नसल्यातरी त्यांच्याबद्दल सामंजस्याचे धोरण ठेवावे लागते. इतरांच्या जातीधर्माचा, वंशाचा, भाषेचा, संस्कृतीचा, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा विचार न करता शहरी लोकांना परस्पराशी सहकार्य करावे लागते. एकत्र बसून खाणेपिणे, प्रवास, करमणूक व कामधंदा या गोष्टी कराव्या लागतात. लोकांच्या वैयक्तिक किंवा खाजगी जीवनात न डोकावण्याची वृत्ती ठेवावी लागते. यातूनच शहरी समुदायात सामाजिक सहिष्णुता निर्माण झालेली असते.

६) **दुय्यम संबंध :** नागर समाज हा दुय्यम समूह असतो. लोकसंख्या ही जास्त, दाट व विजातीय असल्याने लोकांच्या परस्परसंबंधात घनिष्ठता, निकटता व आत्मियता नसते. व्यक्ती परस्परांना नावाने परिचित नसतात. त्यांच्यात समोरासमोरचा संपर्क नसतो, त्यांच्यातील संबंध औपचारिक, कामापुरते, व्यक्तिनिरपेक्ष, करारात्मक व साधनरूप स्वरूपाचे असतात. परस्परसंपर्कासाठी वृत्तपत्रे, फोन, रेडिओ, टेलिव्हीजन अशा संपर्क साधनांचा वापर केला जातो. थोडक्यात शहरातील लोकांचे परस्परसंबंध प्राथमिक नसतात, तर दुय्यम स्वरूपाचे असतात. त्यामुळेच शहरी व्यक्ती प्रचंड गर्दीत राहूनही बऱ्याचदा एक प्रकारचा एकाकीपणा अनुभवीत असते.

७) **दुय्यम समूहांचे नियंत्रण :** नागर समाजातील लोकांचे संबंध दुय्यम स्वरूपाचे असल्याने त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण देखील दुय्यम समूहांकडूनच होत असते. शहरी लोकांच्या परस्परसंबंधात औपचारिकता, करारात्मकता, उपयुक्तता अधिक असल्याने कुटुंब, शेजार, आप्तजन यासारखे प्राथमिक समूह त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्यास अपूरे व असमर्थ ठरतात. तसेच लोकसंख्येतील विविधतेमुळे रुढी, प्रथा, परंपरा, धर्मश्रद्धा, मूल्ये यासारखी सामाजिक नियमने देखील कुचकामी ठरतात. त्यामुळेच व्यक्तीच्या वर्तनावर

नियंत्रण ठेवण्यासाठी दुय्यम समूहांवर अवलंबून रहावे लागते. शहरात कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग यासारख्या दुय्यम समूहांकडून सामाजिक नियंत्रणाचे कार्य औपचारिकपणे पार पाडले जाते.

८) **ऐच्छिक मंडळांची विपुलता :** नागर समाजात ऐच्छिक मंडळे मोठ्या प्रमाणावर असतात. आचार विचार, श्रद्धामूल्ये, आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती याबाबतीत शहरी लोकांमध्ये खूपच विविधता असते. ही विविधताच ऐच्छिक मंडळांच्या स्थापनेसाठी पूरक व पोषक ठरते. शहरातील या विविधतेतच समान आवडीनिवडी, अशाआकांक्षा, छंद, सवयी व हितसंबंध असणारे लोकही भरपूर असतात. असे लोक एकत्र येऊन ऐच्छिक मंडळे स्थापन करतात. राजकीय पक्ष, कामगार संघटना, सांस्कृतिक मंडळ, क्रीडा मंडळ, व्यायाम मंडळ, महिला मंडळ, तरुण मंडळ, वाङ्मय मंडळ, रोटरी क्लब व लायन्स क्लब यासारख्या ऐच्छिक मंडळांची शहरात रेलचेल असते. व्यक्ती आपल्या विविध हितसंबंधाची पूर्तता करण्यासाठी एकाच वेळी अनेक मंडळांचे सदस्यत्व स्वीकारते. शहरी कुटुंबाच्या रचनेत व कार्यात अलिकडे खूपच परिवर्तन घडून आल्याने कुटुंब पूर्वीसारखे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, व्यक्तिमत्त्व विकास याबाबतची कार्ये करण्यास समर्थ नाही. त्यामुळे या गरजांच्या पूर्ततेसाठी शहरी व्यक्तिंना ऐच्छिक मंडळावरच अवलंबून रहावे लागते. ही परिस्थिती देखील मंडळांच्या स्थापणेस कारणीभूत ठरते.

९) **व्यक्तिवाद :** नागरी समाजातील पर्यावरण व्यक्तिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य यांना पोषक असते. शहरात विभिन्न व्यवसाय, विभिन्न ऐच्छिक मंडळे आणि व्यक्तिमत्त्व विकासाची विविध साधने उपलब्ध असतात. व्यक्ती आपल्या आवडीनिवडीनुसार त्यांचा उपयोग करून स्वतःचा विकास घडवून आणू शकते. आपल्या अंगच्या गुणांच्या आधारे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवू शकते. व्यक्तीच्या विकासाच्या मार्गात जात, धर्म, रूढी, परंपरा, कुटुंब, कूल इत्यादींचा अडसर फारसा येऊ शकत नाही. व्यक्ती स्वतःचे निर्णय स्वतःच घेण्यास व घेतलेल्या निर्णयानुसार कृती करण्यास स्वतंत्र असते. आपल्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगू शकते. इतरांचा फारसा विचार न करता एक प्रकारचे स्वतंत्र व स्वयंकेंद्रित जीवन ती जगू शकते. सारांश शहरी पर्यावरण व्यक्तिमत्त्व विकासास अनुकूल असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनावर व्यक्तिवादाचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभाव आढळतो.

**१०) श्रमविभाजन व विशेषीकरण :** नागरी समाजात श्रमविभाजन व विशेषीकरणास मोठाच वाव असतो. औद्योगिक, तांत्रिक, व्यापार, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी सर्वच क्षेत्रात सूक्ष्म श्रमविभाजन दिसून येते. या विविध क्षेत्रात व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार विशिष्ट कार्ये करीत असतात. एकाच व्यवसायात अकुशल, अर्धकुशल, कुशल, तज्ज्ञ, विशेषज्ञ, असे अनेक सेवक काम करीत असतात. प्रत्येकजण एखाद्या विशिष्ट कामातील तज्ज्ञता मिळवण्यासाठी धडपडत असतो. उदा. वैद्यकीय व्यवसायात हृदयरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, दंतरोगतज्ज्ञ, नाक कान घसा तज्ज्ञ, छातीच्या रोगाचा तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ असे विशेषीकरण दिसून येते. हे श्रमविभाजन व विशेषीकरण व्यक्तीची बुद्धिमत्ता, पात्रता, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीवर आधारलेले असते.

**११) सामाजिक गतिशीलता :** नागर समाजात सामाजिक गतिशीलतेला मोठाच वाव असतो. व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषीकरण इत्यादीमुळे शहरात 'अर्जित दर्जाला' महत्त्व असते. त्यामुळे व्यक्तीला स्वकर्तृत्वाने आपल्या सामाजिक दर्जात किंवा सामाजिक स्तरात बदल घडवून आणता येतो. कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वप्रयत्नाने वरिष्ठ स्तरात जाऊ शकते. कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेली व्यक्ती सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण, कलाकौशल्ये, इत्यादीचे संपादन करून श्रेष्ठ दर्जा मिळवू शकते. क्लार्क असलेली व्यक्ती कलेक्टर होऊ शकते. परंतु याच्या उलट ही होऊ शकते. कर्तृत्वशून्य किंवा अकार्यक्षम व्यक्ती उच्च स्तरातून कनिष्ठ स्तरावर फेकली जाऊ शकते. रावाचा रंक होऊ शकतो. एकंदरीत शहरात सामाजिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर असते. दळणवळणाची प्रगत साधने आणि विविध व्यवसायांची उपलब्धता यामुळे गतिशीलतेस चालना मिळते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय वा नोकरी करणे शहरात शक्य असते. व्यक्तीला राहण्याची जागा, व्यवसाय व सामाजिक दर्जा इत्यादीत बदल करणे सोपे जाते.

**१२) क्षेत्रिय नियोजन :** नगरात मर्यादित जागेवर असंख्य लोक दाटीवाटीने राहतात. त्यातच शहराची लोकसंख्या सतत वाढत असते. त्यामुळे जागेची टंचाई निर्माण होते. त्यामुळे लोकांमध्ये राहण्यासाठी व व्यवसायासाठी जागा मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू होते. त्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे, केंद्रे, कार्यालये इत्यादींचे शहराच्या विभिन्न भागात नियोजन केले जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये, विविध व्यापारी केंद्रे यासारखी अत्यावश्यक सेवा व मूलभूत वस्तू पुरविणारी केंद्रे स्थापन झालेली असतात. डॉक्टर्स, वकिल, ऑडिटर्स, चार्टर्ड अकौंटंटस्, इत्यादी श्रेष्ठ व्यावसायिक शहराच्या मध्यवर्ती भागात व्यवसाय स्थापण्यावर भर देतात. त्यामुळे मध्यभागातील जागेची मागणी वाढून किंमती वाढतात. त्यामुळे लोक सभोवतालच्या भागात घरे बांधतात. त्यामुळे एकाच भागात राहणाऱ्या लोकांची जीवनपद्धती बरीचशी समान असते. शहरातील वस्तीस्थानांच्या भिन्नतेबरोबरच लोकांच्या जीवनपद्धतीतील भिन्नता चटकन लक्षात येते. शहरातील क्षेत्रिय नियोजनामुळे शहरी समाजाची रचना कशी आहे याची कल्पना येते.

### १.३.३ पूर्व–औद्योगिक नगर आणि औद्योगिक नगर (Pre-Industrial City & Industrial City)

नगरांचे विविध तऱ्हेने वर्गीकरण केले जाते. पूर्व–औद्योगिक नगर व औद्योगिक नगर असे एक वर्गीकरण आहे. **जोबर्ग जी. एस. (G. S. Joberg)** या समाजशास्त्रज्ञाने पूर्व–औद्योगिक नगर (Pre-Industrial City) या नावाचा ग्रंथ लिहून त्यामध्ये या दोन्ही प्रकारच्या नगरांचे विस्ताराने विवेचन केलेले आहे. या ठिकाणी आपण पूर्व–औद्योगिक नगर व औद्योगिक नगर या दोन्ही प्रकारच्या नगरांचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत.

**अ) पूर्व-औद्योगिक नगर :**

औद्योगिक क्रांती होण्याच्या पूर्वी म्हणजे मध्ययुगात जी नगरे होते त्यांना स्थुलमानाने पूर्व-औद्योगिक नगरे म्हणतात. या नगरांना जोबर्ग समाजाची सामित (मर्यादित) प्रणाली म्हणतो. त्याच्या मते पूर्व-औद्योगिक नगरांचा इतिहास सुमारे ३५०० वर्षे इतका आहे. त्याने पूर्व-औद्योगिक नगरांची तुलना औद्योगिक नगरांशी करून पूर्व-औद्योगिक नगरांचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

पूर्व-औद्योगिक नगराची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) लहान आकार :** आधुनिक काळातील औद्योगिक नगरांच्या तुलनेत पूर्व-औद्योगिक नगरांचा आकार लहान होता. कारण या नगरांची लोकसंख्या मर्यादित होती. तसेच नगरातील लोकसंख्येची घनता ही कमीच होती. अर्थात ही नगरे खेड्यापेक्षा आकाराने मोठी होती.

**२) औद्योगिकीकरणाचा अभाव :** पूर्व-औद्योगिक नगरात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया नव्हती. म्हणजे मोठमोठे उद्योगधंदे (Heavy industries) नव्हते. घरगुती उत्पादन पद्धती होती. या उत्पादनात मोठमोठी यंत्रे व आजच्या सारखी सुधारित तंत्रे (advanced techaneques) वापरली जात नव्हती. उत्पादनात साधासाधी यंत्रे व तंत्रे वापरली जात होती.

**३) जैवशक्तीचा वापर :** पूर्व-औद्योगिक शहरातील उत्पादन प्रक्रियेत यांत्रिकशक्तीऐवजी जैवशक्तीचा वापर होई. म्हणजे उत्पादन कार्य करण्यासाठी मानवी शक्तीचा (मानवी श्रमाचा) किंवा प्राण्यांच्या शक्तीचाच वापर होई. त्यामुळे उत्पादन खूपच मर्यादित प्रमाणात होत असे.

**४) विशेषीकरणाचा अभाव :** पूर्व-औद्योगिक नगरात सुक्ष्म-श्रमविभाजन (Micro Division of Labour) तसेच विशेषीकरण (Specialization) यांचा अभाव होता. घरगुती उत्पादन पद्धतीत कारागीर हाताने उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया पार पाडत. विशिष्टच कार्य किंवा विशिष्टच क्रिया-प्रक्रिया करणारे कारागीर नव्हते. अर्थात किरकोळ स्वरूपाचे श्रमविभाजन दिसून येई. पण त्यामध्ये आजच्यासारखी गुंतागुंत नव्हती.

**५) दळणवळणाची व वाहतुकीची अप्रगत साधने :** पूर्व औद्योगिक नगरात आजच्या सारखी दळणवळणाची व वाहतुकीची प्रगत साधने नव्हती. तर अत्यंत साधी वा अप्रगत साधने वापरली जात. घोडागाडी, बैलगाडी किंवा अन्य प्राणी यांचा वाहतुकीसाठी वापर केला जाई. वाहतुकीची यांत्रिक साधने (मोटार, रेल्वे, विमाने इ.) नसल्याने गडबड, गोंधळ, गोंगाट, वाहनांचा खडखडाट, वाहतुक खोळांबणे, ध्वनी प्रदूषण या समस्या नव्हत्या.

**६) सजातियता :** पूर्व-औद्योगिक नगरातील सामाजिक जीवनात सजातियता मोठ्या प्रमाणावर होती. विभिन्न व्यवसाय करणारे लोक अशा नगरांमध्ये होते हे खरे. तथापि त्यांचे आचार विचार, श्रद्धामूल्ये,

सामाजिक नियमने, जीवनविषयक दृष्टिकोण, भाषा, जीवनशैली इत्यादीमध्ये बऱ्याच प्रमाणात सारखेपणा होता.

**७) गतिशीलतेचा अभाव :** पूर्व-औद्योगिक नगरात व्यावसायिक व सामाजिक गतिशीलतेस फारसा वाव नव्हता. लोक आपल्या कुटुंबात पिढ्यानपिढ्या चालत आलेलाच व्यवसाय बहुधा करीत असत. कुटुंबाचा व्यवसाय सोडून नवीन व्यवसाय स्वीकारण्याचे धाडस सहसा करीत नसत. कारण रोजगाराच्या किंवा व्यवसायाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नव्हत्या. तसेच या नगरांमध्ये सामाजिक गतिशीलतेस फारसा वाव नव्हता. कारण व्यक्तीचा सामाजिक दर्जा रूढीपरंपरेनुसार निर्धारित होई व त्यामध्ये बदल करण्याची पुरेशी संधी उपलब्ध नसे.

**८) शिक्षणाचे अल्प प्रमाण :** पूर्व औद्योगिक नगरात शिक्षणाचे प्रमाण अल्प होते. कारण शैक्षणिक सुविधाच अल्प प्रमाणात होत्या. केवळ उच्च वर्गातील लोकांनाच शिक्षण उपलब्ध होते. सर्वसामान्य लोकांना शिक्षण घेण्याची गरज वाटत नव्हती. व्यावसायिक शिक्षण व्यक्तीला कुटुंबातच अनौपचारिकपणे वडिलधाऱ्या मंडळीकडून मिळत असे. आजच्यासारखी व्यवसाय शिक्षण देणारी प्रशिक्षण केंद्रे नव्हती.

**९) स्त्रियांचे निम्न स्थान :** पूर्व-औद्योगिक नगरात स्त्रियांचे सामाजिक स्थान निम्न होते. 'चूल व मूल' हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. स्त्रिया सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होत नसत. त्यांच्यावर रूढीपरंपरांची बंधने होते. घरगुती उत्पादनातील साध्यासाध्या क्रिया-प्रक्रियात स्त्रिया पुरुषांना मदत करीत. तथापि उत्पादनाची मुख्य जबाबदारी पुरुषांचीच मानली जाई.

**१०) सौम्य सामाजिक समस्या :** पूर्व-औद्योगिक नगरात कांही सामाजिक समस्या होत्या. पण त्यांचे स्वरूप तीव्र नव्हते. आजच्या औद्योगिक नगरात आढळणाऱ्या समस्या (उदा. भांडवलदार-कामगार संघर्ष, संप, मोर्चे, हरताळ, टाळेबंदी, हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इत्यादी) पूर्व-औद्योगिक नगरात नव्हत्या.

### ब) **औद्योगिक नगर** (Industrial City) :

औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळातील नगरांना औद्योगिक नगर म्हणतात. औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर औद्योगिक नगरे उदयास आली असे बर्गेलने म्हटले आहे. १७ व्या व १८ व्या शतकात जे शास्त्रीय शोध लागले त्या शोधावर आधारलेली तंत्रे व यंत्रे मोठ्या प्रमाणावर उदयास आली. उत्पादन प्रक्रियेत ह्या तंत्रांचा व यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. उत्पादनासाठी घराबाहेर वेगळी केंद्रे निर्माण करणे भाग पडले. या केंद्रांना कारखाना (Factory) म्हटले गेले. ह्या कारखान्यात मोठमोठ्या यंत्रांच्या साहाय्याने विपूल प्रमाणात उत्पादन होऊ लागले. प्रारंभी उद्योगधंदे व कारखाने हे नगरात किंवा त्यांच्या जवळपास सुरू झाले. परिणामी, सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः ग्रामीण भागातील लोक नगराकडे उद्योगधंदा व कारखाना असलेल्या ठिकाणाकडे रोजगारासाठी स्थलांतर करू लागले. परिणामी

नगरांचा आकार वाढत गेला व मोठ्या आकाराची नगरे उदयास आली. अशा ह्या उद्योगधंद्यांचे केंद्र असलेल्या विशाल आकारांच्या नगरांना औद्योगिक नगरे म्हणून ओळखले जाऊ लागले.

**औद्योगिक नगरांची वैशिष्ट्ये :**

साधारणपणे पूर्व-औद्योगिक नगराच्या उलट स्वरूपाची वैशिष्ट्ये औद्योगिक नगराची आहेत असे म्हणता येते.

१) **मोठा आकार :** औद्योगिक नगराचा आकार मोठा असतो. कारण त्यामध्ये लोकसंख्येचे प्रमाण व लोकसंख्येची घनता खूपच जास्त असते आणि महत्त्वाचे म्हणजे या नगराचा आकार सतत वाढत असलेला दिसून येतो. औद्योगिक नगरात मर्यादित जागेवर हजारो, लाखो, तर कांही नगरात करोडो लोक दाटीवाटने रहात असतात.

२) **औद्योगिकीकरण :** औद्योगिक नगरात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया तीव्र असते. कारण या नगरात मोठमोठे उद्योगधंदे/कारखाने असतात. कारखान्यात यंत्रांच्या व तंत्रांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असते. तसेच नवनवीन उद्योगधंदे स्थापन करण्याची प्रवृत्ती या नगरातील लोकांमध्ये आढळते.

३) **यांत्रिक शक्तीचा वापर :** औद्योगिक नगरातील उत्पादन प्रक्रियेत म्हणजेच उद्योगधंद्यात जैवशक्तीऐवजी यांत्रिक शक्तीचा वापर करण्यावर भर दिला जातो. मानवी किंवा पशूच्या शक्तीवर चालणाऱ्या यंत्राऐवजी वीजेवर चालणारी यंत्रे वापरण्यावर भर दिला जातो. त्यामुळे प्रचंड प्रमाणात उत्पादन होत असते.

४) **श्रमविभाजन व विशेषीकरण :** औद्योगिक नगरात सूक्ष्म व जटील स्वरूपाचे श्रमविभाजन व विशेषीकरण दिसून येते. उद्योगधंद्यातील वेगवेगळ्या कामाचे वाटप वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये केले जाते. औद्योगिक उत्पादनाच्या कोणत्या तरी एकाच प्रक्रियेत प्राविण्य किंवा तज्ज्ञता प्राप्त करण्यावर म्हणजेच विशेषतज्ज्ञ बनण्यावर लोक भर देत असतात. उद्योगधंद्यांत अकुशल, कुशल, तज्ज्ञ विशेषतज्ज्ञ असे अनेक कर्मचारी असतात.

५) **दळणवळणाची व वाहतुकीची प्रगत साधने :** औद्योगिक नगरात दळणवळणाची (पोस्ट, तारायंत्रे, रेडिओ, टी.व्ही. वृत्तपत्रे, फोन इ.) व वाहतुकीची (रिक्षा, मोटार, ट्रक, रेल्वे, विमान इ.) प्रगत साधने विपूल प्रमाणात असतात व त्यांची संख्या सतत वाढत असते. त्यामुळे अशा नगरात वाहनांचा खडखडाट, गोंगाट, वर्दळ सर्वत्र असते. ही वाहने स्वयंचलीत (डिझेल-पेट्रोलवर चालणारी) असल्याने त्यांच्याद्वारे हवेचे व ध्वनीचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असते.

६) **विजातियता :** औद्योगिक नगरातील सामाजिक जीवनात विजातियता मोठ्या प्रमाणावर असते. या नगरात विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असतात. तसेच ही नगरे व्यापार, शिक्षण, मनोरंजन इत्यादीची केंद्रे असतात. त्यामुळे देशाच्या व परदेशाच्याही विभिन्न भागातून भिन्न भिन्न वंशाचे, धर्माचे, जातीचे, भाषेचे,

वर्गाचे, संस्कृतीचे लोक या नगरांकडे स्थलांतर करीत असतात. त्यांचे आचार, विचार, श्रद्धा व मूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन, जीवनशैली इत्यादीमध्ये मोठी विविधता असते. लोकसंख्येतील या विविधतेलाच सामाजिक विजातियता असे म्हणतात.

७) **गतिशिलतेस वाव :** औद्योगिक नगरात भौगोलिक, व्यावसायिक व सामाजिक गतीशिलतेस मोठा वाव असतो. वाहतुकीच्या साधनांमुळे या नगरातील लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे सहज शक्य असते. तसेच या नगरात व्यवसायाच्या वा रोजगाराच्या विपूल संधी असल्याने लोकांना आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याची व बदलण्याची संधी उपलब्ध असते. तसेच स्वकर्तृत्वाने आपला सामाजिक दर्जा वा स्थान बदलणेही शक्य असते.

८) **शिक्षणाचे मोठे प्रमाण :** औद्योगिक नगरात शिक्षणाचे प्रमाण मोठे असते. कारण या नगरात शिक्षणाच्या सोयीसुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. लोक शिक्षणाविषयी जागरूक असतात. नव्या नव्या गोष्टी शिकण्याकडे, आपली शैक्षणिक पात्रता वा गुणवत्ता वाढविण्याकडे त्यांचा कल असतो. वैज्ञानिक, तांत्रिक, व्यवस्थापन शिक्षणावर विशेष भर दिला जातो.

९) **स्त्रियांचा उन्नत दर्जा :** औद्योगिक नगरात स्त्रियांचा दर्जा बराच उन्नत असतो. शिक्षण घेणे, नोकरी करणे, सार्वजनिक जीवनात सहभागी होणे, आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात कार्य करणे, कौटुंबिक बाबीविषयीचे निर्णय घेणे इत्यादीबाबतचे हक्क व अधिकार स्त्रियांना असतात. आपल्या हक्काविषयी त्या जागरूक झालेल्या दिसतात.

**१०) गंभीर सामाजिक समस्या :** औद्योगिक नगरात अनेक गंभीर सामाजिक समस्या निर्माण झालेल्या असतात. बेकारी, गुन्हेगारी, व्यसनाधिनता, वेशाव्यवसाय, भिक्षावृत्ती, मानसिक ताणतणाव, आत्महत्या, प्रदूषण, अपघात, औद्योगिक कलह, एकाकीपणा, इत्यादी समस्या या नगरांमध्ये असतात व त्यांची तीव्रता सतत वाढत असलेले दिसते.

## १.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्न.**

१. नागर समाजात कोणत्या प्रकारचे संबंध असतात?

अ) प्राथमिक  ब) दुय्यम  क) अनौपचारिक  ड) यापैकी एकही नाही

२. परिस्थितीशास्त्र कशाचा अभ्यास करते?

अ) सजीव व त्यांचे पर्यावरण यांच्यातील संबंधाचा  ब) पर्यावरणाचा

क) नागरी समस्यांचा  ड) यापैकी एकही नाही

३. पूर्व-औद्योगिक नगर हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) लुई वर्थ ब) विल्यम स्कॉट क) जोबर्ग ड) के पार्क

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नागर समाजाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये सांगा.

२. नागर परिस्थितीशास्त्र म्हणजे काय?

## १.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही परिस्थितीशास्त्र व समुदाय, नागर समाजाची वैशिष्ट्ये, औद्योगिकपूर्व नगर व औद्योगिक नगर ह्या संकल्पना समजावून घेतल्या आहेत. परिस्थितीशास्त्र ही संकल्पना समजावून घेण्यासाठी या संकल्पनेचा अर्थ व स्वरूप अभ्यासले. त्यानंतर नागर समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. शेवटी पूर्व-औद्योगिक नगर व औद्योगिक नगर या संकल्पना समजावून घेण्यासाठी त्यांची वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) ब २) अ ३) क

**ब) एका वाक्यात उत्तरे**

१. नागर समाजाची पाच वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे - १) मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव, २) बिगरशेती व्यवसाय, ३) मोठा आकार, ४) सामाजिक विजातियता, ५) दुय्यम संबंध.

२. नागर समाज व त्याच्या सभोवतालचे पर्यावरण यांच्यातील परस्पर-संबंधाचा अभ्यास म्हणजे नागर परिस्थितीशास्त्र होय.

## १.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागर समाजाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. पूर्व-औद्योगिक नगराची वैशिष्ट्ये विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगराची व्याख्या करण्यासाठी वापरले जाणारे निकष

२. नागरी परिस्थितीशास्त्र

३. औद्योगिक नगराची वैशिष्ट्ये

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- एका नगरातील जीवनशैलीचे निरीक्षण करा आणि त्याआधारे एक टिपण करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. प्रा. चंद्रकांत खंडागळे (१९९८) भारतीय समाज, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

२. शशी के. जैन (१९९५), नगरीय समाजशास्त्र, रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर.

३. श्रीमती शारदा तिवारी (२००४), नगरीय समाजशास्त्र, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिली.

४. Rajendra K. Sharma (1997), Urban Sociology, Atlantic Publishers and Distributors, New-Delhi.


❑❑❑

**सत्र २ : घटक २**

# नागरी विकासाचे सिद्धांत
## (Theories of Urban Development)

**अनुक्रमणिका**


२.१ प्रास्ताविक

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय–विवेचन

    २.३.१ एककेंद्री विभाग सिद्धांत

    २.३.२ खंड सिद्धांत

    २.३.३ बहुकेंद्रीय सिद्धांत

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.१ प्रास्ताविक (Introduction)

मागील घटकात तुम्ही नगर (म्हणजेच नागर समाज) म्हणजे काय हे समजावून घेतलेले आहे. नागर समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी नगराची वाढ किंवा विस्तार किंवा विकास कसा होत जातो हेही समजावून घ्यावे लागते. त्यामुळे ह्या घटकात तुम्ही विविध समाजशास्त्रज्ञांनी नगराच्या विकासासंबंधी मांडलेले सिद्धांत देखील समजावून घेणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला

- नगराच्या वाढीसंबंधीचे किंवा विकासासंबंधीचे विविध सिद्धांत स्पष्ट करता येतील. उदा. एककेंद्री सिद्धांत, खंड सिद्धांत व बहुकेंद्रीय सिद्धांत

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject-Matter)

अध्ययन विषयाच्या विवेचनाच्या दृष्टिने या घटकाचे तीन विभाग पाडले असून पहिल्या विभागात एककेंद्री विभाग सिद्धांताचे, दुसऱ्या विभागात खंड सिद्धांताचे तर तिसऱ्या विभागात बहुकेंद्री सिद्धांताचे विवेचन केलेले आहे.

### २.३.१ एककेंद्री विभाग सिद्धांत (Concentric Zone Theory) :

अमेरिकन नागर समाजशास्त्रज्ञ **अर्नेस्ट बर्जेस** (Ernest Burgess) याने हा सिद्धांत १९२५ मध्ये मांडला. या सिद्धांतात बर्जेसने सर्वप्रथम नगरातील विविध क्षेत्रात सामाजिक समूह कसे विभागले जातात याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याचे हे स्पष्टीकरण परिस्थितीशास्त्रीय प्रक्रियांवर (Ecological Processes) आधारलेले आहे.

बर्जेस या सिद्धांतानुसार नगराची वाढ ही एका मध्यवर्ती व्यापार किंवा उलाढाल ठिकाणाच्या सभोवताली वर्तुळाकार पद्धतीने होते. बर्जेसच्या मते नगराची वाढ ही पाच विभागातून (Zones) होते. ह्या विभागांमध्ये कार्यात्मक भेद असतात. मध्यवर्ती व्यापाराचे किंवा उलाढालीचे जे ठिकाण किंवा केंद्र असते त्याला बर्जेसने Central Business District (CBD) असे म्हटले आहे. या एकाच केंद्रातून नगराचे वेगवेगळे विभाग विस्तारत जातात. नगरात अनेक व्यवसाय चालत असतात. प्रत्येक व्यावसायिक आपल्या व्यवसायासाठी अनुकूल अशी जागा निवडीत असतो. त्यामुळे विशिष्ट व्यवसायांचा विशिष्ट विभाग निर्माण होतो. ज्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते त्या व्यवसायांना अनुकूल असणाऱ्या जागेच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढत जातात. याउलट ज्या जागेला मागणी कमी असते त्या जागेच्या किंमती तुलनेने कमी असतात. अशी जागा आर्थिक कुवत कमी असणारे व्यावसायिक निवडतात. या नियमाप्रमाणे नगरातील मोठी बाजारपेठ ही नगराच्या मध्यभागी असते. तिलाच CBD असे म्हणतात. आणि ह्या मध्यवर्ती बाजारपेठेच्या सभोवताली म्हणजेच एकाच केंद्राभोवती नगराचे इतर विभाग विस्तारत जातात.

बर्जेसने सांगितलेले पाच विभाग व त्यांचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे –

**१) मध्यवर्ती विभाग** (Loop Zone) : हा नगरातील सर्वाधिक व्यापाराचा, व्यवहाराचा किंवा उलाढालीचा मुख्य विभाग असतो. अमेरिकन भाषेत याला Down Town असे म्हणतात. हा विभाग नगराच्या केंद्रस्थानी म्हणजेच मध्यभागी असतो. या विभागात सर्व प्रमुख व्यापार, व्यवहार व सरकारी कारभार चालत असतो. नगरातील वाहतुकीचे सर्व मार्ग या विभागात केंद्रित झालेले असतात. या विभागात विविध दुकाने, वस्तुभांडारे, बँका, शासकीय कार्यालये, गुदामे, करमणूक केंद्रे (नाट्यगृहे, चित्रपटगृहे) मोठमोठी उपहारगृहे असतात. त्यामुळे या विभागात दिवसभर लोकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. दुकाने, कार्यालये, इत्यादीत कामासाठी येणारे कर्मचारी तसेच बाहेर गावाहून येणारे लोक हे प्रामुख्याने याच

विभागात येत असतात. त्यामुळे ह्या विभागात दिवसभर लोकांच्या गर्दीने गजबजलेला असतो. तथापि, रात्री मात्र ही गर्दी व वर्दळ कमी होते.

२) **संक्रमण विभाग** (Transition zone) : मध्यवर्ती विभागाच्या म्हणजे CBD च्या जवळ हा दुसरा विभाग असतो. या विभागात जुनी घरे व इमारती असतात. हा भाग झोपडपट्टीसारखा असतो. मध्यवर्ती व्यापाराचा विभाग जसजसा वाढत जातो तसतसा त्याच्या जवळपासच्या विभागातील गल्लीबोळातून दुकाने, उपाहारगृहे, लॉज, कार्यालये यांची संख्या वाढू लागते. या विभागात लहानमोठे व्यापारी व उद्योजक आपले व्यवसाय सुरू करू लागतात. त्यामुळे तेथील जागेची मागणी वाढते. परिणामी तेथील जुन्या घराच्या व इमारतीच्या किंमती वाढू लागतात. ही घरे व इमारती राहण्याऐवजी व्यापारासाठी वापरल्यास आपणास अधिक आर्थिक फायदा होईल असे त्यांच्या मालकांना वाटू लागते. त्यामुळे ते अशा घरातील भाडेकरूंना काढून टाकतात. किंवा भाडेकरू स्वतःहोऊनच जागा खाली करतात. आणि त्याजागी इतर लोक येतात. या लोकांची सोय करताना फारसे नियोजन केले जात नाही. त्यामुळे हा भाग विस्कळीत वा गलिच्छ स्वरूपाचा बनतो. त्यामुळे या विभागात श्रीमंत व मध्यमवर्गीय लोक राहात नाहीत. परिणामी हा विभाग गलिच्छ, व्यसनी, गैरकृत्ये करणाऱ्या लोकांचा बनतो.


३) **कामगार वस्ती विभाग** (Working Class Zone) : संक्रमण विभागाच्या बाहेरच्या बाजूस हा विभाग असतो. या विभागात कामगार वर्गाची वस्ती असते. हा विभाग कारखान्यांच्या जवळ असतो. आपल्या कारखान्याच्या म्हणजेच कामाच्या ठिकाणाच्या जवळपास रहाणे कामगारांना सोयीचे ठरत असते. हा विभाग राहण्याच्या दृष्टीने झोपडपट्टीपेक्षा अधिक बरा असतो. त्यामुळे या विभागात दाट लोकवस्ती असते. एकाच ठिकाणी अनक कुटुंबे दाटीवाटीने रहात असतात. बकाल वस्तीमधून आपली सुटका करून घेऊ इच्छिणारे कामगार या विभागात राहण्यासाठी येतात. हे कामगार कनिष्ठ-मध्यम किंवा गरीब वर्गातील असतात. अंतर्गत स्थलांतर करणाऱ्यांसाठी हा विभाग दुसरी वसाहत असते.

४) **निवासी विभाग** (Residential Zone) : हा विभाग मध्यवर्ती व्यापार विभागापासून तसेच इतरही विभागापासून कांहीसा दूर असतो. या विभागात एक एक कुटुंब राहील अशा पद्धतीची अपार्टमेंट पद्धतीच्या इमारती असतात. या विभागात मोकळी हवा, भरपूर सुर्यप्रकाश, बागा, क्रीडांगणे, सौंदर्यस्थळे, सुनियोजित रस्ते, व्यवस्थित पाणीपुरवठा, हिरवे पट्टे इत्यादी सोयीसुविधा असतात. श्रीमंत, उच्च मध्यम वर्ग, मध्यम वर्ग, वेगवेगळे व्यावसायिक अशा लोकांची वस्ती या विभागात असते. सुशिक्षित व उच्चभ्रू लोकांचा भरणा या विभागात असतो.

५) **बाह्य विभाग** (Commutor's Zone) : हा विभाग सामान्यतः नागरी सीमारेषेबाहेर असतो. त्यामुळे ह्या विभागात ग्रामीण व नागरी अशा दोन्ही जीवनपद्धतीची वैशिष्ट्ये दिसून येतात. नगरातील उद्योग व्यवसायात काम करणारे कामगार, ज्यांना नगरात राहावयास जागा मिळत नाही असे लोक, खेड्यात स्वतःच्या शेतजमिनी असणारे लोक अशी मंडळी या विभागात राहतात. म्हणजेच आपणास असे म्हणता

येईल, की नगराचा विस्तार होऊन अस्तित्त्वात येणाऱ्या उपनगरातील लोक जे मुख्य नगरात कामासाठी मोटार-रेल्वे इत्यादींनी ये-जा करतात अशा लोकांचा विभाग म्हणजे Commuter Zone होय.

बर्जेसच्या सिद्धांतातील हे पाच वर्तुळाकार विभाग पुढील आकृतीच्या साह्याने दर्शविता येतात.




Scanned with CamScanner

**मूल्यमापन :** आपल्या ह्या सिद्धांताबाबत बर्जेसने स्वतःच असे मत मांडले आहे की हा सिद्धांत अमूर्त आहे. नगराच्या वाढीचे हे प्रत्यक्षातील वर्णन नव्हे. इतर शास्त्रज्ञांनीदेखील या सिद्धांतावर टिका केलेली आहे. या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टिका केली जाते.

१) एककेंद्री वर्तुळाच्या रचनेप्रमाणे एखादे नगर प्रत्यक्षात अस्तित्त्वात आल्याचे आपणास बहुधा आढळणार नाही.

२) हा सिद्धांत व्यापारी नगरे व सांस्कृतिक नगरे यांना लागू पडत नाही. अमेरिकेबाहेरील नगरांना विशेषतः जी नगरे वेगवेगळ्या ऐतिहासिक संदर्भात विकसित झालेली आहेत त्यांना हा सिद्धांत लागू पडत नाही. दळणवळणाची साधने व माहिती तंत्रज्ञान यामध्ये झालेली प्रगती व जागतिक अर्थव्यवस्थेचा उदय या कारणांमुळे अमेरिकेतही असे स्पष्ट विभाग (Zones) असलेली नगरे कालांतराने दिसणार नाहीत.

३) ह्या सिद्धांतात अमेरिकन नगरांची भौगोलिक स्थिती वर्णन केलेली आहे. जेथे नगराचा आतील भाग हा गरीब व उपनगरीय भाग हा श्रीमंत आहे. तथापि इतरत्र मात्र याच्या उलट स्थिती आढळू शकते.

४) हा सिद्धांत बहुलकेंद्री नगरांसाठी लागू पडत नाही.

५) औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत नगराबाहेर जेथे जमीन, पाणी, वाहतूक साधने उपलब्ध होतात तेथे कारखाने उभारले जातात. ही गोष्ट ह्या सिद्धांतात आढळत नाही.

६) साधारणपणे जादाचे व्यापारी विभाग हे मध्यवर्ती व्यापार विभागाभोवती (CBD) निर्माण होण्याऐवजी उपनगरीय विभागात निर्माण होताना दिसतात. ही गोष्ट या सिद्धांतात विचारात घेतलेली नाही. तसेच उपनगरीय विभागात बाजार केंद्रे उदयास येत असल्याने मुख्य व्यापार विभाग ही कल्पना आता मागे पडली आहे.

### २.३.२ **खंड सिद्धांत** (Sector Theory)

नगराच्या वाढीचा हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. हा सिद्धांत अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ **होमर हायट** (Homer Hoyt) यांनी अमेरिकेतील अनेक नगरांचा अभ्यास करून १९३९ मध्ये मांडला. हा सिद्धांत बर्जेसच्या एककेंद्री विभाग सिद्धांतातील दुरुस्ती (Modification) मानला जातो.

हायटने बर्जेसच्या सिद्धांतातील मध्यवर्ती व्यापार विभागाचे (CBD) अस्तित्व मान्य केलेले आहे. तथापि हायटच्या मते नगराचा विस्तार हा एककेंद्री वर्तुळाकार विभागाऐवजी निमूळत्या (त्रिकोणी) आकाराच्या सेक्टरमध्ये म्हणजेच खंडामध्ये होतो. म्हणून त्याच्या सिद्धांतास खंड सिद्धांत म्हणतात. खंड सिद्धांतानुसार नगराचे विशेषिकृत प्रदेश (Specialized areas) हे एककेंद्री विभागाऐवजी वेगवेगळ्या खंडाच्या रूपात (in the form of sectors) विकसित होतात. जसजसे नगर विस्तारते तसतसे प्रत्येक विशेषिकृत खंड त्याच्या परिघामध्ये विस्तारत जातो.

हायटच्या सिद्धांतातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१) औद्योगिक संस्था नगरात एका ठिकाणी स्थापन झाल्यास उच्च वर्गाची वस्ती त्यांच्या विरुद्ध भागात अस्तित्वात येते. आणि ह्या दोन्हीच्या मध्ये कामगारांची वस्ती निर्माण होते. अशाप्रकारे वेगवेगळ्या ठिकाणी अस्तित्वात आलेल्या समूहांचा विस्तार होऊन ते एकमेकांना भिडले, की पुन्हा हीच प्रक्रिया सुरू होते व शहर विस्तारत जाते.

२) औद्योगिक संस्था ह्या मध्यवर्ती व्यापार विभागाच्या जवळ विकसित न होता त्या रेल्वेमार्ग, महामार्ग (सडका) किंवा इतर परिवहन बार्गांच्या बाजूने विकसित होतात. हायटने नगराच्या वाढीमध्ये विशेषतः उद्योग व व्यापाराच्या वाढीमध्ये परिवहन मार्गाची भूमिका महत्त्वाची मानली आहे.

३) हायटने असा तर्क केला आहे की, नगरातील एका खंडात (सेक्टरमध्ये) उच्च वर्गाची अधिक किंमतीची घरे निर्माण होऊ लागल्यास ही प्रवृत्ती दीर्घकाळ टिकून राहते. सुरुवातीला उच्च वर्गाचे घरे ही बँका व कार्यालये यांच्याजवळ पण औद्योगिक संस्था व गुदामे यांच्यापासून दूर उभारली जातात. जर पुढे कमी किंमतीची घरे ही त्यांच्या घरासभोवताली बांधली जाऊ लागली तर श्रीमंत लोक नगराच्या बाहेरील भागात स्थलांतर करू लागतात. त्यांचे हे स्थलांतर साधारणतः टेकडीवजा उंच भाग किंवा नगराच्या

किनारपट्टीच्या भागात होते. कारण या भागाचा उपयोग उद्योग व व्यापार यासाठी होत नसतो. कांही वेळा श्रीमंत लोक रम्य अशा मैदानी भागात, जेथे गोल्प वगैरे खेळता येतो, घरे बांधू लागतात.

**मूल्यमापन :** बर्जेसच्या सिद्धांताच्या तुलनेने हायटचा सिद्धांत बराच उपयुक्त आहे. उद्योगांच्या स्थानाविषयीची आधुनिक कल्पना त्यामध्ये मांडली आहे. तसेच परिवहन मार्गाच्या बाजूने नगरांचा विस्तार होतो हे तथ्यही त्यामध्ये मांडलेले आहे. तथापि हा सिद्धांत कांही ठराविक नगरांच्या अभ्यासावरच अधारलेला असल्याने त्यामध्ये कांही दोष आहेत. नगराच्या वाढीसंबंधीचे सर्वसामान्य स्पष्टीकरण ह्या सिद्धांतात मिळत नाही. तसेच उपनगरीय वस्ती जोड नगर याबाबत हा सिद्धांत कांहीच सांगत नाही.

### **२.३.२ बहुकेंद्रीय सिद्धांत** (Multiple Nuclei Theory)

बर्जेस यांच्या केंद्रवर्ती सिद्धांताच्या विरोधी असा हा सिद्धांत आहे. बर्जेसच्या मते नगराचा विकास हा एका मध्यवर्ती केंद्राच्या सभोवताली वर्तुळाकार पद्धतीने होतो. याउलट **सी. डी. हॅरिस** या शास्त्रज्ञाने नगराचा विकास हा अनेक केंद्राच्या भोवती होतो असा सिद्धांत मांडला. या सिद्धांतास बहुकेंद्रीय सिद्धांत असे म्हणतात.

या सिद्धांतातील मध्यवती कल्पना – बहुकेंद्रीय सिद्धांतानुसार नगराचा विकास हा एकाच केंद्राभोवती न होता तो अनेक व्यापार व व्यवसाय केंद्राच्या भोवती (a number of business centres or districts) होतो आणि यातील प्रत्येक केंद्राची स्वतःची अशी एक विशेष कृती (Special activiti) असते व त्या केंद्राचे विशेष असे परिणाम होत असतात.

पहिल्या केंद्रात किंवा विभागात नगरातील मध्यवर्ती व्यापारी क्षेत्र असते. दुसऱ्या विभागात घाऊक व्यापार व लघुउद्योग असतात. पाचव्या विभागात उच्चवर्गीय लोक राहतात. तिसऱ्या विभागात निम्न स्तरातील लोकांची वस्ती असते. चौथ्या विभागात उच्चवर्गीय लोक राहात असतात. सहाव्या विभागात अवजड उद्योगधंदे उभारलेले असतात. सातव्या विभागात व्यापार बाह्यक्षेत्रे म्हणजेच गोडावून म्हणजे गोदामे बांधलेली असतात. आठव्या विभागात उपनगरे असतात, तर नवव्या विभागात औद्योगिक प्रकल्प असतात. अशाप्रकारे नगराचा विकास किंवा वाढ ही एककेंद्रवर्ती पद्धतीने न होता बहुकेंद्रवर्ती पद्धतीने होते.

**या सिद्धांताची उद्दिष्ट्ये :**

१) नगराचा विकास किंवा वाढ ही अनेक केंद्रातून होते.

२) नगरातील प्रत्येक केंद्र किंवा विभाग हा सापेक्षता विशेष समुदायाचा बनलेला असतो. म्हणजेच विशिष्ट केंद्रात विशिष्ट समुदायाचे लोक एकवटलेले असतात.

३) कांही उदाहरणात असे दिसून येते की, एकाच नगरात दोन किंवा अधिक स्वतंत्र समुदायाचे ऐक्य निर्माण होऊन हा बहुकेंद्रीय नमुना किंवा प्रतिमान (Pattern) निर्माण झालेला असतो.

४) कांही उदाहरणात असे दिसून येते की, वांशिक (ethanic) वर्गीय किंवा अन्य कोणत्यातरी भेदांमुळे स्वतंत्र किंवा वेगळी सांप्रदायिक क्षेत्रे (Separate communal areas) एकाच नगरात विकसित झालेली आहेत.

५) पॅरिस हे नगर बहुलकेंद्री प्रतिमानाचे उत्तम उदाहरण आहे.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) बहुपर्यायी प्रश्न** (Multiple Choice Questions)

१. होमर हायट यांनी कोणता सिद्धांत मांडला आहे.

अ) केंद्रवर्ती विभाग सिद्धांत ब) खंड सिद्धांत

क) परिवहन सिद्धांत ड) यापैकी एकही नाही.

२. एककेंद्री विभाग सिद्धांताशी कोणाचे नाव निगडीत आहे?

अ) बर्जेस ब) होमर हाईटब क) कूले ड) यापैकी एकही नाही

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा** (Answer in one sentence)

१. होमर हाईट यांनी शहराच्या वाढीसंबंधी मांडलेल्या सिद्धांताचे नाव सांगा.

२. केंद्रवर्ती क्षेत्र सिद्धांतातील पाच क्षेत्रांची नावे सांगा.

३. बहुकेंद्रीय सिद्धांत कोणी मांडला?

## २.५ सारांश (Let us Sum up)

या अध्ययन घटकांत तुम्ही नगराच्या वाढीचे तीन सिद्धांत अभ्यासलेले आहेत. त्यापैकी पहिला सिद्धांत म्हणजे बर्जेस यांनी मांडलेला केंद्रवर्ती क्षेत्र सिद्धांत होय. बर्जेच्या मते शहराचे १) मुख्य व्यापार - व्यवहार विभाग, २) संक्रमण विभाग, ३) कामगार वस्ती विभाग, ४) निवासी विभाग, ५) बाह्य विभाग असे पाच विभाग पडतात. होमर हायट यांनी खंड सिद्धांत मांडला असून या सिद्धांतानुसार औद्योगिक विभाग एका ठिकाणी स्थापन झाला तर त्याच्या विरुद्ध भागात उच्च वर्गाची वस्ती निर्माण होते आणि औद्योगिक विभाग व उच्च वर्गाची वस्ती यांच्यामध्ये कामगार वस्ती निर्माण होते. यानंतर बहुलकेंद्री सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

## २.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.**

१) ब  २) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. होमर हायट यांनी मांडलेल्या सिद्धांताचे नाव खंड सिद्धांत असे आहे.

२. एककेंद्री विभाग सिद्धांतातील पाच विभाग पुढीलप्रमाणे - १) मुख्य-व्यापार व्यवहार विभाग, २) संक्रमण विभाग, ३) कामगार वस्ती विभाग, ४) निवासी विभाग, ५) बाह्य विभाग.

## २.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. एककेंद्री विभाग सिद्धांताची चर्चा करा.

३. होमर हायट यांचा विभाग सिद्धांत स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

अ) बहुकेंद्रीय सिद्धांत

ब) एककेंद्री विभाग सिद्धांताचे मूल्यमापन

## २.८ चिंतन आणि कार्य

- तुमच्या जवळपासच्या एखाद्या औद्योगिक नगरास भेट द्या व त्याची वाढ कशी झाली हे समजावून घ्या व त्याआधारे एक टिपण तयार करा.

## २.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


१. E. E. Bergel, Urban Sociology

२. शशी के जैन (१९९६), नगरीय समाजशास्त्र, रिचर्स पब्लिकेशन, जयपूर.

३. श्रीमती शारदा तिवारी (२००४), नगरीय समाजशास्त्र, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

४. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००७), नागर समाजशास्त्र, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


❑❑❑

## सत्र २ : घटक ३

# नगरांचे व शहरांचे वर्गीकरण आणि नागरी प्रक्रिया

## (Process of Urbanization)

अनुक्रमणिका

३.१ प्रास्ताविक

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय-विवेचन

- ३.३.१ नगरांचे व शहरांचे वर्गीकरण : भौतिक, ऐतिहासिक व लोकसंख्याशास्त्रीय
- ३.३.२ औद्योगिकीकरण आणि नागरीकरण
- ३.३.३ स्थलांतर व नागरीकरण
- ३.३.४ नागरीकरणाचे सामाजिक परिणाम : कुटुंब, जात, वर्ग आणि स्त्रियांचा दर्जा

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ सारांश

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ स्वाध्याय/गृहपाठ

३.८ चिंतन आणि कार्य

३.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

### **३.१ प्रास्ताविक** (Introduction)

या सातव्या घटकात तुम्ही नगरांचे व शहरांचे वर्गीकरण अभ्यासणार आहात. त्याचबरोबर औद्योगिकीकरण व नागरीकरण तसेच स्थलांतर व नागरीकरण यांचाही अभ्यास करणार आहात. त्यानंतर नागरीकरणाचे कुटुंब, जात, वर्ग व स्त्रियांचा दर्जा यावरील सामाजिक परिणाम अभ्यासणार आहात

## ३.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास

- नगरांचे व शहरांचे भौतिक, ऐतिहासिक व लोकसंख्याशास्त्रीय वर्गीकरण स्पष्ट करता येईल.
- औद्योगिकीकरण व नागरीकरण यांच्यातील परस्परसंबंध समजावून घेता येईल.
- स्थलांतर व नागरीकरण यांच्यातील परस्परसंबंध विशद करता येईल.
- नागरीकरणाचे कुटुंब, जात, वर्ग आणि स्त्रियांचा दर्जा यावरील सामाजिक परिणाम सांगता येईल.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात नगरांची व शहरांची वर्गीकरण स्पष्ट केले जाईल. दुसऱ्या भागात औद्योगिकीकरण व नागरीकरण यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट केला जाईल. तिसऱ्या भागात स्थलांतर व नागरीकरण यांचे विवेचन केले जाईल. तर चौथ्या भागात नागरीकरणाचे कुटुंब, जात, वर्ग व स्त्रियांचा दर्जा यावरील सामाजिक परिणाम स्पष्ट केले जातील.

### ३.३.१ नगरांचे आणि शहरांचे वर्गीकरण : भौतिक, ऐतिहासिक आणि लोकसंख्याशास्त्रीय (Classification of Cities and Towns : Physical, Historical, Demographic) :

या घटकात तुम्ही सर्वप्रथम भारतातील नगरांचे (cities) आणि शहरांचे (towns) वर्गीकरण समजावून घेणार आहात. इंग्रजीतील city या शब्दासाठी मराठीत नगर व शहर हे दोन शब्द वापरले जातात. ढ्रेप या इंग्रजी शब्दाचा अर्थ खेड्यापेक्षा (village) मोठी व नगरापेक्षा (city) लहान असलेली नागरी वसाहत असा आहे. तथापि, town साठी मराठीत स्वतंत्र शब्द रूढ झालेला नाही. त्यामुळे आपण city साठी नगर व town साठी शहर हे शब्द वापरणार आहोत.

नगरांचे व शहरांचे वर्गीकरण विविध निकषांच्या आधारे केले जाते. त्यापैकी त्यांची भौतिक वैशिष्ट्ये, ऐतिहासिक कालखंड व लोकसंख्या या तीन निकषांच्या आधारे नगरांचे व शहरांचे केले जाणारे वर्गीकरण तुम्ही भारताच्या संदर्भात अभ्यासणार आहात.

**अ) भौतिक वैशिष्ट्यांच्या आधारे नगरांचे व शहरांचे वर्गीकरण :**

नगराच्या व शहराच्या पर्यावरणाची गुणवत्ता, त्यांची भविष्यात होणारी वाढ, त्यांचे भौतिक अस्तित्व व सातत्य, इत्यादीच्या दृष्टिने नगराची व शहराची भौतिक वैशिष्ट्ये महत्त्वाची ठरतात. तसेच नगरात व शहरात राहणारे लोक व बाहेरील लोक यांना त्यांचे वाटणारे आकर्षण हे त्यांच्या भौतिक वैशिष्ट्यांवर अवलंबून असते. नगर व शहर ज्या जागेवर (location) वसलेले आहे ती जागा व तिच्याभोवतालची

भौतिक/भौगोलिक परिस्थिती (surroundings) यावर त्यांचे सौंदर्य अवलंबून असते. तसेच त्यांच्या भौतिक वैशिष्ट्यांवर त्यांचे अस्तित्वही अवलंबून असते. जगातील अनेक शहरे व नगरे ही महापूर, भूकंप व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट झालेली आहेत. त्यामुळे नवीन नगर वा शहर वसविताना भूभागास वा जागेस (site) महत्त्व दिले जाते. नगर व शहर ज्या भूभागावर वसलेले आहे त्या आधारे त्याचे पाच प्रकार पाडले जातात ते पुढीलप्रमाणे –

**१) समुद्रकिनाऱ्यावरील नगरे व शहरे :**

भारत एक द्विपकल्प आहे. म्हणजे त्याच्या तीन बाजूस पाणी आहे. भारताच्या पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेस हिंदी महासागर व पूर्वेस बंगालचा उपसागर आहे. त्यामुळे भारताला सुमारे ७,५१७ कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या समुद्रकिनाऱ्याचे पूर्व किनारपट्टी व पश्चिम किनारपट्टी असे दोन भाग पडतात. या दोन्ही किनारपट्टीवर अनेक नगरे व शहरे वसलेली आहेत. त्यापैकी कांही बंदरे आहेत तर कांही बंदरे नाहीत. उदा. कालकत्ता हे मोठे बंदर आहे. पण ते हुगळी नदीकाठी वसलेले असून समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे ५० कि.मी. दूर आहे. या शहरांचे महत्त्वाचे प्राथमिक वैशिष्ट्य म्हणजे या शहरातून समुद्रकिनाऱ्यांचे सौंदर्य पाहण्यास मिळते. त्यामुळे अनेक पर्यटक अशा शहरांना, नगरांना भेटी देतात. उदा. चेन्नई, मुंबई, थिरुअनंतपूरम, कालिकत या शहराना अत्यंत सुंदर असा समुद्रकिनारा (beach) लाभलेला आहे. विशाखापट्टणम् व मंगलोर या शहरांना नगरांना खडकाळ किनारपट्टी लाभलेली आहे. समुद्रकिनारपट्टीच्या कांही शहरांचा भूप्रदेश हा सपाट तर कांहीचा भूप्रदेश हा पहाडी स्वरूपाचा आहे. कोचीन, चेन्नई, एलिप्पी यासारख्या शहरांजवळ खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. सपाट जमीन असलेल्या समुद्रकिनाऱ्याच्या कांही शहरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते. उदा. चेन्नई, एलिप्पी इ. पश्चिम किनारपट्टीवरील अनेक शहरे ही बुडालेल्या समुद्रकिनाऱ्यावर आहेत. येथे लाल मातीच्या टेकड्या, उंच कडे व गुहा आहेत.

समुद्रकिनाऱ्यावरील सपाट प्रदेशात वसलेली भारतातील प्रमुख शहरे / नगरे पुढील आहेत. कोचीन, जामनगर, काकिनाडा, मचलीपट्टणम, चेन्नई, पाटण, पोरबंदर, पाँडेचरी, पूरी, तुतीकोरीन इ. समुद्रकिनाऱ्यावरील पहाडी प्रदेशात वसलेली प्रमुख शहरे पुढील आहेत. कालिकत, कन्नानोर, बृहन्मुंबई, मंगलोर, थिरूअनंतपूरम, विशाखापट्टणम इ.

**२) नदीकाठावरील नगरे व शहरे :**

भारतातील अनेक शहरे ही बारमाही वाहणाऱ्या नद्यांच्याकाठी वसलेली आहेत. उदा. हडप्पा व मोहोंजोदाडो ही प्राचीन काळातील शहरे ही सिंधु नदीच्या काठी वसलेली होती. वाराणसी, पाटलीपूत्र, मथुरा, प्रयाग, कानपूर यासारखी शहरे ही गंगा नदीच्या तर दिल्ली व आग्रा ही यमुनेच्या तीरी वसलेली आहेत. दक्षिण भारतातील नाशिक शहर हे गोदावरीच्या काठी, मदुराई हे वैगई नदीच्या काठी, नागार्जुनकोंडा हे कृष्णेच्या काठी, तंजावर हे कावेरीच काठी, कोलकत्ता हुबळी नदीकाठी वसलेले आहे. या शहरांना नदीद्वारे पाणी पुरवठा होतो. तसेच या नद्यांचा उपयोग जलवाहतूकीसाठी होतो.

भारतात नद्यांना पवित्र मानले जाते. अनेक मोठमोठी मंदिरे ही नद्यांच्या काठी वसलेली आहेत. त्यामुळे हजारो-लाखो धर्मश्रद्धाळू व्यक्ती नद्यांना तीर्थक्षेत्र मानून भेट देतात. नद्यांमध्ये स्नान करणे हे पुण्यकर्म मानतात. मृतदेह नदीकाठी जाळणे व त्याची राख (रक्षा) नदीपात्रात सोडणे हे देखील पुण्यकर्म मानतात. नदीकाठच्या लोकांना स्नानासाठी व कपडे धुणसाठी नद्यांवर घाट बांधलेले आढळतात.

नदीकाठची अनेक शहरे ही नदीच्या बाजूला असलेल्या चिकण मातीच्या किनाऱ्यावर वसलेली आहेत. या किनाऱ्यावर शहराच्या संरक्षणासाठी बांध घातलेले आहेत. त्यामुळे काही शहराचा आकार हा सरळरेषेत विस्तारलेला आहे. उदा. वाराणसी व पाटणा. नदीकाठावरील अनेक शहरांना नदीतून पाणी पुरवठा होतो. शिवाय शहरातील सांडपाणी व टाकाऊ पदार्त हे नदीतच टाकले जातात. त्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. तसेच शहराच्या सौंदर्यास बाधा येते.

तथापि, अशा शहरांना पुराचा सतत धोका असतो. त्यामुळे कांही शहराभोवती मातीचा बंधारा संरक्षणासाठी बांधलेला आहे. नदीकाठच्या कांही शहरांना नदीकिनाऱ्याची झीज होण्याचा धोकाही असतो.

**३) सरोवराकाठची नगरे व शहरे :**

भारतात सरोवराकाठी वसलेली नगरे व शहरे ही संख्येने खूपच कमी आहेत. उदा. श्रीनगर (काश्मिर), अजमेर (राजस्थान), नैनीताल (उत्तरप्रदेश), कोडाईकेंनाल (तामिळनाडू) ही शहरे नैसर्गिक सरोवराकाठी वसलेली आहेत. मात्र कांही शहरे ही मानवनिर्मित सरोवराकाठी वसलेली आहेत. (उदा. उदयपूर) मानवनिर्मित सरोवरे ही पाणीपुरवठा, जलसिंचन, ऊर्जा निर्मिती इत्यादी उद्देशाने शहराजवळ मुद्दाम निर्माण केलेली आहेत. हैद्राबाद, चंदीगढ व थिरूअनंतपूरम या नगराजवळील सरोवरे ही पाणी पुरवठा व मनोरंजन यासाठी निर्माण केलेली आहेत. शहराजवळील सरोवरांचा वापर नौकानयनासाठी केला जातो. तसेच सरोवराकाठी बागबगीचा व क्रिडांगण ही तयार केलेले आहे. श्रीनगर व उदयपूर ही शहरे पर्यटन स्थळे म्हणून विकसित झालेली आहेत. तथापि, इतर शहरे मात्र पर्यटन स्थळ म्हणून फारशी विकसित झालेली नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जलसिंचनाचे व ऊर्जानिर्मितीचे अनेक प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. त्यापैकी कांही प्रकल्पाजवळ जलाशय (तलाव वा सरोवर) निर्माण केलेले आहेत. उदा. संबळपूर (ओरीसा), कोटा (राजस्थान) विजयवाडा (आंध्रप्रदेश) इत्यादी.

**४) टेकड्याजवळील नगरे व शहरे :**

कांही नगरे व शहरे ही टेकड्याजवळ वसलेली आहेत. त्यांना पर्वतीय नगरे / शहरे म्हणतात. उदा. सिमला, नैनिताल, मसुरी, उटी, महाबळेश्वर इ. कांही शहराच्या विकसित भागांमध्ये लक्षवेधी टेकड्यांचे अस्तित्त्व दिसून येते. अशा टेकड्यांमुळे शहरांना प्रभेदक स्वरूप प्राप्त झालेले आहे. दक्षिण भारतातील मंदिरे असलेली कांही शहरे ही टेकड्यांच्याभोवती विकसित झालेली आहेत. उदा. तिरूचिल्लापल्ली शहरातील गोल्डन रॉक मंदीर, पालनी टेकडीवरील मंदीर, तिरूपती शहरातील वेंकटेश्वराचे मंदीर इत्यादी टेकड्यांजवळ मंदिरे व नगरे वसवण्याची प्रवृत्ती दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर दिसून येते. प्राचीन काळात सुरक्षेच्या

दृष्टिने शहर वसविण्यासाठी टेकड्यांच्या प्रदेशास प्राधान्य दिलेले दिसते. बिहारमधील राजगीर हे याचे उत्तम उदाहरण आहे. मध्ययुगात किल्ले बांधण्यासाठी डोंगराचा / टेकड्यांचा उपयोग केला गेला. महाराष्ट्रात व मध्यप्रदेशात अनेक किल्ले हे डोंगरावर बांधलेले दिसतात व त्याच्या पायथ्याशी शहर वसलेले दिसते. गोवळकोंडा हे एक किल्ला असलेले नगर असून ते टेकडीच्या उतारावर वसलेले आहे. ग्वाल्हेर, जयपूर व जोधपूर ही शहरे डोंगरी किल्ले व राजवाडे यासाठी प्रसिद्ध आहेत. अर्थात टेकड्यांचा प्रदेश हा वसाहतीसाठी फारसा उपयुकत व सोयीस्कर मानला जात नाही. कारण तेथे रस्ते, पाणीपुरवठा अशा सुविधा पुरविणे अवघड जाते. तसेच खर्चिक ठरते. हिमालयाच्या टेकड्याजवळील प्रदेशात तीव्र उतारामुळे बांधकाम करणे सोयीस्कर नसते. पहाडी प्रदेशात घरबांधणीसाठी उपयुक्त असणाऱ्या जागेची तीव्र टंचाई जाणवते.

**५) सपाट भूप्रदेशातील नगरे व शहरे :**

उत्तर भारतातील मैदानी प्रदेशात म्हणजेच सिंधु, गंगा, यमुना या नद्यांच्या व त्यांच्या उपनद्यांच्या खोऱ्यात अनेक नगरे व शहरे वसलेली आहेत. या नगरांच्या व शहरांच्या क्षेत्रीय विस्तारास मोठा वाव आहे. सपाट प्रदेशातील शहरांमध्ये बांधकाम, रस्ते, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था इत्यादीसाठी होणारा खर्च हा तुलनेने कमी असतो. तथापि, अशा शहरातील अरूंद जागेमुळे पावसाळ्यात गटारी (ड्रेनेज व्यवस्था) तुंबण्याचा धोका असतो. भारतीय पठारावरील सपाट प्रदेशातही अनेक नगरे व शहरे वसलेली आहेत. अलिगढ, अंबाला, अमृतसर, बलेरी, विजापूर, बिकानेर, गुलबर्गा, हिस्सार, कांचीपूरम, लुधियाना, मदुराई, जयपूर, जोधपूर इत्यादी शहरे सपाट प्रदेशातच वसलेली आहेत.

**ब) ऐतिहासिक दृष्टिकोनातून नगरांचे व शहरांचे वर्गीकरण :**

भौतिक वैशिष्ट्यांनुसार भारतातील शहरांचे वर्गीकरण अभ्यासल्यानंतर आता तुम्ही ऐतिहासिक दृष्टिकोनातून केलेले वर्गीकरण अभ्यासणार आहात. ऐतिहासिक दृष्टिकोनातून भारतातील नगरांचे व शहरांचे पुढील चार प्रकारात वर्गीकरण करता येते.

**१) प्राचीन काळातील नगरे व शहरे :**

भारतातील अनेक वर्तमानकालीन शहरांवर भूतकाळाची छाप असल्याचे दिसून येते. भारतातील अनेक नगरे व शहरे ही प्राचीन काळात वसलेली आहेत. आज या नगर व शहरांची वाढ व विस्तार झालेला असला तरी ती प्रारंभी लहान आकाराची होती. तथापि, राजकीय दृष्टिने ही शहरे प्रभावशाली होती. काशी, अयोध्या, तक्षशिला, पाटलीपूत्र, प्रयाग, गया, उज्जैनी, नाशिक, रामेश्वर, कांची इत्यादी प्राचीनकाळात वसलेली शहरे आहेत. ही शहरे राजकीय व धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असल्याने त्यांचा विकास घडून आला. दक्षिणेकडील अनेक प्राचीन शहरे ही मंदीर असलेली आहेत. ही मंदिरे सुमारे पाचव्या ते बाराव्या शतकात बांधलेली आहेत. या शहरातील रस्त्यांचा एक विशेष असा नमुना (Pattern) आहे. मंदिराभोवती शहरातील रस्ते येऊन मिळतात व तेथे एक चौक तयार होतो. उत्तर भारतात प्राचीन शहरांची अवशेष फारच थोड्या

ठिकाणी आढळतात. बिहारमधील राजगीर हे शहर प्राचीन मगध साम्राज्याची राजधानी होती व तेथे आजही अवशेष आढळतात. अलाहाबाद, मथुरा, अयोध्या इत्यादी शहरांना प्राचीन इतिहास आहे. पण तेथील वास्तुस्त्रीय पुरावे फारसे प्रभावी नाहीत. तथापि, सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोनातून या शहरांना आजही महत्त्व आहे.

**२) मध्ययुगातील नगरे व शहरे :**

मध्ययुगात भारतात अनेक नगरे, शहरे वसवली गेली. ही नगरे व शहरे, राजा, सरदार, जमीनदार अशा लोकांनी वसवली किंवा विकसित केली. दिल्ली, हैद्राबाद, जयपूर, लखनौ, आग्रा, अहमदाबाद, नागपूर, पुणे इत्यादी नगरे ही मध्ययुगीन आहेत. मध्ययुगात भारतात मुस्लिम राजवट होती. मुस्लिम राज्यकर्त्यांनी लष्कर प्रशासन, व्यापार इत्यादीची केंद्रे म्हणून जुन्या शहरांचा विकास केला तर कांही नवीन शहरे (उदा. फत्तेपूर शिक्री, अहमदाबाद, शहानाबाद इ.) वसविली. या राज्यकर्त्यांनी कारागीर, मजूर अशा व्यक्तींना खेड्यातून नगरात स्थलांतर करण्यास प्रोत्साहन दिले. इ.स. १८०० पूर्वी वरी नगरे व शहरे ही मोठ्या प्रमाणावर विकसित झाली. या नगरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील बहुतेक शहरात किल्ले आहेत. या काळातील शहाजनाबाद, हैद्राबाद, जयपूर, फत्तेपूर शिक्री इत्यादी शहरे ही सुनियोजितपणे वसवलेली आहेत. मध्ययुगातील कांही शहरांची भरभराट ब्रिटिश राजवटीत तर काहींची स्वातंत्र्योत्तर काळात झालेली आहे. किल्ले, मशिदी, पारंपरिक बाजार, चौक, मिनार इत्यादी गोष्टी आजही या शहरात महत्त्वाच्या आहेत. तसेच या शहरातील जुने विभाग हे आज अतिगर्दीचे झालेले आहेत. या नगरांतील मध्ययुगीन मोहल्ले हे आजही आपली वांशिक, भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यावसायिक वैशिष्ट्ये टिकवून आहेत.

**३) ब्रिटिश राजवटीतील नगरे व शहरे :**

भारतात सुमारे १५० वर्षे ब्रिटिश राजवट टिकून होती या काळात अनेक नगरे व शहरे उदयास आली. तर पूर्वीच्या छोट्या शहरांचे नगरात व महानगरात रुपांतर झाले. कालिकत (कलकत्ता), मुंबई (बाँबे), चेन्नई (मद्रास) ही प्रमुख महानगरे ब्रिटिश काळात विकसित झाली. तसेच अनेक थंड हवेची ठिकाणे ब्रिटिशकाळातच भरभराटीस येऊन त्यांना शहरांचे रूप प्राप्त झाले. प्राचीन व मध्ययुगीन कांही शहरे ब्रिटिश राजवटीत लक्षणीय स्वरूपात बदलली. तथापि ब्रिटिशकाळात उदयास आलेल्या शहरांवर युरोपियन वास्तुकलेची मोठी छाप दिसून येते. या काळातच जमशेटपूर, भद्रावती, धनबाद, असनसोल ही औद्योगिक शहरे उदयास आली. ब्रिटिशांनी औद्योगिकीकरणास चालना दिली. त्यामुळे नागरीकरणास गती आली. शहरे व नगरे ही शासकीय व्यवहार, लष्कर, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण इत्यादीची केंद्रे बनल्याने सभोवतालच्या प्रदेशातील विभिन्न धर्माचे, जातीचे, वर्गाचे, भाषेचे, व्यवसायाचे लोक शहराकडे स्थलांतर करू लागले. परिणामी अनेक शहरांची व नगरांची भरभराट झाली.

**४) स्वातंत्र्योत्तर काळातील नगरे व शहरे :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर (१५ ऑगस्ट १९४७ नंतर) अल्पकालावधीतच भारतात कांही नगरे / शहरे उदयास आली. त्यापैकी चंदीगढ या नियोजित शहरांचा अपवाद वगळता बाकीची बहुतेक नगरे/शहरे ही औद्योगिक किंवा निवासी केंद्रांच्या भोवती विकसित झालेली आहेत. ही नागरी वाढ ही तितकीशी नियोजित स्वरूपाची नाही.

**क) लोकसंख्येच्या आधारे नगरांचे व शहरांचे वर्गीकरण :**

लोकसंख्येच्या आधारे नगरांचे / शहरांचे वर्गीकरण केले जाते. भारतात किमान ५००० लोकसंख्येच्या वस्तीला नागरी विभाग मानले जाते. तथापि, या वस्तीतील ७५% पुरुष हे बिगरशेती व्यवसायात गुंतलेले असावेत. शिवाय तिच्यातील लोकसंख्येची घनता ही दर चौ.कि.मी. ला किमान ५०० इतकी असावी लागते. आणि तेथे नगर परिषद, महानगरपालिका, कटक मंडळ, नोटिफाईड एरिया यापैकी एक स्थानिक शासन असावे लागते. भारतात ५००० पेक्षा अधिक लोकसंख्येची वस्तीस्थाने मोठ्या प्रमाणावर आहेत. तथापि, त्यापैकी अनेक वस्तीस्थानेही उर्वरित निकष पूर्ण करीत नाहीत. त्यामुळे त्यांना शहर / नगर न मानता खेडे (ींळश्रश्ररसश) किंवा ग्रामीण विभाग मानले जाते.

इ.स. २०११ च्या जनगणेच्या आधारे भारतातील शहरांचे व नगरांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) शहर** (Town) :

यापर्वीच नमूद केल्याप्रमाणे Town या इंग्रजी शब्दासाठी आपण शहर हा मराठी शब्द वापरलेला आहे. ५ हजार ते १ लाख लोकसंख्येच्या नागरी विभागासाठी शहर ही संज्ञा वापरता येईल. देशातील जवळपास सर्वच तालुक्याची ठिकाणे (कांही अपवाद) ही या प्रकारात समाविष्ट होतात. अशा शहरात किमान स्वरूपात नागरी सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, नागरी जीवनपद्धती बरोबरच ग्रामीण जीवनपद्धतीचाही मोठा प्रभाव तेथे आढळतो. बहुतेक शहरात नागरी व ग्रामीण जीवन पद्धतीचे मिश्रण झालेले दिसून येते. अशा शहरात स्थानिक कारभार पाहण्यासाठी नगरपरिषद (Municipal council) असते. या प्रकरात मोडणाऱ्या कांही वसाहतीमध्ये नगर पंचयत ही स्थानिक कारभार पाहणारी संस्था महाराष्ट्रात स्थापन केलेली आढळते.

**२) नगर** (City) :

शहरापेक्षा (town) अधिक मोठ्या आकाराच्या नागरी विभागासाठी नगर ही संज्ञा वापरता येईल. १ लाख ते १० लाख पर्यंतच्या लोकसंख्येच्या वसाहतींचा समावेश नगर या प्रकारात करता येईल. शहरापेक्षा नगरातील जीवनपद्धतीही अधिक प्रगत वा विकसित असते. नागरी जीवन पद्धतीची सर्व लक्षणे या प्रकाराच्या नागरी विभागात आढळतात. भरतातील बहुतेक जिल्ह्याची ठिकाणे या प्रकारात मोडतात. ३ लाखापेक्षा

कमी लोकसंख्येच्या नगरात स्थानिक कारभार पाहण्यासाठी नगरपरिषद ही संस्था असते. तर ३ लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या नगरात महानगरपालिका ही संस्था असते.

**३) महानगर** (metropolitin city) :

१० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नागरी विभागास महानगर मानता येईल. या विभागात स्थानिक कारभार पाहण्यासाठी महानगरपालिका (Municipal Corporation) ही संस्था स्थापन केलेली असते. येथे मानवी जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या नागरी सुविधा विपूल प्रमाणात उपलब्ध असतात. महानगर हे वाहतूक, व्यापार, उद्योग, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादीचे केंद्र असते. नागरी जीवन पद्धती येथे पूर्ण विकसित स्वरूपात आढळून येते. महानगर हे विजातीय स्वरूपाची वसाहत असते. म्हणजे त्यामध्ये विविध वंशाचे, धर्माचे, भाषेचे, जातीचे, वर्गाचे लोक वास्तव्य करीत असतात. महानगर आकाराने जेवढे अधिक मोठे तेवढ्या अधिक प्रमाणात त्यामध्ये नागरी समस्या (Urban Problems) निर्माण झालेल्या दिसतात.

लोकसंख्येच्या आधारे भारतातील महानगरांचे पुढीलप्रमाणे विभाजन करता येईल.

**अ) १० लाखापेक्षा जास्त पण २० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली महानगरे :** यामध्ये भोपाळ, वडोदरा (बडोदा) आग्रा, विशाखापट्टणम्, थिरूअनंतपूरम (त्रिवेंद्रम), लुधियाना, नाशिक, विजयवाडा इत्यादींचा समावेश होतो.

**ब) २० लाखापेक्षा जास्त पण ५० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली महानगरे :** यामध्ये सूरत, जयपूर, कानपूर, लखनौ, नागपूर, गाझीयाबाद, इंदोर, कोईमतूर, कोची, पाटणा इत्यादींचा समावेश होतो.

**क) ५० लाखापेक्षा जास्त पण १ कोटीपेक्षा कमी लोकसंख्येची महानगरे :** यामध्ये चेन्नई (मद्रास), बंगळूर, हैद्राबाद, अहमदाबाद, पुणे इत्यादींचा समावेश होतो.

**ड) १ कोटी पेक्षा अधिक लोकसंख्येची महानगरे यामध्ये मुंबई,** दिल्ली व कोलकत्ता यांचा समावेश होतो. ही अतिविशाल आकाराची महानगरे आहेत. नागरी जीवनपद्धतीचे अत्युच्च रूप या महानगरात आढळते.

**३.३.२ औद्योगिकीकरण आणि नागरीकरण** (Industrialization and Urbanization)

नगरांची व शहरांची वर्गीकरणे अभ्यासल्यानंतर आता तुम्ही औद्योगिकीकरण व नागरीकरण यांचा अभ्यास करणार आहात.

**औद्योगिकीकरण :** औद्योगिकीकरणाची सुरुवात १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे झाली. १७ व १८ व्या शतकात जे शास्त्रीय व तांत्रिक शोध लागले त्या शोधावर आधारलेली अनेक यंत्रे व तंत्रे उदयास आली व त्यांचा वापर उत्पादन प्रक्रियेत होऊ लागला. यंत्राद्वारे घरात उत्पादन

करणे शक्य नसल्याने उत्पादनासाठी घराबाहेर कारखाना (Factory) हे केंद्र उभारले गेले. कारखान्याच्या उभारणीसाठी इमारत, यंत्रे व तंत्रे, कच्चा माल खरेदी करणे व पक्का माल विकणे यासाठी बाजारपेठा, वाहतूक साधने, वीज, पाणी, मनुष्यबळ इत्यादी घटकांची गरज असते. ही गरज पूर्ण करण्यासाठी मोठे भांडवल लागते. अशा प्रकारे प्रचंड भांडवल गुंतवणूक करून वस्तू व सेवा यांचे उत्पादनासाठी कारखाना उभारणे यालाच स्थुलमानाने उद्योग (Industry) म्हटले गेले. कापड, लोखंड, पोलाद, रसायने, औषधे, सिमेंट, कागद यांच्या उत्पादनासाठी उद्योग उभारले गेले. अशा ह्या मोठमोठ्या उद्योगांची वाढ, विस्तार व विकास होण्याची जी प्रक्रिया सुरू झाली तिलाच स्थुलमानाने औद्योगिकीकरण असे म्हणतात. अशा या औद्योगिकीकरणाचा व नागरीकरणाचा घनिष्ठ संबंध आहे.

**औद्योगिकरणाची व्याख्या व अर्थ :**

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे**

अजैविक शक्तीवर चालणाऱ्या अवजड यंत्राच्या साह्याने वस्तू व सेवांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी उद्योगधंदे उभारण्याची प्रक्रिया म्हणजे औद्योगिकीकरण होय.

**२) बिल्बर्ट इ. मूर :**

''आर्थिक वस्तू व सेवा यांच्या उत्पादनासाठी अमानवी किंवा अजैविक शक्तीचा जास्तीत जास्त वापर करणे असा औद्योगिकीकरणाचा मूलभूत अर्थ आहे.''

**३) बी. कुप्पुटचामी :**

''वस्तू उत्पादन, वाहतूक व दळणवळण यासाठी बाष्प व वीज यासारख्या अजैविक साधनांचा वापर करणे म्हणजे औद्योगिकीकरण होय.''

**४) एम. एस. गोरे :**

''औद्योगिकीकरण ही संज्ञा अशा प्रक्रियेचा निर्देश करते की, जिच्यामध्ये वस्तूचे हाताने होणारे उत्पादन इतर शक्तीवर चालणाऱ्या यंत्राने होणाऱ्या उत्पादनात परिवर्तीत होते आणि या परिवर्तनामुळे कृषीतंत्र, वाहतूक व दळणवळण, व्यापार व वित्तसंघटन यांच्यातही परिवर्तन होते.''

**औद्योगिकीकरणाचा अर्थ :**

वरील व्याख्यांच्या आधारे औद्योगिकीकरणाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) औद्योगिकीकरण म्हणजे शास्त्रीय-तांत्रिक शोधावर आधारलेल्या साधनांच्या (यंत्रांच्या) सहाय्याने उत्पादन करणे होय.

२) उत्पादनात जैवशक्तीऐवजी अजैवशक्तीवर (यांत्रिकशक्तीवर) चालणारी साधने वा यंत्रे वापरणे होय.

३) उत्पादन, कृती, वाहतूक, संप्रेषण इत्यादीचे यांत्रिकीकरण होते.

४) नवीन बाजारपेठा उदयास येणे, वित्तपुरवठ्याच्या संघटनात बदल होणे, श्रमविभाजन व विशेषीकरण उदयास येणे, भांडवलाचा विस्तार व त्यावरील अवलंबन वाढत जाणे.

५) थोडक्यात, मोठमोठ्या उद्योगधंद्याचा उदय, विकास, विस्तार होणे म्हणजे औद्योगिकीकरण होय.

**औद्योगिकरणाची वैशिष्ट्ये :**

**१) यांत्रिकीकरण :**

औद्योगिकीकरणाचे पहिले वैशिष्ट्ये म्हणजे उत्पादन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण होणे होय. औद्योगिकीकरण उत्पादनासाठी मोठमोठी यंत्रे वापरली जातात. ही यंत्रे मानवी शक्तीऐवजी वीज, खनिज तेल यांच्याद्वारे निर्माण होणाऱ्या शक्तीवर चालतात.

**२) कारखाना उत्पादन पद्धती :**

औद्योगिकीकरणात घरगुती - उत्पादन पद्धतीच्या जागी कारखाना उत्पादन - पद्धती येते. घराबाहेर कारखाना उभारून त्यामध्ये यंत्रांच्या मदतीने कमी श्रमात अधिक व सुबक वस्तूंचे उत्पादन केले जाते म्हणजे राहण्याची जागा व उत्पादनाची जागा यांची फारकत होते.

**३) श्रमविभाजन व विशेषीकरण :**

औद्योगिकीकरणात सुक्ष्म व संकीर्ण असे श्रमविभाजन व विशेषीकरण उदयास येते. व्यक्तीचे वय, लिंग, जन्म याऐवजी तिचे गुण, कर्तृत्व, शिक्षण या आधारे श्रमविभाजन केले जाते. यातूनच उद्योगधंद्यात औपचारीक संघटन (नोकरशाही) निर्माण होते. औपचारिक नियमांच्या आधारे ह्या संघटनेतील पदांचा हक्क व कर्तव्य ठरविली जातात. प्रत्येक पदावरील व्यक्ती ही विशिष्ट कार्यात तज्ञता प्राप्त करून विशिष्ट कार्य करीत राहते यालाच विशेषीकरण म्हणतात.

**४) दळणवळण व वाहतूक साधने :**

औद्योगिकीकरणात दळणवळणाच्या व वाहतूकीच्या साधनांचे जाळे विणले जाते. कच्चा माल कारखान्यात आणण्यासाठी व पक्क माल बाजारात पोहचविण्यासाठी मोटार, रेल्वे, जहाज, विमान, अशा वाहतूक साधनांची व टपाल, तारायंत्र, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन वृत्तपत्र इत्यादीचे जाळे विणले जाते.

**५) भांडवलास प्राधान्य :**

औद्योगिकीकरणात भांडवलास प्राधान्य मिळते. जागा, इमारती, यंत्रे, वीज, पाणी, कच्चा माल, वाहतूक व दळणवळण साधने, मनुष्यबळ इत्यादींची औद्योगिकीकरणात गरज असते व त्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज भासते. उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया ही भांडवलावर आधारलेली असते. उद्योगात भांडवल गुंतवणाऱ्यास भांडवलदार म्हणतात. भांडवलदार उद्योगाचा मलक असतो तर कामगार हा उद्योगधंद्याचा नोकर असतो. यातूनच भांडवलदार व कामगार हे दोन वर्ग समाजात उदयास येतात.

**६) नफ्यासाठी उत्पादन :**

उद्योगातून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे औद्योगिकीकरणाचे एक वैशिष्ट्य आहे. घरगुती उत्पादन पद्धतीत निर्वाह विषय गरजा भागविणे हे प्रधान उद्दिष्ट होते. कारखाना उत्पादन पद्धतीत मात्र नफा मिळविणे हे प्रधान उद्दिष्ट असते. त्यामुळे नफा मिळविण्यासाठी उद्योगाचा विस्तार करणे, जास्तीत जास्त उत्पादन करणे, बाजारपेठा काबीज करणे, जाहिरातीद्वारे ग्राहकांना आकर्षित करणे, कृत्रिम गरजा निर्माण करून ग्राहकांना त्याची सवय लावणे, समाजात चंगळवादाचे वातावरण निर्माण करणे इत्यादी गोष्टी जाणीवपूर्वक केल्या जातात. थोडक्याात औद्योगिकीकरणात उद्योगाची चक्रे नफ्याच्या प्रेरणेने फिरत असतात.

**७) नागरीकरणास चालना :**

औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणास चालना मिळते. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत प्रारंभी मोठ मोठे उद्योग हे शहरात वा शहराच्या जवळपास उभारले जातात. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशातील लोक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतात. त्यामुळे शहराची लोकसंख्या व आकार वाढत जातो. जुन्या शहरांचा विस्तार होतो तर काही नवीन शहरे उदयास येतात अशाप्रकारे औद्योगिकीकरणापाठोपाठ नागरीकरण सुरू होते.

**८) कृषी उत्पादन तंत्रात बदल :**

औद्योगिकीकरणात कृषी मालावर आधारलेले अनेक उद्योग उदा. साखर कारखाने, सुत गिरण्या, तेल गिरण्या इ. सुरू होतात. या उद्योगांची कच्च्या मालाची गरज भागविण्यासाठी कृषी उत्पादन वाढविणे आवश्यक ठरते. त्यामुळे कृषी क्षेत्रात सुधारित उत्पादन तंत्र (रासायनिक खते, जंतुनाशके, संकरित बियाणे, सुधारित अवजारे, कृत्रिम पाणी पुरवठा इ.) वापरले जाते. परिणामी शेती विकासासही चालना मिळते.

**९) सामाजिक परिवर्तन :**

औद्योगिकरणामुळे केवळ उत्पादन वितरण, वाहतूक, व्यापार, इत्यादीतच परिवर्तन घडून येत नाही तर कुटुंब, धर्म, विवाह शिक्षण इत्यादी सामाजिक इच्छा आकांक्षा, आवडी निवडी, सवयी, इत्यादीतही

लक्षणीय परिवर्तन घडून येते. परंपरागत रितीरिवाज प्रथा, रुढी, दैववादी वृत्ती इत्यादींचा प्रभाव कमी होतो व नवीन ज्ञान कल्पना, यांचा प्रभाव वाढत जातो. त्यामुळे विकास, प्रगती, सुधारणा यांची गती वाढत जाते.

**नागरीकरण, व्याख्या, स्वरूप व कारणे किंवा घटक**

नागरीकरणाचा अर्थ समजण्यासाठी आपण प्रथम कांही मान्यवर अभ्यासकांनी नागरीकरणाच्या दिलेल्या व्याख्या अभ्यासणार आहोत.

१. नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः खेड्यांतील लोकांनी नगरांकडे स्थलांतर करणे आणि नगरातील बिगरशेती व्यवसाय, मूल्ये आणि जीवनशैली यांचा स्वीकार करणे या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात – **प्रा. चंद्रकांत खंडागळे**

२. ग्रामीण समुदायाचे नागर समुदायात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात – **ई. ई. बर्गेल**

३. कृषी व्यवसायाशी संबंधित असलेल्या लहान समुदायातील लोकसंख्या जेव्हा प्रामुख्याने उद्योग, व्यापार, शासकीय व्यवहार चालत असलेल्या मोठ्या समुदायाकडे स्थलांतरीत होत असेल तर त्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात – **डब्लु. एस. थॉम्पसन**

४. नागरीकरण ही नगरांच्या वाढीशी संबंधित असणारी प्रक्रिया असून तिचे दोन पैलू आहेत. १) लोक ग्रामीण भागातून नागरी भागाकडे स्थलांतर करतात. २) कृषीविषयक कामे सोडून बिगरकृषी पद्धतीची कामे स्वीकारतात. – **नेल्स एण्डर्सन**

५. नागरीकरण ही ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे लोकसंख्येचे होणारे स्थलांतर आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातल्यापेक्षा नागरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढते. नागरीकरण म्हणजे नागरी वर्तन प्रतिमानांचा व विचार प्रकारांचा प्रसार होणे होय. – **विल्यम स्कॉट**

**नागरीकरणाचे स्वरूप**

वरील व्याख्यांच्या आधारे नागरीकरणाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१. स्थलांतर – प्रक्रिया :** नागरीकरण ही लोकसंख्येच्या स्थलांतराची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः लहान आकाराच्या समुदायातील किंवा खेड्यातील लोक तुलनेने मोठ्या आकाराच्या समुदायाकडे किंवा नगराकडे अथवा औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर करतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या (U.N.O.) एका अहवालानुसार नागरीकरणाच्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित निर्धारित आकाराच्या समूहाकडून मोठ्या आकाराच्या समूहामध्ये एकत्रित होत असते.

२. **आधुनिक प्रक्रिया :** नागरीकरण ही आधुनिक काळातील प्रक्रिया आहे. मानव समाजात प्राचीन काळापासून शहरे (Towns) व नगरे (Cities) अस्तित्वात आहेत. नगरे मानवी संस्कृतीइतकीच प्राचीन आहेत. पण प्राचीन काळात नागरीकरणाची प्रक्रिया प्रचलित नव्हती. खेड्यातील लोक शहराकडे वा

नगराकडे मोठ्या प्रमाणावर स्थायी स्वरूपाचे सहसा स्थलांतर करीत नसत. ही प्रक्रिया आधुनिक काळात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीनंतर प्रथम इंग्लंड व त्यानंतर इतर युरोपियन राष्ट्रात आणि त्यानंतर ती इतर पाश्चात्य राष्ट्रात या प्रक्रियेची सुरुवात झाली आणि त्यानंतर तिचे लोण पौर्वात्य राष्ट्रातही पोहचले. आज सर्वच राष्ट्रात नागरीकरण ही अनिवार्य प्रक्रिया मानली जाते.

३. **सामाजिक प्रक्रिया :** नागरीकरण ही केवळ एका भौगोलिक स्थानाकडून दुसऱ्या भौगोलिक स्थानाकडे स्थलांतरणाची म्हणजेच भौगोलिक गतिशीलतेची प्रक्रिया नाही तर ती एक सामाजिक प्रक्रियासुद्धा आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या आपणास असे म्हणता येईल की नागरीकरण ही नागरी जीवनपद्धतीच्या वैशिष्ट्यात वाढ होण्याची प्रक्रिया आहे. अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेली मनोवृत्ती लोकांमध्ये विकसित होणे नागरीकरणात अभिप्रेत आहे. ग्रामीण लोकांनी नगराकडे स्थलांतर करणे व बिगरकृषी व्यवसाय स्वीकारणे एवढेच नागरीकरणासाठी पुरेसे नाही तर त्यांच्या आचार विचार, मूल्ये, राहणीमान, जीवनशैली इत्यादी गोष्टींतही नागरी पर्यावरणाच्या अनुषंगाने परिवर्तन घडून आले पाहिजे. याच अर्थाने **विल्यम स्कॉट** हे नागरीकरणास ''नागरी वर्तन प्रतिमानांचा (Patterns of behaviour) आणि विचार पद्धतींचा (mods of thought) प्रसार होणे.'' असे मानतात. यासंदर्भात **पॉल मीडीज** आणि **मिझरूची** म्हणतात की ''नागरीकरण या संज्ञेद्वारे अशा प्रक्रियेचा बोध होतो की जिच्यामुळे अ) नागरी मूल्यांचा विस्तार होतो. ब) खेड्यांकडून लोक नगराकडे येतात. क) व्यवहार प्रतिमाने बदलतात आणि त्यांच्या तादात्मीकरणाचा समन्वय नगरात राहणाऱ्या समूहांशी साधला जातो. त्यामुळे नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया ठरते.

४. **नगरवादाहून वेगळी :** बऱ्याच वेळा नागरीकरणाच्या प्रक्रियेचा संबंध नगरवादाशी (urbanism) जोडल्याचे आढळते. तथापि नागरीकरण ही नगरवादाहून भिन्न किंवा वेगळी अशी गोष्ट आहे. **लुईस वर्थ** यांनी नागरीकरणास एक प्रक्रिया (Process) मानले आहे तर नगरवादास एक स्थिती (Situation) मानले आहे. **एस. बी. क्विन** आणि **डी. बी. कारपेंटर** यांनी आपल्या The American City या ग्रंथात असे नमूद केले आहे की, ''नगरात निवास करण्याच्या स्थितीशी तादात्म्य प्रस्तापित करणे म्हणजे नगरवाद होय आणि नागरी निवासाच्या जीवनपद्धतीशी तादात्म्यीकरण प्रस्थापित करण्यास नागरीकरण असे म्हणतात.'' नगरवाद ही नगरात राहणाऱ्या लोकांचा जीवन जगण्याचा मार्ग किंवा शैली आहे. नागरीकरणाची प्रक्रिया ह्या जीवनशैलीस समृद्ध करते. ज्या लोकांना ह्या जीवनशैलीचा परिचय नाही त्यांच्यापर्यंत ही जीवनशैली पोहचविण्याचे कार्य नागरीकरणाची प्रक्रिया करते. थोडक्यात नागरीकरण ही नगरवादाचा प्रसार व विस्तार करणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल.

५. **औद्योगिकीकरणाशी संबंधीत :** नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेशी घनिष्ठपणे संबंधित आहे. औद्योगिकीकरणापाठोपाठ नागरीकरण सुरू होते असे मानले जाते. कांही विद्वानांच्या मते या दोन्ही प्रक्रिया नेहमी हातात हात घालून वाटचाल करीत असतात. नागरीकरण हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू असलेल्या समाजात नागरीकरणाची

प्रक्रिया चालू असते. आर्थिक विकास साधू इच्छिणाऱ्या समाजात औद्योगिकीकरणावर भर दिला जातो. औद्योगिकीकरणामुळे नवीन उद्योगकेंद्रे अस्तित्वात येतात तर जुन्या उद्योगकेंद्राचा विकास साधण्यावर भर दिला जातो. अशा उद्योगकेंद्रात नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. परिणामी अशा केंद्राकडे सभोवतालच्या प्रदेशातून लोक नोकरी, धंदा, व्यापार, शिक्षण-प्रशिक्षण इत्यादीच्या निमित्ताने खेचले जातात. त्यातूनच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते.

६. **नागरीकरणाच्या पूर्वावश्यकता :** नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होण्यासाठी अगोदर कांही गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक असते. ग्रामीण भागातून नगराकडे लोकांचे स्थलांतर होण्यासाठी वाहतुकीच्या (मोटार, रेल्वे, जहाज, विमान इ.) आणि संदेशवहनाच्या (टपाल, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ इ.) प्रगत साधनांचे जाळे उभारलेले असले पाहिजे. तसेच त्यांचा वरचेवर विकास घडवून आणला पाहिजे. तसेच नगरात जमीन, पाणी, निवाऱ्याची साधने, वस्तूंच्या देवघेवीची व्यवस्था, इत्यादी बाबींचीही उपलब्धता असली पाहिजे. कांही विद्वानांच्या मते नागरीकरणासाठी विशिष्ट मनोवृत्ती किंवा दृष्टिकोनही निर्माण झालेला असावा लागतो.

७. **नागरीकरणाच्या अवस्था :** नागरीकरणाच्या प्रक्रियेची गती ही औद्योगिकीकरणाच्या गतीवर अवलंबून असते. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या विकासाच्या अवस्थांनुसार नागरीकरणाच्याही विविध अवस्थांमधून विकास होत जातो. त्यालाच नागरीकरणाच्या अवस्था (phases of urbanization) असे म्हणतात. त्या अवस्था पुढीलप्रमाणे आहेत -

**अ) पहिली अवस्था :** पहिल्या अवस्थेत नागरीकरणाची सुरुवात प्रथमतः मंद गतीने होते. या अवस्थेत एखाद्या समाजात औद्योगिकीकरणाला नुकतीच सुरुवात झालेली असते. त्यामुळे त्यावर आधारलेल्या नागरीकरणासही फारसा वेग आलेला नसतो. प्रक्रियेचा प्रारंभ मात्र निश्चित रूपाने झालेला असतो. दुसऱ्या अवस्थेला आवश्यक असणारी पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य पहिल्या अवस्थेकडून केले जाते. नागरीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा उदाहरणार्थ जमीन, निवारा साहित्य, पाणीपुरवठा, सामूहिक जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक-सामाजिक यंत्रणा (मालमत्ता, श्रम, सेवा व वस्तुंची देवघेव व्यवस्था इ.) संरक्षण व्यवस्था, प्रशासन, आणि नवीन मनोवृत्ती किंवा दृष्टिकोन इत्यादी बाबी या पहिल्या अवस्थेत उपलब्ध झालेल्या असतात.

**ब) दुसरी अवस्था :** या अवस्थेत औद्योगिकीकरणाचा वेग बराच वाढलेला असतो. अनेक औद्योगिक नगरे अस्तित्वात येतात. जुन्या औद्योगिक नगरांत स्थलांतरीत लोकांचे प्रमाण खूपच वाढलेले असते. त्यामुळे त्यांचे नुतनीकरण होते. अशा नगरांतून नागरी समस्यांची सुरुवातही झालेली असते. औद्योगिकीकरणाची गती वाढल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाचीही गती वाढते.

**क) तिसरी अवस्था :** या अवस्थेत नागरीकरणाची कमाल अवस्था गाठली जाते. कारण औद्योगिकीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत आलेली असते. औद्योगिक विकास पूर्ण झालेला असतो.

नागरीकरणाच्या बहुतेक सर्व समस्यांनी उग्र स्वरूप धारण केलेले असते. नागरीकरणासंबंधी निश्चित धोरण आखून उपाययोजना कराव्या लागतात.

**ड) चौथी अवस्था :** या अवस्थेत नागरीकरणाची गती कमी होते. औद्योगिकीकरण पूर्ण झाल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाची गती कमी होणे स्वाभाविकच असते. अशावेळी नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असे मानले जाते. अशाप्रकारे वरील चार अवस्थेतून नागरीकरणाची प्रक्रिया विकसित होऊन पूर्णत्वाला पोहचते.

**८. सामाजिक परिवर्तनाचा घटक :** नागरीकरण सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणारा एक महत्त्वाचा घटक आहे. नागरीकरणामुळे पारंपारिक सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, सामाजिक जीवन पद्धती इत्यादीमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून येते हे आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालेले आहे. संयुक्त कुटुंबाच्या जागी विभक्त कुटुंब अस्तित्वात येणे, धर्मसंस्थेचे महत्त्व कमी होणे. सामाजिक स्तरीकरणात बदल होणे, लोकांचे राहणीमान, सामाजिक संबंधी, मनोवृत्ती यामध्ये बदल होणे, औपचारिक अशा शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणास महत्त्व येणे. नवनवीन समस्या निर्माण होणे अशाप्रकारची परिवर्तने घडून येण्यास नागरीकरणामुळे चालना मिळते.

**नागरीकरणाची कारणे** (Causes of Urbanization)

नागरीकरणाची व्याख्या व स्वरूप अभ्यासल्यानंतर तुम्ही नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांचा किंवा घटकांचा अभ्यास करणार आहात. ग्रामीण भागातून लोकांचे नगराकडे स्थलांतर होणे हा नागरीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. ह्या स्थलांतरास ज्या घटकांमुळे चालना मिळते त्या घटकांना नागरीकरणाची कारणे असे म्हणता येते. नागरीकरणाची कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. औद्योगिकीकरण :** औद्योगिकीकरण हे नागरीकरणाचे प्रमुख कारण मानले जाते. औद्योगिक क्रांतीनंतर मानव समाजात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शास्त्रीय शोधावर आधारलेली यंत्रे व तंत्रे उदयास येऊन त्यांचा उत्पादन प्रक्रियेत वापर होऊ लागला. त्यातून कारखाना उत्पादन पद्धती उदयास आली. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मोठमोठे कारखाने म्हणजेच उद्योगधंदे सुरू केले जाऊ लागले. उद्योगधंद्याचे केंद्रीकरण होऊ लागले. अशा भागात नोकरी, व्यापार, व्यवसाय करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करू लागले. यातूनच कांही नवीन शहरे उदयास आली तर जुन्या शहरांचा विस्तार व विकास होऊ लागला. अशाप्रकारे औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणास चालना मिळाली. उदा. सुमारे ३०० वर्षापूर्वी कोळ्यांची वस्तीअसलेल्या मुंबई बेटाचे ब्रिटिश राजवटीत औद्योगिक केद्रात रूपांतर होत गेले व आज ते भारतातील प्रथम क्रमांकाचे नगर बनले आहे. इ.स. १९११ मध्ये एक लहान गाव असलेल्या जमशेटपूरमध्ये 'टिस्को' हा पोलाद कारखाना सुरू केल्यानंतर त्याचे नगरात रुपांतर झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रशियाच्या सहकार्याने पोलादाचा कारखाना सुरू झाल्यानंतर 'भिलाई' हे नगर उदयास आले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगिकीकरणास चालना दिली व त्यातूनच भारतात नागरीकरणाची गती वाढली. अशाप्रकारे औद्योगिकीकरण हा नागरीकरणास जबाबदार ठरणारा मूलभूत घटक आहे.

२. **दळणवळणाची साधने :** दळणवळणाची प्रगत साधने हे नागरीकरणाचे दुसरे कारण आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत कच्चा व पक्का माल तसेच मनुष्यबळ यांची वाहतूक करण्यासाठी व संदेश त्वरित पाठविण्यासाठी दळणवळणाच्या प्रगत साधनांची गरज भासते. यातूनच मोटार, ट्रक, रेल्वे, जहाज, विमान अशी वाहतुकीची साधने आणि टपाल, तारायंत्र, दूरध्वनी, वायरलेस, फॅक्स अशी सदेशवहनाची साधने उदयास आली. जमीन, पाणी व आकाश ह्या तीन मार्गावर दळणवळण साधनांचे जाळे विणले गेले. परिणामी लोकांना ग्रामीण भागातून नगरांकडे स्थलांतर करणे सुलभ झाले. जी गावे, शहरे/नगरे व औद्योगिक केंद्र दळणवळणाच्या प्रगत साधनांनी जोडली गेली त्यांच्याकडे सभोवतालच्या प्रदेशातील लोकसंख्येचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होऊन नागरीकरणास चालना मिळाली आहे.

३. **व्यापार आणि व्यवसाय :** एखादा व्यवसाय किंवा व्यापार करून पैसा कमावण्याच्या हेतुने एखाद्या मध्यवर्ती नगराकडे ग्रामीण लोक, दुसऱ्या नगरातील लोक, एवढेच नव्हे तर परदेशातील लोकही धाव घेतात. म्हणजेच एखाद्या शहरास वा नगरास व्यापाराच्यादृष्टीने महत्त्व प्राप्त झाल्यास त्याकडे स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढत जावे व नागरीकरणास चालना मिळते. भारतात कानपूर व अहमदाबाद यांचा याच कारणामुळे विस्तार घडून आलेला आहे.

४. **शिक्षण :** एखाद्या नगरात, शहरात किंवा गावात एक किंवा अधिक शैक्षणिक संस्था सुरू होतात. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची व त्यांना हव्या असणाऱ्या सोयीसुविधा पुरविणाऱ्या लोकांची त्या नगरात, शहरात किंवा गावात गर्दी होऊ लागते व त्यातून नागरीकरणास गती मिळते. इ.स. १८५७ साली मुंबई, कलकत्ता, मद्रास (चेन्नई) येथे विद्यापीठे सुरू झाली. पुढे या नगरांतून व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणसंस्थांची संख्या वाढत गेली. त्यामुळे या नगरांकडे शिक्षणप्रेमी मंडळींनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराच्या वाढीमध्ये शिक्षण ह्या घटकाचा मोठा वाटा आहे. शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त होऊन एखादे नवीन शहर वा नगर अस्तित्वात येण्याची शक्यतासुद्धा नाकारता येत नाही.

५. **राजकीय घटक :** एखाद्या शहरास वा नगरास राजधानीचा दर्जा मिळाल्यानंतर त्याची झपाट्याने वाढ होते. असे शहर राजकीय, प्रशासकीय कार्यांचे प्रमुख केंद्र बनते. लष्करीदृष्ट्याही त्याचे महत्त्व वाढते. परिणामी सभोवतालच्या भागातील लोक अशा शहराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करू लागतात व नागरीकरणास चालना मिळते. भारतातील दिल्ली, भोपाळ, हैद्राबाद इत्यादींची वाढ होण्यात त्यांचा राजधानी म्हणून असलेला दर्जा मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. राजधानी किंवा प्रशासकीय केंद्र म्हणून एखादे नवीन शहरसुद्धा अस्तित्वात येऊ शकते. उदा. पंजाब व हरियाणा राज्याची राजधानी असलेले चंदीगढ.

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचे ठिकाण म्हणून 'ओरस' हे शहर वसविण्यात आले. परिणामी सभोवतालच्या भागातील लोक या शहराकडे स्थलांतरीत होऊ लागले आहेत.

६. **धार्मिक क्षेत्र :** धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेल्या क्षेत्राकडे लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करतात. परिणामी त्या क्षेत्राचे नगरात रुपांतर होते. भारतात ही गोष्ट विशेषत्वाने दिसून येते. वाराणशी, गया, मथुरा, अलाहाबाद इत्यादी धार्मिक क्षेत्रे आज मोठी नगरे बनलेली आहेत. सुमारे ५० वर्षापूर्वी एक छोटेसे खेडे असलेले शिर्डी हे गाव (जि. अहमदनगर) त्याचे धार्मिक महत्त्व वाढल्याने शहरात रुपांतरीत झाले आहे.

७. **पर्यटन केंद्र :** एखादे थंड हवेचे ठिकाण, निसर्गरम्य ठिकाण, एखाद्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यामुळे प्रसिद्ध पावलेले ठिकाण इत्यादीकडे हौसी पर्यटक मंडळी खेचली जाते. त्यांना आवश्यक असलेल्या सायीसुविधा पुरविणारे व्यापारी, विक्रेते त्याठिकाणी येऊन दुकाने, हॉटेल, खानावण, लॉज अशी केंद्रे सुरू करतात. पुढे त्या ठिकाणाचा पर्यटन केद्र म्हणून विकास होत जातो व त्याचे नगरात रुपांतर होते. उदा. मसूरी, उटी.

८. **लोकसंख्या वाढ :** अलिकडील काळात जागतिक लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यास खेड्यासारखे लहान समुदाय असमर्थ ठरत आहे. शिवाय वाढती लोकसंख्या खेड्यातील शेती व्यवसायात सामावली जाऊ शकत नाही. परिणामी खेड्यातील लोक रोजगार व अन्य सोयीसुविधा मिळविण्यासाठी जवळपासच्या नगरांकडे स्थलांतर करीत आहेत. यातूनच नागरीकरणास वेग आलेला आहे.

९. **नागरी जीवनाचे आकर्षण :** आधुनिक काळात शहरे व नगरे ही उत्पादन, वितरण, शिक्षण, मनोरंजन, संरक्षण, प्रशासन, राजकारण इत्यादीची केंद्रे बनली आहेत. त्यामुळे शहरात कारखाने, दुकाने, बाजारपेठा, बँका, हॉटेल, लॉज, शाळा, चित्रपट व नाट्यगृहे, क्लब, दवाखाने, बागा, क्रीडांगणे, व्यायामशाळा अशा विविध सोयीसुविधा उपलब्ध असतात. परिणामी नागरी जीवन हे आकर्षक, चैनीचे व चकचकीत बनलेले असते. त्यामुळे नागरी जीवनाचे आकर्षण निर्माण होऊन ग्रामीण लोक नगरात/शहरात वास्तव्यासाठी येऊ लागले आहेत. परिणामी नागरीकरणास चालना मिळाली आहे.

**३.३.३ स्थलांतर आणि नागरीकरण** (Migration and Urbanization) :

औद्योगिकीकरण आणि नागरीकरण यांचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही स्थलांतर व नागरीकरण यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणार आहात.

**स्थलांतराची व्याख्या :**

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे :** आपल्या समुदायाच्या किंवा समाजाच्या किंवा देशाच्या भौगोलिक व राजकीय सीमाबाहेर सापेक्षता कायम स्वरूपात वास्तव्यास जाण्याची व्यक्ती वा समूहाची हालचाल म्हणजे स्थलांतर होय.

२) **विल्यम स्कॉट :** व्यक्ती किंवा लोकसंख्येची राजकीय सीमेच्या बाहेर नवीन निवासी क्षेत्रात किंवा समुदायात सापेक्षतः कायम स्वरूपाची होणारी हालचाल म्हणजे स्थलांतर होय.

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की स्थलांतर म्हणजे लोकांनी एका समुदायातून दुसऱ्या समुदायात सापेक्षतः स्थायी स्वरूपात वास्तव करण्यासाठी जाणे होय. स्थलांतर व नागरीकरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका अहवालानुसार नागरीकरणाच्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित निर्धारित आकाराच्या समूहाकडून मोठ्या आकाराच्या समूहात एकत्रित होत असते. लोकांना स्थलांतर करण्यास भाग पाडणारे अनेक घटक आहेत. उदा. नैसर्गिक आपत्ती, राजकीय संकट, रोजगाराच्या संधींचा अभाव, महत्त्वाकांक्षा इत्यादी.

औद्योगिकीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतरास चालना देते आणि हे स्थलांतर नागरीकरणास चालना देते. अशाप्रकारे ह्या तीन प्रक्रियामध्ये संबंध आहे. तो पुढीलप्रमाणे दाखविता येतो.

नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेशी घनिष्ठपणे संबंधित आहे. औद्योगिकीकरणाच्या पाठोपाठ नागरीकरण सुरू होते. कांही विद्वानांच्या मते या दोन्ही प्रक्रिया नेहमी हातात हात घालून वाटचाल करतात. नागरीकरण हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे आर्थिक विकास साधू इच्छिणाऱ्या समाजात औद्योगिकीकरणावर भर दिला जातो. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत ज्या ठिकाणी उद्योग उभारले जातात तेथे नगरांचा विकास घडून येतो. म्हणजेच औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणास चालना मिळते. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत साधारणपणे बहुतांशी उद्योग हे शहरात उभारले जातात. कारण उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा उदा. जमीन, वीज, पाणी, कच्चा माल, मनुष्यबळ, बाजारपेठा, वाहतूक साधने इत्यादी शहरात उपलब्ध असतात. त्यामुळे अशा शहरात उभारलेल्या उद्योगधंद्यात रोजगार मिळविण्यासाठी सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करू लागतात. परिणामी त्या शहरांची वाढ व विकास होऊ लागतो. अशाप्रकारे नागरीकरणास चालना मिळते. भारतात अशाप्रकारे विकसित झालेली शहरे म्हणजे मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, कानपूर इत्यादी आहेत. ही शहरे पूर्वी लहान होती. ब्रिटिश राजवटीत या शहरांमध्ये उद्योगधंदे उभारण्यात आले. स्वातंत्र्यानंतर तेथील उद्योगधंद्याची संख्या वाढत गेली. वाहतुकीच्या साधनांनी ही शहरे सभोवतालच्या प्रदेशाशी जोडली गेली. परिणामी सभोवतालच्या प्रदेशातील लोक ह्या शहरांकडे रोजगारासाठी स्थलांतर करू लागले. यातूनच त्यांची वाढ होण्यास चालना मिळाली.

दुसऱ्याही एका रीतीने उद्योगधंद्याच्या उभारणीमुळे नागरीकरणास चालना मिळू शकते. एखाद्या ठिकाणी उद्योगधंदा उभारण्यासाठी अनुकूल परिस्थिती असते. तथापि, तेथे एखादे शहर नसते. अनुकूल परिस्थिती असलेल्या ठिकाणी उद्योग उभारला की, त्या उद्योग केंद्राकडे कामगार, व्यापारी, विक्रेते असे विभिन्न प्रकारचे लोक स्थलांतर करतात व तेथे वस्ती करून राहू लागतात. अशा उद्योगकेंद्रात नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. परिणामी त्या केंद्राकडे इतरही लोक नोकरी, धंदा, व्यापार, शिक्षण इत्यादीच्या

निमित्ताने स्थलांतर करू लागतात. यातूनच त्या केंद्राचा विकास होऊन पुढे त्यास मोठ्या नगराचे स्वरूप प्राप्त होते.

अशाप्रकारे औद्योगिकीकरणामुळे जुन्या शहरांची वाढ व विकास होतो तर कांही नवी शहरे उदयास येतात. त्यामुळे औद्योगिकीकरण व नागरीकरण हातात हात घालून चालतात असे म्हटले जाते. तसेच नागरीकरण व स्थलांतर यांचाही घनिष्ठ संबंध आहे. नागरीकरण ही लोकसंख्येच्या स्थलांतरणाचीच प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः खेड्यातील लोक नगरांकडे वा औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर करीत असतात. थोडक्यात औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येचे स्थलांतर नगराकडे होते व त्यातून नागरीकरणास चालना मिळते.

### ३.३.४ नागरीकरणाचे कुटुंब, जात, वर्ग आणि स्त्रियांचा दर्जा यावरील परिणाम

नागरीकरणाची व्याख्या, स्वरूप, कारणे आणि भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया अभ्यासल्यानंतर आता तुम्ही नागरीकरणाचा कुटुंब, जात, वर्ग आणि स्त्रियांचा दर्जा यावरील परिणाम अभ्यासणार आहात.

**नागरीकरणाचे कुटुंबावरील परिणाम** (Consequences of Urbanization on the family)

नागरीकरणाचा भारतातील कुटुंबावर पडलेला प्रभाव पुढील मुद्द्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

१) **कुटुंबाच्या आकारात बदल :** नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबाची जागा हळूहळू विभक्त कुटुंब घेत आहे. पती-पत्नी व त्यांची अविवाहित मुले एवढेच सदस्य असलेले लहान आकाराचे कुटुंब नागर समाजात अनेक दृष्टीने सोयीचे ठरत आहे. व्यक्तीवाद, राहत्या जागेची टंचाई, उच्च जीवनमान, स्त्रीने नोकरी करणे, शहरातील धावपळीचे जीवन, इत्यादीमुळे कुटुंबाचा आकार लहान ठेवणे सोयीचे वाटते. म्हणून अन्य नातेवाईक कुटुंबात अडचणीचे ठरत आहेत. तसेच संतती नियमनाच्या साधनांमुळे प्रजोत्पादनाद्वारे वाढणारा कुटुंबाचा आकार मर्यादित करणे शक्य झाले आहे. शहरातील जागेची टंचाई, कुटुंब सदस्यांचे वेगवेगळे व्यवसाय यांमुळे निवास, मालमत्ता भोजनव्यवस्था याबाबतीत संयुक्त असणे अशक्य होत आहे.

२) **पितृसत्ताक एकाधिकारशाहीचा ऱ्हास :** नागरी कुटुंबात कुटुंब प्रमुख पुरुषाच्या एकाधिकारशाहीचा ऱ्हास होत आहे. पती हाच कुटुंब प्रमुख असला तरी त्याला इतर सदस्यांच्या म्हणजे पत्नी व मुलांच्या मतांचा, आवडीचा निवडीचा, इच्छा आकांक्षाचा आदर करून निर्णय घ्यावा लागतो. मातापिता आपले निर्णय मुलांवर जबरदस्तीने लादत नाहीत व मुलेही मातापित्यांच्या प्रत्येक आज्ञेचे आंधळेपणाने पालन करीत नाहीत. याचा अर्थ असा नव्हे की माता पिता मुलांना मुक्त स्वातंत्र्य देतात व मुले त्यांच्या आज्ञेचा अव्हेर करतात. पतीपत्नी व प्रौढ मुले यांनी परस्पर सहमतीने निर्णय घेण्याचे समतावादी वातावरण नागरी कुटुंबात निर्माण होत आहे. थोडक्यात कुटुंब प्रमुख पुरुषाच्या एकाधिकारशाहीच्या जागी लोकशाही व्यवस्था नागरी कुटुंबात येत आहे.

**३) स्त्रियांच्या दर्जात वाढ :** नागरीकरणामुळे स्त्रीचा कुटुंबातील दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे. नागरी कुटुंबात पती हा पत्नीच्या सल्ल्याने अधिकार वापरतो, किंवा पती पत्नीत अधिकाराचे विभाजन होत आहे. कुटुंबातील कामाच्या बाबतीत लिंगभेदावर आधारलेले कार्यविभाजन शहरात टिकू शकत नाही. कमावत्या पत्नीला पती स्वयंपाक व अन्य घर कामात मदत करतो. नोकरी वा धंद्यामुळे घराबाहेर असणाऱ्या पुरुषास कुटुंबाच्या दैनंदिन व्यवहाराकडे लक्ष देणे शक्य नसते. त्यामुळे पत्नीच बाजार करणे, पोस्ट बँक इ. ठिकाणी जाणे, मुलांना शाळेत नेणे-आणणे अशी कामे करते व त्याबाबतचे निर्णय स्वातंत्र्य तिला मिळते. नोकरी करणारे जोडते त्यांच्या सोयी व सवडीनुसार घरातील व घराबाहेरील कामे करतात. अशारितीने नागरीकरणामुळे पती-पत्नीमध्ये परिस्थितीजन्य समता प्रस्थापित होत आहे. नागरी कुटुंबात मुलाप्रमाणेच मुलीला समान मानून तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष दिले जात आहे.

**४) व्यक्तीवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार :** नागरीकरणामुळे व्यक्तीवादी दृष्टिकोन हळूहळू बळावत चालला आहे. नागर समाजात व्यक्तीला स्वकर्तृत्वाने शिक्षण, नोकरी, व्यवसाय, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याची संधी मोठ्या प्रमाणात असल्याने कुटुंबाच्या चालीरीती, आई-वडिलांच्या अपेक्षा यापेक्षा व्यक्तिगत इच्छा आकांक्षा महत्त्वाच्या ठरू लागल्या आहेत. शिक्षण, व्यवसाय, विवाह याबाबतचे निर्णय घेताना सदस्य कुटुंबाच्या हितापेक्षा स्वहितास प्राधान्य देऊ लागले आहेत.

**५) कुटुंबाच्या कार्यात बदल :** नागरीकरणाच्या प्रभावामुळे कुटुंबाच्या कार्यात बदल होऊन कुटुंबाची अनेक कार्ये इतर संस्था, संघटना मंडळे व समूह यांच्याकडे हस्तांतरीत झाली आहेत. प्रजोत्पादनाचे कार्य कुटुंबातच होत असले तरी त्यासाठी डॉक्टर्स, नर्स, प्रसूतीकृहे यांचे तर बालसंगोपनासाठी बालरोगतज्ज्ञ, डॉक्टर्स, बालआरोग्य केंद्रे यांचे सहाय्य घेतले जाते. नोकरी करणाऱ्या माता पित्यांना लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणागृहे, शिशुसदने यांच्यावर अवलंबून राहावे लागत आहे. मुलांच्या औपचारिक, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासाठी कुटुंब बालवाडीपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षण संस्थावर विसंबून रहाते. मुलांचे समाजीकरण व त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण कुटुंबाच्या हातात फारसे राहिलेले नाही. मुलांचा बराचसा वेळ घराबाहेर जातो. नोकरी करणारे जोडपे मुलांना शिस्त लावणे, त्यांच्यावर सुसंस्कार करणे, त्यांचे मनोरंजन करणे यासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाही. करमणूक, खेळ, शिक्षण, आरोग्य यांकरिता कुटंबाबाहेरील पर्यावरणाचा व संस्थांचा प्रभाव पडून त्यांची मनोवृत्ती कुटुंबनिरपेक्ष असे स्वहित पाहण्याची बनते. त्यातूनच कुटुंब सदस्यांच्या परस्परसंबंधात परिवर्तन होत आहे.

अर्थव्यवस्थेच्या उत्पादन, विनिमय, वितरण व उपभोग या चार प्रक्रियांपैकी केवळ उपभोग हीच प्रक्रिया नागरी कुटुंबाच्या हातात राहिली आहे. इतर प्रक्रिया सार्वजनिक संस्थांच्या हातात गेल्या आहेत. नागर समाजात व्यक्तीचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा कुटुंबावरून निर्धारीत न होता व्यक्तीच्या कर्तृत्वाने निर्धारीत होत आहे. व्यक्तीला मिळालेला दर्जा व प्रतिष्ठा तिच्या कुटुंबात पुढच्या पिढीत टिकून राहील याची शाश्वती राहिली नाही.

**६) समस्यांची निर्मिती :** नागरीकरणाच्या प्रभावामुळे कांही कौटुंबिक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहरातील विभक्त कुटुंबाकडून नात्यातील वृद्ध, अपंग, परित्यक्त व निराधार व्यक्तींचे पालनपोषण होणे अशक्य झाले आहे. सामाजिक व व्यावसायिक गतिशीलतेमुळे कमावती मुले व मातापिता यांच्यात भौतिक, आर्थिक व भावनिक दुरावा निर्माण होत आहे. त्यातून वृद्धांची समस्या बिकट झाली आहे. वृद्धापकाळी कौटुंबिक संरक्षण मिळेनासे झाल्याने भविष्यनिर्वाह निधी, निवृत्ती वेतन, आयुर्विमा, वृद्धाश्रम अशा सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे उदरनिर्वाहास थोडीफार मदत होत असली तरी भावनिक दुरावा वा एकाकीपणा नाहीसा होत नाही. आज प्रत्येक गोष्ट बाजारात विकत मिळते. पण माया, ममता, जिव्हाळा, आत्मीयता, स्नेह ह्या गोष्टीं कुटुंबाशिवाय अन्यत्र मिळत नाहीत. म्हणून कुटुंबातील ऐक्य या एकाच कारणामुळे टिकू शकेल असे शास्त्रज्ञांना वाटते.

**नागरीकरणाचे जातिसंस्थेवरील परिणाम :**

नागरीकरणामुळे जातीसंस्थेची अनेक वैशिष्ट्ये व निर्बंध लोप पावली आहेत. तर कांही लोप पावण्याच्या मार्गावर आहेत. जातिसंस्थेवरील नागरीकरणाचा प्रभाव पुढीलप्रमाणे–

**१) अर्जित दर्जाला महत्त्व :** नागर समाजात विभिन्न जाती धर्माचे, वंशाचे, भाषेचे, व्यवसायाचे लोक एकत्र आल्याने व्यक्तीचा दर्जा व प्रतिष्ठा, जात, जन्म, कुटुंब इ. च्या आधारे निर्धारीत करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे अर्जित दर्जाला महत्त्व आले आहे. नागरी पर्यावरणात सामाजिक गतिशीलतेस भरपूर वाव मिळतो. त्यामुळे स्वकर्तृत्वाने कनिष्ठ जातीतील व्यक्तींना, सत्ता, संपत्ती मिळवून त्याआधारे उच्च सामाजिक दर्जा संपादन करणे शक्य झाले आहे. कारण शहरात दर्जाच्या दृष्टीने शिक्षण संपत्ती या घटकांनाच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या गोष्टी नसलेल्या कर्तृत्वहीन अशा उच्च जातीतील व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ मानला जाऊ लागला आहे. अशारितीने नागरीकरणामुळे जातीच्या आधारे व्यक्तीच्या सामाजिक दर्जाचे निर्धारण करणे अशक्य होऊन अर्जित वा संपादीत दर्जाचा महत्त्व आले आहे.

**२) व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य :** नागरीकरणामुळे व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य उपभोगणे शक्य झाले आहे. नागरी व्यवसाय जातीच्या चौकटीत बसत नसल्याने व्यावसायकि गतीशीलता अटळ झाली. शहरातील आधुनिक व्यवसायात जातीच्या आधारे नोकर भरती करणे शक्य नसल्याने व्यक्तीच्या अंगच्या गुणकौशल्यास महत्त्व आले. त्यामुळे व्यक्ती आवश्यक ती पात्रता धारण करून आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडू लागली आहे. त्यामुळे जातीचाच व्यवसाय करण्याचा निर्बंध लोप पावला आहे.

**३) खाणे पिणे व सामाजिक संपर्काबाबतच्या निर्बंधाचे उच्चाटण :** नागरीकरणामुळे जातीचे खाणे पिणे व सामाजिक संपर्काबाबतच्या निर्बंधाचे उच्चाटण झाले आहे. शहरात हॉटेल खाणावळीत जेवताना त्याबाबतचे जातीचे नियम पाळणे अशक्य झाले. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने उच्च जातीतही मद्यसेवन व मांसाहार सुरू झाला आहे. मोटार, रेल्वेतून प्रवास करताना, शाळा, बँक, शासकीय कार्यालये, बाजारपेठा, नाट्य व चित्रपटगृहे इ. सार्वजनिक ठिकाणी वावरतांना शहरात जातपात शिवाशीव, स्पृश्यास्पृश्य, उच्चनीच,

सोवळे ओवळे इ. बाबतचे नियम गळून पडले आहेत. जागेच्या टंचाईमुळे वेगळ्या जातीच्या शेजारी राहणे भाग पडते. त्यामुळे विभिन्न जातीत सामाजिक संपर्क वाढण्यास मदत झाली.

४) **आंतरजातीय विवाहास चालना :** नागरीकरणामुळे आंतरजातीय विवाहास चालना मिळाली आहे. नागर समाजात विभिन्न जाती धर्माच्या स्त्री पुरुषांचा अनेक कारणामुळे निकटचा संबंध येऊ लागला. एकमेकांना ओळखण्याची, पारखण्याची पुरेसी संधी त्यांना मिळू लागली. त्यातूनच आकर्षण वाढून आंतरजातीय विवाहास चालना मिळाली आहे. कायदा व पुरोगामी व्यक्ती यांचा अशा विवाहास पाठिंबा व प्रोत्साहन मिळत आहे. तथापि, अशा विवाहाचे प्रमाण अद्याप अल्पच आहे. महत्त्वाचे म्हणजे असे विवाह बहुधा नियोजित नसतात तर प्रेमविवाह असतात. कांही का असेना नागरीकरणामुळे जातीचा अंतर्विवाहाचा नियम शिथिल होण्यास मदत झाली आहे.

५) **वर्गव्यवस्थेचा उदय :** नागरीकरणामुळे वर्गव्यवस्थेचा उदय व वाढ होण्यास मदत होत आहे. शहरातील आधुनिक व्यवसायात विभिन्न जातीचे लोक एकत्र आले. त्यांचे हितसंबंध समान बनले व ते साध्य करण्यासाठी विभिन्न जातीचे लोक संघटित होऊ लागले. त्यातूनच त्यांच्यात एकात्मता निर्माण होऊ लागली. ही स्थिती जातिव्यवस्थेच्या अस्तित्वास मारक तर वर्गव्यवस्थेच्या उदयास पोषक ठरत आहे.

६) **धर्माचा आधार नष्ट :** जातिव्यवस्थेला असलेला धर्माचा आधार नागरीकरणामुळे नष्ट होण्यास मदत झाली आहे. नागरी पर्यावरण बुद्धिवाद, तर्कशुद्धता, वैज्ञानिक दृष्टिकोन इ. ना पोषक असते. त्यामुळे जातिसंस्था ही ईश्वरप्रणीत आहे. गतजन्मातील कर्माचे फळ म्हणून या जन्मी उच्च वा नीच जात मिळते ही विचारसरणी शहरी जीवनात अमान्य केली जाते. जातिव्यवस्था अशास्त्रीय असून तिचे उच्चाटन झालेच पाहिजे असा दृष्टिकोन नागरीजीवनात बळावत आहे.

### **नागरीकरणाचे वर्गावरील परिणाम** (Consequences of Urbanization on Class)

जातीव्यवस्थेप्रमाणेच वर्गव्यवस्थेवरही नागरीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. समाजात असंख्य लोक असतात. त्या सर्वांचा सामाजिक दर्जा मात्र समान नसतो. कांहीचा दर्जा हा श्रेष्ठ, कांहीचा मध्यम तर काहीचा कनिष्ठ असतो. समान सामाजिक दर्जा असलेल्या लोकांचा एक गट (समूह) तयार होतो. या गटासच वर्ग असे म्हणतात. समाजात असे अनेक वर्ग असतात व एक वर्ग हा त्याच्या सामाजिक दर्जाच्या दृष्टीने इतर वर्गाहून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो. एका वर्गातील लोकांची आर्थिक स्थिती, अभिवृत्ती, वर्तनप्रकार, मूल्ये, जीवनशैली इत्यादी गोष्टी बहुतांशी समान असतात व ह्या समानतेमुळे त्यांच्यात आपण एका वर्गाचे सदस्य आहोत अशी जाणीव म्हणजेच वर्गजाणीव निर्माण होते व ह्या वर्गजाणीवेमुळेच एक वर्ग इतर वर्गाहून भिन्न ठरतो. प्रत्येक वर्ग समाजातील आपली प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करीत असतो व त्यासाठी एक वर्ग इतर वर्गांशी ठराविक अंतर ठेवून वागत असतो. यातूनच समाजात वेगवेगळ्या वर्गांच्या परस्परसंबंधाची एक व्यवस्था निर्माण होते. या व्यवस्थेलाच स्थुलमानाने वर्गव्यवस्था असे म्हणतात.

प्रत्येक समाजात वर्गव्यवस्था असते. भारतीय समाजातही जातिव्यवस्थेप्रमाणेच वर्गव्यवस्था असून तिचे स्वरूप नागर समाजात व ग्रामीण समाजात वेगवेगळे असल्याचे आढळते. जातिव्यवस्था ही देखील एकप्रकारची वर्गव्यवस्थाच आहे. म्हणून मुजूमदार व मदन जातीस 'बंद वर्ग' म्हणतात. भारतीय समाजातील अशा वर्गव्यवस्थेवर नागरीकरणाचा काय प्रभाव पडला आहे हे तुम्ही याठिकाणी समजावून घेणार आहात. हा प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **वर्गाच्या निर्धारकात बदल :** पारंपारिक समाजात व्यक्तीचा सामाजिक दर्जा आणि म्हणून सामाजिक वर्ग हा जन्म, वय, लिंग, वर्ण इत्यादी जैविक घटकांच्या म्हणजेच निर्धारकांच्या आधारे ठरत असे. उदा. ब्राह्मण जातीत जन्मलेल्या व्यक्तीचा वर्ग इतरांहून श्रेष्ठ मानला जाई. लिंगाच्या आधारे पुरुषांचा वर्ग स्त्रियांच्या वर्गापेक्षा श्रेष्ठ मानला जाई. वयाच्या आधारे वृद्धांचा वर्ग बालकांच्या वर्गापेक्षा श्रेष्ठ मानला जाई. नागरीकरणामुळे आज व्यक्तींचा वर्ग निर्धारित करणाऱ्या ह्या जैविक घटकांचे महत्त्व कमी झाले आहे. त्याऐवजी व्यक्तीचा दर्जा व वर्ग हा संपत्ती, सत्ता, शिक्षण, कलाकौशल्ये इत्यादी सामाजिक घटकांच्या म्हणजेच निर्धारकांच्या आधारे निर्धारित होऊ लागला आहे. औद्योगिक नागर समाजात व्यक्तीचा जन्म वा जात, वर्ग, लिंग, वय इत्यादी घटक लक्षात न घेता तिच्या अंगच्या गुणाच्या व कौशल्याच्या आधारे तिचा सामाजिक दर्जा व वर्ग निर्धारित करण्यास प्राधान्य दिले जाऊ लागले. आहे.

२) **नवीन वर्गांचा उदय :** वर्गव्यवस्था सार्वत्रिक स्वरूपाची आहे. म्हणजे ती प्राचीन तसेच अर्वाचीन, प्रगत तसेच अप्रगत, ग्रामीण तसेच नागर अशा सर्व प्रकारच्या समाजात आढळते. प्राचीन राजेशाहीच्या काळात राजघराण्यातील व्यक्ती, सरदार व सामान्य प्रजा असे तीन वर्ग होते. मध्ययुगीन सरंजामशाहीच्या काळात सरंजाम वा जमीनदार व कुळे असे दोन वर्ग होते. औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरण व नागरीकरण सुरू झाले. नगरात मोठमोठे उद्योगधंदे स्थापन केले गेले. अशा या औद्योगिक नगरात भांडवलदार किंवा कारखानदार, प्रशासक किंवा कार्यकारी, कुशल तसेच अकुशल कामगार असे नवीन वर्ग उदयास आले. या वर्गांचे उच्च वर्ग (Higher Class), मध्यम वर्ग (Middle Class), आणि कनिष्ठ वर्ग (Lower Class) असे स्थुलमानाने तीन प्रकार पाडण्यात येतात. हे वर्ग प्रामुख्याने व्यक्तीच्या आर्थिक स्थितीच्या आधारे पाडलेले आहेत. उच्च वर्गात मोठमोठे उद्योजक, व्यापारी, राजकीय सत्ताधारी, उच्च पदस्थ प्रशासकीय व व्यवस्थापकीय अधिकारी, प्रसिद्ध सिनेकलावंत व खेळाडू इत्यादींचा समावेश होतो. कारण त्यांची आर्थिक स्थिती सर्वोत्तम असते. ते गर्भश्रीमंत असतात. मध्यमवर्गात डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्राध्यापक, वकील, लघुउद्योजक व व्यापारी इत्यादींचा समावेश होतो. उच्च वर्गापेक्षा या वर्गातील लोकांची आर्थिक स्थिती ही बेताची असते. मात्र कनिष्ठ वर्गातील लोकांपेक्षा ती उत्तम असते. कनिष्ठ वर्गात कामगार, हमाल, घरगडी, मोलकरणी, रोजंदारीवर काम करणारे मजूर अशा अनिश्चित व कमी उत्पन्न असलेल्या लोकांचा समावेश होतो. नागर समाजातील ह्या वर्गाची आर्थिक व सामाजिक स्थिती ही दयनीय असल्याचे दिसते.

**३) जातिव्यवस्थेचे वर्गव्यवस्थेत रुपांतर :** औद्योगिकीकरण व नागरीकरण यांचा प्रभाव पडून भारतातील औद्योगिक नागर समाजात जातिव्यवस्थेचे हळूहळू विघटन होत असून तिच्या जागी वर वर्णन केलेली वर्गव्यवस्था रूढ होत चालली आहे. भारतातील मोठमोठ्या नगरातील एकाच वर्गात विभिन्न जातीचे लोक एकत्र येत आहेत. म्हणजेच पूर्वी वेगवेगळ्या जातींचा एकाच वर्गात समावेश होत आहे. त्यामुळे शहरात जातीची जाणीव कमी होत असून त्या जागी वर्गीय जाणीव विकसित होत चालली आहे. अर्थात वर्गव्यवस्थेतही जातिव्यवस्थेचे अवशेष मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. साधारणतः भारतातील नागर समाजातील उच्च वर्गात प्रामुख्याने उच्च जातीच्या लोकांचा समावेश असलेला दिसून येतो आणि कनिष्ठ वर्गात प्रामुख्याने कनिष्ठ जातींच्या लोकांचा समावेश असलेला दिसून येतो. एवढेच नव्हे तर प्रत्येक वर्गाच्या अंतर्गत छोटे छोटे जातीसमूह तयार झालेले दिसून येतात. त्यामुळे नागरीकरणामुळे जातीचा प्रभाव पूर्णतः संपलेला आहे. किंवा जातिव्यवस्था नष्ट झालेली आहे असे म्हणता येत नाही. तथापि, एक गोष्ट मात्र नक्की आहे की जातिव्यवस्था हळूहळू शिथील होत चालली असून वर्गव्यवस्था हळूहळू विकसित होत आहे.

**४) उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस वाव :** पारंपारिक भारतीय समाजात उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेला वाव नव्हता. म्हणजे व्यक्तीला आपला सामाजिक दर्जा व पर्यायाने वर्ग स्वकर्तृत्वाने बदलण्याची संधी उपलब्ध नव्हती. कनिष्ठ वर्गातील व्यक्ती उच्च वर्गात जाऊ शकत नव्हती. कनिष्ठ दर्जा व वर्ग असलेल्या सामान्य प्रजेला उच्च दर्जा असलेल्या राजकीय सत्ताधाऱ्यांच्या वर्गात प्रवेश करता येत नव्हता. कुळे, शेतमजूर, अल्पभूधारक यांच्या कनिष्ठ वर्गातील व्यक्तीला सरंजाम व जमीनदार लोकांच्या उच्च वर्गात प्रवेश करणे शक्य नव्हते. जातिव्यवस्थेसारख्या बंदिस्त स्तरीकरण व्यवस्थेत तर कनिष्ठ जातीतील व्यक्तींना – ती कितीही गुणवान व कर्तृत्ववान असो – उच्च जातीत म्हणजेच वर्गात प्रवेश करता येत नसे. जन्माने मिळणारी जात व जातीने प्राप्त होणारे सामाजिक स्थान वा दर्जा कांहीही करून बदलता येत नसे. आधुनिक काळात मात्र औद्योगिकीकरण व नागरीकरण या प्रक्रियांचा प्रभाव पडून नागर समाजात उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस वाव मिळू लागला आहे. नागर समाजात व्यक्ती स्वकर्तृत्वाने सत्ता, संपत्ती, शिक्षण, कलाकौशल्ये प्राप्त करून आपले सामाजिक स्थान व दर्जा आणि पर्यायाने वर्ग बदलू शकते. म्हणजेच कनिष्ठ वर्गातून उच्च वर्गात प्रवेश करू शकते. उदा. कनिष्ठ वर्गातील अभ्यासू व बुद्धिमान असलेला क्लार्क स्पर्धा परीक्षाद्वारे कलेक्टर होऊ शकतो. गरीब कामगार कष्ट करून कारखानदार होऊ शकतो. अर्थात या उलटही होऊ शकते. म्हणजे उच्च वर्गात असलेली कर्तृत्वहीन व्यक्ती कनिष्ठ वर्गात फेकली जाऊ शकते. याला अधोगामी सामाजिक गतिशीलता (Downward Social Mobility) असे म्हणतात.

**नागरीकरणाचे स्त्रियांच्या दर्जावरील परिणाम** (Consequences of Urbanization on the Status of Women)

नागरीकरणाचा कुटुंब, जात व वर्ग यावरील प्रभाव अभ्यासल्यानंतर आता तुम्ही नागरीकरणाचा भारतीय स्त्रियांच्या दर्जावर काय प्रभाव पडला हे समजावून घेणार आहात.

जगात सर्वत्रच पुरुषप्रधान संस्कृती व समाजव्यवस्था आढळते. भारतीय समाजही याला अपवाद नाही. पारंपारिक भारतीय समाजात संयुक्त कुटुंबपद्धतीच्या प्रभावामुळे सर्व अधिकार पुरुषांच्या हाती केंद्रीत झाले. स्त्रियांना मात्र अनेक अधिकारापासून वंचित ठेवले गेले. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. विवाहाचा जोडीदार (पती) निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. बालवयातच मुलींचे विवाह होत. विधवा विवाहास बंदी होती. अनेक रूढीपरंपराची बंधने स्त्रियांवर लादलेली होती. सार्वजनिक जीवनात स्त्रियांनी मुक्तपणे सहभागी होण्यास बंदी होती. 'चूल-मुल' एवढ्यापुरतेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. पुत्रप्राप्तीस विशेष महत्त्व दिले जाई तर कन्या जन्मणे पित्याच्या डोक्यावरील ओझे मानले जाई. स्त्रियांना लागू असणारे नीतीनियम पुरुषांना बंधनकारक नव्हते. या सर्व परिस्थितीमुळे स्त्रियांचा दर्जा व स्थान अत्यंत कनिष्ठ, दुय्यम व दयनीय बनले.

ब्रिटिश राजवटीत भारतात औद्योगिकीकरण-नागरीकरण या प्रक्रिया सुरू झाल्या. या प्रक्रियांचा प्रभाव पडून स्त्रियांची स्थिती सुधारण्यास व दर्जा उंचावण्यास चालना मिळाली. नागरीकरणाचा स्त्रियांच्या दर्जावरील प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **स्त्रीशिक्षणास चालना :** नागरीकरणामुळे स्त्रीशिक्षणास चालना मिळाली. नागरी पर्यावरण हे व्यक्तीवादास व व्यक्तीस्वातंत्र्यास पोषक असते. त्यामुळे व्यक्ती मग ती पुरूष असो वा स्त्री तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची संधी नगरात उपलब्ध होते. त्यामुळे स्त्रियांना शिकण्याची संधी मिळू लागली आणि स्त्रीशिक्षणास चालना मिळाली. जसी जसी नागरीकरणाची प्रक्रिया गतीमान होते तसतसे स्त्रीशिक्षणाचे प्रमाण वाढत जाते. नगर जेवढे अधिक मोठे तेवढे तेथे स्त्रीशिक्षणाचे प्रमाण अधिक आढळते. आज नागरी विभागात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारचे शिक्षण घेऊ लागल्या आहेत. शिक्षणामुळे त्यांचा दर्जा सुधारण्यास चालना मिळाली आहे.

२) **अर्थार्जन :** परंपरागत भारतीय समाजात पुरुषाने अर्थार्जन करावे व स्त्रीने घरकाम व बालसंगोपन करावे असे लिंगभेदावर आधारलेले श्रमविभाजन प्रचलित होते. स्त्रियांनी कमावणे कमीपणाचे मानले जाई. आज मात्र औद्योगिक नागर समाजात स्त्रीशिक्षण, व्यक्तीवादाचा प्रभाव, उच्च जीवनमानाची अपेक्षा, वाढती महागाई इत्यादी घटकांमुळे स्त्रियांनी घराबाहेर पडून अर्थार्जन करणे फायदेशीर वाटू लागले आहे. लग्नाच्या बाजारात कमावत्या मुलीस तुलनेने अधिक मागणी असल्याने पालक मुलांना शिकविणे व नोकरी मिळवून देणे यासाठी धडपडू लागले आहेत. नागरीकरणाच्या प्रक्रियेत शहरात अनेक व्यवसाय उदयास येऊ लागले आहेत. त्यामुळे स्त्रिया छोटेछोटे उद्योग, सरकारी-निमसरकारी-खाजगी कार्यालये, बँका, व्यापारपेठा,

दुकाने, मनोरंजन केंद्रे, शिक्षणसंस्था इत्यादीमध्ये नोकरी करून अर्थार्जन करू लागल्या आहेत. त्यामुळे त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढण्यास व परिणामी दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.

**३) कौटुंबिक अधिकारांची प्राप्ती :** पारंपारिक समाजात पुरुष हा कुटुंबप्रमुख मानला जाई. पत्नी व मुले ही त्याच्या पूर्ण आज्ञेत असत. स्त्रीला कौटुंबिक बाबतीतील निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. नागरीकराच्या प्रक्रियेत मात्र स्त्रीला कौटुंबिक अधिकार मिळू लागले आहेत. नागरी कुटुंबात पती हाच कुटुंबप्रमुख असला तरी तो पत्नीच्या सल्ल्याने कौटुंबिक अधिकार वापरू लागला आहे. कांही बाबतीत पती पत्नीमध्ये अशा अधिकारांचे विभाजन होत आहे. नगरात लिंगभेदावर आधारलेले कार्यविभाजन टिकत नाही. नोकरी करणाऱ्या पत्नीस पती हा घरकामात मदत करू लागला आहे. नोकरीधंद्यामुळे सतत घराबोर राहणाऱ्या पतीला कौटुंबिक व्यवहाराचे कांही अधिकार पत्नीकडे सोपविणे भाग पडू लागले आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करणे, बँकेतून पैसे काढणे, मुलांना शाळेत पोहचविणे, त्यांची फी वगैरे भरणे, वेगवेगळी बिले भरणे इत्यादीबाबतची कामे स्त्रिया करू लागल्या आहेत. आणि त्याबाबतचे स्वातंत्र्य त्या उपभोगू लागल्या आहेत. नागरी कुटुंबात पती पत्नीला 'दासी' न मानता मैत्रिण, सखी, सहचारिणी मानू लागला आहे. अशाप्रकारे नागरीकरणामुळे स्त्रियांचे कुटुंबातील स्थान उंचावले आहे. कौटुंबिक निर्णय घेण्याचे अधिकार ती उपभोगू लागली आहे.

**४) सार्वजनिक जीवनातील सहभाग :** नागरीकरणामुळे स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला आहे. नागरी समाजात व्यक्तिमत्त्व विकासाची व करिअर विकासाची विविध क्षेत्रे व संधी उपलब्ध असतात. त्यामुळे स्त्रियांना आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, करिअर घडविणे शक्य होऊ लागले आहे. नागरी स्त्रिया ह्या समाजकारण, राजकारण, कला, क्रीडा, साहित्य, गीतसंगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट इत्यादी क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करू लागल्या आहेत. संधी मिळताच आपण पुरुषापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही हे दाखवून देऊ लागल्या आहेत. एकंदरीत नागरीकरणामुळे स्त्रियांची 'चूल व मुल' या कार्यक्षेत्रातून सुटका होऊन त्या सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागल्या आहेत. त्यामुळे त्यांचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे.

**५) स्त्री संघटना व स्त्री चळवळ :** नागरीकरणामुळे स्त्रिया शिकू लागल्या, नोकरीधंदा करू लागल्या. त्यामुळे त्या सुशिक्षित बनल्या. त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढले. याचा परिणाम म्हणून त्यांच्यात बौद्धिक व सामाजिक जागृती घडून आली. आपल्या हक्कांची व स्वातंत्र्याची त्यांना जाणीव झाली. पुरुषप्रधान व्यवस्थेत आपल्यावर होणाऱ्या अन्यायअत्याचारांची त्यांना जाणीव झाली. त्याविरुद्ध त्या आवाज उठवू लागल्या. यातूनच स्त्रियांच्या संघटना उदयास आल्या. या संघटना स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी झटू लागल्या. पुरुषी वर्चस्वापासून मुक्त होण्यासाठी त्या चळवळी करू लागल्या. यातूनच स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती चळवळ ह्या संकल्पना उदयास आल्या.

अशाप्रकारे नागरीकरणामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्न** (Multiple Choice Questions)

१. ग्रामीण लोकांनी नगरांकडे स्थलांतर करण्याच्या प्रक्रियेस काय म्हणतात?

अ) नगरवाद ब) ग्रामनगरवाद क) नागरीकरण ड) यापैकी एकही नाही

२. खालीलपैकी कोणता घटक नागरीकरणास चालना देतो?

अ) औद्योगिकीकरण ब) दळणवळणाची साधने क) शिक्षणप्रसार ड) वरील सर्व

३. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील किती टक्के लोकसंख्या नागरी विभागात रहाते?

अ) २०.८ ब) २७.८ क) ३५.५ ड) ४०.४

४. नागरीकरणामुळे कोणत्या कुटुंबाचे विघटन होते?

अ) संयुक्त कुटुंब ब) केंद्र कुटुंब क) मातृसत्ताक कुटुंब ड) यापैकी एकही नाही.

५. नागर समाजातील वर्गव्यवस्थेचा आधार कोणता आहे?

अ) जन्म ब) लिंग क) आर्थिक स्थिती ड) धर्म

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नागरीकरण म्हणजे काय?

२. नागरीकरणास जबाबदार असणारे घटक सांगा.

३. औद्योगिकीकरणाचा अर्थ सांगा.

४. नागरीकरणामुळे कोणत्या प्रकारच्या सामाजिक गतीशिलतेस चालना मिळते?

५. इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असणारे राज्य कोणते आहे?

## ३.५ सारांश (Let us Sum up)

या घटकात तुम्ही नगरे व शहरांचे वर्गीकरण अभ्यासलेले आहे. यानंतर तुम्ही औद्योगिकीकरण स्थलांतर व नागरीकरण यांच्यातील परस्परसंबंध अभ्यासला आहे. सर्वात शेवटी तुम्ही नागरीकरणाचा कुटुंब, जात, वर्ग व स्त्रियांचा दर्जा यावर पडलेला प्रभाव समजावून घेतलेला आहे. नागरीकरणामुळे कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल होत आहेत. जातीचे कांही निर्बंध नष्ट तर कांही शिथिल झाले आहेत. नागरीकरणामुळे जातिव्यवस्थेचे विघटन सुरू होऊन तिच्या जागी आर्थिक स्थितीवर आधारलेली वर्गव्यवस्था

(उच्च, मध्यम, कनिष्ठ) रूढ होत आहे. नागरीकरणामुळे स्त्रियांना शिक्षण घेणे, एखादी नोकरी वा धंदा करणे, करिअर घडविणे शक्य होऊ लागल्याने त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे.

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) क  २) ड  ३) ब  ४) अ  ५) क

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण लोकसंख्येचे नगरांकडे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण होय.

२. नागरीकरणास जबाबदार असणारे घटक : औद्योगिकीकरण, दळणवळणाची साधने, व्यापार व व्यवसायात वाढ, शिक्षण, राजकीय घटक, धार्मिक क्षेत्र व पर्यटन केंद्र इत्यादी.

३. मोठमोठ्या उद्योगांची वाढ, विस्तार व विकास होण्याच्या प्रक्रियेस औद्योगिकीकरण म्हणतात.

४. नागरीकरणामुळे उर्ध्वगामी सामाजिक गतीशिलतेस चालना मिळते.

५. भारतात सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असणारे राज्य गोवा आहे.

## ३.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नगरांची व शहरांची वर्गीकरण विशद करा.

२. नागरीकरणाचा कुटुंब व जात यावरील प्रभाव स्पष्ट करा.

३. औद्योगिकरण, स्थलांतर व नागरीकरण यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगरांचे व शहरांचे लोकसंख्याशास्त्रीय वर्गीकरण

२. औद्योगिकीकरण

३. नागरीकरणाचा वर्गव्यवस्थेवरील प्रभाव

४. नागरीकरण व स्त्रियांचा दर्जा

## ३.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- नागरीकरणाचा सभोवतालच्या ग्रामीण जीवनावर काय परिणाम झाला आहे याची नोंद करा.
- नागरी भागातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या जाणून घ्या व त्याआधारे एक टिपण तयार करा.

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. प्रा. चंद्रकांत खंडागळे (१९९८) ''भारतीय समाज'', प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

२. डॉ. विलास संगवे (संपादक, १९७९) ''भारतातील सामाजिक समस्या'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००५) जनरल नॉलेज (वर्णनात्मक), प्रकाशिका, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

❑❑❑

**सत्र २ : घटक ४**

# नागरी समस्या, नियोजन आणि विकास

# (Uran Problems, Planning and Development)

**अनुक्रमणिका**


४.१ प्रास्ताविक

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय-विवेचन

४.३.१ नागरी समस्या : निवासाची व स्वच्छतेची समस्या

४.३.२ मादक द्रव्यासक्तीची समस्या

४.३.३ पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या

४.३.४ नगर नियोजन : प्रारंभीच्या नियोजनविषयक कल्पना, उद्यान नगर प्रतिमान, महानगर नियोजन आणि अद्ययावत नगरे

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.१ प्रास्ताविक (Introduction)

या शेवटच्या आठव्या घटकात तुम्ही भारतातील कांही नागरी समस्या, नगर नियोजनाचा अर्थ तसेच भारतातील नगर नियोजनाची तत्त्वे व व्यवहार आणि ७४ वी राज्यघटना दुरुस्तीच्या अनुषंगाने नागरी कारभार वा प्रशासन ह्या तीन बाबींचा अभ्यास करणार आहात. कोणत्याही समाजाचे अध्ययन करताना त्या समाजातील सामाजिक समस्या अभ्यासणे आवश्यक असते. म्हणून तुम्ही या घटकात सर्वप्रथम निवासाची, गलिच्छ वस्त्यांची समस्या, स्वच्छतेची समस्या, मादक द्रव्यासक्तीची समस्या व पर्यावरण प्रदूषणाची

समस्या ह्या समस्या अभ्यासणार आहात. नागर समाजाचा अभ्यास करताना नागर समाजांचा म्हणजेच नगरांचा विस्तार-विकास घडवून आणण्यासाठी केल्या जाणाऱ्या नियोजनाचा म्हणजेच नगर नियोजनाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. त्यामुळे येथे तुम्ही नगर नियोजनाचा अर्थ प्रारंभीच्या नियोजनविषयक कल्पना, उद्यान नगर प्रतिमान, महानगरीय नियोजन व अद्ययावत नगरे ह्या संकल्पना समजावून घेणार आहात.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास-

- भारतातील नागरी समस्या समजावून घेता येतील.
- नगर नियोजनाचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- नगर नियोजनाच्या प्रारंभीच्या कल्पना, उद्यान नगर प्रतिमान, महानगरीय नियोजन व अद्ययावत नगरे या संकल्पना अभ्यासता येतील.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

अभ्यासाच्या सोयीसाठी ह्या घटकाचे चार भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात निवासाची व स्वच्छतेची समस्या या नागरी समस्यांची चर्चा केली जाईल. दुसऱ्या भागात मादक द्रव्यासक्तीची समस्या, तिसऱ्या भागात पर्यावरणाच्या प्रदुषणाची समस्या व चौथ्या भागात नगर नियोजनाचा अभ्यास केला जाईल.

### ४.३.१ नागरी समस्या (Urban Problems)

ह्या शेवटच्या आठव्या घटकात तुम्ही प्रथम १) निवास व गलिच्छ वस्तीची समस्या, मद्यपान आणि मादक द्रव्यासक्तीची समस्या, २) पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या ह्या समस्यांचा अभ्यास करणार आहात.

**निवासाची समस्या** (Problem of Housing)

जगातील सर्वच देशातील नगरांमध्ये निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या निर्माण झालेली आहे. नगरात मर्यादित जागेत लाखो-करोडो लोक दाटीवाटीने घरे बांधून राहतात. शहरातील बहुतांशी जागा ही कार्यालये, दुकाने, कारखाने, शिक्षणसंस्था, बँका, वाहनतळ, बागा, क्रीडांगणे, रस्ते, लोहमार्ग इत्यादींनी व्यापलेली असते. त्यामुळे घरे बांधण्यासाठी जागेची टंचाई निर्माण होते. परिणामी जागेच्या किंमती भरमसाठ वाढतात. केवळ गरिबांनाच नव्हे तर मध्यमवर्गीयांनाही जागा खरेदी करून घरे बांधणे अशक्य होते. म्हणून ते नगरात/शहरात मिळेल तेथील रिकाम्या जागेत अनाधिकृतपणे, अनियोजितपणे, दाटीवाटीने मोडकी-तोडकी वा कच्ची घरे म्हणजेच झोपड्या बांधून राहतात. अशा झोपड्यांच्या समूहासच झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती असे म्हणतात. अशा वस्तीत कोणत्याही नागरी सुविधा नसतात. त्यामुळे ही वस्ती आरोग्याच्यादृष्टीने घातक असते. अशा वस्तीत गुंड, चोर, मवाली, जुगारी, भिकारी, अपंग, अवैध कृत्ये करणारे व निम्न

आर्थिक स्थिती (दरिद्री) असणारे लोक हे बहुसंख्यांक असतात. त्यामुळे तेथे अवैध व अनैतिक कृत्ये घडत असतात. त्यामुळे गलिच्छ वस्ती ही नागरी जीवनातील गंभीर समस्या बनली आहे.

**निवासाची समस्या :** जगातील सर्वच देशातील नगरांमध्ये निवास व गलिच्छ वस्तीच्या समस्याने उग्र स्वरूप धारण केले आहे. अन्न व वस्त्राप्रमाणेच निवारा किंवा निवास म्हणजेच घर ही मानवाची मूलभूत गरज आहे. ''निवास किंवा घर हे असे ठिकाण असते की जेथील वातावरण आरोग्यदायी व आरामदायक असते. आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांसह तेथे राहणे व्यक्तीला आनंददायी वा सुखकारक वाटत असते.'' परंतु दुर्दैवाने आज जगातील विशेषतः नगरातील अनेक लोकांना निवास किंवा घर उपलब्ध नाही. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण, राहत्या जागेची टंचाई व तिच्या वाढत्या किंमती, घरबांधणीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या किंमती, वाढते दारिद्र्य व बेकारी इत्यादी कारणामुळे नगरात निवासाची समस्या उद्‌भवली असून अनेक लोक डोईजड ठरणाऱ्या भाड्याच्या घरात राहतात, कांहीजण रस्त्यावर, फुटपाथवर, उघड्यावर किंवा गलिच्छ वस्तीत आश्रय घेतात. ज्यांना स्वतःचे घर आहे अशी असंख्य कुटुंबेदेखील एक किंवा दोन खोल्यांच्या घरात राहतात. निवासाची समस्या ही गलिच्छ वस्तीच्या उदयास कारणीभूत ठरली आहे. म्हणून येथे गलिच्छ वस्तीची व्याख्या व वैशिष्ट्ये समजावून घेऊ या.

**गलिच्छ वस्तीची समस्या :** गलिच्छ वस्तीची समस्या ही सार्वत्रिक/जागतिक स्वरूपाची आहे. केवळ भारतासारख्या विकसनशील देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नेदरलँड अशा विकसित देशातही लाखो लोक गलिच्छ वस्तीत राहतात. भारतातील नागरी लोकसंख्येपैकी सुमारे ३५ ते ४० टक्के लोकसंख्या गलिच्छ वस्तीत राहते.

**गलिच्छ वस्तीची व्याख्या :**

१. गलिच्छ वस्ती म्हणजे अनियमितपणे व दाटीवाटीने वसलेल्या व नागरी सुविधांचा अभाव असलेल्या मोडक्या तोडक्या किंवा कच्चा घरांचा समूह होय, तेथील परिस्थिती ही व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षा व नीतिमत्ता यांच्यादृष्टीने घातक असते. – **प्रा. चंद्रकांत खंडागळे.**

२. गलिच्छ वस्ती शहरातील असे क्षेत्र असते की जेथील निवासाची स्थिती निम्न दर्जाची असते. – **ई. ई. बर्गेल.**

३. अतिगर्दी, अनारोग्याची स्थिती आणि सुविधांचा अभाव ह्या वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या घरांचा समूह किंवा क्षेत्र म्हणजे गलिच्छ वस्ती होय. ह्या स्थितीमुळे किंवा यापैकी कोणत्यातरी एकामुळे तेथे राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यास, सुरक्षिततेस व नैतिकतेस धोक निर्माण होतो. – **संयुक्त राष्ट्रसंघ.**

४. विस्कळीत स्वरूपात वसलेल्या, अव्यवस्थितपणे विकसित झालेल्या क्षेत्रास गलिच्छ वस्ती म्हटले जाऊ शकते. तसेच साधारणपणे त्या क्षेत्रात लोकसंख्या अधिक व दाटीवाटीची असते, मोडकी तोडकी घरे असतात व त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जाते. – **भारत सेवक समाज.**

**गलिच्छ वस्तीची वैशिष्ट्ये :**

१. **गलिच्छ वस्तीचे स्थान :** गलिच्छ वस्ती ही शहरातील किंवा शहरालगतच्या मोकळ्या जागेवर बहुधा अनाधिकृतपणे उभारलेली असते. कालांतराने या वस्तीस शासनाकडून अधिकृत केले जाऊ शकते.

२. **मोडकीतोडकी घरे :** गलिच्छ वस्तीतील घरे ही अत्यंत छोटी, कमी उंचीची, मोडकीतोडकी किंवा कच्च्या स्वरूपाची असतात. लाकडी फळ्या, पत्रे, दगड, माती, क्वचित विटा, गोणपाट, प्लॅस्टिक कागद इत्यादींचा वापर करून आणि विस्कळीत स्वरूपात व दाटीवाटीने बांधलेली असतात. अशा घरात अनेक लोक दाटीवाटीने राहात असतात. तेथे सूर्यप्रकाश व हवा येण्यास फारसा वाव नसतो.

३. **नागरी सुविधांचा अभाव :** गलिच्छ वस्तीत वीज, पाणी, रस्ता, शौचालय, स्नानगृह, गटार इत्यादी नागरी सुविधा नसतात त्यामुळे तेथे सर्वत्र अस्वच्छतेचे व घाणीचे साम्राज्य असते. परिणामी तेथे वैयक्तिक व सामुदायिक आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो.

४. **लोकसंख्येची विजातियता :** गलिच्छ वस्तीत विभिन्न धर्माचे, जातीचे, प्रांताचे, भाषेचे लोक राहत असतात. तथापि, या आधारेच त्यांचे छोटे छोटे समूह अस्तित्वात आलेले असतात. आणि या छोट्या समूहाअंतर्गत घनिष्ट संबंध प्रस्थापित झालेला दिसतो.

५. **कनिष्ठ आर्थिक स्थिती :** गलिच्छ वस्तीतील बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिती कनिष्ठ दर्जाची असते. कारण त्यांना कायम स्वरूपी व चांगले उत्पन्न देणारा रोजगार बहुधा नसतो. बरेचजण हे अकुशल कामगार, अपंग, भिकारी, भूरटे चोर, खिसेकापू, भंगार गोळा करणारे, अवैध धंदे करणारे असे असतात. परिणामी निश्चित उत्पन्नाची हमी नसल्याने ते दरिद्रीच असतात.

६. **शैक्षणिक सुविधांचा अभाव :** गलिच्छ वस्तीत बहुधा शैक्षणिक सुविधा नसतात. पालक हे अडाणी, निरक्षर व दरिद्री असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व नसते. परिणामी, ते मुलांना शाळेत घालण्याऐवजी एखाद्या कामास जुंपतात. महानगरातील गलिच्छ वस्तीत बहुभाषिक लोक रहात असल्याने शाळा सुरू करणे कठीण होते.

७. **उपसंस्कृती :** गलिच्छ वस्तीत गुन्हेगार, गुंड, मवाली, चोर, अपंग भिकारी, अनाथ, दरिद्री अशा निम्न गुणवत्तेच्या लोकांचा अधिक भरणा असतो. त्यामुळे तेथे सतत भांडणे, मारामाऱ्या, अवैध व अनैतिक कृत्ये, जुगार, मटका, दारूविक्री, इत्यादींना ऊत आलेला असतो. गुंड, मवाली, दादा, गुन्हेगार असे लोक येथील नेते व मार्गदर्शक असतात. तेथे त्यांचेच राज्य असते. यातूनच तेथे एक वेगळीच जीवनपद्धती व

सामाजिक मूल्ये उदयास आलेली असतात. याच अर्थाने अल्बर्ट कोहेन म्हणतात की, गलिच्छ वस्तीत एक वेगळीच उपसंस्कृती निर्माण झालेली आहे.

**निवासाच्या व गलिच्छ वस्तीच्या समस्येची कारणे**

नागर समाजात निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या उद्‌भवण्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

१. **औद्योगिकीकरण :** औद्योगिक क्रांतीनंतर शहरांमध्ये मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाले. त्यामुळे खेड्यातील घरगुती उद्योग बंद पडले. परिणामी बेकार झालेले लोक शहरातील उद्योगधंद्यात रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतर करू लागले. तथापि, तेथे सर्वांनाच रोजगार मिळत नाही. ज्यांना रोजगार मिळाला त्यांना चांगली घरे बांधणे परवडत नाही. तसेच उद्योगातील कामगारांसाठी उद्योगपतींनी कारखान्याजवळ घरे बांधली नाहीत. परिणामी अशा लोकांना घराची समस्या भेडसावू लागली व त्यांनी शहरातील मोकळ्या जागेवर गलिच्छ वस्त्या उभारल्या.

२. **नागरीकरण :** औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरण सुरू झाले. शहरे ही रोजगार, शिक्षण, उद्योग, व्यापार, नागरी सुविधा, चैनीचे जीवन यांची केंद्रे बनली. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहरात वास्तव्यासाठी स्थलांतर करू लागले. त्यांना शहरातील चांगल्या वस्तीत जागा घेऊन घरबांधणे अशक्य होते. परिणामी त्यांनी गलिच्छ वस्त्या उभारल्या.

३. **लोकसंख्यावाढ :** वैद्यकीय सुविधांच्या उपलब्धतेमुळे मृत्यूदर घटला पण त्याप्रमाणात जन्मदर घटला नाही. परिणामी लोकसंख्या वाढू लागली. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा शेती व्यवसायावर भागू शकत नसल्याने शेती क्षेत्रातील बेकार व अतिरिक्त लोक पोटासाठी शहराकडे येऊ लागले. तेथे त्यांना चांगली निवासस्थाने बांधणे शक्य नसल्याने त्यांनी गलिच्छ वस्त्या उभारल्या.

४. **नैसर्गिक आपत्ती :** महापूर, अवर्षण, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, साथीचे रोग, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तीत सापडलेले लोक शहरात आश्रमासाठी येतात. पुढे आपत्ती टळली तरी मूळ गावी न जाता शहरातच राहाणे पसंत करतात. तथापि, आर्थिक कुवत नसल्याने झोपड्या बांधून राहू लागतात.

५. **राहत्या जागेची टंचाई :** नैसर्गिक वाढ व स्थलांतर यामुळे नगरातील लोकसंख्या वाढते. तसेच लोकसंख्येची घनताही वाढते. त्यामुळे जागेची टंचाई होऊन तिचे भाव (दर) सामान्याच्या आवाक्याबाहेर जातात. परिणाम घरबांधणे अशक्य होते. म्हणून सामान्य लोक गलिच्छ वस्त्या उभारतात.

६. **दारिद्र्य :** वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार वाढत नाही. शिवाय उद्योगधंद्यात मंदी येऊन कामगार कपात होते. परिणामी शहरात बेकारी वाढते. लोकांचे उत्पन्न घटते. त्यामुळे त्यांना मूलभूत गरजा भागविणेही जड जाते. परिणामी अशा बेकार व दरिद्री लोकांना गलिच्छ वस्ती उभारण्याशिवाय पर्याय नसतो.

**७. परकीयांचे स्थलांतर :** बऱ्याच वेळा एखाद्या देशातील महानगरांमध्ये परकीय लोकही स्थलांतर करतात. उदा. भारत-पाक फाळणीनंतर आणि बांगला देश मुक्ती संग्रामाच्यावेळी तत्कालीन पश्चिम व पूर्व पाकिस्तानातील अत्याचाराला कंटाळून असंख्य निर्वासित भारतातील सीमेलगतच्या शहरात स्थलांतरीत झाले व झोपड्या बांधून राहू लागले. श्रीलंकेतील वांशिक दंगलीमुळे अनेक तमिळांनी चेन्नई व अन्य शहरातील गलिच्छ वस्त्यात स्थलांतर केले आहे.

**निवासाची समस्या सोडविण्यासाठी केलेली उपाययोजना**

**१. वित्त पुरवठा :** केंद्र सरकार, राज्य सरकार, तसेच एल.आय.सी. आपल्या कर्मचाऱ्यांना व विमा धारकांना गृहबांधणीसाठी कमी व्याज दराने वित्तपुरवठा करतात. तसे गृहनिर्माण व नगर विकास महामंडळ देखील गृहबांधणीसाठी कर्मचाऱ्यांना वित्त पुरवठा करणे, सर्वसाधारण जनतेला स्वतःचे घरबांधण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँका (उदा. स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया इ.) आणि खाजगी क्षेत्रातील बँका (उदा. एच.डी.एफ.सी., आय.सी.आय.सी.आय. इ.) देखील वित्तपुरवठा करतात.

२. केंद्रसरकारच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयातर्फे 'केंद्र सरकार कर्मचारी कल्याण व गृहनिर्माण संघटना' ही संघटना स्थापन केली असून ती केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी अखिल भारतीय स्तरावर ''ना नफा ना तोटा'' या तत्त्वावर गृहबांधणीचे प्रकल्प राबविते.

**३. भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण** संघाची स्थापना १९६९ मध्ये केली असून हा संघ संपूर्ण भारतात सहकारी तत्त्वावर घरबांधणी करण्याच्या मोहीमेचे नेतृत्व करणारी शिखरसंस्था आहे. सहकारी तत्त्वावर गृहबांधणी कार्यास ही संस्था प्रोत्साहन व मार्गदर्शन पुरविते.

**४. गृहनिर्माण आणि नगर विकास महामंडळाची स्थापना :** याची १९७० मध्ये केली असून शहरात गृहबांधणी करणारी ही अग्रेसर संस्था आहे. शहरात घरे व पायाभूत सुविधांसाठी सर्वांना विशेषतः दुर्बल व वंचित घटकांना अर्थसहाय्य करते. आजपर्यंत सुमारे १५० लाख घरांसाठी अर्थसहाय्य पुरविले आहे.

**५. दोन दशलक्ष घरेबांधणीचा कार्यक्रम** – हा १९९८-९९ मध्ये सुरू केला. सर्वांना घर पुरविणे हा त्याचा उद्देश आहे. तथापि निम्न उत्पन्न गटातील लोकांना व दुर्बल घटकांना घरे पुरविण्यावर विशेष भर दिला जातो. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ४ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

**गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी केलेले उपाय**

गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी सरकारतर्फे दोन प्रकारचे उपाय योजले आहेत.

**१. गलिच्छ वस्तीचे निर्मूलन करणे :** या प्रकारात पर्यायी जागा शोधून त्या ठिकाणी गलिच्छ वस्तीतील लोकांना घरे बांधून दिली जातात आणि गलिच्छ वस्तीचे निर्मूलन केले जाते.

२. **गलिच्छ वस्तीत सुधारणा करणे :** या प्रकारात गलिच्छ वस्ती आहे. त्या ठिकाणीच ठेऊन त्या वस्तीत सुधारणा घडवून आणल्या जातात. त्यानुसार गलिच्छ वस्तीत रस्ते, गटारी, वीज, सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा पुरविल्या जातात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्र सरकारने १९५६ मध्ये घटकराज्यांना गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधारणांसाठी आर्थिक मदत देण्यासाठी 'गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधार योजना' सुरू केली. या योजनेखाली गलिच्छ वस्तीतील लोकांना पर्यायी जागा देऊन घरे बांधून देणे, तसेच सद्याच्या गलिच्छ वस्तीत रस्ते, वीज, पाणी, शौचालये इ. सुविधा पुरविणे यावर भर दिला.

१९६० मध्ये अनाधिकृतपणे वसलेल्या झोपड्या हटविण्यासाठी त्यांना ९९ वर्षाच्या कराराने पर्यायी जागा देऊन तेथे घरे बांधण्याची योजना सुरू केली.

१९७२ मध्ये "**गलिच्छ वस्ती पर्यावरण सुधार मध्यवर्ती योजना**" सुरू केली. या योजनेखाली मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, हैद्राबाद, बेंगलोर, कानपूर, लखनौ, मद्रास (चेन्नई), नागपूर, पुणे ही दहा नगरे समाविष्ट केली. पुढे १९७३-७४ मध्ये आणखीन दहा नगरे समाविष्ट केली. या योजनेखाली केंद्र सरकार राज्यांना गलिच्छ वस्तीत नागरी सुविधा पुरविण्यासाठी अर्थसहाय्य देते.

ऑगस्ट १९९६ पासून **राष्ट्रीय गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम** सुरू केला असून त्या अंतर्गत राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना प्रदेशांना गलिच्छ वस्तीत पिण्याचे पाणी, गटारी, सार्वजनिक स्वच्छतागृहे व स्नानगृहे अशा सुविधा पुरविण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

२ डिसेंबर २००१ पासून **वाल्मिकी-आंबेडकर आवास योजना** सुरू केली आहे. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या पर्याप्त निवारा नसणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीसाठी आरोग्यदायी वातावरण असलेली (शौचालये व स्नानगृह युक्त) घरे बांधून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

वरील प्रमुख उपायाबरोबरच इतरही कांही उपाय केले जात आहेत. उदा. १) नवीन गलिच्छ वस्त्या उभारण्यास पायबंद घालण्यासाठी कायदे करणे, २) महानगरपालिकांमध्ये गलिच्छ वस्ती सुधार समिती स्थापन करणे. ३) नगराच्या गरजा व समस्या विचारात घेऊन नगर नियोजन करणे, ४) नगरात नवीन कारखाने उभारण्यास परवानगी न देणे, ५) नगरात क्रीडांगणे, उद्याने, शाळा, दवाखाने, बाजार, वाहनतळ, करमणूक केंद्रे इत्यादीसाठी जागा आरक्षित करणे इ.

अशाप्रकारे निर्मूलन, सुधारणा, पुनर्वसन, प्रतिबंध इत्यादी मार्गाने गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तथापि त्याच्या मार्गात पुढील अडचणी येतात. १) पर्यायी जागा मिळणे अवघड असते व मिळाली तरी तेथे घरे बांधून देणे अत्यंत खर्चिक असते. २) नवीन/पर्यायी जागेत जाण्यास लोकांचा विरोध होतो. कारण त्यासाठी त्यांना कांहीतरी किंमत द्यावी लागते. ३) सद्याच्या गलिच्छ वस्त्या हलविण्यास राजकारणी (नगरसेवक), गुंड, व्यापारी अशी मंडळीही विरोध करतात. कारण त्यांच्या

हितसंबंधास बाधा येत असते. ४) जमिनीचा ताबा मिळविणे, त्यावर घरे बांधणे या कामात अनेक कायदेशीर-प्रशासकीय अडचणी उद्‌भवत असतात.

**निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी आपणास पुढील उपाययोजना सुचविता येतील–**

१. **कर्जपुरवठा :** कमी खर्चाची पण आवश्यक त्या सुविधा असणारी स्वमालकीची घरे बांधण्यासाठी लोकांना अल्पव्याजाने त्वरित व भ्रष्टाचारमुक्त स्वरूपात कर्जपुरवठा करावा.

२. **दारिद्र्य निर्मूलन :** हे निवासाच्या व गलिच्छ वस्त्याच्या समस्येचे मूळ कारण असल्याने लोकांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी सर्वंकष उपाय योजावेत.

३. **गलिच्छ वस्ती उभारण्यास पायबंद** घालण्यासाठी खेड्यात शेतीविकास करून व उद्योगधंदे उभारून तेथील लोकांना पुरेसा रोजगार उपलब्ध करून द्यावा म्हणजे ते शहराकडे स्थलांतर करणार नाहीत.

४. **कडक कायदे :** नव्याने गलिच्छ वस्त्या उभारू नयेत यासाठी कडक कायदे करावेत. अनाधिकृत वस्त्या कठोरपणे उठावाव्यात व संबंधितांना शासन करावे. तसेच गलिच्छ वस्तीतील गुंड, दादा, मवाली, जुगारी, मद्यविक्रेते, अवैध धंदे करणारे, इत्यादींचा बंदोबस्त करून पर्यावरणात्मक सुधारणा कराव्यात.

५. **नियोजन :** शहरातील उद्योगधंद्यांचा सुनियोजितपणे विकास करावा. शक्यतो नगराबाहेर नवे उद्योग उभारावेत. शहराचा विस्तार मर्यादित ठेवण्याचे उपाय योजावेत.

६. **स्वयंसेवी संस्थांची मदत :** गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सुशिक्षित मंडळी, यांनी एकत्र येऊन शासनास मदत करावी.

**स्वच्छतेची समस्या** (Problem of Sanitation)

निवासाची समस्या समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही नागर समाजातील स्वच्छतेची समस्या अभ्यासणार आहात. जगातील बहुतेक देशांतील विशेषतः विकसनशिल देशातील नागर समाजात स्वच्छतेची समस्या गंभीर बनलेली आहे. भारतातील बहुतांशी सर्वच शहरांमध्ये सर्वत्र अस्वच्छता, व दुर्गंधी मोठ्या प्रमाणावर आढळते. त्यामुळे व्यक्तिगत तसेच समुदायाच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे शहरी जीवनात स्वच्छता राखून, साफसफाई करून आरोग्यदायी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक बनलेले आहे. म्हणून तुम्ही या ठिकाणी स्वच्छतेच्या समस्येचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणार आहात.

**स्वच्छतेचा अर्थ आणि व्याख्या** (Meaning & Definition of Sanitation)

इंग्रजीतील Sanitation या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ ''आरोग्य रक्षणार्थ घ्यावयाची काळजी किंवा खबरदारी'' असा आहे. व्यक्तींच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी व्यक्ती ज्या समुदायात राहतात त्या समुदायात व सभोवतालच्या परिसरात सर्वच स्वच्छता राखली पाहिजे. कारण अस्वच्छ परिसर हा अनेक

रोगांस कारणीभूत ठरतो. परिणामी, अशा परिसरात राहणाऱ्या व्यक्तींचे आरोग्य धोक्यात येते. अस्वच्छ परिसरामुळे पटकी, हगवण, जंत होणे, कावीळ, पोलिओ, गोवर, विविध त्वचा रोग, घटसर्प, इत्यादी संसर्गजन्य रोग होतात. त्यामुळे या रोगांना प्रतिबंध करून मानवी आरोग्याचे रक्षण करणे आवश्यक ठरते व त्यासाठी व्यक्तिगत व सामुदायिक स्वच्छता राखणे गरजेचे ठरते. म्हणून Sanitation या शब्दासाठी मराठीत 'स्वच्छता' किंवा 'साफसफाई' हा पर्यायी शब्द वापरला जातो. थोडक्यात Sanitation म्हणजे आरोग्य रक्षणार्थ घ्यावयाची काळजी म्हणजेच स्वच्छता असा अर्थ होतो. Sanitation चा अर्थ अधिक सुस्पष्ट होण्यासाठी त्याच्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या विचारात घेणे उचित ठरते. त्यापैकी कांही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **चंद्रकांत खंडागळे :** आरोग्यास अपायकारक असणारी घाण, संसर्गजन्य घटक, मलमूत्र, टाकाऊ पदार्थ, सांडपाणी इत्यादी विविध गोष्टींची विल्हेवाट लावून किंवा त्यांचा पुनर्वापर करून समाजात किंवा समुदायात आरोग्यदायी परिस्थिती निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे स्वच्छता होय.

(Sanitation is a process of creating hygienic condition in the society or community by disposing or reusing various things like dirt, infection, excreata, waste matter, sewage etc. which are injurious to the health.

२) **डॉ. पी. एन. मोदी :** लोकांच्या सामान्य आरोग्यास धोकादायक असणाऱ्या रोगांचा उद्भव होण्यास प्रतिबंध करणारी परिस्थिती विकसित करून लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणारे विज्ञान म्हणजे स्वच्छता होय.

(Sanitation is a science of preserving health of the public by developing such conditions which will prevent the outbreak of diseases dangerous for the general health of public.)

३) **जागतिक आरोग्य संघटना** (WHO) : साधारणपणे मानवी मलमुत्राची सुरक्षितपणे विल्हेवाट लावण्यासाठी केलेल्या सेवा व सुविधांची तरतूद म्हणजे स्वच्छता होय. स्वच्छता ही संज्ञा टाकाऊ पदार्थांचे संकलन व सांडपाण्याची विल्हेवाट लावणे यासारख्या सेवांच्याद्वारे आरोग्यदायी परिस्थितीचे जतन करणे या अर्थानेही वापरली जाते.

(Sanitation generally refer to the provision of facilities and services for the safe disposal of human urine and feces. The word sanitation also refers to the maintenance of hygienic conditions, through services such as garbage collection and wastewater disposal.)

४) **पाणीपुरवठा आणि स्वच्छता सहयोगी परिषद** (Water Supply and Sanitation Collaborative council) मानवी आरोग्यवृद्धीस सहयोगी ठरेल अशा पद्धतीने मलमुत्र, घरातील सांडपाणी

आणि घनकचरा यांचे संकलन, वाहतूक, उपचार आणि विल्हेवाट किंवा पुनर्वापर करणे म्हणजे स्वच्छता होय.

(Sanitation as "The collection, transport, treatment and disposal or reuse of human excreta, domestic wastewater and solid waste, and associated hygiene promotion)

थोडक्यात स्वच्छता ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेत आरोग्यास अपायकारक असणाऱ्या सर्वप्रकारच्या गोष्टींची/पदार्थांची विल्हेवाट लावली जाते. किंवा त्यांच्यावर प्रक्रिया करून त्यांना पुनर्वापरासाठी योग्य बनविले जाते व समाजात किंवा समुदायात आरोग्यास उपकारक ठरेल अशी परिस्थिती निर्माण केली जाते.

**स्वच्छतेच्या समस्येचे स्वरूप**

स्वच्छतेचा अर्थ समजावून घेतल्यानंतर स्वच्छतेविषयीच्या समस्येचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेऊ या.

**१) कारणमीमांसा :** नागर समाजात आरोग्य रक्षणाची काळजी घेण्याची म्हणजेच स्वच्छतेची नितांत गरज आहे. कारण या समाजातील परिस्थिती वा पर्यावरण हे आरोग्याच्यादृष्टीने खूपच प्रतिकूल वा अपायकारक असते. शहरात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आढळते. ही अस्वच्छता निर्माण होण्याची विविध कारणे आहेत. त्यापैकी कांही प्रमुख पुढीलप्रमाणे:

**अ) औद्योगिकीकरण :** नागर समाजात औद्योगिकीकरणाची गती जास्त आहे. तेथे मोठमोठे उद्योगधंदे असतात. या उद्योगांतून/कारखान्यातून विविध घातक वायू, धूर, धुरळा, काजळी, राख, कार्बन इत्यादी प्रकारची प्रदूषके बाहेर पडून हवेत मिसळतात व हवा प्रदूषण होते. तसेच ह्या कारखान्यातून रसायने, क्षार, राख, मळी, विविध धातुंचे कण तयार होऊन ते सांडपाण्यात मिसळतात व ते पाणी नद्या, तलाव, समुद्र इत्यादीत मिसळून जलप्रदूषण होते. शिवाय कारखान्यातील टाकाऊ पदार्थांचे जमिनीवर ढीग साचतात व त्यातील रासायनिक विषायी द्रव्ये मातीत मिसळून मृदाप्रदूषण होते. थोडक्यात औद्योगिकीकरणामुळे शहरात हवेचे, पाण्याचे व मृदेचे प्रदूषण होऊन मानवी आरोग्यास धोका निर्माण होतो.

**ब) वाहतूक साधने :** पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची शहरात प्रचंड गर्दी असते. खनिज तेलाच्या अपुऱ्या ज्वलनामुळे अनेक विषारी वायू तयार होऊन ते हवेत मिसळतात. तसेच शिसे, धूर, धूरके इत्यादी प्रदूषकेही हवेत मिसळून हवा प्रदूषण होते.

**क) कचरा व सांडपाणी :** शहरात जागोजागी कचऱ्याचे मोठमोठे ढीग तयार होतात. या ढिगाऱ्यात जंतू, विषारी वायू व इतर प्रदूषके तयार होतात व ती हवेत व पाण्यात मिसळून प्रदूषण वाढते. तसेच शहरातील लोक प्लॅस्टिक, कागद व इतर प्रकारचा कचरा रस्त्यात, उघड्या गटारीत, पाण्यात टाकतात व

त्यामुळे जलप्रदूषण होते. शहरातील स्वयंपाकगृहे, हॉटेल्स, लॉज, स्नानगृहे, शौचालये, कारखाने इत्यादीतील सांडपाणी त्यावर प्रक्रिया न करता रस्त्यावर व जवळपासच्या जलाशयात सोडले जाते. परिणामी, जलप्रदूषण होते. बहुतेक शहरात उघड्या गटारी असून त्यामध्ये रोगजंतू तयार होऊन हवेत मिसळतात व हवा प्रदूषण होते. अनेक लोक विशेषतः झोपडपट्ट्यातील लोक उघड्यावर मलमूत्र विसर्जन करतात. तसेच अन्नधान्ये, फळे, भाजीपाला इत्यादींचे अवशेष उघड्या जागेवर/रस्त्यावर फेकतात, परिणामी, अशा वस्तू कुजून त्यात विषारी द्रव्ये व रोगजंतू निर्माण होतात.

**ड) जागृतीचा अभाव :** शहरातील अनेक लोकांमध्ये आरोग्यविषयक व स्वच्छताविषयक जागृतीचा अभाव आढळतो. बरेच लोक व्यक्तिगत स्वच्छता बाळगतात मात्र सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. अनेकांना स्वच्छतेच्या सवयी नसतात. बेजबाबदारपणे रस्त्यावर/सार्वजनिक जागांवर घाण व कचरा करतात. बरेच जण मोबाईल, मोटार सायकल खरेदी करतात पण शौचालय बांधित नाहीत. व्यक्तिगत शौचालय नसलेली मंडळी सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात मात्र त्याची स्वच्छता ठेवण्याकडे दुर्लक्ष करतात. अस्वच्छतेमुळे आरोग्य बिघडते याची जाणीव त्यांना नसते व ज्यांना ही जाणीव असते ते 'कळतय पण वळत नाही' या उक्तीप्रमाणे वागतात.

वरील विविध कारणांमुळे शहरात अस्वच्छता निर्माण होऊन आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण होते. म्हणून शहरी जीवनात स्वच्छता ठेवण्याची गरज भासते.

**२) स्वच्छतेची उद्दिष्टे :** नागर समाजात स्वच्छता ठेवण्याच्या सोयीसुविधा निर्माण करून मानवी आरोग्याचे रक्षण करणे आवश्यक असते. स्वच्छता ठेवण्याची म्हणजेच आरोग्य रक्षणाची काळजी घेण्याची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) आरोग्यदायी पर्यावरण :** शहरात विविध कारणांमुळे सर्वत्र अस्वच्छता मोठ्या प्रमाणावर असल्याने शहरी पर्यावरण हे अपायकारक बनते. त्यामुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण होतो. हा धोका टाळण्यासाठी शहरी पर्यावरण स्वच्छ, प्रदूषणमुक्त, आरोग्यदायी बनविणे आवश्यक असते आणि त्यासाठी स्वच्छतेच्या सायीसुविधा निर्माण कराव्या लागतात. थोडक्यात आरोग्यदायी पर्यावरण निर्माण करणे हे स्वच्छतेचे पहिले उद्दिष्ट आहे.

**ब) नैसर्गिक स्त्रोतांचे रक्षण :** शहरातील हवा, पाणी, वनस्पती इत्यादी नैसर्गिक स्त्रोतांचे वा साधनसंपत्तीचे संरक्षण करणे हे स्वच्छतेचे दुसरे उद्दिष्ट आहे. केवळ मानवी जीवन सुखी करण्यासाठीच नव्हे तर मानवाचे (व इतरही प्राण्यांचे) अस्तित्व टिकून राहण्यासाठी शुद्ध व स्वच्छ हवेची व पाण्याची गरज असते. त्यासाठी हवा व पाण्याचे प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यावी लागते; व त्यासाठी स्वच्छतेची गरज असते.

**क) सुरक्षा व प्रतिष्ठा :** मानवाची सुरक्षा व प्रतिष्ठा यांची जपणूक करणे हे स्वच्छतेचे तिसरे उद्दिष्ट आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन करणे, कचरा व घाण रस्त्यावर टाकणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविवेकी वापर करणे इत्यादी कृत्ये ही असभ्यतेचे/अप्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. त्यामुळे नागरिकांसाठी शौचालये, स्नानगृहे, मुताऱ्या, बंदिस्त गटारी, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था अशा सोयीसुविधा निर्माण करणे गरजेचे ठरते. यामुळे मानवी जीवन सुरक्षित तर होतेच पण ते सभ्य, प्रतिष्ठीत, सुसंस्कृत बनते.

**३) संकीर्ण प्रक्रिया :** स्वच्छता ही एक संकीर्ण प्रक्रिया आहे. म्हणजे या प्रक्रियेत अनेक क्रिया अंतर्भूत आहेत. विविध तऱ्हेची घाण, कचरा, मलमूत्र इत्यादीचे संकलन करणे, त्यांचा संचय करणे, त्यांची वाहतूक करणे, त्यांच्यावर उपचार करणे, आणि त्यांची विल्हेवाट लावणे इत्यादी बाबी स्वच्छता व्यवस्थेमध्ये अंतर्भूत आहेत. याशिवाय गोळा केलेल्या टाकाऊ वस्तूंवर प्रक्रिया करून त्यातील घटक वेगळे करून त्यांचा पुनर्वापर करणे ही क्रियाही स्वच्छता व्यवस्थापनात अंतर्भूत आहे. पुनर्वापराच्या क्रियेत मलमूत्रातील व सांडपाण्यातील पोषक अन्नद्रव्ये, पाणी, ऊर्जा, सेंद्रिय द्रव्य इत्यादीवर लक्ष्य केंद्रीत केले जाते. थोडक्यात स्वच्छता व्यवस्थेत टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावणे व त्यांचा शक्य असेल तर पुनर्वापर करणे या दोन मुख्य क्रिया अंतर्भूत आहेत. त्यामुळे स्वच्छता पक्रिया ही संकीर्ण ठरते.

स्वच्छता प्रक्रिया संकीर्ण असल्याचे आणखीन एक कारण म्हणजे तिच्यात चार अभियांत्रिकी पायाभूत घटक (Engineering infrastructure items) गुंतलेले आहेत. ते म्हणजे : अ) मलमूत्र व्यवस्थापन पद्धती, ब) सांडपाणी व्यवस्थापन पद्धती, क) घनकचरा व्यवस्थापन पद्धती, ड) बंदिस्त गटार पद्धती. ह्या चार अभियांत्रिकी घटकाबरोबरच स्वच्छता प्रक्रियेत कांही सामाजिक पैलूही समाविष्ट आहेत. स्वच्छता प्रक्रिया राबविण्यासाठी लोकांचाही उत्स्फूर्त सहभाग असावा लागतो. त्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटलेले असावे लागते. स्वच्छतेविषयी ते जागृत असले पाहिजेत. शौचालये, स्नानगृहे, गटारी, तसेच नैसर्गिक स्त्रोत वा साधनसंपत्ती यांचा त्यांनी शास्त्रीय पद्धतीने व विवेकाने वापर करावयास पाहिजे. त्यासाठी लोक पुरेसे सुशिक्षित, सुसंस्कृत व प्रबोधित असले पाहिजेत. स्वच्छता राखण्यासाठी केवळ तांत्रिक घटक (शौचालये, बंदिस्त गटारी, कचरा व्यवस्थापन प्लँट इ.) उपलब्ध करून देणे पुरेसे ठरत नाही. त्याच्या जोडीला सामाजिक-सांस्कृतिक घटकांचीही पूर्तता व्हावी लागते. अनेक समुदायात विशेषतः शहरातील झोपडपट्ट्या व खेडी यांच्यामध्ये स्वच्छतेविषयीचे तांत्रिक घटक उपलब्ध करून दिले तरी त्यांचा योग्य वापर करण्याची सवय व ज्ञान लोकांना नसल्याने स्वच्छता राखली जाऊ शकत नाही असा अनुभव आहे. थोडक्यात स्वच्छता प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी तांत्रिक घटकाबरोबरच सामाजिक-सांस्कृतक घटकांचीही पूर्तता व्हावी लागते. त्यामुळेही स्वच्छता प्रक्रियाही संकीर्ण बनते.

**४) विविध प्रकार :** स्वच्छता व्यवस्थेचे (Sanitation Systems) विविध प्रकार आढळतात. त्यापैकी कांही प्रकार हे मानवी मलमूत्र व्यवस्थापनाशी तर कांही 'संपूर्ण स्वच्छता व्यवस्थेशी' (मलमूत्र,

सांडपाणी, पावसाचे पाणी इत्यादींचे व्यवस्थापन) निगडीत आहेत. स्वच्छता व्यवस्थेचे कांही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) मूलभूत स्वच्छता** (Basic Sanitation) : म्हणजे केवळ एकाच घरांसाठी वापरली जाणारी सुधारित स्वच्छता व्यवस्था होय.

**ब) डबाधारित स्वच्छता** (Container-based Sanitation) : म्हणजे मानवी मैल्यावर उपचार/प्रक्रिया करण्याची सुविधा जेथे आहे तेथपर्यंत तो एखाद्या डब्यातून/पेटीतून वाहून नेणे होय.

**क) समुदायास समग्र स्वच्छतेकडे घेऊन जाणे** (Community-led total Sanitation) : हा एक लोकांच्या विशेषतः ग्रामीण लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणणारा दृष्टिकोन आहे. या प्रकारात लोकांना उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या सवयीचा उत्स्फुर्तपणे त्याग करण्यास प्रवृत्त केले जाते.

**ड) शुष्क स्वच्छता** (Dry Sanitation) म्हणजे शुष्क (कोरडे) शौचालय होय, ज्यातील मैला वाहून नेण्यासाठी बंदिस्त गटार व्यवस्था नसते. या प्रकारात मैल्यापासून मूत्र वेगळे होईल अशी व्यवस्था असते.

**ई) परिस्थितीशास्त्रीय स्वच्छता** (Ecological Sanitation) : या प्रकारात मानवी मलमुत्रातील पोषक अन्नघटक व सेंद्रिय द्रव्ये शेतातील पिकांना देण्याची व्यवस्था केली जाते. त्यामुळे हा एक सुरक्षित व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असा प्रकार आहे.

**फ) आकस्मिक स्वच्छता** (Emergency Sanitation) : नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी, निर्वासितांसाठी स्वच्छतेच्या सुविधा/शौचालये उपलब्ध करून दिली जातात. यामध्ये तीन टप्पे आहेत. १) त्वरीत टप्पा, २) अल्प मुदतीचा टप्पा, ३) दीर्घ मुदतीचा टप्पा. पहिल्या टप्प्यात लोकांनी उघड्यावर मलमूत्र विसर्जन करू नये यावर लक्ष दिले जाते. त्यासाठी त्यांना खड्ड्याचे (Pit) शौचालय, बादली (Bucket) शौचालय, डबाधारित शौचालय, रासायनिक (Chemical) शौचालय इ. सुविधा पुरविल्या जातात. दुसऱ्या टप्प्यात मूत्र वेगळे करणारे शुष्क शौचालय, सेप्टीक टँक, विकेंद्रत सांडपाणी व्यवस्था इ. सुविधा पुरविल्या जातात. तर तिसऱ्या टप्प्यात हात धुण्याच्या सुविधा आणि मलमुत्रांचे व्यवस्थापन सुविधाही पुरविल्या जातात.

**ग) पर्यावरणीय स्वच्छता** (Environmental Sanitation) : या प्रकारात रोग संक्रमणाशी निगडीत असणाऱ्या पर्यावरणीय घटकांचा समावेश होतो. घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, औद्योगिक कचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रित करणे इत्यादीवर लक्ष दिले जाते.

**घ) जागेवरील स्वच्छता** (Onsite Sanitation) ज्या ठिकाणी मैला व सांडपाणी निर्माण होते त्या ठिकाणीच त्याचे संकलन व संचय करून त्यावर उपचार/प्रक्रिया करणे म्हणजे जागेवरील स्वच्छता होय.

**च) शाश्वत स्वच्छता** (Sustainable Sanitation) : या प्रकारात मैला व सांडपाणी गोळा करण्याच्या पद्धती, त्यांची वाहतूक, त्यांच्यावर प्रक्रिया करणे, त्यांची विल्हेवाट करणे वा पुनर्वापर करणे इत्यादीवर एकत्रितपणे लक्ष केंद्रीत केले जाते. हा प्रकार आर्थिकदृष्ट्या टिकाऊ स्वरूपाचा, सामाजिकदृष्ट्या स्वीकारता येण्याजोगा, तांत्रिक व संस्थात्मकदृष्ट्या योग्य आणि पर्यावरणाचे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण करणारा असा आहे.

**५) स्वच्छता एक मानवी हक्क :** अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण यांच्याप्रमाणे आरोग्य ही मानवाची मूलभूत गरज आहे. मानवाचे जीवनमान उंचावण्यासाठी ह्या गरजांची पूर्तता होणे आवश्यक असते. आरोग्य उत्तम असणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक ठरते. आरोग्य उत्तम राहण्यासाठी लोकांना स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत; त्यांचा तो हक्कच ठरतो. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने २०१० मध्ये पाणी आणि स्वच्छता हा एक मानवी हक्क म्हणून मान्य केला आहे. तथापि, जेएमपीच्या अंदाजानुसार २०१७ मध्ये सुमारे ४५० कोटी लोकांना सुरक्षित स्वच्छता सुविधा उपलब्ध नव्हत्या. म्हणूनच आज स्वच्छता सुविधा असणे हे शाश्वत विकासाचे एक उद्दिष्ट मानले जाते. स्वच्छता हा विकास प्रक्रियेतील अग्रक्रमाचा विषय बनला आहे. जगातील सर्वच देश आज आपल्या नागरिकांना स्वच्छता सुविधा पुरविण्यावर भर देत आहेत. त्याचबरोबर लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून जनजागृतीचे अनेक उपक्रमही राबविले जात आहेत. भारतही याला अपवाद नाही.

**भारतातील स्वच्छता** (Sanitation in India) :

सर्वच विकसनशिल देशाप्रमाणे भारतातही स्वच्छतेविषयीची समस्या गंभीर आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाची लोकसंख्या सतत वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येला स्वच्छतेविषयीच्या कितीही सेवासुविधा पुरविल्या तरी त्या अपुऱ्याच पडत आहेत. आर्थिक विकासासाठी देशाने औद्योगिकीकरणाची गती वाढविण्यावर भर दिला. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या पाठोपाठ नागरीकरणाचीही गती वाढली. नगरांचे व नागरी लोकसंख्येचे प्रमाण वाढले. १९५१ मध्ये केवळ १७.३४ टक्के लोकसंख्या शहरी विभागात राहात होती. २०११ मध्ये ती ३१.१६ टक्क्यावर पोहचली. त्यामुळे सतत वाढत जाणाऱ्या नागरी लोकसंख्येला स्वच्छताविषयक सेवासुविधा पर्याप्त प्रमाणात पुरविणे हे एक मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्यप्राप्ती होऊन ७० वर्षे झाली आहेत. तथापि, ५१६१ शहरांपैकी ४८६१ शहरांमध्ये बंदिस्त गटार व्यवस्था (Sewerage network) नाही. सुमारे १८% नागरी घरांमध्ये शौचालय नाही. तेथील सदस्य उघड्यावर शौचास जातात. अनेक शहरात बंदिस्त गटारी नसल्याने रस्त्यावर सांडपाणी सोडले जाते. केवळ २५ ते ३० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे दुषित पाण्यामुळे होणाऱ्या रोगांचे प्रमाण मोठे आहे. पटकी, हगवण यासारख्या रोगाने दरवर्षी लाखो बालके मरण पावतात. झोपडपट्ट्या, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, शाळा, इत्यादीमध्ये स्वच्छता विषयक पायाभूत सुविधा नाहीत. त्यामुळे बहुतेक शहरांतील पर्यावरण हे आरोग्यास उपायकारक बनलेले दिसून येते. स्वच्छताविषयक सेवासुविधांच्या अभावामुळे/अपुरेपणामुळे

होणाऱ्या रोगांवर उपचार करण्यासाठी शासनाला दरवर्षी करोडो रुपये खर्च करावे लागतात. थोडक्यात भारतात स्वच्छताविषयक सेवासुविधांची स्थिती असमाधानकारक नव्हे तर चिंताजनक स्वरूपाची आहे.

**भारतातील स्वच्छताविषयक सेवासुविधांचा इतिहास :** आज भारतात स्वच्छताविषयक सेवासुविधांची स्थिती-समाधानकारक नाही हे खरे. तथापि, याबाबतचा भारताचा इतिहास हा नक्कीच समाधानकारक आहे. सिंधु संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन अशी ज्ञात संस्कृती आहे. ही संस्कृती नागर संस्कृती होती. या संस्कृतीतील नगरांमध्ये स्वच्छता व्यवस्था (Sanitation System) ही अत्यंत उत्तम व शास्त्रसुद्ध अशी होती. या संस्कृतीतील मोहंजोदारो, हडप्पा, लोथल, कालिबंगन इ. नगरांची रचनाही नियोजनबद्ध अशी होती. प्रत्येक घरात स्नानगृह व सांडपाण्याची गटारे होती. ही गटारे भुयारी मार्गाने नगराच्या मुख्य गटारास जोडलेली होती. पुढे मौर्य व गुप्त कालखंडातही अनेक नगरे होती व त्यामध्ये स्वच्छताविषयक सेवासुविधा पुरेशा प्रमाणात पुरविल्या जात. दक्षिणेकडील विजयनगरच्या साम्राज्यातही स्वच्छताविषयक सेवासुविधांवर विशेष लक्ष दिले जात होते. मध्ययुगातील कांही शासकांनीही आपल्या अधिपत्याखालील नगरांमध्ये आयोग्यविषयक व स्वच्छताविषयक सेवासुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न केले. ब्रिटिश राजवटीत नगरांना विशेष महत्त्व आले. नगरे ही व्यापार, शिक्षण, राजकारण, लष्कर इत्यादीची केंद्रे बनली. त्यामुळे ब्रिटिशांनी नगरांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्यास प्रारंभ केला. त्यावेळी पटकी, प्लेग यासारख्या साथीच्या रोगांची लागण भारतीय जनतेबरोबरच ब्रिटिशांनाही होऊ लागल्याने ब्रिटिश सत्तेने नगरांमध्ये शौचालये, गटारी, पाणीपुरवठा, सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प अशा सुविधा निर्माण करण्याकडे लक्ष दिले. इंग्लंडच्या धर्तीवर ब्रिटिश सत्तेने १९१५ मध्ये मुंबई प्रांतात नगरनियोजनासंबंधीचा पहिला कायदा केला व नगरपालिकांना नगरनियोजन करण्यासंबंधिचे अधिकार दिले. त्यानुसार नगरपालिका नगरामध्ये स्वच्छताविषयक कार्यक्रम राबवू लागल्या तसेच 'बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट' यासारख्या संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत स्वच्छता कार्यक्रम राबविण्यावर भर दिला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रात तसेच प्रत्येक घटकराज्यात नगर विकास मंत्रालय स्थापन करण्यात आले. राज्यघटनेने सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता हा विषय राज्यसूचीत समाविष्ट केलेला असला तरी नगरांनी स्वच्छतेविषयीचे धोरण ठरविण्याचे काम केंद्रीय नगर विकास मंत्रालय करते आणि त्याने ठरविलेल्या धोरणानुसार राज्यातील नगर विकास मंत्रालय स्वच्छता विषयक कार्यक्रम व योजना राबविते. या कार्यक्रमांतर्गत पुढील उपाययोजना राबविल्या जातात.

- शहरांतील प्रत्येक घरात शौचालय असावे या हेतूने गरिबांना परवडतील अशी शौचालये उभारली जातात. तसेच त्यासाठी त्यांना निधी, अनुदान, मदत व मार्गदर्शन पुरविले जाते.
- शहरातील स्थानिक स्वराज्यसंस्थांमार्फत सर्वप्रकारचा कचरा गोळा करून शहराबाहेर नेऊन त्याची विल्हेवाट लावली जाते. शक्य असेल त्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जातो.

- शहरातील घरे, कार्यालये, हॉटेल, कारखाने इत्यादीमधील सांडपाणी वाहून नेहण्यासाठी गटारी बांधल्या जातात. या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचे प्रयत्न केले जातात.

- शहरात जागोजागी सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या उभारल्या जातात. कांही शहरात लोकांना या सुविधा मोफत तर कांही शहरात अल्पदराने पुरविल्या जातात.

- बहुतेक सर्वच मोठ्या व मध्यम आकाराच्या शहरात मानवी मलमूत्र व सांडपाणी यांची विल्हेवाट लावण्यासाठी बंदिस्त (भूयारी) गटार व्यवस्था (ड्रेनेज सिस्टिम) उभारण्यावर भर दिला जातो.

- बहुतेक शहरात गलिच्छ वस्त्या असून त्यांच्यामध्ये नागरी सुविधांचा अभाव/टंचाई असते. त्यामुळे तेथे मोठी अस्वच्छता असते. परिणामी, संपूर्ण शहरातील पर्यावरण बिघडते म्हणून केंद्र सरकारने गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधार योजना (१९५६), गलिच्छ वस्ती पर्यावरण सुधार मध्यवर्ती योजना (१९७२), राष्ट्रीय गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम (१९९६), वाल्मिकी-आंबेडकर आवास योजना (२००१), राजकीय गांधी आवास योजना इत्यादी योजना राबविल्या असून त्या अंतर्गत गलिच्छ वस्त्यांमध्ये शौचालय, स्नानगृहे, मुताऱ्या, पाणी, बंदिस्त गटारी इ. सुविधा पुरविल्या जातात.

- शहरांनी स्वच्छता कार्यक्रम राबवावेत म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने निर्मल शहर पुरस्कार योजना राबविले जाते. स्वच्छताविषयक लक्ष्य पूर्ण करणाऱ्या शहरांना पुरस्कार म्हणून रोख रक्कम व प्रशस्तीपत्र दिले जाते.

- लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीवजागृती व्हावी म्हणून शासनाद्वारे प्रबोधन कार्यक्रम राबविले जातात. जाहिराती, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी इत्यादीमार्फत स्वच्छतेविषयीचा प्रचार व प्रसार जनतेमध्ये केला जातो. स्वच्छतेविषयी लोकांना प्रेरणा, प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने महात्मा गांधीच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदीनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले. ''ना. गंदगी करेंगे, ना करने देंगे'' हे या अभियानाचे घोषवाक्य आहे. जनतेच्या उत्स्फूर्त सहभागाने रस्ते सफाई, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, शौचालये स्वच्छ करणे, असे उपक्रम या अभियानात राबविले जातात. त्यासाठी स्वच्छता दूत म्हणून नामवंत व्यक्तींना नियुक्त केले आहे. या अभियानात सार्वजनिक/सहकारी कार्यालये व कर्मचारी, बिगरशासकीय संघटना, लष्करी जवान, सिनेकलावंत, खेळाडू, उद्योजक आध्यात्मिक गुरू इत्यादीचा सक्रिय सहभाग आहे.

अशाप्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वच्छता राखण्याच्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. तथापि, स्वच्छतेविषयीच्या समस्येचे पूर्णपणे निराकरण अद्याप झालेले नाही. याची कांही ठळक कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

- सर्वसामान्य लोकांना अद्यापही स्वच्छतेचे महत्त्व पटलेले नाही. अशिक्षित व अल्पशिक्षित लोक स्वच्छतेविषयी उदासिन आहेत. शौचालयाचा वापर करण्यास अनेकजण नाखूष असतात सुशिक्षित लोकही व्यक्तिगत स्वच्छता बाळगतात पण सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात.
- शौचालये, स्नानगृहे, गटारी इत्यादी स्वच्छताविषयक सोयी सुविधांचा योग्य वापर केला जात नाही. रस्त्यावर, गटारीत कचरा टाकला जातो. शासकीय अनुदानातून शौचालय बांधतात पण अनेकजण त्याचा वापरच करीत नाहीत.

  गरिबांना बांधून दिलेल्या शौचालयाचे व गटारींचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असते. थोड्या कालावधीतच हे बांधकाम निकामी झाल्याचे दिसून येते. शिवाय स्वच्छताविषयक शासकीय निधीमध्ये कर्मचारी व लोकप्रतिनिधी मोठा भ्रष्टाचार करतात. स्वच्छतेच्या योजना व कार्यक्रम शासकीय कर्मचारी अत्यंत उदासिनपणे राबवितात. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा, सेवाभाव, बांधिलकी इत्यादींचा अभाव असतो. स्वच्छतेविषयीची उद्दिष्ट्ये केवळ कागदोपत्री पूर्ण करण्यावर ते भर देतात.
- जनताही स्वच्छता कार्यक्रमात मनापासून उत्स्फूर्तपणे सहभागी होत नाही. अनेक शहरात केवळ पुरस्कार मिळविण्यासाठी स्वच्छता कार्यक्रम राबविले जातात. पुरस्कारप्राप्तीनंतर स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जाते. पुरस्कारप्राप्त झालेली शहरेही नंतर स्वच्छता कार्यक्रमासंबंधी उदासिन बनतात. स्वच्छता ही निरंतरपणे ठेवण्याची प्रक्रिया आहे हेच अद्याप लोकांना उमजलेले नाही.
- शहरात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर (नगरपरिषद, महानगरपालिका) आहे. मात्र अनेक संस्थांचे उत्पन्न अपुरे असल्याने स्वच्छता सुविधा उभारण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा निधी नसतो. केंद्र व राज्य शासनांकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यावर अनेक संस्था अवलंबून आहेत. त्यांचे हे आर्थिक परावलंबन शहरातील स्वच्छतेची समस्या सोडविण्याच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे.
- अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात अकार्यक्षमता, गैरव्यवस्थापन, लालफित, भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा इत्यादी दोष आढळतात. या दोषांमुळेही स्वच्छता कार्यक्रम यशस्वी होऊ शकत नाही.

वरील कारणांचे निर्मूलन केल्यास भारतातील शहरात स्वच्छता सेवासुविधाची स्थिती समाधानकारक होईल यात शंका नाही.

### ४.३.२ **मादक द्रव्यासक्तीची समस्या** (Problem of Drug Addiction)

मानव प्राचीन काळापासून मद्य किंवा दारू, अफू, गांजा इत्यादी नशा आणणाऱ्या पदार्थांचे म्हणजेच मादकद्रव्यांचे सेवन करीत आलेला आहे. तथापि, अशा पदार्थांचे सेवन करणे, त्यांचा दुरूपयोग करणे, या पदार्थांच्या सेवनाची आसक्ती निर्माण होणे ही आधुनिक काळातील विशेषतः नागर समाजातील एक गंभीर सामाजिक समस्या बनलेली आहे. या समस्येची कारणे आणि उतायययोजनांचा अभ्यास याठिकाणी तुम्ही

करणार आहात. त्यासाठी अगोदर ''मादकद्रव्य, मादकद्रव्यांचा दुरुपयोग, मादकद्रव्यांवरील अवलंबित्व आणि मादकद्रव्यांची आसक्ती किंवा अधिनता'' या चार संज्ञांचा अर्थ समजावून घेऊ.

१. **मादक द्रव्य** - Drug या इंग्रजी शब्दासाठी मराठीत मादकद्रव्य, मादकपदार्थ, अंमली पदार्थ असे शब्द रूढ झालेले आहेत. तथापि Drug याचा अर्थ 'औषधी पदार्थ' असा असून डॉक्टरने रोग/आजार बरा करण्यासाठी रोग्यास Drug घेण्याची शिफारस करणे आणि डॉक्टरच्या शिफारसीनुसारच औषधविक्रेत्याने (ड्रगिस्ट) तो रोग्यास विकणे अभिप्रेत किंवा समाज संमत आहे. **जागतिक आरोग्य संघटनेच्या** मतानुसार ''ड्रग म्हणजे असा कोणताही रासायनिक पदार्थ किंवा द्रव्य, जे सजीवाने, शरीरात घेतले असता त्याच्या एका किंवा अनेक कार्यात बदल घडून येतो.'' मादक द्रव्ये ही अ) **वनस्पतीजन्य** (उदा. तंबाखू, मद्य, अफू, गांजा, भांग, चरस इ.) आणि ब) **रासायनिक** (उदा. एल. एस. डी. (Lysergic Acid Diethylamide), मस्कॉलीन, सायलोसायबीन, अम्फोटामाईन्स, बार्बीच्यूरेटस, मार्फिन व हेरॉईन इ.) अशा दोन प्रकारची आहेत. या मादक द्रव्यांचे सेवन केले असता त्याचे व्यक्तीच्या शारीरिक क्रियांवर, भावनावेगावर, संवेदनक्षमतेवर व जाणिवेवर परिणाम होतात.

२. **मादकद्रव्यांचा दुरूपयोग** (Drug abuse) डॉक्टरी सल्ल्यानुसार रोगमुक्तीसाठी मादक द्रव्याचा उपयोग करणे हे योग्य व चांगले असते. तथापि या द्रव्यांचा डॉक्टरच्या सल्ल्याऐवजी वेगळ्याच उद्देशाने म्हणजेच अवैद्यकीय (Non medical) उद्देशाने वापर करणे म्हणजे मादकद्रव्यांचा गैरवापर किंवा दुरुपयोग (Misuse or abuse) होय. **जागतिक आरोग्य संघटनेच्या** मतानुसार ''ड्रगअबयुज म्हणजे अवैद्यकीय कारणासाठी व्यक्तीने स्वतःच (डॉक्टरच्या सल्ल्याशिवाय) मादक द्रव्याचे मोठ्या प्रमाणावर पुन्हा पुन्हा सेवन करणे होय.'' मादकद्रव्याचा दुरूपयोग दोन प्रकारे होतो. (अ) कांही मादक द्रव्यांच्या सेवनास कायद्याने मान्यता दिलेली आहे. तथापि त्यासाठी डॉक्टरची अधिकृत संमती आवश्यक असते. पण डॉक्टरी सल्ल्याशिवाय मादक द्रव्याचे अयोग्यपणे व अतिप्रमाणात सेवन करणे हे मादक द्रव्याचा दुरुपयोग ठरतो. (ब) कांही मादकद्रव्यांच्या सेवनावर व खरेदी-विक्रीवर कायद्याने बंधने घातलेली आहेत. अशा मादकद्रव्यांची खरेदी-विक्री व सेवन करणे हेही मादकद्रव्याचा दुरुपयोग ठरते. मॉर्फिन, पेथीड्रीन ही द्रव्ये वेदनाशामक म्हणून योग्य प्रमाणात डॉक्टरच्या शिफारसीनुसार वापरणे सदोपयोगाचे उदाहरण ठरते. या द्रव्यांत नशा किंवा गुंगी आणण्याचा गुणधर्म आहे. डॉक्टरच्या शिफारसीशिवाय केवळ नशा/गुंगी यावी, बेहोशीचा आनंद उपभोगता यावा म्हणून जर त्यांचे वारंवार व अतिप्रमाणात वापर केला तर ते दुरुपयोगाचे उदाहरण ठरेल.

३. **मादकद्रव्यांवरील अवलंबित्व** (Drug dependence) जी व्यक्ती मादक पदार्थाचे सेवन (तोंडाने गिळून, नाकाने हुंगून किंवा इंजक्शनद्वारे शरीरात टोचून) करते तिला या सेवनाची हळूहळू सवय लागते. म्हणजेच या पदार्थाचे सेवन केलेच पाहिजे. अशी तिची धारणा होते. यालाच मादकद्रव्यांवरील अवलंबित्व असे म्हणतात. हे अवलंबित्व शारीरिक तसेच मानसिक स्वरूपाचे असते.

४. **मादकद्रव्यासक्ती** (Drug addiction) मादकद्रव्यासक्ती म्हणजे व्यक्ती मादकद्रव्याच्या सेवनाच्या पूर्णपणे आहारी जाणे होय किंवा मादकद्रव्यांनी व्यक्तिच्या मनावर व शरीरावर आपली घट्ट पकड बसविणे होय. मादकद्रव्यासक्ती होणे ही एक प्रक्रिया असून तिच्या तीन अवस्था आहेत.

**अ) सवय :** (Habit) एखादा मादक पदार्थ नियमितपणे सेवन करणे यास सवय म्हणतात. सवयीत व्यक्तिला मादकपदार्थ वेळेवर न मिळाल्यास तिला तरतरी वा हुशार वाटत नाही. तिचे कामात लक्ष लागत नाही. परंतु तो पदार्थ घेतला की ती पूर्वीसारखी नॉर्मल होते.

**ब) सह्यता** (Tolerance) मादकद्रव्य सेवनांमुळे जी तरतरी वा हुशारी येते किंवा आनंद वाटतो तो पुढे हळूहळू येईनासा होतो. यालाच मादकद्रव्याबाबतची सह्यता असे म्हणतात. परिणामी आनंद/नशा येण्यासाठी व्यक्ती मादकद्रव्याची मात्रा (डोस) तसेच घेण्याच्या वेळा वाढविते.

**क) आसक्ती** (Addiction) त्यानंतर व्यक्तीला मादकद्रव्य घेण्याची एवढी चटक लागते की ती त्याच्या पूर्णपणे आहारी जाते, अधिन होते. मादकद्रव्य न घेतल्यास तिच्या शारीरिक व मानसिक लक्षणात बदल होतो. उदा. शारीरिक वेदना होणे, नाकाडोळ्यातून पाणी वाहणे, हातापायास कंप सुटणे, उलट्या-जुलाब होणे, अडखळत चालणे बोलणे, मनाची एकाग्रता संपणे इत्यादी. त्यामुळे व्यक्ती कोणताही विधीनिषेध न बाळगता हे मादकद्रव्य मिळविण्यासाठी धडपडू लागते. आणि जेव्हा तिला तो द्रव्य सेवनास मिळतो तेव्हाच तिला बरे (तात्पुरते) वाटू लागते. पुढे ठराविक काळानंतर त्या द्रव्यसेवनाची पुन्हा तीव्र इच्छा निर्माण होऊन वरील लक्षणे सुरू होतात. अशा या स्थितीस मादकद्रव्यांची आसक्ती, अधिनता किंवा व्यसनाधिनता असे म्हणतात.

**मद्यपान व मादकद्रव्यासक्तीची कारणे :**

आधुनिक समाजात विशेषतः नागर समाजात मादकद्रव्यासक्तीची समस्या अत्यंत गंभीर बनलेली आहे. आणि ती दिवसेंदिवस विस्तारत चालली आहे. नागर तसेच ग्रामीण भागातील लोक, श्रीमंत तसेच गरीब, प्रौढ तसेच युवक, सुशिक्षित तसेच अशिक्षित, पुरूष तसेच स्त्रिया अशा सर्व घटकांना या समस्येने ग्रासलेले आहे. या समस्येची कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **शारीरिक कारणे :** कांही व्यक्तींना चिंता, भीती, नैराश्य यामुळे झोप येत नाही. कांही व्यक्ती डोकेदुखी, अंगदुखीने त्रस्त असतात. अपघातग्रस्त व कर्करोगग्रस्त रुग्णांना अतिवेदना होत असतात. अशावेळी झोप यावी, वेदना कमी व्हाव्यात म्हणून डॉक्टर औषधोपचाराचा भाग म्हणून मादक पदार्थांची वा मद्याची उपाययोजना करतात. मात्र अशा पदार्थांच्या सेवनाची कांही रुग्णांना चटक लागून ते मादकद्रव्याच्या अधिन होतात. तसेच रात्रपाळी करणाऱ्या व्यक्ती, रात्रभर ड्रायव्हींग करू इच्छिणारे ड्रायव्हर्स, नाटक तमाशातील कलाकार, रात्री अभ्यास करणारे विद्यार्थी इत्यादी मंडळी जागरण करण्यासाठी मादक द्रव्याचे सेवन करू लागतात व पुढे कायमचे व्यसनाधिन होतात. त्याचबरोबर अनेक खेळाडू शारीरिक क्षमता

वाढविण्यासाठी, तर कांही लोक लैंगिक समागमाचा कालावधी वाढविण्यासाठी, तर अंगमेहनतीची कामे करणारे लोक शारीरिक थकवा घालविण्यासाठी मादकद्रव्यांचे सेवन करू लागतात व त्यानंतर त्याचे आसक्त होतात. सुरुवातीस मादक द्रव्याच्या सेवनाने केंद्रीय मज्जासंस्थेस उत्तेजना मिळून व्यक्तीस शारीरिक सुखाची अनुभूती येते. परिणामी शरीर वारंवार अशा मादकद्रव्यांची मागणी करू लागते आणि व्यक्ती त्यांच्या अधिन होते.

२. **मानसिक कारणे :** व्यक्ती मादकद्रव्याची वा मद्याची आसक्त होण्यास कांही मानसिक घटकही कारणीभूत ठरतात. आजचे नागरी जीवन हे अत्यंत धकधकीचे, धावपळीचे, स्पर्धेचे, अडीअडचणीचे बनलेले आहे, त्यामुळे व्यक्तीच्या मनावर प्रचंड ताण येतो; ती चिंताग्रस्त होते. ताण व चिंतांचा विसर पडावा म्हणून व्यक्ती मादकपदार्थांचे सेवन करू लागतात व व्यसनाधिन होतात. कांही व्यक्तींना जीवनात अपयश, फसवणूक, अपेक्षाभंग, विरह अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्यांना नैराश्य वा वैफल्य येते. अशा वैफल्यग्रस्त व्यक्ती मादकद्रव्यांचा आश्रय घेतात व त्यांच्या आधिन होतात. कांही व्यक्ती गंमत म्हणून, मौजमजा करावयाची म्हणून किंवा मादकद्रव्यांचे सेवन केल्याने नेमके काय होते याचा अनुभव घेण्याची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी म्हणून मादक द्रव्यसेवनास सुरुवात करतात व पुढे त्यांच्या अधिन होतात. कांही व्यक्ती अपंग, कुरूप, मंदबुद्धीचे शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल असतात. त्यामुळे त्यांच्या मनात न्युनगंडाची भावना निर्माण होते. ते एकलकोंडे बनतात. नैराश्याने घेरले जातात. अशा स्थितीचा विसर पडावा म्हणून ते मादक द्रव्यसेवन सुरू करतात व त्याचे आसक्त बनतात.

३. **सामाजिक कारणे :** मादकद्रव्यासक्तीच्या व मद्यपानाच्या समस्येस कांही सामाजिक घटकही उदा. कौटुंबिक सौख्याचा अभाव, कुसंगत, सामाजिक मूल्यांचा ऱ्हास, सामाजिक प्रथा इ. जबाबदार आहेत. कुटुंबातील पती-पत्नी, पालक-मुले यांच्यातील संबंध हे संघर्षाचे वा ताणतणावाचे असतील तर कुटुंबसदस्यांना कौटुंबिक सौख्य, प्रेम, माया, सहानुभूती मिळत नाही. परिणामी कांही सदस्य ही पोकळी भरून काढण्यासाठी मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जातात. तसेच घटस्फोट, मातापिता यापैकी एकाचा मृत्यू, मातापित्यानी विभक्त रहाणे, त्यांचे मुलांकडे दुर्लक्ष असणे इत्यादी घटकांमुळेही मुले मादकद्रव्यसेवनाच्या अधिन होतात. कुटुंबातील प्रौढ मंडळी मादकद्रव्यसेवन करीत असतील तर त्याचा प्रभाव पडून मुलांनाही त्याचे व्यसन लागण्याची दाट शक्यता असते. तसेच व्यक्तीला कुटुंबाबाहेर म्हणजे समाजात कुसंगत लाभली तर व्यक्ती विविध व्यसनांच्या आहारी जाते. बहुसंख्य विद्यार्थी हे मित्राच्या संगतीतच मादकद्रव्ये सेवनास सुरुवात करतात व पुढे त्याच्या अधिन होतात असा अनुभव आहे. अलिकडे धार्मिक-नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत चालला असून नव्या पिढीवर भोगवाद, भौतिकवाद, चंगळवाद, व्यक्तिवाद इत्यादींचा अतिरेकी प्रभाव वाढत आहे. त्यामुळे सुखप्राप्ती, आनंद उपभोग घेणे, चंगळ करणे इत्यादीच्या नावाखाली मादकद्रव्याचे सेवन करण्याचे फॅड वाढत आहे. कांही प्रथापरंपराही या समस्येस कारणीभूत आहेत. एरवी मादकद्रव्य सेवन हे निषिद्ध मानले जाते. तथापि यात्रा, जत्रा, सणसमारंभ इत्यादीप्रसंगी मात्र मादकपदार्थांचे सेवन करण्यास समाजसंमती दिलेली आढळते. उदा. होळीच्या वेळी भांग व दारू सेवनास परवानगी असते. त्यामुळे अशा

अपवादात्मक प्रसंगी केलेल्या मादकद्रव्यसेवनाची काही व्यक्तीना चटक लागून पुढे त्या व्यसनी बनतात. कांही आदिम समाजात मद्यपान करणे ही समाजसंमत प्रथा मानली जाते. तर कांही समूहात पाहुणचाराचा भाग म्हणून पाहुण्यांना मादकद्रव्ये आदरपूर्वक पुरविली जातात. यामुळेही कांही व्यक्ती व्यसनाधिन होतात.

४. **आर्थिक कारणे :** मादकद्रव्यासक्तीस व मद्यपानास कांही आर्थिक घटकही उदा. दारिद्र्य, बेकारी, श्रीमंती, अचानक धनलाभ होणे, कामाच्या ठिकाणची परिस्थिती इत्यादी-कारणीभूत ठरतात. दारिद्र्यामुळे आपल्या व आपल्या कुटुंबाच्या गरजा भागवू न शकणारी व्यक्ती आपले दुःख व दारिद्र्य विसरण्यासाठी गांजा, भांग, मद्य इत्यादीच्या सेवनास प्रारंभ करते व पुढे त्यांच्या अधिन होते. आधुनिक काळात बेकारीची समस्या उग्र बनलेली आहे. ज्यांना रोजगार मिळत नाही अशा व्यक्तीं वैफल्यग्रस्त होऊन मादकद्रव्यांच्या आहारी जातात. मंदी किंवा अन्य कारणामुळे नोकरीधंदा बंद पडून बेकार झालेली व्यक्तीही आपले दुःख विसरण्यासाठी मादकद्रव्यांना जवळ करते. समाजात कांही व्यक्तींना विनासायास भरपूर पैसा मिळत असतो. त्यामुळे अशा व्यक्ती रंगढंग, चैन, ऐषोआराम करण्याच्या नावाखाली मादक द्रव्यांचे सेवन करू लागतात. श्रीमंत कुटुंबातील बऱ्याच व्यक्ती भरपूर पैसा असल्यामुळेच मादकद्रव्य सेवनास प्रारंभ करतात व त्यांच्या आहारी जातात. कांही वेळा व्यक्तीस अचानक धनलाभ होतो. अपेक्षा व पात्रता नसताना मिळालेल्या पैशाचा योग्य वापर कसा करावा हे न समजल्याने अशा व्यक्ती मौजमजा करण्याच्या नावाखाली मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जातात. कांही व्यक्तींना अत्यंत खडतर परिस्थितीत आपली नोकरी, धंदा, व्यवसाय करावा लागतो. उदा. अतिउष्ण वा अतिथंड किंवा दुर्गंधीयुक्त वातावरणात काम करणे. त्यामुळे ही खडतर वा प्रतिकूल परिस्थिती सहन करण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून मादकद्रव्य सेवनाच्या आहारी जातात. बऱ्याच उच्चभ्र व्यवसायांमध्ये चर्चा, परिषदा, मिटींग, पार्टी, सौदेबाजी, ग्राहक पटविणे, कॉन्ट्रॅक्ट मिळविणे इत्यादी प्रसंगी मादकद्रव्य सेवन हे शिष्टाचार मानला आहे. ह्या शिष्टाचाराचे पालन करण्यातूनच अनेक व्यक्ती मादकद्रव्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. या व्यापारात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत असे लोक नव्या नव्या क्लृप्ती वापरून लोकांना विशेषतः युवा पिढीस मादकद्रव्य सेवनाची सवय लावतात. त्यामुळे अनेकजण नकळतपणे मादकद्रव्यासक्त होतात. उदा. खाद्यपदार्थ, शीतपेये, फळे इत्यादीत मादकद्रव्ये मिसळून मुलांना नकळतपणे मादकद्रव्यसेवनाची चटक लावण्याचे प्रमाण वाढत आहे. अशी चटक लागलेली मुले पुढे जाणिवपूर्वक मादकद्रव्य सेवन करू लागतात. कांही व्यापारी मुलांना प्रारंभी मोफत मादकद्रव्ये पुरवून त्याची चटक लावतात व पुढे ही मुले स्वतःहून अशा पदार्थांची खरेदी करू लागतात.

**मद्यपान व मादकद्रव्यासक्तीच्या समस्येवरील उपाययोजना**

मद्यपान व मादकद्रव्यासक्तीची समस्या सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांचे १) नियंत्रणात्मक/कायदेशीर उपाययोजना २) उपचारात्मक उपाययोजना व ३) प्रतिबंधात्मक उपाययोजना अशा तीन गटात विभाजन करता येईल.

## १) नियंत्रणात्मक /कायदेशीर उपाययोजना

मादकद्रव्य सेवनाचे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर तसेच तिच्या कुटुंबावर आणि एकूणच समाजजीवनावर गंभीर दुष्परिणाम होतात. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी मादकद्रव्यांचे उत्पादन, व्यापार (खरेदी-विक्री) व सेवन इत्यादींवर नियंत्रणे घालण्यासाठी शासनाने वेळोवेळी कायदेशीर उपाययोजना केलेल्या आहेत.

अ) ब्रिटिश राजवटीत सरकारने **दि ऑफिम ॲक्ट १९५७, दि आफिम ॲक्ट-१८७८** आणि **घातक ड्रग्ज ॲक्ट - १९३०** असे तीन कायदे संमत केले. या कायद्यांमध्ये मादकद्रव्यांचा अवैध व्यापार करणाऱ्यास दंडासह किंवा दंडाविना तीन वर्ष कारावासाच्या शिक्षेची तरतूद केलेली होती. तसेच अशाच स्वरूपाचा गुन्हा दुसऱ्यांना करणाऱ्यास दंडासह वा दंडाविना जास्तीत जास्त आठ वर्ष कारावासाची तरतूद केलेली होती. मात्र या कायद्यांमध्ये किमान शिक्षेची निश्चिती केलेली नव्हती. त्यामुळे न्यायाधीश अशा गुन्ह्यासाठी अत्यंत अल्प दंडाची व कारावासाची शिक्षा सुनावित असत. त्यामुळे हे कायदे फारसे परिणामकारक ठरले नाहीत.

ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बहुतेक सर्व घटक राज्यांनी **ओपियम स्मोकिंग ॲक्ट** (Opium Smoking Act) संमत करून विनापरवाना मादकद्रव्य सेवनास बंदी घातली. **मद्रास प्रोहिबिशन ॲक्ट - १९४७** नुसार 'हेम्प' वनस्पतीच्या लागवडीवर बंदी घातली. मात्र औषधनिर्मितीचा परवाना असणाऱ्यांना मात्र लागवडीस परवानगी दिली होती. "**दि बाँबे प्रोहिबिशन ॲक्ट-१९४९**" नुसार मादकद्रव्यांचे (मद्य, अफू, गांजा, चरस किंवा असा कोणताही पदार्थ जो मादक आहे असे शासन जाहीर करील) उत्पादन, विक्री वितरण व सेवन करणाऱ्यावर प्रतिबंध घालण्यात आले. आणि या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास दंड व जास्तीत जास्त तीन वर्ष कारावास अशा शिक्षेची तरतूद केली.

क) १९८५ मध्ये भारत सरकारने "**दि नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सीस ॲक्ट**" या नावाचा कायदा संमत केला आहे. या कायद्याने मादकद्रव्यांची एक यादी तयार केलेली आहे. या यादीतील कोणत्याही द्रव्याचे वा पदार्थाचे उत्पादन, वितरण, खरेदी-विक्री, उपभोग इत्यादीवर नियंत्रण व प्रतिबंध घातला आहे. या कायद्याचे प्रथम उल्लंघन करणाऱ्यास किमान १० वर्षे कारावास व १ लाख रुपये दंड तर कमाल २० वर्षे कारावास व २ लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद केली आहे. असाच गुन्हा परत घडल्यास किमान १५ वर्षे कारावास व दीड लाख रुपये दंड आणि कमाल ३० वर्षे कारावास व ३ लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद केलेली आहे. तथापि गांजालागवडीसाठी मात्र ५ वर्षे कारावास व ५० हजार रुपये दंडाची तरतूद केलेली आहे.

ज्या व्यक्ती मादकद्रव्याच्या आहारी गेलेल्या आहेत व ज्यांनी स्वतःजवळ गुंगी आणणारी मादकद्रव्ये बाळगली आहेत अशांना या कायद्यानुसार १ वर्ष कारावास व दंड अशी शिक्षा होऊ शकते. मात्र जर मादकद्रव्याच्या आहारी गेलेल्या व्यक्तीस त्यातून बाहेर पडावयाचे असेल व त्यासाठी वैद्यकीय उपचार

घ्यावयाचे असतील तर मात्र अशा व्यक्तीस कारावासात न डांबता तिला शासनमान्य दवाखान्यात वा संस्थेत पाठविण्याचा अधिकार या कायद्याने न्यायालयास दिलेला आहे.

**२) उपचारात्मक उपाययोजना**

मादकद्रव्यसेवनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना शोधून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करणे (यामध्ये मानसोपचार व समाजोपचार (Social therapy यांचाही समावेश होतो.) आवश्यक आहे. यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांनी खास दवाखाने सुरू केलेले आहेत. या दवाखान्यात अशा व्यक्तींना भरती करून त्याला व्यसनमुक्त होण्यासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची वैद्यकीय उपाययोजना केली जाते. उदा. व्यसनमुक्त होण्याचा मनोनिग्रह दृढ करणे मादकद्रव्यावरील शारीरिक व मानसिक अवलंबन हळूहळू कमी करत जाणे, तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार प्रारंभी कमी तीव्रतेची मादकद्रव्ये देऊन त्यांचा उपयोग पुढे हळूहळू कमी करत जाणे, आवश्यक ती प्रतिजैवके (अँटीबायोटीक्स औषधे) देणे इत्यादी. अशा व्यक्तीला इतर व्यसनाधिन व्यक्तींशी तसेच व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तिंशी मनमोकळेपणाने संवाद साधू दिला जातो. आपले अनुभव, समस्या, अडचणी, वेदना, व्यथा इत्यादी मुक्तपणे इतरांसमोर मांडू दिल्या जातात. त्यामुळे त्याच्या मनावरील ताण कमी होण्यास मदत होते. यालाच ''**नॉर्कोटिक ॲनॉनिमस**'' (N.A.) असे म्हणतात. मादक द्रव्यांच्या व्यसनातून मुक्त झालेल्या व्यक्तीचे समाजात पुनर्वसन करणे आवश्यक असते. त्यासाठी प्रथम 'व्यसनी' म्हणून लागलेला कलंक पुसला जाणे आवश्यक असते. तसेच त्याला व्यावसायिक कौशल्ये शिकवून एखादा रोजगार उपलब्ध करून देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे आवश्यक असते. तसेच मादकद्रव्यसेवनास त्याने परत सुरुवात करू नये म्हणून मादकद्रव्यांशी संबंधित व्यक्ती, ठिकाणी, प्रसंग, वातावरण इत्यादीपासून त्याला दूर ठेवणेही आवश्यक असते.

भारत सरकारच्या समाजकल्याण मंत्रालयाने मादकद्रव्यसेवनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी एक कृती कार्यक्रम बनविला आहे. या कार्यक्रमांतर्गत १) अशा व्यक्तींचा शोध घेणे, त्यांना व्यसनापासून मुक्त होण्याची प्रेरणा देणे, मार्गदर्शन, उपचार व पुनर्वसन करणे यासाठी समुदाय पातळीवर उपक्रम राबविले जातात. २) तसेच मादकद्रव्यांच्या दुष्परिणामाविषयी समाजात जाणिवजागृती निर्माण केली जाते. ३) या कामात मदत करू इच्छिणाऱ्या सेवाभावी व्यक्ती व संस्थांना प्रशिक्षण दिले जाते. ४) या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी बिगरशासकीय संघटनाचे (NGOs) सहकार्य घेऊन त्यांना मदत दिली जाते.

**३) प्रतिबंधात्मक उपाययोजना**

लोक मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जाणार नाहीत, मद्यपान करणार नाहीत याची काळजी घेण्यासाठी करावयाच्या उपायांना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणता येते. यासंदर्भात पुढील उपाययोजना सूचविता येईल.

**अ) कायद्याची कडक अंमलबजावणी :** मादकद्रव्यांचे उत्पादन, वितरण, अवैध व्यापार व सेवन यासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींची अत्यंत प्रामाणिक व कडक स्वरूपात अंमलबजावणी करून गुन्हेगारास

कडक शासन झाले पाहिजे. तरच मादकद्रव्यांची सहज उपलब्धता व दुरुपयोगास आळा बसेल. यासंदर्भात पोलीस, तुरुंग, न्यायालय इत्यादी शासकीय यंत्रणांचे शुद्धीकरण झाले पाहिजे म्हणजे त्या भ्रष्टाचारमुक्त झाल्या पाहिजेत. मादकद्रव्यांच्या व्यापाराकडे हप्ते घेऊन दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. तसेच तुरुंग, दवाखाने, उपचारकेंद्रे इत्यादीतील कर्मचारी हे या कायद्यानुसार शिक्षा झालेल्या कैद्यांना व व्यसनमुक्तीसाठी उपचार घेणाऱ्या व्यक्तींना चोरून मादकद्रव्ये पुरवितात. अशा कर्मचाऱ्यांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे. एकंदरीत मादकद्रव्याशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांवर दहशत बसेल अशापद्धतीने कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

**ब) वैद्यकीय व्यावसायिकांच्या दृष्टिकोनात बदल :** वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित असणारे डॉक्टर, औषध विक्रते इत्यादींच्या दृष्टिकोनात बदल झाला पाहिजे. अनेक डॉक्टर्स रुग्णाला तात्काळ बरे वाटावे व आपण तज्ज्ञ डॉक्टर आहोत असा लोकात लौकीक व्हावा म्हणून रुग्णांना भरमसाठ ड्रग्ज (औषधे) लिहून देतात. पुढे काही रोगी डॉक्टरच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय स्वतःच ड्रग्ज खरेदी करू लागतात व औषध विक्रेतेही ती विकतात. यातूनच अनेक रुग्ण ड्रग्जचे शिकार होतात. म्हणून डॉक्टर्सनी शक्यतो गंगी/नशा आणणाऱ्या ड्रग्जचा वापर टाळावा. जर अशा ड्रग्जचा औषर म्हणून वापर करणे अत्यावश्यक असेल तरच वाजवी/मर्यादीत प्रमाणात त्यांची शिफारस करावी. तसे करताना ड्रग्जच्या दुष्परिणामांची रुग्णांना पुरेसी कल्पना द्यावी व त्यांचा दुरुपयोग न करण्यासंबंधी रुग्णाला सचेत करावे. औषधविक्रेत्यांनीही डॉक्टरी सल्ल्याशिवाय ड्रग्जची विक्री करू नये.

**क) जाणीव जागृती :** मादकद्रव्यसेवनांच्या दुष्परिणामांची लोकांना जाणिव करून देण्यासाठी समाजात मोठ्या प्रमाणावर जागृती मोहिम राबविली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थी, कामगार, हमाल, अतिश्रीमंत व अति दरिद्री व्यक्ती, गलिच्छ वस्तीतील लोक इत्यादींसाठी जाणिव जागृतीचे/प्रबोधनाचे उपक्रम (चर्चा, मेळावे, परिषदा इ.) राबविले पाहिजेत. या उपक्रमांत शासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, पालक, शिक्षक, विचारवंत, कलावंत इत्यादींनी सहभागी झाले पाहिजे. लोकांना विशेषतः युवकांना मादकद्रव्यासंबंधीचे शास्त्रीय ज्ञान दिले पाहिजे. मादकद्रव्यासक्ती व मादकद्रव्यांचा दुरुपयोग या समस्येशी संबंधित असणाऱ्या विविध पैलुंचे शास्त्रीय संशोधन करून त्याचे निष्कर्ष समाजात प्रसारीत केले पाहिजेत. त्यासाठी प्रसारमाध्यमांचा सुयोग्य उपयोग करून घेतला पाहिजे. एकंदरीत मादकद्रव्यांच्या विरोधी वातावरण समाजात निर्माण झाले पाहिजे.

**ड) इतर उपाय :** याशिवाय समाजातील दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य, अज्ञान यासारख्या समस्यांचे निर्मूलन झाले पाहिजे. प्रत्येकास पुरेसा रोजगार, शिक्षण व आरोग्य सुविधा प्राप्त होऊन सुखासमाधानाने जगता येईल अशी सामाजिक परिस्थिती निर्माण केली पाहिजे. कारण दारिद्र्य, बेकारी, आजार, अज्ञान इत्यादीने गांजलेले लोक चटकन व्यसनाधिन होताना आढळतात. तसेच कुटुंबातील सदस्यांचे परस्परसंबंधही प्रेमाचे/स्नेहाचे असावेत. कारण कौटुंबिक सौख्यास पारखी झालेली व्यक्तीही व्यसनाकडे वळण्याची दाट

शक्यता असते. यासंदर्भात पालकांनी आपल्या मुलांच्या सवयीकडे/वर्तनाकडे पुरेसे लक्ष दिले पाहिजे. कुसंगतीत सापडून मुले मादकद्रव्यसेवन तर करीत नाहीत ना याची वेळोवेळी खात्री करून घेतली पाहिजे. जर मुले माद्रकद्रव्यसेवन करताना आढळली तर वेळीच त्यांना प्रेमाने, डॉक्टरी सल्ल्याने, गरज भासल्यास सक्तीने त्या सेवनापासून परावृत्त केले पाहिजे.

### ४.३.३ पर्यावरण प्रदूषणाची समस्या (Problem of Environmental Pollution)

पर्यावरणाचे प्रदूषण ही आधुनिक काळातील सर्वात गंभीर अशी समस्या आहे. सजीवांच्या सभोवताली असणाऱ्या व त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या परिस्थितीस पर्यावरण असे म्हणतात. पृथ्वीवरील सजीवांच्या सभोवताली निसर्गाने निर्माण केलेल्या हवा, पाणी, भूमी, सजीव आणि मानवाने निर्माण केलेल्या भौतिक व अभौतिक वस्तू इत्यादी प्रमुख घटकांचे आवरण आहे. या घटकांनाच अनुक्रमे वातावरण, जलावरण, भूआवरण, जीवावरण आणि संस्कृती असे म्हणतात. ह्या पाच घटकांतील किंवा आवरणातील सहसंबंधामुळे सजीवासाठी जी आवश्यक परिस्थिती निर्माण होते तिला पर्यावरण असे म्हणतात. प्रत्येक सजीवाचे स्वतःचे असे खास पर्यावरण आहे. आणि प्रत्येक सजीव आपल्या गरजापूर्तीसाठी पर्यावरणातील विविध घटकांचा उपयोग करून घेत असतो. मानवदेखील आपल्या गरजापूर्तीसाठी/सुखप्राप्तीसाठी पर्यावरणातील विविध घटकांचा अंधाधुंदपणे वापर करू लागला आहे. त्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी किंवा ऱ्हास होऊ लागला आहे. पर्यावरणाचे प्रदूषण हे या ऱ्हासाचे एक प्रमुख कारण आहे. प्रदूषणाच्या समस्येने सर्व जगालाच ग्रासलेले आहे. म्हणून या ठिकाणी आपण प्रदूषणाचा अर्थ, प्रकार, कारणे व प्रदूषण नियंत्रणाची उपाययोजना यांचा ऊहापोह करणार आहोत.

■ **प्रदूषणाचा अर्थ आणि व्याख्या**

Pollution हा इंग्रजी शब्द लॅटिन भाषेतील Polluere या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ एखादी गोष्ट दूषित किंवा अशुद्ध होणे असा आहे. यावरून पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणातील हवा, पाणी, अन्न, भूमी, इत्यादी घटक दूषित किंवा अशुद्ध होणे होय. पर्यावरणाच्या प्रदूषणाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या पाहू.

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणाचे घटक असलेल्या हवा, पाणी, माती इत्यादींच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांमध्ये होणारे असे अवांछनीय परिवर्तन की, जे सजीवांचे आरोग्य, क्षमता व कृती यांना धोकादायक ठरते.

२. **एनव्हारमेंटल पोल्यूशन पॅनेल** (वॉशिंग्टन) सजीवांची विपुलता, भौतिक व रासायनिक घडण, उत्सर्जनाच्या पातळ्या, ऊर्जेची प्रतिमाने यातील बदलांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम म्हणून आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत होणाऱ्या प्रतिकूल फेरफारास पर्यावरणाचे प्रदूषण असे म्हणतात.

**३. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ :** जे पदार्थ किंवा घटक घन, द्रव किंवा वायू स्वरूपात मानवी कृतीद्वारे किंवा नैसर्गिकपणे पर्यावरणात मिसळतात व पर्यावरणास घातक ठरू शकतात त्यांना प्रदूषके म्हणतात. अशा प्रदूषकांची पर्यावरणातील घातक उपस्थिती किंवा त्यांच्या उपस्थितीमुळे घडून आलेले घातक बदल म्हणजे पर्यावरण प्रदूषण होय.

■ **पर्यावरणीय प्रदूषणाचे प्रकार :**

पर्यावरणातील प्रदूषणाचे विविध निकषांच्या आधारे विविध प्रकार पाडता येतात. स्थूलमानाने प्रदूषणाचे हवा प्रदूषण, जलप्रदूषण, भूप्रदूषण व ध्वनीप्रदूषण असे चार प्रकार पडतात.

**१. हवा प्रदूषण :** हवा प्रदूषण म्हणजे हवेत दूषित पदार्थ किंवा घटक मिसळून हवा दूषित किंवा अशुद्ध होणे होय. दूषित पदार्थांना प्रदूषके असे म्हणतात. ही प्रदूषके वायू प्रदूषके (उदा. कार्बन डॉय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साइड, सल्फर, नायट्रोजनची संयुगे, क्लोरिन इत्यादी) आणि कणप्रदूषके (उदा. धूलीकण, जलबिंदू, धूर, धुरळा, रोगकारक जीवाणू इत्यादी) अशा दोन प्रकारची असतात. हवेत अनेक वायू असून त्यांचे हवेतील नैसर्गिक प्रमाण निश्चित असे आहे. उदा. हवेत नायट्रोजन ७८%, ऑक्सिजन २१%, कार्बनडॉयॉक्साईड ०.०३% इतके असून पाण्याची वाफ व इतर वायूंचे प्रमाण अल्प आहे. कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे हवेतील वायूंचे हे प्रमाण बदलते. तसेच हवेची नैसर्गिक गुणवत्ताही बदलते आणि हे बदल सजीवांच्या आरोग्यास हानिकारक ठरतात. तसेच भौतिक मालमत्तेस हानी किंवा नुकसान पोहचवितात.

■ **हवा प्रदूषणाचे दुष्परिणाम**

**१. दृष्टिदोष :** हवेतील धूर, धुरळा, धुके, राख, काजळी इत्यादीमुळे प्रकाशकिरण सर्वत्र पसरून डोळ्यांना दिसण्यात अडथळा येतो व अपघात होतात.

**२. पदार्थावर परिणाम :** हवेतील प्रदूषकांमुळे संगमरवरी इमारती, धातूची साधने व वाहने, काच, रंग इत्यादीवर गंज चढतो. त्यांची झीज होते.

**३. अनारोग्य :** अशुद्ध हवेमुळे फुफ्फुसाचा कर्करोग, अस्थमा, डोकेदुखी, श्वसनमार्गास सूज, पेशींच्या कार्यात बिघाड, डोळ्यांची जळजळ, इ. आजार होऊन आरोग्य बिघडते. नवजात बालकांवर अशक्तपणा, विकलांगता, अकाली मृत्यू इ. परिणाम होतात.

**४. आम्लपर्जन्य :** सल्फर डायॉक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड मिसळून आम्लयुक्त पाऊस पडतो. त्यामुळे वनस्पतींची वाढ खुंटते. जंगले नष्ट होतात. पुल, पुतळे, इमारती यांना गंज चढतो.

**५. तापमान वाढ :** हवेत कार्बन डायॉक्साईडचे प्रमाण वाढून पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे अनेक जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वाढत्या तापमानाने बर्फ वितळून समद्राच्या पाण्याची पातळी वाढून मानवी वसाहतींना धोका निर्माण झाला आहे.

६. **ओझोनचा नाश :** कूलर, एअरकंडिशनर्स, जेट विमानातील इंधन, प्लास्टिक फोम इत्यादीत वापरल्या जाणाऱ्या क्लोरोफ्लुरोकार्बन (CFC) नावाच्या रासायनिक संयुगाचा हवेतील ओझोन वायूशी संयोग होऊन ओझनचे प्रमाण कमी होत आहे. हा वायू सूर्यापासून येणाऱ्या घातक 'अल्ट्रा-व्हायोलेट' किरणांना थोपवून त्याची तीव्रता कमी करतो. तथापि त्याचे हवेतील प्रमाण कमी होत असल्याने हे घातक किरण पृथ्वीवर पोहचून गंभीर त्वचारोग होऊ शकतात.

७. **किरणोत्सर्जनामुळे** कर्करोग व इतर कांही रोगांच्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच जीवशास्त्रीय जनुकीय घडणीत बदल होऊन त्याचे जीवसृष्टीवर दुष्परिणाम होत आहेत.

## २. जलप्रदूषण :

पृथ्वीवरील महासागर, सागर, सरोवरे, नद्या, ओढे इत्यादी जलाशयांचा जलावरणात समावेश होतो. सजीवांना हवेप्रमाणेच पाण्याची गरज आहे. तथापि कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे ह्या जलाशयात जंतू, विषाणू, आम्ले, क्षार, पारा, शिसे, नायट्रेटस्, फॉस्फेट, किरणोत्सारी आयसोटोप्स, तेल, कीटकनाशके, धुण्याच्या पावडरी, धूळ, कचरा, राख इ. प्रदूषके मिसळून त्यातील पाणी बेचव, अशुद्ध, घाणरडे व दुर्गंधीयुक्त होऊन ते आरोग्यास धोकादायक बनते. यालाच स्थूलमानाने जलप्रदूषण असे म्हणतात. **''पाण्यात विविध दूषित पदार्थ मिसळून त्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होणे व त्यामुळे ते पिण्यास व वापरण्यास अयोग्य बनणे म्हणजे जलप्रदूषण होय.''** जलप्रदूषणामुळे जगात सर्वत्रच पिण्याच्या शुद्ध पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून मानवासह सर्वच जीवसृष्टीचे आरोग्य व पर्यायाने अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

### ■ जलप्रदूषणाचे दुष्परिणाम :

१. **ऑक्सिजनची कमतरता :** प्रदूषणामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन पाण्यातील वनस्पती व प्राणी यांचा नाश होतो. तेल व ग्रीसच्या तवंगामुळे पाण्यात खोलवर प्रकाश पोहचत नाही. त्यामुळे वनस्पतीच्या प्रकाश संश्लेषणात अडथळे येतात. त्यामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन वनस्पतींचा नाश होतो.

२. **तापमानात वाढ :** प्रदूषणामुळे पाण्याचे तापमान वाढते. त्यामुळे जलाचरांच्या जीवनचक्रात बाधा येऊन त्यांना हानी पोहचते.

३. **जलचरांचे आजार :** प्रदूषित पाण्यामुळे जलचरांना विविध रोग होतात. उदा. प्रदूषित पाण्यातील अमोनियामुळे माशांना कर्करोग व कल्ल्याचे विकार होतात. खनीज तेलातील कर्करोगजन्य रसायनांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो. डी.डी.टी. सारख्या कीटकनाशकांमुळे जलचरांची व पक्षांची अंडी फुटतात व आतील पिल्ले मरतात.

४. **मानवी आरोग्यास धोका :** प्रदूषित पाण्यामुळे मानवास विविध गंभीर आजार जडतात. पाण्यातील जंतू, विषाणू, आम्ले इत्यादीमुळे कावीळ, पटकी, विषमज्वर, आमांश, डांग्या खोखला, घटसर्प इत्यादी रोग होतात. पाण्यातील ॲल्युमिनियममुळे अलझायमर, शिशामुळे मतिमंदत्व, पाऱ्यामुळे मानसिक संतुलन ढळणे व अपंगत्व असे आजार होतात.

५. **परिसंस्थेचा विनाश :** एखाद्या नदीच्या किंवा तळ्याच्या पाण्यात कीटकनाशके व इतर प्रदूषके मिसळल्याने तेथील परिसंस्थेचा विनाश होतो.

६. **प्रवाळांना धोका :** पाण्याचे तापमान वाढून प्रवाळ खडक ठिसूळ बनतात व पांढुरके पडतात. गाळ साचल्याने प्रवाळ बेटे नष्ट होतात. प्रवाळावर गाळ साचल्याने प्रकाश संश्लेषणात अडथळे येऊन प्रवाळातील सूक्ष्मजीवांना खाद्य मिळत नाही.

### ३. ध्वनी प्रदूषण

ध्वनी प्रदूषण हा प्रदूषणाचा एक प्रकार आहे. इंग्रजीत त्यास Noise Pollution म्हणतात. Noise हा शब्द लॅटिन भाषेतील Nausea या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ कर्कश आवाज किंवा ध्वनी असा आहे. ध्वनी मापनासाठी 'डेसिबल' (dB) हे परिमाण वापरतात. साधारणपणे ५० ते ६० डेसिबलपर्यंतचा ध्वनी सुसह्य ठरतो. मात्र ८० डेसिबल्सनंतरचा ध्वनी असह्य होतो; गोंगाट/कर्कश ठरतो. तर १२० डेसिबल्सनंतरचा ध्वनी शरीरास हानिकारक ठरतो. आधुनिक काळात प्रामुख्याने नागर समाजात ध्वनी प्रदूषणाची समस्या गंभीर बनलेली आहे. शहरातील लोकांचा गोंगाट, मोटार, रेल्वे, विमाने, कारखान्यातील यंत्रे, घरातील रेडिओ, दूरदर्शन, पंखे, वातानुकूलित यंत्रे, सभा संमेलने, सण उत्सव इत्यादीच्या निमित्ताने लावले जाणारे लाऊडस्पिकर्स, स्टिरिओ, डॉल्बी इत्यादीमुळे ध्वनीप्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत आहे.

■ **ध्वनीप्रदूषणाचे दुष्परिणाम :**

१. **बहिरेपणा :** साधारणतः १०० डेसिबल्सपेक्षा अधिक तीव्रतेचा आवाज सतत कानावर पडला तर बहिरेपणा येतो.

२. **शारीरिक व्याधी :** ध्वनीप्रदूषणामुळे रक्ताभिसरणाची क्रिया मंदावते. पवनसंस्थेत व श्वसनक्रियेत बिघाड होतो. मळमळणे, डोकेदुखी, रक्तदाब वाढ अशा व्याधी जडतात.

३. गरोदर स्त्रियांच्या पोटातील गर्भावर घातक परिणाम होतात.

४. गोंगाटामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होते.

५. सततच्या ध्वनी प्रदूषणामुळे मानसिक स्वास्थ्य बिघडते. निद्रानाश जडतो. स्वभाव चिडचिडा बनतो. मनावर ताण येतो. परिणामी व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते.

## ४. भूप्रदूषण किंवा मृदा प्रदूषण

''रासायनिक द्रव्ये, धातुंचे कण, कचरा, हवेतील व पाण्यातील प्रदूषके इत्यादीच्या प्रभावामुळे जमिनीचा पोत बिघडणे, तिची उपजाऊ (पिकाऊ) क्षमता कमी होणे व ती वापरण्यास निरुपयोगी होणे म्हणजे भूप्रदूषण होय.'' भूमी किंवा जमीन, तिच्यावरील माती, दगड, खडक, पर्वत, पठारे, मैदाने, वाळवंटे, जमिनीतील खनीजे इत्यादींचा भूआवरणात समावेश होतो. जमीन या परिसंस्थेतील वनस्पती, सुक्ष्मजीवजंतू, कृमीकीटक, पशुपक्षी, मानव हे सजीव असून त्यांच्या गरजा जमिनीद्वारेच पूर्ण होतात. तथापि कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे जमिनीचे/मातीचे प्रदूषण होऊन तिची नैसर्गिक गुणवत्ता ढासळत आहे.

■ **भूप्रदूषणाचे दुष्परिणाम :**

**१. सजीवांस घातक :** शेतातील रासायनिक खते व कीटकनाशके मातीत मिसळल्याने मातीतील कांही उपयुक्त जीव व वनस्पतींचा नाश होतो. खतांचे व कीटकनाशकांचे अंश भूगर्भातील पाण्यात मिसळून जलप्रदूषण होते व त्या पाण्यातील जीव नष्ट होतात. असे पाणी विहिरीत उतरून ते पिण्याने आरोग्य बिघडते. खते व कीटकनाशकातील अंश अन्नधान्ये, फळे, भाजीपाला यात उतरून ती खाल्ल्यानेही आरोग्य बिघडते.

**२. क्षारपड व नापीक जमीन :** रासायनिक खते व पाण्याचा अतिरेकी वापर होऊन जमीन क्षारपड बनते. तसेच मातीत आम्लधर्मीय व अल्कलीधर्मीय रासायनिक द्रव्ये मिसळून जमीन नापीक होते. कारखान्यातील टाकाऊ पदार्थातील रासायनिक द्रव्ये मातीत मिसळून ती नापीक बनते.

**३. रोगराई :** जमिनीवरील कचऱ्याच्या ढिगात जंतू व विषारी द्रव्ये तयार होऊन ती हवा, पाणी, खाद्यपदार्थ यांच्यात मिसळतात. या ढिगाजवळ उंदीर, माशा, डास, चिलटे इत्यादी रोगप्रसारक जीवांची वाढ होऊन रोगराई पसरते.

**४. धातुयुक्त प्रदूषके :** खाणीजवळील धातुयुक्त प्रदूषके मातीत मिसळून तिच्यातील जीवजंतू-कृमीकीटक मरतात. वनस्पतींची वाढ खुंटते. जमिनीची पीक उत्पादनक्षमता घटते. अन्नधान्यात धातुंचे कण मिसळून ते मानवी आरोग्यास घातक ठरतात.

**पर्यावरणीय प्रदूषणाची कारणे :**

पर्यावरण प्रदूषणास अनेक कारणे जबाबदार आहेत. त्या कारणांचे (अ) नैसर्गिक कारणे आणि (ब) मानवनिर्मित कारणे असे मुख्य दोन प्रकार पाडता येतात.

**अ) नैसर्गिक कारणे :**

१) ज्वालामुखीचा उद्रेक, जंगलातील वणवे यातून तयार होणारी राख, समुद्राच्या पाण्याचे बाष्पिभवन होऊन खाली शिल्लक राहिलेले क्षार, वादळांमुळे उडणारी धूळ, जैविक पदार्थांच्या विघटनातून तयार होणारे वायू व द्रव्ये हवेत मिसळून **हवा प्रदूषण** होते.

२) वादळी वारे, जमिनीची धूप, सेंद्रिय पदार्थांचे विघटन इत्यादीमुळे **जलप्रदूषण** होते.

३) ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडणारी राख व ज्वालारस जमिनीवर पसरणे, नदीच्या पुराबरोबर वाहून येणारी घाण, कचरा व इतर प्रदूषके नदीकाठावरील मातीत मिसळणे, वाऱ्याबरोबर वाहून येणारी प्रदूषके मातीत मिसळणे इत्यादीमुळे **भूप्रदूषण** (मृदाप्रदूषण) होते.

४) ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, गोंगाट करीत घोंगावणारी वादळे, पशुपक्षांचा कलकलाट इत्यादीमुळे **ध्वनीप्रदूषण** होते.

**ब) मानवनिर्मित कारणे :**

नैसर्गिक कारणामुळे होणारे पर्यावरण प्रदूषण हे फारसे गंभीर, तीव्र व धोकादायक नाही. परंतु मानवनिर्मित कारणांमुळे होणारे प्रदूषण मात्र अत्यंत घातक ठरत आहे. त्यापैकी कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे-

**१. औद्योगिकीकरण :** आधुनिक काळात सर्वच समाजात विशेषतः नागरी समाजात औद्योगिकीकरणाची गती खूपच वाढत चालली आहे. सर्वत्र विविध कारखाने निघाले आहेत. या कारखान्यातून कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डायॉक्साईड, मॅग्नेशियम डायॉक्साईड, क्लोरीन, अमोनिया इत्यादी घातक वायू तसेच धूर, धुरळा, काजळी, राख, कार्बन इत्यादी प्रदूषके हवेत मिसळून **हवाप्रदूषण** होते. तसेच ह्या कारखान्यातून रसायने, क्षार, राख, मळी, विविध धातुंचे (जस्त, तांबे, कथील, शिसे, पारा, क्रोमियम, कॅडमिअम, आर्सेनिक इ.) कण किंवा अंश कारखान्यातील सांडपाण्यात मिसळतात व ते पाणी नद्या, सरोवरे, समुद्र इत्यादीत मिसळते व **जलप्रदूषण** होते. विविध कारखान्यातील टाकाऊ पदार्थांचे जमिनीवर ढीग साचतात व त्यातील रासायनिक द्रव्ये मातीत मिसळतात. औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातून बाहेर पडणारी राख, साखर कारखान्यातील मळी इत्यादी मातीत मिसळतात व भूप्रदूषण होते. कारखान्यातील यंत्रांच्या खडखडाटामुळे ध्वनीप्रदूषण होते. थोडक्यात औद्योगिकीकरण हे पर्यावरणीय प्रदूषणाचे एक प्रमुख कारण आहे.

**२. वाहतूक साधने :** खनीज तेलावर (पेट्रोल-डिझेल) चालणाऱ्या वाहनांची शहरात प्रचंड गर्दी झालेली आहे. खनीज तेलाच्या अपुऱ्या ज्वलनामुळे कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर ऑक्साईड्स, हायड्रो कार्बन्स, शिसे, धूर व धूरके इत्यादी दूषितके हवेत मिसळून हवा

प्रदूषण होते. समुद्रातून तेल वाहतूक करणाऱ्या जहाजांना अपघात होऊन तेल समुद्रात मिसळते व जलप्रदूषण होते. अशा या वाहतुक साधनांच्या इंजिनचा आवाज व हॉर्न्स यामुळे ध्वनीप्रदूषण होते.

३. **खाणी व तेल शुद्धीकरण केंद्रे :** खाणिजवळील जमिनीत कॅडमिअम, जस्त, शिसे, तांबे, आर्सेनिक, निकेल इत्यादी धातूंचे कण मिसळून भूप्रदूषण होते. खनीज तेल शुद्धीकरण प्रक्रियेतून क्षारयुक्त पाणी, अल्कली, आम्ल, सायनाईड्स, हायड्रोकार्बन्स, फिनॉल्स इ. घातक पदार्थ तयार होऊन ते पाण्यात मिसळतात तसेच तेलगळती पाण्यात होते व जलप्रदूषण घडून येते.

४. **आधुनिक शेती :** शेती उत्पादनवाढीसाठी वापरली जाणारी रासायनिक खते व कीटकनाशके मातीत मिसळतात आणि **भूप्रदूषण** होते. अशी प्रदूषित माती पाण्याबरोबर वाहात जाऊन नदी, तळी, समुद्र यात मिसळते व **जलप्रदूषण** होते. तसेच खतातील व जंतुनाशकातील अंश भूगर्भातील पाण्यात उतरतात व ते पाणीही प्रदूषित होते. पिकावर फवारली जाणारी औषधे, रसायने, जंतुनाशके हवेत पसरून हवाप्रदूषण होते.

५. **अणुस्फोट व आण्विक कचरा :** अनुस्फोटातून अनेक किरणोत्सर्गी कण हवेत मिसळून हवाप्रदूषण होते. आण्विक कचरा डब्यात सीलबंद करून ते डबे समुद्रात खोलवर सोडतात. तथापि त्यातून गळती होऊन किरणोत्सर्जनामुळे सागरीप्रदूषण होते.

६. **कचरा व सांडपाणी :** शहरात जागोजागी कचऱ्याचे प्रचंड ढीग तयार होतात. या ढिगाऱ्यात जंतू, विषारी वायू व अन्य प्रदूषके तयार होतात. ती हवेत व पाण्यात मिसळून हवेचे व पाण्याचे प्रदूषण होते. समुद्रकिनारी व नद्यांच्या काठी आलेले पर्यटक प्लॅस्टिक, कागद व अन्य कचरा पाण्यात टाकतात व त्यामुळे जलप्रदूषण होते. शहरातील स्वयंपाकगृहे, हॉटेल्स, स्नानगृहे, शौचालये, कारखाने इत्यादीतील सांडपाणी त्यावर प्रक्रिया न करता नद्या, सरोवर, समुद्र यात सोडल्याने जलप्रदूषण होते. शहरातील उघड्या गटारीतील पाण्यात रोगजंतू तयार होऊन हवेत मिसळल्याने हवा प्रदूषण होते. मानव व इतर प्राण्यांचे मलमूत्र, अन्नधान्ये, फळे, भाज्या, इत्यादीच्या साली, मानवाने वापरून फेकून दिलेल्या वस्तूंचे जमिनीवर ढीग साचून त्यात विषारी द्रव्ये तयार होतात व मातीत मिसळतात व भूप्रदूषण होते.

७. **जंगलतोड :** मानवाने रस्ते व लोहमार्गबांधणी, घरबांधणी, फर्निचर इत्यादीसाठी लाकूड मिळावे, तसेच शेतीसाठी जमीन उपलब्ध व्हावी म्हणून प्रचंड प्रमाणावर जंगलतोड केल्याने वनस्पतींचे प्रमाण घटत आहे. परिणामी वातावरणातील कार्बनडायॉक्साईड वायू शोषून घेण्याची क्रिया मंदावत चालली आहे. परिणामी वातावरणाचे तापमान वाढून हरितगृह परिणामाची समस्या उद्‌भवल्याने हवा प्रदूषण वाढले आहे. जंगलतोडीमुळे जमिनीची धूप होऊन वाळवंटीकरणाची प्रक्रिया विस्तारत आहे. भूस्खलनाचे प्रमाणही वाढले आहे.

८. **इतर कारणे : अ) इंधने** – उष्णतेसाठी व अन्न शिजविण्यासाठी जाळल्या जाणाऱ्या लाकूड, कोळसा व अन्य इंधनामुळे धूर, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रस ऑक्साईड, सल्फर डायॉक्साईड इत्यादी हवेत मिसळून हवाप्रदूषण होते.

**ब) शस्त्रास्त्रे :** युद्धात वापरली जाणारी अण्वस्त्रे व रासायनिक तसेच जैविक अस्त्रे यांच्यामुळे प्रचंड हवाप्रदूषण होते.

**क) धुम्रपानातून** कार्बन मोनॉक्साईड, पॉलिसायक्लिक ॲरोमॅटिक, सायनाईड, बेन्झीपायरीन इ. घातक पदार्थ हवेत मिसळून हवाप्रदूषण होते.

**ड) उष्णता :** कारखान्यातील शीतकरण प्रक्रियेतून व ऊर्जा निर्मिती केंद्रातून निर्माण होणारी उष्णता नदी व तलावात सोडल्याने जलप्रदूषण होते.

■ **पर्यावरणीय प्रदूषणावरील उपाययोजना :**

पर्यावरणीय प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण करणे आणि त्याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे या उद्देशाने जगातील इतर देशांप्रमाणेच भारतातही विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. ह्या उपाययोजना अ) कायदेशीर आणि ब) प्रतिबंधात्मक अशा दोन प्रकारात विभागता येतील.

**अ) कायदेशीर उपाययोजना :**

पर्यावरणाच्या प्रदूषणास प्रतिबंध करणे व त्याचे नियंत्रणकरणे यासाठी भारतात विविध कायदे संमत केलेले आहेत. त्यापैकी कांही महत्त्वपूर्ण कायदे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. जल (प्रदूषणाचे नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम – १९७४**

हा कायदा १९७४ मध्ये भारतीय संसदेने संमत केला असून तो देशभर लागू आहे. या कायद्यानुसार केंद्रिय जलप्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य जलप्रदूषण नियंत्रण मंडळे स्थापन करण्याची तरतूद केली आहे. या मंडळांना नद्या, नाले, विहीरी, तळी इत्यादीची स्वच्छता राखण्यास चालना देणे, त्यातील पाण्याच्या प्रदूषणाबाबत संशोधन करणे, त्यासाठी प्रयोगशाळा स्थापने, जलप्रदूषणाबाबत सरकारला सल्ला देणे, जलप्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रणासंदर्भात कृती आराखडा तयार करणे, पाण्यातील प्रदूषणाचे प्रमाण ठरविणारे मानदंड निश्चित करणे इत्यादी अधिकार आहेत. या कायद्यानुसार नदी, तलाव, विहिरी इत्यादीत जाणीवपूर्वक विषारी/घातक पदार्थ सोडणे हा कायदेशीर गुन्हा ठरवून त्यासाठी ६ वर्षे कारावासाची शिक्षा निश्चित केलेली आहे. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानगीशिवाय कारखान्यातील सांडपाणी जलप्रवाहात सोडण्यास प्रतिबंध केलेला आहे. कारखान्यातील सांडपाणी तपासण्याचा अधिकारही ह्या मंडळास दिला आहे. मंडळाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास तीन महिने कारावास वा रु. १० हजार दंड अथवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात.

## २. हवा (प्रदूषणाचे नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम – १९८१

भारतीय संसदेने हा कायदा १९८१ मध्ये संमत करून देशभर लागू केला आहे. या कायद्यात केंद्रीय हवा प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच राज्य हवाप्रदूषण नियंत्रण मंडळे स्थापण्याची तरतूद आहे. ह्या मंडळांना – हवाप्रदूषणासंबंधी सरकारला सल्ला देणे, त्याबाबत संशोधन करणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कृती आराखडा बनविणे व त्याची अंमलबजावणी करणे, प्रदूषण विषयक माहिती गोळा करून प्रसिद्ध करणे, विविध प्रदूषकांचे मानदंड ठरविणे, प्रदूषणचाचणी घेण्यासाठी प्रयोगशाळा स्थापन करणे, एखादे क्षेत्र हवा प्रदूषित क्षेत्र म्हणून घोषित करणे. इत्यादी अधिकार आहेत. या कायद्यानुसार हवा प्रदूषित घोषित क्षेत्रातील कारखान्याच्या हवा प्रदूषित करण्याच्या कृतीवर निर्बंध घालता येतात. तसेच हवा प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषण न करण्याचे बंधन कारखान्यांवर घालता येते. ह्या बंधनाचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यावर हे मंडल खटला भरू शकते. निर्धारित मानदंडापेक्षा अधिक प्रमाणात हवा प्रदूषके वातावरणात सोडल्यास किंवा त्याबाबतचा मंडळाचा आदेश न पाळल्यास संबंधितास दीड वर्ष कारावास व अर्थदंड अशी शिक्षा होऊ शकते. अशा गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास वाढीव दंडाचीही तरतुद केलेली आहे.

## ३. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम – १९८६

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी १९८६ मध्ये संमत केलेल्या ह्या कायद्यात ''पर्यावरणीय प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रित करण्यासाठी'' पुढील तरतुदी केलेल्या आहेत.

अ) कारखाना/उद्योग चालविणाऱ्या जबाबदार व्यक्तिंना निर्धारित मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषके उत्सर्जित करण्यास परवानगी नाकारली अहे.

ब) धोकादायक व घातक पदार्थांच्या/द्रव्यांच्या हाताळणी संदर्भात संरक्षण कार्यपद्धतीचा अवलंब करण्याची सक्ती केली आहे.

क) एखादा कारखाना निर्धारित मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषके उत्सर्जित करीत असेल तर कारखान्यातील जबाबदार व्यक्तीने त्याचे नियंत्रण करावे व त्याची माहिती वरिष्ठास द्यावी.

ड) कारखान्यातील प्रदूषणाचे नमुने घेणे, ते चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे व प्रयोगशाळेतील निष्कर्षानुसार त्या कारखान्यास प्रदूषण नियंत्रणाच्या सूचना देणे आवश्यक आहे.

इ) या कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस पाच वर्ष कारावास किंवा रु. एक लाख दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**ब) प्रतिबंधात्मक उपाययोजना**

पर्यावरणाचे प्रदूषण होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजनेस प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणता येते. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) हवा प्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

शक्यतो कारखाने मानवी वसाहतीबाहेर काढावेत. कारखान्याची धुराडी उंच ठेवावीत. प्रत्येक कारखान्यात प्रदूषण नियंत्रक यंत्रणा बसवावी. अतिप्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर बंदी घालावी. खनीजतेलावरील वाहनांचा कमीतकमी वापर करावा. पायी जाणे, सायकलवरून जाणे, सार्वजनिक बस/रेल्वेने प्रवास करणे, आठवड्यातून किमान एक दिवस खाजगी चारचाकी/दुचाकी वापर बंदी करणे इत्यादीस प्राधान्य द्यावे. अपारंपारिक ऊर्जेवर चालणाऱ्या साधनांचा (सौरऊर्जा, पवन ऊर्जा, गोबर गॅस, सुर्यचूल इ.) वापर करावा. कोळसा व खनिज तेल याऐवजी कारखान्यात जलविद्युतचा वापर करावा. वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन, सामाजिक वनीकरण इ. उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावेत. घनकचरा जाळणे टाळावे कारण त्यामुळे हवाप्रदूषण खूप होते. बंदिस्त गटारी योजना राबवावी.

**ब) जलप्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

घरातील, हॉटेल व लॉजमधील, कारखान्यातील सांडपाणी व कचरा किंवा टाकाऊ पदार्थ जलाशयात टाकू नये. सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा वापरात आणावे, घरातील सांडपाण्याद्वारे घराभोवती बाग फुलवावी किंवा भाजीपाला लागवड करावी. नदी, तलाव, ओढे, समुद्र इत्यादीमध्ये कपडे, भांडी, जनावरे, वाहने धुणे, स्नान करणे, निर्माल्ये टाकणे बंद करावे. शेतात रासायनिक खताऐवजी सेंद्रिय खते वापरावीत.

**क) भूप्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

रासायनिक खते व जंतुनाशकाऐवजी नैसर्गिक/सेंद्रिय खते व जंतुनाशके वापरावीत. सांडपाणी मातीत मिसळू देऊ नये. कचरा जमिनीवर कुजू न देता खड्ड्यात कुजवून खत बनवावे. गांडूळ खत वापरावे. जनावरांची मुक्त चराई टाळावी. जमिनीवर बांधबंदीस्ती करावी. आलटून-पालटून पीके घ्यावीत शेतात पाण्याचा अतिवापर टाळावा. वेगवेगळ्या खाणीतील धातुंचे कण मातीत मिसळणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**ड) ध्वनी प्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

प्रत्येक कारखान्यात ध्वनी नियंत्रक यंत्रणा बसवावी. सभा संमेलने व सण उत्सव या प्रसंगी वाद्यांचा व ध्यनीसेवकांचा वापर कमीत कमी करावा. फटाके वाजविणे व दारुकाम यावर बंदी घालावी. कारखाने, विमानतळ इत्यादी मानवी वस्तीपासून दूर ठेवावेत. वाहनांना सायलेन्सर्स बसवावीत. रस्ते डांबराऐवजी अॅस्फाल्ट सिमेंटचे बनवावेत. त्यामुळे वाहतुकीचा आवाज कमी होतो. शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष

लागवड करावी. उद्याने उभारावीत. कारण पानांनी बहरलेले वृक्ष ध्वनीची तीव्रता १० ते १५ डेसिबल्सनी कमी करतात.

### ४.३.४ नगर नियोजन (Urban Planning) : प्रारंभिच्या नगर नियोजन विषयक कल्पना, उद्यान नगर प्रतिमान, महानगरीय नियोजन

नागरी समस्यांच्या अभ्यासानंतर तुम्ही आता नगर नियोजनाचा अभ्यास करणार आहात. त्यादृष्टीने प्रथम नगर नियोजनाचा अर्थ समजावून घेणार आहात आणि त्यांनतर प्रारंभिच्या नगर नियोजनविषयक कल्पना व उद्यान नगर प्रतिमान तसेच महानगरीय नियोजन यांचा अभ्यास करणार आहात.

**नगर नियोजनाचा अर्थ** (Meaning of Urban Planning)

या ठिकाणी तुम्ही नगर नियोजनाचा अर्थ समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम नियोजन म्हणजे काय हे समजावून घेऊ ''विशिष्ट हेतु किंवा ध्येय साध्य करण्यासाठी करावयाच्या क्रिया, प्रक्रिया व साधने यांची पद्धतशीर केलेली आखणी किंवा मागणी म्हणजे नियोजन'' अशी आपणास व्याख्या करता येईल. किंबाल यंग यांच्या मते मनातील हेतू किंवा उद्देश साध्य करण्यासाठी विशिष्ट दिशेने होणारे सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणारा कार्यक्रम म्हणजे नियोजन होय.

नगर नियोजन हा नियोजनाचा एक विशेष प्रकार आहे असे म्हणता येईल. नगराच्या विकासासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन असे स्थूलमानाने म्हणता येईल. नगरात राहणाऱ्या लोकांना आवश्यक त्या भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सुखासमाधानाने राहता येईल असे पर्यावरण निर्माण करणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जे नियोजन करावयाचे त्यास नगर नियोजन म्हणतात. नगर नियोजनाचा अर्थ अधिक सुस्पष्ट होण्यासाठी कांही मान्यवर शास्त्रज्ञांनी नगर नियोजनाच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे उचित ठरेल.

**नगर नियोजनाच्या व्याख्या** (Definitions of Urban Planning)

१. **स्टुअर्ट चॅपिन** - नगर नियोजन ही विकास आणि समायोजनाची प्रक्रिया आहे, जिच्यामध्ये लोकांच्या आर्थिक व सामाजिक गरजांच्या आधारे नगरातील पर्यावरणाचा विकास केला जातो.

२. **मेयर** - नगर नियोजन हे नगरातील विभिन्न घटकांना सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त करून देते.

३. **प्रा. जॅक्सन** - नगर तसेच ग्राम नियोजनाचा संबंध हा जमिनीचा किंवा भूमिचा विकास व उपयोग यांच्याशी आहे.

४. **प्रा. स्टँप** - नागरिकांचे कल्याण साधणे व त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावणे हे नगर नियोजनाचे प्रमुख ध्येय आहे.

५. **प्रा. चंद्रकांत खंडागळे** – नगरातील लोकांच्या, वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजा विचारात घेऊन त्यांना पुरवावयाच्या सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय.

वरील व्याख्यांवरून नगर नियोजनासंबंधी पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१. नगर नियोजन ही नगराच्या विकासाशी संबंधित असलेली प्रक्रिया आहे.

२. नगरात राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजांची पूर्तता करून त्यांचे कल्याण साध्य करणे व त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे हे नगर नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

३. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगरवासियांच्या केवळ वर्तमानकाळातीलच नव्हे तर भविष्यकालीन गरजा विचारात घेऊन त्यांच्या पूर्तीसाठी पद्धतशीर कार्यक्रम व योजना आखल्या जातात.

४. उपलब्ध भूमि, नगराचे भौगोलिक स्थान, त्याची विकास क्षमता, वित्तपुरवठा इत्यादी बाबी विचारात घेऊन नगर नियोजनाची आखणी केली जाते.

५. नगरातील पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, प्रकाश योजना, प्रदूषण नियंत्रण इत्यादी बरोबरच गृहबांधणी, दवाखाने, शाळा, क्रीडांगणे, उद्याने यासारख्या सुविधा सर्वांना उपलब्ध करून देण्याची योजना नगर नियोजनात आखली जाते.

थोडक्यात, नगरातील लोकांना नगरात सुखासमाधानाने राहता येईल असे भौतिक व सामाजिक पर्यावरण निर्माण करणे हा नगर नियोजनाचा उद्देश असतो.

- भारतातील प्रारंभिच्या नगरनियोजनविषयक कल्पना (Early Urban Planning Ideas in India):

भारतात आधुनिक नगरनियोजनाची सरूवात ब्रिटिश राजवटीत झाली. त्यापूर्वीच्या नगर नियोजनाविषयीच्या कल्पना पुढीलप्रमाणे समजावून घेता येतील.

- **सिंधु संस्कृतीतील नियोजनविषयक कल्पना :**

भारतातील प्रारंभिक नियोजनविषयक कल्पना समजावून घेण्यासाठी सिंधु संस्कृतीपासून सुरूवात करावी लागते. कारण सिंधु संस्कृती ही भारतातील ज्ञात असलेली सर्वात प्राचीन संस्कृती आहे. ही संस्कृती नागर संस्कृती होती. म्हणजे या संस्कृतीत अनेक नगरे होती. मोहेंजोदडो व हडप्पा या दोन नगरांचे अवशेष सापडलेले आहेत. त्यावरून सिंधू संस्कृतीतील नगर नियोजनविषयक कल्पनांची माहिती मिळते.

सिंधु संस्कृतीतील नगरे ही अत्यंत नियोजनबद्धपणे वसवलेली होती. नद्यांच्या पुरापासून नगरांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या भोवती भक्कम तटबंदी होती. या तटबंदीस वक्ररचनेची प्रवेशद्वारे होती. तसेच नगराभोवती खंदक खोदलेले होते. प्रत्येक नगरात पूर्व-पश्चिम असा मुख्य रस्ता होता. या मुख्य रस्त्यास काटकोनात छेदणारे उपरस्ते होते. रस्त्यावर प्रकाश योजना व कचरा साठवण्याची व्यवस्था होती. उप

रस्त्यांच्या दोन्ही बाजूस पक्क्या विटांची अनेक एकमजली, दुमजली व क्वचित तीन मजली घरे बांधलेली होती. घरासमोर विस्तृत अंगण व पाठीमागे परसदार असे. घरात स्नानगृह, शौचालय, शयनकक्ष, स्वयंपाकगृह अशा सुविधा असत. तर नगरात ठिकठिकाणी मोठमोठी सार्वजनिक स्नानगृहे, धान्याची कोठारे, सभागहे, समुद्रकिनारी गोदी बांधलेल्या होत्या. व्यक्तिगत व सार्वजनिक इमारतीमधील सांडपाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त गटारीही बांधलेल्या होत्या. अशी ही नियोजनबद्ध नागर संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाली असून आज तिचे केवळ अवशेष आढळतात. या अवशेषांवरून तत्कालीन नगर नियोजनाची कल्पना किती प्रगत होती हे लक्षात येते.

- **वैदिक संस्कृतीतील नियोजनविषयक कल्पना :**

सिंधु संस्कृतीच्या अस्तानंतर वैदिक संस्कृती उदयास आली. ही संस्कृती तशी ग्रामीण संस्कृती होती. तथापि, पुढे अनेक नगरे उदयास आली. या संस्कृतीतील नगरनियोजनविषयक कल्पनांची माहिती वेद, पुराणे, महाकाव्ये (रामायण व महाभारत) यासारख्या ग्रंथातून मिळते. तसेच कौटिल्याचे अर्थशास्त्र, मानसार समरांगण, सूत्रधार, शुक्रनीतीसार, अपराजित पृच्छा इत्यादी ग्रंथातून ही तत्कालीन नगररचनेची माहिती मिळते. या ग्रंथातून नगरांचे त्रिकोणी, चौकोनी, आयताकृती, गोलाकार, अर्धचंद्राकृती, भुजंगाकृती इत्यादी विविध आकारांचे वर्णन केलेले आढळते. यापैकी चौकोनी रचना ही उत्तम मानली जाई. अयोध्या व द्वारका ही नगरे आयताकृती होती. इंद्रप्रस्थ, नालंदा, तक्षशिला, मथुरा, द्वारका पाटलीपुत्र इत्यादी नगरे ही नियोजनबद्धपणे वसविलेली होती. नालंदा व तक्षशिला येथील विद्यापीठांची रचना ही नगर नियोजनाचा उत्कृष्ट नमुना होता. या काळातील नगर नियोजनाचे पुढील नऊ घटक होते. १) पाणीपुरवठा, २) मंडपरचना, ३) बाजारपेठ, ४) संरक्षण व्यवस्था, ५) शासन व्यवस्था, ६) निवासस्थाने, ७) सांडपाण्याची व्यवस्था, ८) शिक्षण संस्था, ९) उद्याने व मंदिरे.

या काळातील नगरात राजमार्ग व वाममार्ग असे मुख्य दोन रस्ते असत. या दोन्ही रस्त्यांचा छेद नगराच्या मध्यभागी होऊन तेथे चौक आखलेला असे. त्यामुळे नगराचे चार विभाग पडत. या चार विभागत व्यवसायानुरूप वसाहती असत. एकंदरीत या काळात नगरनियोजनाचा सर्वांगिण विचार केला जाई.

- **मुस्लिम राजवटीतील नियोजनविषयक कल्पना :**

वैदिक संस्कृतीनंतर भारतात मध्ययुगात मुस्लिम राजवट प्रस्थापित झाली. त्यामुळे इस्लामी नगरनियोजनाच्या कल्पना व तंत्रे भारतात आली. जेरूसलेम व दमास्कस येथील ज्यू व ख्रिस्ती शैलीचा संमिश्र प्रभाव इस्लामी वास्तू व नगरे यांच्या रचनेवर पडला. नगराच्या मध्यभागी मशिदी बांधणे, रोमन जलवाहिन्यांच्या धर्तीवर पाणीपुरवठ्याची योजना राबविणे, घराभोवती उंच भिंती संरक्षणासाठी बांधणे, अंगणात बागबगीचा फुलविणे, इमारतीवर घुमट व मनोरे इत्यादी मुस्लिम नगररचनेची वैशिष्ट्ये होती व ती भारतात आली. या काळात अनेक नवीन नगरे वसविली गेली. सम्राट अकबराने वसविलेले **फत्तेपूर सिक्री** हे नगर इस्लामी नगररचनेचा उत्कृष्ट नमूना आहे. या नगरात धार्मिक वास्तू विभाग, राजवाडे, मनोरंजन केंद्रे,

मशिदी, कबरस्थाने, दिवाण-ई-खास, दिवाण-ई-आम अशा भव्य इमारती बांधल्या. या नगराचा बुलंद दरवाजा हा अतिभव्य आहे. अशाच धर्तीवर दिल्ली, आग्रा, लाहोर येथील किल्ल्यांची मांडणी केली गेली.

इ.स. १७२८ मध्ये महाराजा जयसिंग यांनी वसविलेले जयपूर (राजस्थान) हे नगर हिंदू नगररचनेचा उत्कृष्ट नमूना आहे. येथील सर्व इमारती गुलाबी रंगाच्या आहेत. घरे एकमेकांना खेटून बांधलेली आहेत. नगराची रचना आयताकृती आहेत. नगराभोवती तटबंदी असून या तटबंदीस ८ प्रवेशद्वारे आहेत. नगराच्या चार दिशांना मोठे रस्ते आहेत. तर उपरस्ते हे अरूंद आहेत. अशाप्रकारे ब्रिटिशपूर्व भारतातील नगर नियोजनाचे स्वरूप होते.

- **उद्यान नगर प्रतिमान** (Garden City Model) :

नगर नियोजनाची चर्चा करताना उद्यान नगर म्हणजेच 'गार्डन सिटी' (ऋीवशप लळींूं) या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक ठरते. कारण वर्तमानकाळातील नगर नियोजनावर गार्डन सिटी या संकल्पनेचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. नगर किंवा शहर हे कसे सुंदर असावे याविषयीचा दृष्टिकोन गार्डन सिटी या संकल्पनेत अंतर्भूत आहे. **'होवार्ड'** या विद्वानाने इ.स. १८८८ मध्ये ''ए पिसफुल पाथ टू रियल रिफार्म'' नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात त्याने सर्वप्रथम उद्यान नगर ही संकल्पना मांडली. शहरांतील गलिच्छ वस्त्यांची समस्या (Problem of slums) सोडवून शहरांतील पर्यावरण सुधारणे या उद्देशाने होवार्डने ही संकल्पना मांडली. उद्यान नगराचे स्वरूप कसे असावे याबाबत होवार्डने पुढील मुद्दे मांडलेले आहेत.

१) कोणत्याही शहराची लोकसंख्या ही ३०,००० पेक्षा जास्त नसावी.

२) शहराभोवती हिरवीगार झाडी असावी, ज्यामुळे शहराभोवती एक नैसर्गिक तटबंदी तयार होईल.

३) शहरात बाहेरून येणाऱ्या लोकांना वस्ती करून राहण्यास परवानगी देऊ नये. त्यासाठी शहराभोवती कुंपण घालावे.

४) शहराचे लहान-लहान विभाग पाडावेत. त्यामुळे लोकांना भरपूर जागा व सौंदर्य या दोन्ही गोष्टी उपलब्ध होतील.

५) शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी शहरात आकर्षक व भव्य भवन (इमारती) व स्मारके उभी करावीत. उद्याने (बागबगीचा) व कारंजी निर्माण करावीत.

६) लोकांना राहण्यासाठी उपनगरे निर्माण करावीत.

७) शहरातील जमिनीवर व्यक्तीऐवजी समुदायाची मालकी असावी.

वरील वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या शहरास होवार्ड याने गार्डन सिटी (उद्यान नगर) असे नाव दिले आहे. होवार्डला अशाप्रकारची अनेक नगरे उभारावयाची होती.

उद्यान नगराची संकल्पना ही प्रथम दर्शनी जरी आकर्षक वाटली तरी तिच्यामध्ये अनेक दोष वा त्रुटी आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१) आधुनिक काळातील औद्योगिक नगरे ही अवाढव्य स्वरूपात विस्तारलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या भोवताली नैसर्गिक तटबंदी उभा करणे शक्य नाही.

२) आज वाहतुकीच्या साधनांमुळे स्थलांतराचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर व्यक्ती अधिक गतिशील बनली आहे. जगातील कोणत्याही भागात / देशात जाऊन तेथे वास्तव्य करण्यास व्यक्तीला परवानगी मिळू लागली आहे. अशा परिस्थितीत एखाद्या शहरात बाहेरून येणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करणे योग्य ठरणार नाही.

३) शहरातील जमिनीवर व्यक्तीऐवजी समुदायाची मालकी असावी हा विचार देखील अव्यवहार्य आहे. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलशाही विचारसरणीचा व मूल्यांचा प्रभाव वाढत चालला आहे. खाजगी मालमत्तेचे तत्त्व सर्वत्र स्वीकारले आहे. अशा स्थितीत सामुदायिक मालकीची कल्पना लागू करणे अवघड ठरेल.

वरीलप्रमाणे उद्यान नगराच्या प्रतिमानात दोष / अडचणी असल्या तरी या प्रतिमानात कांही गुणही आहेत. उदा. शहराच्या लोकसंख्यावाढीवर नियंत्रण घालणे, शहराच्या सौंदर्यात भर घालणे, राहण्यासाठी उपनगरे निर्माण करणे इत्यादी.

- **महानगरीय नियोजन** (Metropolitan Planning) :

नागरी क्षेत्राचे (Urban area) स्थलमानाने शहर (town) नगर (city) आणि महानगर (Metropolitan city) असे तीन प्रकार पाडले जातात. शहर हे खेड्यापेक्षा मोठे व नगरापेक्षा लहान क्षेत्र असते. महानगर हे नगरापेक्षा अधिक विस्तृत वा मोठे क्षेत्र असते. महानगराची लोकसंख्या अतिशय मोठी असते तसेच लोकसंख्येची घनता देखील अतिशय दाट असते. ही लोकसंख्या अत्यंत विजातिय स्वरूपाची असते. म्हणजे महानगरात विभिन्न वंशाचे, धर्माचे, जातीचे, वर्गाचे, भाषेचे, प्रांताचे लोक वास्तव्य करीत असतात. शिवाय त्यांचे हितसंबध परस्परांपासून भिन्न भिन्न असतात. अनेकदा ते हितसंबंध परस्परविरोधीही असतात. तसेच महानगरात रस्ते, इमारती, दुकाने, शासकीय-निमशासकीय कार्यालये, वाहने, संप्रेषण (लेर्ाींपळलरींळेप) साधने, व्यापार व वाणिज्य केंद्रे, उद्योगधंदे, शिक्षण व मनोरंजन केंद्रे इत्यादींची मोठी विपूलता असते. तसेच सभोवतालच्या प्रदेशातून अनेक लोक महानगरांकडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे महानगरांचा आकार व गरजा सतत वाढत असतात. तसेच महानगरातील समस्यांची तीव्रताही वाढत असते. त्यामुळे महानगरासाठी नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. तथापि, आधुनिक काळात महानगरासाठी नियोजन करणे हे अत्यंत गुंतागुंतीचे व कठीण होऊन बसलेले आहे. या ठिकाणी तुम्ही महानगरासाठी करावयाच्या नियोजनाचे स्वरूप समजावून घेणार आहात.

- **महानगरीय नियोजनाचा अर्थ :**

महानगरातील लोकांच्या वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा विचारात घेऊन त्यांना पुरवावयाच्या सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे महानगरीय नियोजन होय. महानगरातील लोकांना अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना शारीरिक व मानसिक स्वास्थ्य मिळवून देणे, त्यांचे कल्याण साध्य करणे हे महानगरीय नियोजनाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महानगरीय नियोजनात पुढील बाबींचा विचार करावा लागतो.

**१) परिवहन व्यवस्था पद्धतशीर व नियंत्रित करणे :**

महानगरात अंतर्गत वाहतूकीसाठी सायकल, रिक्षा, मोटार सायकल, मोटार, रेल्वे अशी विभिन्न वेगाची वाहने वापरली जातात. या वाहनांची संख्या प्रचंड मोठी असते. त्यामुळे महानगरात वाहतूकीत अडथळे येऊन वाहतूकीची कोंडी होणे, अपघात होणे अशा दुर्घटना वारंवार घडत असतात. त्यामुळे महानगरात रस्ते व रेल्वे मार्ग बांधणे, त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते व त्यासंबंधीचे नियोजन करावे लागते. महानगराच्या विविध भागांना व उपनगरांना जोडणारे रस्ते बांधणे, चौकात वाहतूक नियंत्रक दिवे (ट्रॉफिक सिग्नल) बसविणे, गरजेनुसार रस्त्यावर पूल, उड्डाण पूल, भूयारी मार्ग, फूटपाथ इत्यादी सुविधा उभाराव्या लागतात. वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस नेमणे, रस्त्यावर प्रकाश योजना उभारणे, नदीकाठच्या महानगरात अंतर्गत जलवाहतूक व्यवस्था करणे इत्यादी बाबींचे नियोजन करावे लागते. भारतातील मुंबई, दिल्ली, कोलकत्ता, चेन्नई, बंगळूर, हैद्राबाद, पुणे इत्यादी महानगरांमध्ये वरील वाहतुकविषयक बाबींचे नियोजन केलेले दिसून येते.

**२) वाहनतळ उभारणे :**

वाढत्या लोकसंख्येबरोबरच नगरात इमारती, कार्यालये, दुकाने, घरे, बाजारपेठा इत्यादी वाढत जाऊन नगरातील रस्ते अपुरे पडतात. लोक रस्त्यावरच वाहने उभी करतात. परिणामी वाहतुकीस अडथळा येतो. अपघात होतात. म्हणून नगरात वाहने उभी करण्यासाठी (पार्किंगसाठी) खास वाहनतळ (पार्किंग झोन) निश्चित करावे लागतात. म्हणजेच लोकांना आपली वाहने उभी करण्यासाठी ठिकठिकाणी मोकळी जागा उपलब्ध करून द्यावी लागते. दुचाकी-चारचाकी, लहान-मोठ्या अशा वाहनंसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करावी लागते. अनेक नगरात आज 'पे-पाकिंग' (म्हणजे पैसे देऊन वाहन उभे करणे) सुविधा पुरविली जाते. आवश्यक तेथे 'नो पार्किंग' चे फलकही लावावे लागतात.

**३) जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणे :**

महानगरामध्ये मर्यादित भूभागावर मोठ्या लोकसंख्येचे केंद्रिकरण झालेले असते. त्यातच सभोवतालच्या प्रदेशातील लोक महानगरांकडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे महानगरात जमिनीची टंचाई निर्माण होते. म्हणून लोक रिकाम्या जागेवर अतिक्रमण करून झोपड्या, दुकाने, स्टॉल, हातगाड्या उभारण्याची शक्यता

असते. हे अतिक्रमण टाळण्यासाठी महानगरात जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवावे लागते. त्यादृष्टिने रस्ते, गटारी, फुटपाथ, शासकीय व खाजगी जागा इत्यादीवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे, घरांच्या मजल्यांवर नियंत्रण ठेवणे, रस्त्यापासून किती अंतर ठेवून इमारत बांधावी हे ठरविणे, दोन घरातील अंतर ठरविणे, बगीचे क्रिडांगणे, दवाखाने, शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था इत्यादीसाठी नगरातील मोक्याच्या जागा आरक्षित करणे, चटई क्षेत्र ठरवून देणे इत्यादी गोष्टींचा विचार नगर नियाजेनात करावा लागतो.

**४) गलिच्छ वस्तू निर्मूलन / सुधारणा :**

आज सर्वच नगरात विशेषत: महानगरात गलिच्छ वस्त्यांची (झोपडपट्टीची) समस्या गंभीर बनलेली आहे. नगरात राहत्या जागेची टंचाई निर्माण होऊन जमिनीचे भाव गगनाला भडल्याने जागा खरेदी करून घर बांधणे गरीबांना शक्य नसते. म्हणून ते वाटेल तेथे झोपड्या उभारतात. तेथे नागरी सुविधा नसतात. सर्वत्र घाणीचे साम्राज्य असते. म्हणून नगरातील प्रदूषण व रोगराई वाढते. त्यामुळे अशा गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करून तेथील लोकांना पक्की घरे व नागरी सुविधा (रस्ते, पाणी, वीज, शौचालय, गटारी इ.) पुरविणे आवश्यक असते. आज बहुतेक महानगरपालिकामध्ये गलिच्छ वस्ती सुधार समिती स्थापन केलेली असून ती याबाबतचे नियोजन करते. त्यानुसार सध्याच्या जागेतच लोकांना पक्की घरे व नागरी सुविधा पुरविल्या जातात. किंवा झोपडपट्टी उठवून तेथील लोकांना अन्य ठिकाणी घरे बांधून दिली जातात. एखाद्या झोपडपट्टीचे निर्मूलन करावयाचे कि तिच्यात सुधारणा करावयाची याचा निर्णय घ्यावा लागतो.

**५) गृहनिर्माण योजना राबविणे :**

आज नगरात-महानगरात स्वत:चे घर बांधणे हे सामान्य लोकांसाठी अशक्य ठरत चालले आहे. कारण जागेचे दर प्रचंड वाढलेले आहेत. त्यामुळे नगर नियोजन करताना अल्प उत्पन्न असलेल्या लोकांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे आवश्यक बनलेले आहे. अल्पदरात, अल्प क्षेत्रफळाची घरे बांधून दिल्यास लोकांची निवासाची समस्या सूटू शकते. शिवाय झोपडपट्ट्या उभारण्यास प्रतिबंधही होऊ शकतो. महाराष्ट्रात गृहबांधणीस उत्तेजन देण्यासाठी ''गृहनिर्माण विकास वित्तसहाय्य महामंडळ'' (HDFC) स्थापन करून लोकांना वाजवी दराने गृहबांधणीसाठी कर्ज पुरवठा केला जतो. आज गृहनिर्माण योजना ही नगर नियोजनातील एक महत्त्वपूर्ण तत्त्व मानले जाते.

**६) विविध विभाग (नेपश) पाडणे :**

नगरातील गर्दी कमी करणे, प्रदूषणास आळा घालणे, वाहतुकीवरील ताण कमी करणे, नगरातील परीसर स्वच्छ, स्वास्थ्यवर्धक व सुंदर ठेवणे इत्यादीसाठी नगराचे विविध विभाग पाडावे लागतात. त्यानुसार अवजड उद्योगधंदे, लघु उद्योगदंदे, बाजारपेठा, निवास, शासकीय कार्यालये, शैक्षणिक व आरोग्य सुविधा, मनोरंजन केंद्रे इत्यादीसाठी वेगवेगळे विभाग पाडून ज्या-त्या विभागत ज्या-त्या सुविधा निर्माण करण्यासाठी

तरतूद करावी लागते. थोडक्यात नगरात विशिष्ट ठिकाणी दाटी होणार नाही याचा विचार नगर नियोजनात करावा लागतो.

**७) आवश्यक सेवा-सुविधा पुरविणे :**

नगरातील लोकांना आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरविण्याचा विचार देखील नगर नियोजनात करावा लागतो. नागरीकांना स्वच्छ, शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी नगराबाहेरील जलाशयातून (नदी, सरोवर) पाईप लाईन टाकून नळाद्वारे घराघरात पाणी पुरवठा करावा लागतो. तसेच सांडपाण्यासाठी बंदिस्त गटार योजना (ड्रेनेज) तयार करावी लागते. शहराला वीज पुरवठा करण्याची यंत्रणाही उभारावी लागते. कांही महानगरात स्वयंपाकाचा गॅस देखील बंदिस्त नळाद्वारे पुरविला जातो. या सेवा सुविधा कांही ठिकाणी महानगरपालिका तर कांही ठिकाणी राज्य वा केंद्र सरकार पुरविते.

**८) स्वच्छता :**

शहरात प्रचंड प्रमाणात कचरा तयार होत असतो. त्यामुळे त्याची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावावी लागते. अन्यथा कचरा कुजून प्रदूषणाचा धोका वाढतो. त्यासाठी कचराकुंड्या, कचरा उचलण्यासाठी वाहने, रस्ता व गटारी सफाई करणारे कर्मचारी, माशा, डास, उंदरे, मोकट जनावरे यांचा बंदोबस्त इत्यादींची व्यवस्था करावी लागते. एकंदरीत नगरातील परीसर स्वच्छ ठेऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागते.

**९) नगराचे सौंदर्य :**

नगर नियाजेनात नगराचे सौंदर्य वाढविण्याचा विचारही करावा लागतो. त्यासाठी नगरात ठिकठिकाणी उद्याने उभारणे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करणे, चौकात कमानी व रंगीबेरंगी कारंजे उभारणे, नगराजवळ नदी, तलाव असेल तेथे नौकानयनाची (जलविहाराची) सोय करणे, मुलांसाठी विविध खेळाची मैदाने व साहित्य उपलब्ध करून देणे, मनोरंजनकेंद्रे उभारणे इत्यादी सुविधा निर्माण करून नगराचे सौंदर्य खुलविण्याची तरतूद नगर नियाजेनात करावी लागते.

## अद्ययावत नगरे (Smart Cities)

महानगरीय नियोजनानंतर आता तुम्ही अद्ययावत नगर म्हणजेच स्मार्ट सिटी (यालाच सायबर व्हिले, डिजिटल सिटी, इलेक्ट्रॉनिक समुदाय, फ्लेक्झीसिटी, इंटलिजंट सिटी, नॉलेज-बेसड् सिटी, टेलीसिटी, युबिक्विटस सिटी, वायर्ड सिटी इत्यादी पर्यायी नावे आहेत.) ही संकल्पना अभ्यासणार आहात. आज अनेक देशांत अद्ययावत नगरे उभारली असून भारतासह इतरही अनेक देश ती उभारण्याचे अभियान (mission) राबवित आहेत. अद्ययावत नगरांचा अभ्यास करताना प्रथम त्यांचा अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये थोडक्यात समजावून घेणे उचित ठरते.

**अद्ययावत नगराचा अर्थ व व्याख्या :**

अद्ययावत नगर ही संकल्पना नगराच्या नूतनीकरणाशी वा अत्याधुनिकीकरणाशी संबंधित आहे. तथापि, अद्ययावत नगराचा अर्थ स्पष्ट करणे किंवा त्याची सर्वत्र लागू पडेल व सर्वमान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. कारण अद्ययावत नगर ही संकल्पना स्थितीशिल (static) नसून गतिशील (dynamic) आहे. कारण तिच्यात सातत्याने नवनवीन गोष्टी समाविष्ट होत आहेत. तसेच अद्ययावत नगर उभारण्याच्या प्रक्रियेत विविध टप्पे असल्याने या नगराची वैशिष्ट्ये अद्याप पुरेशा प्रमाणात स्पष्ट झालेली नाहीत. त्यामुळे अद्ययावत नगराचा अर्थ विविध तऱ्हेने स्पष्ट केला जाऊ शकतो. विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या त्यामुळेच विविध तऱ्हेच्या असलेल्या दिसून येतात. अद्ययावत नगराचा अर्थ समजण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊ या.

१) **चंद्रकांत खंडागळे :** माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा राज्यकारभारात व अन्य व्यवहारात होणारा प्रगमनशिल वापर, अत्याधुनिक सोयीसुविधांची मुबलक उपलब्धता, उच्च जीवनमान, शाश्वत विकासास व प्रदूषणमुक्त पर्यावरणास प्राधान्य, समुदाय विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांचा पर्याप्त सहभाग, इतर समुदायासाठी विकासाचा आदर्श नमुना म्हणून ओळखले जाणे इत्यादी प्रभेदक वैशिष्टे असलेल्या सुविकसित नगरास अद्ययावत नगर म्हटले जाते. (A well developed city having distinctive characteristics like, progressive use of information communication technology in governance and other affairs, an aboundant availability of ultra-modern facilities, high standard of living, priority to sustainable development and pollution free environment, an adequate citizens' participation in the process of community development, recognized as a role-model of development for other communities etc., is known as smart city.

२) **फ्रॉस्ट आणि सल्लीव्हॅन** (Frost and Sullivan) : अद्ययावत नगराची व्याख्या करणारे पुढील आठ आधारभूत पैलू आम्ही निवडलेले आहेत. ते म्हणजे अद्ययावत राज्यकारभार, अद्ययावत ऊर्जा, अद्ययावत इमारती, अद्ययावत गतिशिलता, अद्ययावत पायाभूत सेवा, अद्ययावत तंत्रज्ञान, अद्ययावत आरोग्याची काळजी आणि अद्ययावत नागरिक (We identified eight key aspects that define a smart city : smart governance, smart energy, smart buildings, smart mobility, smart infrastructure, smart etchnology, smart healthcare and smart citizen.)

३) **डिकीन** (Deakin) बाजाराच्या (नगरातील नागरिकांच्या) मागण्या पूर्ण करण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करणारे नगर म्हणजे अद्ययावत नगर होय आणि या प्रक्रियेत समुदायाचा आस्थापूर्वक सहभाग असणे अद्ययावत नगरासाठी आवश्यक असते. (Deakin defines the smart city as one that utilises Information Communication Technology to meet the demands of

the market (the citizens of the city), and that community involvement in the process is necessary for a smart city.)

४) **स्मार्ट सिटी कौन्सिल :** अद्ययावत नगर म्हणजे असे नगर की, ज्याच्या सर्व कार्यांमध्ये डिजिटल तंत्रज्ञान खोलवर रूजविलेले असते. (A smart city is one that has digital technology embedded across all city functions.)

५) **बिझनेस डिक्शनरी :** अद्ययावत नगर म्हणजे असे विकसित नागरी क्षेत्र की, जे अर्थव्यवस्था, गतिशिलता, पर्यावरण, लोक जीवन, शासन या अनेकविध आधारभूत क्षेत्रातील श्रेष्ठत्वाद्वारे शाश्वत आर्थिक विकास व उच्च गुणवत्तेचे जीवन निर्माण करते. आधारभूत क्षेत्रातील हे श्रेष्ठत्व भक्कम मानवी व सामाजिक भांडवल आणि/किंवा माहिती संप्रेषण तंत्रज्ञानातील पायाभूत सुविधा यांच्याद्वारे साध्य केले जाऊ शकते. (A smart city is a developed urban area that creates sustainable economic development and high quality of life by excelling in multiple key areas; economy, mobility, environment. People living and government. Excelling in these key areas can be done so through strone human capital, social capital and/or ICT infrastructure).

६) **भारत सरकार :** अद्यावत नगर हे आपल्या रहिवाश्यांमधील विस्तृत घटकांची शिक्षणाची पातळी कौशल्य किंवा उत्पन्न पातळी विचारात न घेता, त्यांना आर्थिक क्रिया व रोजगाराच्या संधी याबाबतची शाश्वतता देते. (Smart city offers sustainability in terms of economic activities and employment opportunities to a wide section of it's residents, regardless of their level of education. Skills or income level's.)

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, अद्ययावत नगर हे शासन व स्थानिक लोकांच्या सहभागाने नियोजनबद्धपणे सुविकसित केलेले नगर असते. त्यामध्ये सर्व क्षेत्रात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर होत असतो. विविध पायाभूत सुविधा मुबलक असतात. नागरिकांचे जीवनमान उच्च असते. त्यात शाश्वत विकासास अग्रक्रम दिला जातो. प्रदूषण मुक्त पर्यावरण निर्माण केले जाते. युरोपियन संघाने आपली महानगरे अद्ययावत बनविण्यासाठी विशेष कष्ट घेतले. सार्वजनिक सेवांचे आधुनिकीकरण, गुणवत्तापूर्ण जीवन व माहितीतंत्रज्ञानाचा वापर यावर या संघाने प्रचंड खर्च केला. स्पेनमधील Bletchley Park हे पहिले स्मार्ट नगर मानले जाते. याशिवाय दुबई, मिल्टन केन्स, साऊथम्पटन, ॲमस्टरडम, बर्सेलोना, माद्रिद, न्युयार्क, हाँगकाँग इत्यादी अद्ययावत नगरे म्हणून विकसित केली आहेत.

**अद्ययावत नगराची वैशिष्ट्ये**

वरील विवेचनाच्या आधारे अद्ययावत नगराची पुढील वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील.

१) **सुविकसित नगर :** अद्ययावत नगर हे नियोजनबद्धपणे चांगल्याप्रकारे विकसित केलेले किंवा अत्याधुनिकीकरण केलेले नगर असते. त्याला विकसित/अत्याधुनिक बनविण्याच्या प्रक्रियेत शासनाबरोबरच

नगरातील नागरिकांचाही पर्याप्त सहभाग असतो. हे नागरिक जागृत, विकासाभिमुख व सहयोग देणारे असतात. त्यामुळेच नगरास अद्ययावत/विकसित बनविणे शक्य होते.

२) **माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर :** अद्ययावत नगरातील सर्व व्यवहारात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रगमनशिलपणे वापर होत असतो. म्हणजेच या तंत्रज्ञानात वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा वा बदल स्वीकारून त्यांचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान नगरात होणाऱ्या सर्व क्षेत्रात खोलवर रुजविलेले असते. उदा. नगरात वाईफाई सिग्नल सर्वत्र सतत असतात. संपूर्ण नगर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असते. वाहतूक नियंत्रणासाठी हे तंत्रज्ञान वापरले जाते. नगरातील स्वशासनसंस्था नागरिकांशी ऑन लाईन पद्धतीने व्यवहार करीत असते. सर्व व्यवहार संगणकावर नोंदविले जातात. प्रशासकीय कारभार जास्तीत जास्त कागदविरहीत (Paperless) करण्यावर भर दिला जातो. इत्यादी. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर हे अद्ययावत नगराचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे हे सर्वमान्य आहे.

३) **अत्याधुनिक सुविधा :** अद्ययावत नगरात अत्याधुनिक सोयीसुविधा मुबलक प्रमाणात/गरजेपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध असतात आणि त्यांचे सातत्याने नूतनीकरण होत असते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, अद्ययावत नगर हे नागरिकांच्या गरजांपेक्षा दोन पावले पुढे असते. या नगरात वीज, पाणी, गॅस इ. चा २४ तास पुरवठा असतो. रस्ते विस्तृत व सुशोभित असतात. पादचारी व विभिन्न गतीची वाहने यांच्या सोयीसाठी रस्त्याचे विभाजन केलेले असते. परिणामी, रस्ते अपघात व वाहतूक कोंडी अशा समस्या जवळपास नसतात. शिक्षणसंस्था, आरोग्यकेंद्रे, दवाखाने, कार्यालये, सार्वजनिक केंद्रे, इत्यादी भव्य व अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असतात. सर्वांना शिक्षण, मनोरंजन, सुरक्षा इत्यादीच्या सुविधा उपलब्ध असतात. त्यामुळे नगरातील रहिवाशांच्या जीवनमानाचा दर्जा उच्च असतो व तो अधिकाधिक उंचावण्याचे प्रयत्न सतत केले जातात.

४) **शाश्वत विकास :** अद्ययावत नगरात शाश्वत आर्थिक-सामाजिक विकास घडवून आणण्यास प्राधान्य दिले जाते. नागरिक उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती काळजीपूर्वक वापरतात. साधनसंपत्तीच्या नवनवीन स्त्रोतांचा शोध घेत राहतात. खाजगी तसेच सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेतात; तिची नासधूस करीत नाहीत. साधनसंपत्तीचा अतिरेकी व अविवेकी वापर टाळतात. पुढील पिढींच्या गरजांचा विचार करून आपल्या गरजा पूर्ण करतात.

५) **प्रदूषणमुक्त पर्यावरण :** अद्ययावत नगरातील पर्यावरण हे प्रदूषणमुक्त ठेवण्यावर भर दिला जातो. लोक प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळतात. अधिक प्रदूषण करणाऱ्या सुविधांचा वापर करणे टाळतात. पर्यावरणस्नेही वस्तू, यंत्रे व तंत्रे वापरतात. रस्ते, गटारी, सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवतात. साफसफाईचे महत्त्व जाणतात. म्हणून ते कमीत कमी कचरा करतात. या नगरातील स्थानिक शासनसंस्थादेखील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करते. कचऱ्याचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करते. कचऱ्यापासून पुनर्निर्माण व पुनर्वापर करण्यावर भर देते. नगरात शक्य तेथे वृक्षलागवड करून नगरास हिरवेगार बनविते. गलिच्छ

वस्त्यांचे निर्मूलन/सुधारणा करण्याच्या योजना राबविते. परिणामी, नगरातील पर्यावरण हे स्वच्छ, आरोग्यदायी व संतुलित राहते. त्यामुळे हे नगर इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनते.

**६) आदर्श नमुना :** अद्ययावत नगर हे उत्कृष्टपणे विकसित केलेले नगर असते. त्यामुळे ते समुदाय विकासाच्यादृष्टीने आदर्श नमुना (rold-model) मानले जाते. सभोवतालचे नागर तसेच ग्रामीण समुदाय त्याच्याकडे विकासाचा आदर्श नमुना (प्रतिमान) म्हणून पाहतात. त्याचे अनुकरण करू पाहतात. अद्ययावत नगरही त्यांना विकसाबाबत प्रेरणा, मार्गदर्शन व मदत देण्याचे काम करते. एकंदरीत अद्ययावत नगर हे इतरांसाठी पथदर्शक असे असते.

**भारतातील अद्ययावत नगर अभियान** (Smart City Mission in India)

गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदींनी २०११ मध्ये अहमदाबादजवळ 'गुजरात इंटरनॅशनल फाइनेंशल टेक (GIFT)' या नावाने भारतातील पहिले अद्ययावत नगर उभारण्यास सुरुवात केली. पुढे २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यावर त्यांनी भारतात १०० अद्ययावत नगरे उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यानुसार २५ जून २०१५ रोजी १०० अद्ययावत नगरे अभियान (100 Smart City Mission) सुरू केले व त्यासाठी एकूण ९८ हजार कोटी रुपये इतकी रक्कम मंजूर केली. या रक्कमेतून १०० नगरे विकसित करण्याचे व ५०० नगरांचे पुनर्नविनीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. यापैकी ४८ हजार कोटी रुपये हे अद्ययावत नगर अभियानासाठी व ५० हजार कोटी रुपये हे ''अटल पुनर्नविनीकरण व नागरी रुपांतरण अभियान'' (Atal Mission for Rejuvenation & Urban Transformation -AMRUT) यासाठी आहेत. हे अभियान निवडलेल्या शहरांच्या राज्यशासनाच्या सहकार्याने केंद्रीय नागरी विकास मंत्रालयाने राबवावयाचे आहे. या अभियानांतर्गत १०० नगरांची नामांकने घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी केली आहेत. या शहरांची निवड स्पर्धात्मक पद्धतीने केलेली आहे. त्यामध्ये प्रत्येक राज्यातून व केंद्रशासित प्रदेशातून किमान एक नगर असेल याची काळजी घेतली आहे. ह्या अभियानात पहिल्या टप्प्यात २०, दुसऱ्या टप्प्यात ४० व तिसऱ्या टप्प्यात ४० या क्रमाने निवडलेल्या नगरांना अद्ययावत बनविण्यात येणार आहे. हे अभियान २०१७-२०२२ या पाच वर्षात राबविले जाणार आहे. २०२२ नंतर या अभियानाचे परिणाम दिसून येण्यास सुरुवात होईल.

**या अभियानाची वैशिष्ट्ये –**

- अद्ययावत नगरांचे काम दोन टप्प्यात चालेल. नवीन नगरे निर्माण करणे व जुन्या नगरांचे नूतनिकरण करणे.
- किमान १ लाख लोकसंख्या असलेले नगर अद्ययावत केले जाईल.
- दोन मोठ्या नगरांच्या मध्ये एक अद्ययावत नगर उभारले जाईल.

- मोठ्या नगराजवळील लहान नगरात वीज, पाणी, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, मनोरंजन, आरोग्य, शिक्षण, गॅस इत्यादीबाबतच्या अत्याधुनिक सुविधा पुरविण्यात येतील.
- कांही नगरांच्या विकासासाठी परकीय मदत मिळविली जाईल. उदा. वाराणसीस जपानने तर दिल्लीस कतार या देशाने मदत देण्याचे मान्य केले आहे.

अद्ययावत नगरे ही जवळच्या इतर नगरांना विकासाच्या संदर्भात मदत व मार्गदर्शन देतील.

**अभियानाचे फायदे :**

भारतातील अद्ययावत नगर अभियान केवळ शहरांसाठीच नव्हे तर खेड्यांसाठी व संपूर्ण देशासाठी फायदेशीर ठरणारे आहे. कारण अद्ययावत नगरे ही खेड्यांना मदत करतील. लहान लहान नगरातील लोकांना विकासाच्या संधी मिळतील. परकीय कंपन्या अद्ययावत नगरात येतील व रोजगार वाढेल. त्यामुळे बेकारी व दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती होईल. आज भारताचा विकासाचा वेग कमी आहे कारण बहुसंख्य लोक अद्याप डिजिटलच्या दुनियेपासून दूर आहेत. अद्ययावत नगरांच्या उभारणीमुळे हे दूरत्त्व कमी होईल. परिणामी, संपूर्ण देशच अद्ययावत बनेल व विकसित देशांच्या यादीत स्थान मिळविल.

**या अभियानासमोरील आव्हाने :** भारतातील अद्ययावत नगरे अभियान फायदेशीर ठरणारे आहेच. मात्र या अभियानासमोर कांही आव्हाने आहेत ती पुढीलप्रमाणे :

- अद्ययावत नगरांच्या उभारणीसाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. हा निधी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान आहे. २०१४ च्या अंदाजपत्रकात वित्तमंत्री अरुण जेठलीनी १५० अद्ययावत नगरांसाठी ७०१६ कोटी रुपये मंजूर केले होते. तथापि, केवळ ८२४ कोटी रुपयेच फेब्रुवारी २०१५ पर्यंत खर्च केले होते. त्यामुळे २०१५ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात या प्रकल्पासाठी केवळ १४३ कोटी रुपयांचीच तरतूद केली गेली. निधीच्या बाबतीत अशीच परिस्थिती राहिली तर या अभियानाच्या मार्गात अडथळे येऊ शकतात.
- अद्ययावत नगरांच्या उभारणीसाठी अनेक बदल करणे गरजेचे आहे. त्यासाठी नगर नियोजनाबाबतचे नवीन कायदे करणे तसेच जुन्या कायद्यात दुरुस्ती/सुधारणा करणे आवश्यक आहे. असे कायदे संमत करून घेणे हेही एक आव्हान ठरते.
- अद्ययावत नगरांमध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञान सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापरावयाचे आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा अतिरेक हा कांही नवीन समस्यांना/दुष्परिणामांना कारणीभूत ठरू शकतो. या दुष्परिणामांकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे ठरते. इंटरनेटद्वारे होणारे माहितीचे आदानप्रदान फायदेशीर असले तरी या सुविधाचा दुरूपयोग होणार नाही याचीही काळजी घ्यावी लागेल. म्हणजेच सायबर गुन्हे वाढण्याची शक्यता आहे व ते नियंत्रीत करण्याचे मोठे आव्हान या नगरांसमोर आहे.

- अद्ययावत नगरे अभियान यशस्वी होण्यासाठी केवळ निधी, तंत्रज्ञान, कायदे इत्यादीचीच पूर्तता होणे पुरेसे नाही तर लोकदेखील अद्ययावत म्हणजेच स्मार्ट बनले पाहिजेत. म्हणजेच लोक जागृत, सुसंस्कृत, शिस्तबद्ध, कायदेपालन करणारे सहकार्य देणारे असले पाहिजेत. भारतीय लोकांची मानसिकता पाहता लोकांना अद्ययावत बनविणे हे एक मोठेच आव्हान ठरते.

## ४.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्न.**

१. कोणत्या साली ''गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधार योजना'' सुरू केली?

अ) १९५६ ब) १९६० क) १९६५ ड) १९७०

२. कोणत्या साली 'दि नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सीस ॲक्ट' संमत झाला.

अ) १९८० ब) १९८२ क) १९८५ ड) १९९०

३. फत्तेपूर सिक्री हे शहर कोणी वसविले?

अ) बाबर ब) अकबर क) शहाजन ड) शेरशहा सूरी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. मादक द्रव्य (Drug) म्हणजे काय?

२. पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे काय?

३. नगर नियोजनाचा अर्थ सांगा.

## ४.५ सारांश (Let us sum up)

या घटकात तुम्ही सर्वप्रथम निवासाची व स्वच्छतेची समस्या, मादकद्रव्यासक्तीची समस्या, आणि पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या ह्या चार नागरी समस्यांचे स्वरूप, कारणे व उपाययोजना यांचा अभ्यास केलेले आहे.

नागर समाजात लोकांची गर्दी वाढत गेल्याने राहत्या जागेची टंचाई निर्माण होऊन जमिनीचे भाव प्रचंड वाढल्याने सामान्यांना घर बांधणे अवघड बनले आहे. त्यामुळे शहरात असे लोक झोपडपट्ट्या बांधून राहू लागतात. अशा झोपडपट्टीत नागरी सुविधांचा अभाव असल्याने तेथील वातावरण आरोग्यास घातक असते. यातूनच शहरात निवासाची व गलिच्छ वस्तीची व स्वच्छतेची समस्या उद्भवलेली आहे. केंद्र व राज्य सरकारांद्वारे ही समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. यानंतर तुम्ही मद्यपान व मादक द्रव्यासक्तीची समस्या अभ्यासली अहे. शहरात अनेक व्यक्ती विविध प्रकारच्या मादक पदार्थांच्या

सेवनाच्या आहारी गेलेल्या आहेत. यालाच मादकद्रव्यासक्ती असे म्हणतात. ही आसक्ती निर्माण होण्यास शारीरिक मानसिक, सामाजिक, आर्थिक, कारणे जबाबदार आहेत. मद्यपान व मादक द्रव्यासक्तीची समस्या सोडविण्यासाठी शासनाकडून ''दि नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकेट्रॉपिक सबस्टन्सीस ॲक्ट – १९८५'' हा कायदा संमत केलेला आहे. तसेच शासकीय दवाखान्यात अशा व्यसनाधिन लोकांवर उपचार करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. सर्वात शेवटी तुम्ही पर्यावरणाच्या प्रदूषणाच्या समस्येचा अभ्यास केलेला आहे. पर्यावरणातील हवा, पाणी, ध्वनी, भूमी इत्यादी घटक दूषित होणे व ते सजीवास हानिकारक ठरणे याला पर्यावरणाचे प्रदूषण असे म्हणतात. प्रदूषणाचे हवाप्रदूषण, जलप्रदूषण, भूमीप्रदूषण व ध्वनीप्रदूषण असे चार प्रकार पडतात. या प्रदूषणाचे मानवासह संपूर्ण जीवसृष्टीवर गंभीर दुष्परिणाम होत आहेत. पर्यावरणाच्या प्रदूषणास औद्योगिकीकरण, वाहतूक साधने, खाणी, तेलशुद्धीकरण प्रकल्प, आधुनिक शेती, जंगलतोड, अणुस्फोट, कचरा व सांडपाणी, युद्धे इत्यादी कारणे जबाबदार आहेत. प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रित करण्यासाठी सरकारने विविध कायदे संमत केलेले आहेत.

नगर नियोजन ही नागर समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. नगराच्या विकासासाठी–विस्तारासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय. नगरवासियांना नगरात सुखसमाधानाने राहता येईल असे पर्यावरण उपलब्ध करून देणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते. या ठिकाणी तुम्ही भारतातील प्रारंभिच्या नगरनियोजन कल्पना, उद्यान नगर प्रतिमान व महानगरीय नियोजन तसेच अद्ययावत नगरे यांची चर्चा केलेली आहे.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) अ    २) क    ३) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जागतिक आरोग्य संघटनेच्या मतानुसार मादकद्रव्य म्हणजे असा कोणताही रासायनिक पदार्थ किंवा द्रव्य, जे सजीवाने शरीरात घेतले असता त्याच्या एका किंवा अनेक कार्यात बदल घडून येतो.

२. पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणाचे घटक असलेल्या हवा, पाणी, भूमी इत्यादींच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मात होणारे असे अवांछनीय परिवर्तन, की जे सजीवांचे आरोग्य, क्षमता व कृती यांना धोकादायक ठरते.

३. नगरातील लोकांच्या, वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजा विचारात घेऊन त्यांना पुरवावयाच्या सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय.

## ४.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. गलिच्छ वस्ती निर्मूलनासाठी केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

२. मादकद्रव्यासक्तीच्या समस्येची विविध कारणे विशद करा.

३. पर्यावरण प्रदूषणाचे प्रकार स्पष्ट करा.

४. नगर नियोजनाचा अर्थ स्पष्ट करून महानगरीय नियोजन स्पष्ट करा.

५. स्वच्छतेच्या समस्येची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१. गलिच्छ वस्ती निर्माण होण्याची कारणे.

२. मादक द्रव्यासक्तीवरील उपाययोजना

३. पर्यावरण प्रदूषणाची कारणे

४. पर्यावरण प्रदूषणास प्रतिबंध करणारे कायदे

५. अद्ययावत नगरे

## ४.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- तुमच्या जवळपासच्या नगरास भेट देऊन तेथील समस्या सोडविण्यासाठी राबविल्या जात असलेल्या उपाययोजनांची नोंद करा.
- एखाद्या महानगरपालिकेच्या आयुक्ताशी चर्चा करून नगर नियोजनाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडथळ्यांची नोंद करा.
- स्वच्छ भारत अभियानाविषयी सविस्तर माहिती मिळवा.

## ४.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ (Suggested Readings)


१. Ram Ahuja (2002), Social Problems in India, Rawat Publications, Jaipur.

२. Rajendra K. Sharma (1997), Urban Sociology, Atlantic Publishers & Distributors, New Delhi.

३. प्रा. डॉ. सतीश डोंबरे (२००७), जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४. डॉ. सर्जेराव साळुंखे (२००२), समकालीन भारतातील सामाजिक समस्या, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५. प्रा. चंद्रकांत खंडागळे (२००७), नागर समाजशास्त्र, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


❑❑❑